Impact Factor 5.888
www.sjifactor.com

p-ISSN 2454-7409
e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
यांचा संयुक्त उपक्रम

वर्ष नववे अंक पहिला जानेवारी २०२४
Vol. 9 Issue 1
Jan. 2024
Regular Issue

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

## MPSP

www.indiramahavidyalaya.com

**Peer Reviewed Annual National Indexed Research Journal in Marathi**

**Published as per UGC (India) Guidelines**

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती व अस्मिता जोपासणारे मराठी विषयाचे प्राध्यापक,
संशोधक आणि अभ्यासक यांच्या संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

Online & Print

**Published By**
**DBMRC**
**INDIRA MAHAVIDYALAYA**
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)

Impact Factor 5.888 p-ISSN 2454-7409 e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

# (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 9 ISSUE 1 January 2024
वर्ष नववे, अंक पहिला, जानेवारी २०२४

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

**सहसंपादक व प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

## संपादक मंडळ **Editorial Board**

प्रा. रेखा वाठ, प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे, डॉ. कैलाश नेमाडे, डॉ. दशरथ चव्हाण

1. **Prof. R.M. Wath,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rekhawath23@gmail.com Mobile No.: +91-9422153353
2. **Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: +91-9923909296
3. **Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: +91-9420199479
4. **Dr. K.R. Nemade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: krnemade@gmail.com Mobile No.: +91-7020242364
5. **Dr. D.M. Chavhan,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: dmchavhan1985@gmail.com Mobile No.: +91-9637360295

## Invited Editors

**1. Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
**2. Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**3. Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
**4. Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

1. **Mrs. Sonali Dahalkar**, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
2. **Dr. J. Prabhash**, Former Pro-VC, Uni. of Kerala, Thiruvananthpuram, Director General of State institute of parliamentary affairs, Visiting fellow of diff. Uni. Australia, USA
3. **Dr. Ramesh Mangal**, Ex. Principal, MKHS Guj. College & Director SVCC, Indore, M.P.
4. **Dr. Anil Gajbhiye**, Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
5. **Dr. Shashikant Sawant**, Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.
6. **Dr. P.W. Kale**, Ex. Dean, Faculty of Commerce, S.G.B. Amravati University, Amravati
7. **Dr. Leela More**, Ex-Professor, Government College, Indore, M.P.
8. **Dr. Sindhu Mandavkar**, Ex-Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra
9. **Dr. Upinder Dhar,** Vice Chancellor, Shri Vaishnav Vidyapeeth Vishwavidylaya, Indore, MP
10. **Dr. Karunesh Saxena,** Vice Chancellor, Sangam University, Bhilwara, Rajasthan
11. **Dr. Rajesh Vyas,** Principal, Christian Eminent College, Indore, M.P.
12. **Dr. Atul Patel,** Dean, Smt. Chandaben M. Patel Institute of Computer Applications, Charotar University of Science and Technology, Changa, Gujarat.

**मुद्रक :** सेवा प्रकाशन, विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ व संगणक :** डॉ. पवन मांडवकर

## Communication

Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
E mail: marathipradhyapak@gmail.com
Alternate mail id: researchjournalofindia@gmail.com
Telephone: +91-7201-226147, 226129 Mobil No.: +91-9422867658, +91-9403014885
**Website:** www.indiramahavidyalaya.com

**Online Access Free / Subscription for hard copy for a year including special issues Rs. 500/-**
by crossed Cheque or by DD or by RTGS/IMPS A/c in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre,** A/c No. 60175373000, Bank Of Maharashtra, Branch - Azad Maidan Road, Yavatmal, IFSC - MAHB0000047, MICR - 445014001

(सूचना : या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. संदर्भ वापरताना या नियतकालिकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | जयंत पवार यांच्या कथेतील महानगरीय जाणिवा | डॉ. कैलास सोनू महाले | ५–९ |
| २ | युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकराची वैचारिक ग्रंथसंपदा | प्रा. डॉ. मीनाक्षी देव (निमकर) | १०–१३ |
| ३ | आत्मचरित्र : स्वरूप आणि संकल्पना | डॉ. शीतल मारुती कोरडे | १४–१९ |
| ४ | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | प्रा.डॉ. अतुल नारायण चौरे | २०–२४ |
| ५ | स्वातंत्र्योत्तर भारतातील ग्राम दुर्देशेची कारणे–राष्ट्रसंताचे पोवाडे | डॉ. प्रवीण कारंजकर | २५–२९ |
| ६ | नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेतील प्रयोगशीलता | डॉ. सागर गवई | ३०–३५ |
| ७ | साहित्य आणि समाज : एक जैविक अनुबंध | डॉ. अनमोल शेंडे | ३६–४१ |
| ८ | जीवनाच्या संघर्षाची गाथाः दडपलेल्या व्यथा | प्रा.डॉ. मिलिंद कांबळे | ४२–४७ |
| ९ | 'प्रवाहपतीत' या कादंबरीतील व्यक्तिचित्रण | डॉ. लालबा चां. दुमटकर | ४८–५० |
| १० | संत साहित्य आणि समाजप्रबोधन | डॉ. पद्माकर डिगांबर वानखडे | ५१–५५ |
| ११ | रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील सामाजिकतेचे परिशिलन | प्रा. डॉ. भास्कर पाटील | ५६–६२ |
| १२ | संत साहित्य व समाज प्रबोधन | प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके | ६३–६७ |
| १३ | अंजनाबाई खुणे यांच्या पाच निवडक कविता | प्रा. डॉ. अनंत वराडे | ६८–७१ |
| १४ | आनंद यादव यांची कविता: एक अवलोकन | डॉ. गजानन भाऊराव घोंगटे | ७२–७५ |
| १५ | 'शबरी' कादंबरीतील विभावरी शिरूरकरांच्या लौकिक जीवनाच्या प्रतिबिंबाचा शोध | उज्वला नामदेवराव जानवे<br>मार्गदर्शक -<br>डॉ. परमानंद बावनकुळे | ७६–८१ |
| १६ | रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यांमधील भटक्या समाजाच्या व्यथा-वेदना | प्रा. डॉ. नवनाथ अंगद शिंदे | ८२–८९ |
| १७ | महाराष्ट्र धर्माचे उद्गाते - संत शिरोमणी नामदेव ॥ | डॉ राजेश मिरगे | ९०–९३ |
| १८ | कोंडी : राजकारणात गुरफटलेल्या ग्रामवासीयांचे चित्रण | डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे | ९४–९७ |
| १९ | संत जनाबाईच्या अभंगांतून व्यक्त होणारे स्त्रीमन | प्रा.डॉ. सविता माधवराव पवार | ९८–१०१ |
| २० | मराठी काव्यातील ग्रामीण संस्कृती | डॉ. शरद वाघोळे | १०२–१०५ |
| २१ | खानदेशातील अस्सल लोककलेचे संचित : वही गायन | प्रा. दीपक संतोष पवार | १०६–१०९ |
| २२ | भारतीय ज्ञान परंपरा आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण | डॉ. पवन मांडवकर | ११०–११४ |
| २३ | मराठीची जडणघडण आणि मराठी लेखनाचे आधुनिक तंत्रज्ञान | डॉ. सौ. वीरा मांडवकर | ११५–१२० |

# संपादकीय

'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'चा नवव्या वर्षीचा पहिला अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. शोधनिबंध लेखकांनी शोधनिबंध लेखनाच्या आंतरराष्ट्रीय पद्धती पाळून त्याचा मूल्यात्मक व वाङ्मयीन दर्जा सांभाळावा, ही आमची अपेक्षा असते. त्यात गोषवारा अथवा सारांश, बीजशब्द, प्रस्तावना, निष्कर्ष किंवा समारोप, संदर्भ यांचा समावेश अनिवार्यपणे करावा. शुद्धलेखनाच्या चुका नसाव्यात. शोधनिबंध पूर्णतः तपासूनच पाठवावा. जर्नल हे गूगल, एसएसआरएन, रिसर्च गेट यांच्याशी लिंक केले असल्याने आपल्या निबंधाचे शीर्षक, लेखकाचे नाव व गोषवारा युनिकोड फॉन्टमध्ये मराठीत व त्याखाली इंग्रजीत अनुवाद टाईम्स न्यू रोमन मध्ये पाठविल्यास त्याचा आपल्याला फार मोठा फायदा होतो.

या अंकासाठी संशोधकांनी विविध विषयांवरील उत्तमोत्तम शोधनिबंध प्रकाशनार्थ पाठविले व पीअर रिव्ह्यू समितीकडून झालेल्या छाननीतून प्रकाशनयोग्य अशा निबंधांना स्वीकारल्यानंतर हा अंक तयार झाला आहे. आंतरराष्ट्रीय नियमावलीनुसार शोधनिबंध प्रकाशित करण्यासंदर्भात सर्व संशोधक, अभ्यासक लेखकांना आम्ही सतत आवाहन करतो आणि त्याला शोधनिबंधलेखकांकडून योग्य प्रतिसाद मिळतो. यूजीसीचा नियतकालिकांसदर्भात जी नियमावली आहे, तिचे तंतोतंत पालन 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका' करते. हे नियतकालिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या मार्गदर्शनात प्रकाशित होते. पी–आयएसएसएन व इ–आयएसएसएन प्राप्त या नियतकालिकाचा इम्पॅक्ट फॅक्टरही पाचच्या वर आहे.

हे जर्नल इंदिरा महाविद्यालयाच्या www.indiramahavidyalaya.com या वेबसाईटवर Research Journal या हेडमध्येही ठेवले जाते. Peer Reviewed जर्नल असल्याने यातील शोधनिबंध विविध प्राधिकरणांवरील निवडीसाठी ग्राह्य धरले जातात. तसेच एपीआयसाठी Peer Reviewed जर्नलमधील शोधनिबंधांचे गुण ग्राह्य धरता येतात.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने अधिकाधिक दर्जेदार शोधनिबंध ऑनलाईन व ऑफलाईन प्रकाशित करण्याची संधी 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'ला मिळत राहील, हीच अपेक्षा!

— डॉ. पवन मांडवकर
व संपादक मंडळ

# जयंत पवार यांच्या कथेतील महानगरीय जाणिवा

**डॉ. कैलास सोनू महाले**
सहायक प्राध्यापक,
पदव्युत्तर मराठी अध्ययन आणि संशोधन केंद्र
रा.ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर
ksmahale5580@gmail.com संपर्कध्वनी - 9405553512

## गोषवारा :

नव्वदनंतरच्या जागतिकीकरणाच्या कालखंडात जयंत पवार यांनी महानगरीय जीवनवास्तव आपल्या कथेतून प्रखरपणे मांडलेले दिसते. महानगरीय संवेदनेच्या अंतरंगात शिरून त्याचा तळ ढवळणाऱ्या कथा लिहिणाऱ्यात जयंत पवार हे नाव आघाडीवर आहे. माणूस व लेखक म्हणून असलेली त्यांची तीव्र संवेदनक्षमता त्यांच्या कथेतून जाणवते. जयंत पवार यांच्या कथेला समकालीन जीवनातले अनेक पैलू आहेत. महानगरातले विविध स्वरूपी वास्तव त्यांनी आपल्या कथा लेखनातून मांडले आहे. वास्तव चित्रणातून मानव्याचा शोध घेण्याची तीव्र लालसा त्यांच्या लेखनात दिसते. गुंतागुंतीचे ताणतणाव, मानवी जगण्याचा संघर्ष व माणूसपणाचा शोध हे विषय त्यांच्या कथेच्या केंद्रस्थानी आहेत. महानगरातील पालटलेल्या स्थिती गतीचा, सामान्य माणसाच्या विस्थापनाचा, कष्टकरी कामगारांच्या समूह मानसिकतेचा तळठाव ही कथा घेते. महानगरीय जीवनाची गुंतागुंत, असंख्य व्यक्तींची स्वभाव दर्शने, परागंदा आणि अस्तंगत वाटेवरील सामान्यांच्या अस्वस्थ जगाचे चित्र मांडणाऱ्या जयंत पवार यांच्या कथेने मराठी साहित्यात वेगळा ठसा उमटवला आहे. इतकेच नाही तर मराठी कथेच्या कक्षा रुंदावण्यात त्यांचे योगदान महत्वाचे आहे.

## पार्श्वभूमी :

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतीय भांडवलशहांच्या हातात अर्थव्यवस्था आली. या काळात भांडवलदार उद्योगपतींचा वर्ग, जमीनदारांकडून दडपलेला शेतकरी वर्ग आणि बुद्धिजीवी पांढरपेशा, व्यावसायिक वर्ग अशी वर्गवारी झाली. याबरोबरच महानगरातील कारखान्यातून काम करणारा कामगार वर्ग अस्तित्वात आला. महानगरातील व्यक्तींचे धावपळीचे जीवन, त्यांच्या समस्या, चंगळवाद, पाश्चिमातीकरण इत्यादी प्रभावातून महानगरीय साहित्य निर्माण झाले. महानगरी जीवनव्यवस्थेत सर्वच बाबतीत आलेली आधुनिकता, घडलेले बदल या काळातील अन्य साहित्यप्रकारांप्रमाणे कथेनेदेखील स्वीकारलेले दिसतात. अनुभवाचा परिघ विस्तारत अवकाशाच्या बाहेर जावून महानगरातले वास्तव, तेथील जीवनसंघर्ष नव्वद नंतरच्या जागतिकीकरणाच्या कालखंडात अनेक कथाकारांनी मांडला आहे. विशेषतः व्यक्ती आणि समूहाच्या प्रश्नांची मांडणी करण्याचा प्रयत्न जयंत पवार, समर खडस, प्रशांत बागड, पंकज कुरुलकर, सतीश तांबे, विजय तांबे,मनस्वीनी लता रवींद्र आदी कथाकारांनी केला आहे. खरेतर स्थित्यंतराचा बदलाचा काळ असल्याने विषयाचे वेगवेगळे स्तर लेखकांना खुणावत होते, मात्र समकालीन लेखकांना ते सर्वच कवेत घेता आले नाहीत. जयंत पवार, सतीश तांबे असे काही मोजकेच कथाकार हे महानगरीय वास्तव समर्थपणे मांडू शकले. विशेषत: जयंत पवार यांनी महानगरीय जीवनवास्तव आपल्या कथेतून प्रखरपणे मांडलेले दिसते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात जयंत पवार यांच्या कथेतून महानगरीय जाणीव कशी प्रकट झाली आहे हे विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

# जयंत पवार यांच्या कथेतील महानगरीय जाणिवा :

मराठी साहित्य क्षेत्रात नव्या पिढीचे नाटककार, कथाकार व पत्रकार म्हणून जयंत पवार सर्वपरिचित आहेत. १९८५ पासून त्यांनी विविध मासिके व नियतकालीकातून पत्रकार म्हणून काम केले होते. गेल्या काही वर्षात महानगरीय संवेदनेच्या अंतरंगात शिरून त्याचा तळ ढवळणाऱ्या कथा लिहिणाऱ्यात जयंत पवार हे नाव आघाडीवर आहे. संवेदनशील नाटककार म्हणून त्यांची ओळख आहेच; पण त्याचबरोबर त्यांनी महानगरीय कनिष्ट मध्यमवर्गीय, शोषितांचे विश्व साकारणाऱ्या कथादेखील लिहिल्या आहेत. भाऊ पाध्येच्या कथांनी ते प्रभावित झाले. त्यांची जडणघडणही गिरणगावात झाली आहे. तेथील अंतर्बाह्य रूप अनुभवत त्यांनी ते सहानुभूतीपूर्वक उमजून घेतले. बालपणापासून पाहिलेले गिरणगाव, साहित्यिकांचे जग व पत्रकारितेमुळे जगाकडे पाहण्याची आलेली खुली नजर, गिरणी संप, जातीय दंगली, जागतिकीकरणाचे भलेबुरे आघात या सगळ्याचा परिणाम जयंत पवार यांच्या कथालेखनावर झालेला दिसतो. ऐंशीनंतरच्या काळातील त्यांचे कथालेखन आश्वासक आणि अधिक अपेक्षा निर्माण करणारे आहे. प्रस्तुत अभ्यासात जयंत पवार यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर', 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा', 'लेखकाचा मृत्यू आणि इतर गोष्टी' व 'मोरी नींद नसानी होय' या चारही कथासंग्रहातील कथालेखनाचा विचार केला आहे. मुंबई महानगरातील गिरणी संपानंतरच्या काळातील तेथील माणसांचे जगणे आस्थेवाईकपणे पाहणारा लेखक म्हणून जयंत पवार यांच्याकडे पाहावे लागेल. माणूस व लेखक म्हणून असलेली त्यांची तीव्र संवेदनक्षमता त्यांच्या कथेतून जाणवते. नव्वद नंतरच्या काळात कथालेखन करत असताना जयंत पवार यांना जागतिकीकरण व त्यानंतरच्या बदललेल्या परिस्थितीचे समग्र व सजग भान आलेले दिसते. आधुनिक काळात संपूर्ण महानगरीय समाजव्यवस्था ढवळून निघाली. त्यातून झालेले बदल त्यांनी कथेतून मांडले आहेत. खाउजा धोरणाने संपूर्ण समाजजीवनच बदलून गेले. एकूण समाजजीवनात झालेले हे बदल कथाकार जयंत पवार यांनी बारकाईने टिपले आहेत. त्याचे पडसादही त्यांच्या कथेतून उमटलेले आहेत.

जयंत पवार यांच्या कथांबाबत विवेचन करताना त्यातील अनुभवविश्व, जीवन जाणिवा, व्यक्तिचित्रण, निवेदन व भाषाशैली हे घटक केंद्रस्थानी ठेवले आहेत. त्यांच्या या चारही कथासंग्रहातील कथांचा भौगोलिक अवकाश हा प्रामुख्याने महानगर आहे. त्यादृष्टीने पवारांची कथा ही 'महानगरीय संवेदनेची कथा' आहे. “गंभीर व सकस नाटकं लिहिणारा नाटककार अशी जयंत पवार यांची ओळख आहेच, पण त्याचबरोबर अभिव्यक्तीचा अस्सलपणा टिकवून ठेवत महानगरातील जीवनवास्तवाला परिणामकारकतेने साकारण्यात जयंत पवारांचे योगदान महत्वाचे ठरते. आपल्या कथालेखनातून मुंबईतील कनिष्ठ मध्यमवर्गीयांचे प्रश्न ते मांडतात. गिरणी कामगारांच्या संघर्षाचे संदर्भ या कथांमधून व्यक्त होतात.” (पवार, २०१०, पृ.१८) या कथांचे अवलोकन करताना त्यातील संवेदनशीलता, भाषिक अभिव्यक्ती आणि पात्रांची सामाजिक पार्श्वभूमी हे गुणविशेष भाऊ पाध्ये यांचा कथालेखनाशी वारसा सांगणारे आहेत, असे म्हणता येईल. 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' हा २०१० साली प्रकाशित झालेला जयंत पवार यांचा पहिला व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कथासंग्रह आहे. तर 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा' हा २०१५ साली प्रकाशित झालेला संग्रह होय. त्यानंतर 'लेखकाचा मृत्यू आणि इतर गोष्टी'(२०२०) व 'मोरी नींद नसानी होय'(२०२१) हा अखेरचा कथासंग्रह आहे. या चारही कथासंग्रहात महानगरीय जाणीव ठळकपणे प्रकट झाली आहे. जयंत पवारांच्या कथांमध्ये महानगरातील माणसांची होणारी मानसिक कोंडी, हिंसाचार, सततची धावपळ व जगण्यासाठी चाललेली धडपड तसेच श्रमजीवी वर्गाच्या हालअपेष्टा, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, मुंबईतील बकाल जीवनचित्रण ही आशयसूत्रे दिसतात. महानगरातील विविध स्तरातील जग अगदी बारकाव्यानिशी त्यांच्या कथेत येते. गिरणी कामगार, झोपडपट्टी, स्वच्छता कर्मचारी, फुटपाथ, रेल्वेस्टेशन, रेड लाईट एरिया, कामगार चाळ असे विलक्षण स्वरुपाचे जग ही कथा

मांडते. आपल्या कथा लेखनामागील प्रेरक जाणीव प्रकट करताना स्वत: जयंत पवार म्हणतात, "मी आयुष्याची तीस-बत्तीस वर्षे जिथे घालवली तो गिरणगाव, नाटकवाल्यांचं जग, साहित्यिकांचं जग, पत्रकारितेच्या निमित्ताने जगाकडे बघायची खुली झालेली खिडकी, मुंबईतला गिरण्यांचा संप, बाबरीकांड, धार्मिक पुनरुज्जीवनवाद आणि जातीय दंगे, जागतिकीकरणाचे भलेबुरे आघात या सगळ्याचा परिणाम माझ्या जाणिवांवर आणि पर्यायाने लेखनावर झालेला आहे." (पवार,२०१०,पृ.६५) मुंबईतील कनिष्ठ मध्यमवर्गीयांचे दुःख मांडतानाच गिरणी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडणारी जयंत पवारांची कथा आहे. कामगारांचे संप, संघटनांच्या भूमिका, अंतर्गत दुही याचे चित्रण त्यांच्या 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर', 'एका रोमहर्षक लढ्याचा गाळीव इतिहास' या कथांमधून येते. गिरणगावच्या बदलत्या रुपात उपरा ठरलेला कामगार, त्याचा संघर्ष याचे चित्रण वास्तव रुपात व्यक्त झाले आहे. 'साशे भात्तर रुपयांचा सवाल अर्थात युद्ध आमचे सुरु!' या त्यांच्या कथेतून कामगारांमध्येच परस्पर संघर्ष पेटवून देऊन संघटनाशक्ती संपवून टाकण्याचे गिरणीमालकांचे षड्यंत्र उघड झाले आहे. गिरणी मालकापासून तर गिरणी कामगारापर्यंत आणि बिल्डरांपासून तर विस्थापित झोपडपट्टी वासीयांपर्यंत अवघं नागर जीवन 'वरनभातलोन्चा नि कोन नाय कोन्चा' या संग्रहातील कथा आपल्या कवेत घेताना दिसतात. दीर्घ पल्ल्याच्या असल्या तरी आणि कथांतर्गत पात्रांची संख्या खूप मोठी असली तरी, कथेला कल्पनारम्यता, अद्भुतता यांची बेमालूम जोड दिल्याने कथेतील वंचितांच्या आयुष्यातील जीवघेणं वास्तव व त्या वास्तवाआड दडलेलं कारुण्य खिळवून ठेवतं. आपल्या कथाविषयक भूमिकेशी ठाम राहून जयंत पवार आपल्या कथेतून वास्तवाआड दडलेलं अगोचर विदारक सत्य वाचकाला गोचर करून दाखवतात, त्यामुळेच वास्तव आणखीनच प्रखरपणे काळजाला भिडत राहतं.

'लेखकाचा मृत्यू आणि इतर गोष्टी' या कथासंग्रहाच्या माध्यमातून जयंत पवार यांनी लघुकथा आणि कथा यांच्या सीमारेषा धूसर करणारा नवाच रूपबंध घडवला आहे. या संग्रहातील अनेक कथा महानगरातील अभावग्रस्त मानवी जगणे अत्यंत संवेदनशीलपणे व्यक्त करणाऱ्या आहेत. 'बाबू भंगारवाल्याच्या आयुष्यातील दुपार' व इतर कथांमधून ही संवेदनशीलता प्रकट झाली आहे. सामान्य माणसांच्या जगण्यातील हतबलता व्यक्त करताना येथील व्यवस्थेवर कथाकाराने चांगलेच ताशेरे ओढले आहेत. 'मोरी नींद नसानी होय' या कथेत महानगरातील रेल्वे फ्लॅटफॉर्मवरचं जग पाहिलं तर तिथल्या चहाच्या टपऱ्या, वेठबिगारीसारखी कामं करणारी तिथली मुलं, ती मुलं जिथून आणि ज्या परिस्थितीत आणली गेली आहेत त्याचं वास्तव, त्या मुलांच्या गावाकडचं उध्वस्तलेपण, विधवा आया आणि कर्जाच्या दाबातून असहायतेतून दूर लोटावी लागणारी पोटची पोरं, शेताच्या बांधावरून आईला शेवटचं पाहत त्यांनी गाव सोडणं, रेल्वेचा प्रवास करत मुंबईत दाखल होणं आणि नव्या विश्वात निमुटपणे शरण जाणं इथपर्यंतचा प्रवास अत्यंत संवेदनशीलपणे टिपत महानगरातील जीवघेणे वास्तव उभे केले आहे. बिहार ते मुंबई या व्यापक अवकाशात साकार झालेल्या या कथेत नंदकिशोर हा किशोरवयीन मुलगा आपल्या कुटुंबाला कर्जाच्या दलदलीतून बाहेर काढण्यासाठी मुंबईला येतो. राधेश्यामच्या चहा - नाश्त्याच्या गाड्यावर काम करतो. आपल्या निरागसतेने तिथला अवकाश भारून टाकतो. बिरजी त्याला उभारी देतो, विश्वास देतो. पुढे बिरजीच आध्यात्मिक गुरुच्या नादाने त्याच्या मृत्यूस कारण ठरतो. अंतासमयी किशोरच्या डोळ्यासमोर माई, बडकी, नन्हे यांचे चेहरे तरळून जातात. शहर माणसाला एकटं करुन खुडून टाकतं, तेच त्याचं भागधेय ठरतं. जयंत पवार यांनी अतिशय बारकाव्यानिशी हे जग रेखाटले आहे. बंबया बोली आणि उत्तर प्रदेशातील भोजपुरी बोलीच्या मिलाफातून ही कथा त्यांनी सजीवरित्या साकारली आहे. 'रमाकांत ....एक खोल विवर' ही कथा महानगरातील तळाशी असलेल्या सफाई कामगारांचे जग पृष्ट्स्तरावर आणते. रमाकांत साठे या शिकलेल्या तरुणाला घाणीत काम करायचे नसते. बापाच्या ॲक्सिडेंटमुळे नाईलाजाने तो सफाई कामगाराची नोकरी स्वीकारतो. प्रेयसी मेघनास परिस्थिती समजल्यावर त्यास नाकारते. रमाकांत या घटनेने स्वतः भोवतीच्या खोल विवरात रुतत जातो. कुठल्या

दुःखाच्या फेऱ्यात आपण लपेटलो जातोय हे त्याला कळत नाही. नियतीनेच नियत केल्यासारखेच त्याचे आयुष्य घाणीच्या साम्राज्यात लोटले जाते. तो या व्यवस्थेविषयी अतिशय तिखटपणे भाष्य करतो. मेघनालाही 'यास जबाबदार कोण?' या आशयाचा संदेश पाठवतो. एकूणच काळ कितीही पुढे सरकला तरी परंपरागत ढाचे निखळून पडत नाहीत. जन्मतःच शिक्का कपाळी बसतो. महानगरातील हे मॅनहोलमधले जग हेलावून टाकणारे आहे. त्यातील दृश्यसंवेदना जीवघेणी आहे.

१९९० नंतर जागतिकीकरणाची एक मोठीच लाट आली.मध्यम व नवमध्यम वर्गसमूह त्यातून तयार झाला. पैसा हाच सुखी जीवनाचा मंत्र मानला जाऊन त्यासाठी सततचा संघर्ष व स्पर्धा सुरु झाली. स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी वाटेल ती तडजोड, अर्थकेंद्री जीवनव्यवहार त्यातून अनेक सामाजिक व आर्थिक प्रश्न निर्माण झाले. या सर्व घटना-घडामोडी ही जयंत पवारांच्या कथेची प्रेरणा आहे. महानगरातीलहेवास्तव,संवेदना,बदलते संदर्भ त्यांच्या कथेतून व्यक्त होतात. मुंबईत झालेले बॉम्बस्फोट, दहशतवादी कारवाया, स्त्रियांवरील अत्याचार, भाषिक व धार्मिक प्रश्नांवरून झालेले वाद इ. संदर्भ जयंत पवार यांच्या कथेतून येतात. या सर्व परिस्थितीत सामन्य माणूस हा भयभीत झाला असून त्याची ही असुरक्षितता 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन' या कथेतून व्यक्त होते.

जयंत पवारांच्या कथेतून 'नैतिकता' या मूल्यसंकल्पनेवर प्रकाश टाकला गेला आहे. नैतिकतेच्या समाजमान्य संकल्पना आणि नव्या व्यवस्थेत निर्माण झालेली 'नैतिकता' यांच्यातील संघर्ष पवारांच्या कथेतून अधोरेखित होतो. योग्य-अयोग्य, पापपुण्य, नीती-अनीती यांच्यातील अंतर्विरोध व त्यातून माणसांच्या मनाची होणारी कोंडी नेमक्या स्वरुपात मांडली गेली आहे. जयंत पवार यांच्या 'छटाकभर रात्र तुकडा-तुकडा चंद्र' व 'चंदूच्या लग्नाची गोष्ट अर्थात सड्डम मे टढ्ढूम' या कथांमधून ही आशयसूत्रे व्यक्त होतात. समकालीन सामजिक वास्तव व त्यातील बदलते संदर्भ यांना आपल्या लेखनाच्या आशयसूत्रांशी जयंत पवार यांची कथा थेटपणे जोडून घेते. महानगरात घडणाऱ्या भयावह वास्तवाची जाणीव त्यांच्या कथांमधून व्यक्त होते. जागतिकीकरणाचे भयावह रूप हे आशयसूत्र अनेक कथांमध्ये आहे. कौटुंबिक पातळीवरील परस्पर संघर्ष, आंतरिक ताणतणाव, चंगळवादी संस्कृती, महानगरातून उखडल्या गेलेल्या कामगारांचे भावविश्व, त्यांचे संसार अशा विविधांगी जाणिवा व बदलत्या सामाजिक संदर्भाचे सूत्र जयंत पवारांच्या कथेतून येते. सर्वात महत्वाचे म्हणजे कथाकार जयंत पवार हे भोवतालच्या घटनांचा केवळ वेध घेत नाहीत, तर मानवी जीवनाच्या संदर्भात या बदलत्या समाजवास्तवाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करतात. आयुष्याची ३० ते ३२ वर्ष या महानगरात घालवल्यामुळेच त्याकडे बघण्याची एक नेमकी दृष्टी त्यांना लाभली आहे व हीच त्यांच्या कथालेखनाची विशेष ताकद म्हणता येईल.

समकालीन मराठी कथेत जीवनचित्रण, व्यक्तिरेखा, निवेदन, समाजवास्तव, भाषाशैली याबाबतीत जे विविध प्रयोग झाले त्यात जयंत पवार यांच्या कथालेखानातील वैशिष्ट्यांची नोंद घ्यावी लागते. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि विशेषतः महानगरातील बदलत्या संदर्भांना आपल्या कथाविश्वातून चिंतनशील प्रतिसाद त्यांनी दिला. रचनापद्धती, निवेदनशैली याबाबत नाविन्यपूर्ण मांडणी जयंत पवार यांच्या कथेत दिसते. कथेतील पात्र साकारण्यात,कथा निवेदनात पवार यांनी काही पारंपरिक संकेत वापरले तर काही ठिकाणी निवेदनाचा, भाषाशैलीचा वेगळा प्रकारही वापरला आहे. उदा. 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन', 'जन्म एक व्याधी', 'छटाकभर रात्र तुकडा-तुकडा चंद्र' या कथांमधून बेभरवशाचा निवेदक वाचकांशी संवाद साधतो.

महानगरातील बदलत्या समाजजीवनाचे भयावह वास्तव, त्यासंबंधीच्या जाणिवा जयंत पवार यांच्या कथा लेखनातून जाणवतात, ही आजच्या मराठी कथेसंदर्भात महत्वाची घटना आहे. भाऊ पाध्ये यांच्या नंतर महानगरीय जाणिवेची कथा लिहिणारा, ती परंपरा जोपासणारा एक महत्वाचा कथाकार म्हणून जयंत पवारांच्या कथालेखनाची व त्यातील अस्सल अभिव्यक्तीची नोंद घ्यावी लागेल. जयंत पवार हे 'कथा' या माध्यमाच्या नव्या शक्यता तपासून पाहणारे गंभीर लेखक आहेत. महानगरीय वास्तवाचे

तेथील समाजजीवनासह अनेक चिंतनाचे विषय त्यांच्या कथालेखनातून समोर येतात. त्यांची कथा वाचकाला सतत जागी ठेवते. निखिलेश चित्रे यांनी जयंत पवार यांच्या कथालेखनाबद्दल नोंदवलेले निरीक्षणमहत्वाचे आहे. ते म्हणतात, "जयंत पवार यांच्या कथा म्हणजे व्यक्तीच्या समाजात जगण्याचे दस्तऐवज आहेत. समाजात जगताना होणारे आनंद आणि त्रास त्यांच्या संपूर्ण व्यामिश्रतेसकट या कथा वाचकापुढे मांडतात. आजच्या मराठी साहित्यात पवारांची उपस्थिती आश्वासक आणि अधिक अपेक्षा निर्माण करणारी आहे." (पवार,२०१०, पृ.२२) जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण आणि खासगीकरणामुळे होणाऱ्या कथित विकासप्रक्रियेशी तसेच त्या अनुषंगाने बदललेल्या जीवनमूल्यांशी जुळवून घेऊ न शकल्याने भरडली जाणारी, उद्ध्वस्त होणारी माणसं हा जयंत पवार यांचा आत्मीयतेचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. शोषित-वंचितांचे कथाविषय, ही माणसं, त्यांचं भागधेय आणि त्या भागधेयाशी झगडत, संघर्ष करत, कधी पराभूत होत, तर कधी त्यावर स्वार होत आयुष्य व्यतीत करणारी सामान्य माणसं त्यांना कायम साद घालताना दिसतात. परिस्थितीनं पिचलेली माणसं जयंत पवारांना आपलीशी वाटतात. त्यांची सुख-दु:खं, त्यांचं जगणं म्हणूनच त्यांचे कथाविषय बनतात  हे त्यांच्या कथासंग्रहातील कथांमधून जाणवते.

## समारोप :

जयंत पवार यांच्या कथेला समकालीन जीवनातले अनेक पैलू आहेत. महानगरातले विविध स्वरूपी वास्तव त्यांनी आपल्या कथा लेखनातून मांडले आहे. वास्तव चित्रणातून मानव्याचा शोध घेण्याची तीव्र लालसा त्यांच्या लेखनात दिसते. गुंतागुंतीचे ताणतणाव, मानवी जगण्याचा संघर्ष व माणूसपणाचा शोध हे विषय त्यांच्या कथेच्या केंद्रस्थानी आहेत. एकसूत्री अनुभव केंद्राचे प्रकटीकरण ते करीत नाहीत तर अनेक प्रकारची अनुभवसूत्रे त्यांच्या कथा लेखनातून व्यक्त झालेली आहेत. मध्यमवर्गीय माणसांचे जग व त्यांचे प्रश्न तसेच चाळसंस्कृतीचे प्रभावी चित्रण आपल्या कथेच्या माध्यमातून जयंत पवार मांडू पाहतात. "जयंत पवार यांच्या कथेत महानगरीय संवेदनशीलतेचे फार प्रभावी चित्रण पाहायला मिळते. भाऊ पाध्ये, बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ यांनी महानगरीय अधोविश्वाची संवेदनचित्रे फार प्रभावीपणे साकारली. जयंत पवार यांची कथा या मजबूत स्थंभावर उभी राहून पुढच्या शक्यता धुंडाळते. त्यांच्या जीवनदृष्टीमध्ये सामान्य माणूस केंद्रस्थानी आहे. मुख्यत: काळाच्या उदरात गडप झालेल्या कष्टकऱ्यांच्या गोष्टींचे उत्खनन करण्याचे काम त्यांची कथा करते." (दळवी,२०२१, पृ.१८) महानगरातील पालटलेल्या स्थिती गतीचा, सामान्य माणसाच्या विस्थापनाचा, कष्टकरी कामगारांच्या समूह मानसिकतेचा तळठाव ही कथा घेते. महानगरीय जीवनाची गुंतागुंत, असंख्य व्यक्तींची स्वभाव दर्शने, परागंदा आणि अस्तंगत वाटेवरील सामान्यांच्या अस्वस्थ जगाचे चित्र मांडणाऱ्या जयंत पवार यांच्या कथेने मराठी साहित्यात वेगळा ठसा उमटवला आहे. इतकेच नाही तर मराठी कथेच्या कक्षा रुंदावण्यात पवार यांचे योगदान महत्वाचे आहे. म्हणूनच या काळातील समर्थ कथाकार म्हणून त्यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

## संदर्भ :

१. पवार, जयंत 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर', (प्रस्तावना) लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१० पृ. १८
२. तत्रैव, पृ. ६५
३. तत्रैव, पृ. २२
४. दळवी, संदीप, 'हा ॠतू वेगळा आहे'. ललित पब्लिकेशन्स, मुंबई, २०२१, (प्रस्ता) पृ. १

❖❖❖

# युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकराची वैचारिक ग्रंथसंपदा

**प्रा. डॉ. मीनाक्षी देव (निमकर)**
मराठी विभाग प्रमुख, सहा. प्राध्यापिका
डॉ. सौ. इं. भा. पा. महिला कला महाविद्यालय,
औरंगाबाद. मो. क्र. ९८८११०९०४६

## प्रास्ताविक :

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार थोर विचारवंत कायदेपंडित,विषमते विरुद्ध लढा देणारे मानवतावादी समाजसुधारक तसेच विसाव्या शतकातील सांस्कृतिक संघर्षाचा महानायक अशा विविध बिरुदानी गौरवांकित डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव युगानयुगे इतिहासात सुवर्णाक्षराने अंकित झाले आहे. माणूस ही एकच जात आणि मानवता हा एकच धर्म अशी शिकवण तळमळीने देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना १९९० मध्ये भारतरत्न या सर्वोच्च पुरस्कारने सन्मानित करण्यात आले. ``खूप शिक्षण घे, खूप मोठा हो, ज्ञानासमोर सर्वजण नतमस्तक होतात`` हे आपल्या वडिलांचे शब्द कायम स्मरणात ठेवून बाबासाहेब बी.ए.उत्तीर्ण झाल्यानंतर सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीने उच्च शिक्षणासाठी अमेरिका, लंडन येथे गेले, अत्युच्य पदवी मिळवणे हे त्यांचे ध्येय होते. १८-१८ तास अध्ययनरुपी तपश्चर्या करून बाबासाहेब एम.ए., एम.एस्सी, डी.एस्सी, बार-अॅटला (बॅरिस्टर), पी. एच. डी या अत्युच्य पदव्या त्यांनी प्राप्त केल्या. प्राध्यापक, वकील, संपादक, मजूर खात्याचे मंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय घटना समितीचे अध्यक्ष, अशा विविध पदांवर कार्य करून या पदांना त्यांनी योग्य न्याय दिला.

## बाबासाहेबांचे तत्वज्ञान :-

बाबासाहेबांनी ज्ञान आणि शिक्षण यांचा नेहमीच पुरस्कार केला. संघटन संघर्ष, हक्कासाठी, लढा, संमता, समानन्याय, अधिकार, कर्तव्य, संघर्ष, हक्कासाठी, लढा, संमता, समानन्याय, अधिकार, कर्तव्य, वागणूक, स्वाभिमान निर्भयता आणि आत्मसन्मान या तत्वाचा आग्रह धरला आणि वेळोवेळी आपल्या कृती मधून, आपल्या भाषणा मधून, लेखनामधून या बद्दल परखड विचार मांडले.वर्णव्यवस्था,जाती व्यवस्थेचा विरोध केला, जातीव्यवस्थेचा राक्षस माणूसकी खाऊन टाकतो त्यामुळे समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय यांची रुजवणूक झाली पाहिजे हे विचार त्यांनी तळमळीने मांडले या तत्वविचाराना त्यांनी हृदयातून आत्मसात केले होते. स्त्री, पुरुष, समानता, स्त्री सन्मानाचा त्यांनी पुरस्कार केला. हिंदू कोड बिल द्वारे संविधानात ही स्त्रीयांच्या बाजूने कायदे करून महिलांना न्याय हक्क व अधिकार दिले. मजदूर, शेतकरी कामकरी कष्टकरी मजूर या सर्वांना कामाचा योग्य मोबदला व माणूस म्हणून न्याय हक्क मिळाले पाहिजे. या विचारांचा त्यांनी नेहमी पुरस्कार केला आणि त्यांच्या न्याय हक्का साठी संविधानातही तरतुद केली. डॉ. बाबासाहेबांनी देशातील आर्थिक विषमता समाजातील जाती-

धर्म वर्ण व्यवस्था, राजकीय, कायदेविषयक, मानववंश शास्त्र या विषयावर जे विचार आपल्या ग्रंथातून मांडले ते आजही प्रासंगिक आणि मौलिक आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक ग्रंथ संपदा :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरां नी जे ग्रंथ लेखन केले ते प्रामुख्याने संशोधनात्मक, समीक्षणात्मक आणि वैचारिक अशा स्वरूपाचे आहे.बाबासाहेबानी आर्थिक, सामाजिक, राजकीय ऐतिहासिक, मानववंश, शास्त्रीय, कायदेविषयक, व्यक्ती चित्रणात्मक, भाषेसंबंधी अशा विविध विषयांवर लेखन केले आहे. बाबासाहेबांचे विचार काळाच्या किती पुढे होते द्रष्टे होते याची जाणीव आपल्याला त्यांचे ग्रंथ वाचल्यावर होते. सामाजिक शास्त्रातले संशोधन किती मौलिक, सखोल, व्यासंग, चिंतन मनन करून करता येऊ शकते याचा आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संशोधनात्मक -समीक्षणात्मक वैचारिक ग्रंथातून आपल्या प्रत्ययाला येते. त्यांच्या एकेका ग्रंथावर पीएचडी करता येऊ शकते, इतके त्यातील विचार सखोल आणि व्यापक आहेत त्यांच्या या ग्रंथ संपदेचा धावता आढावा किव्हा फक्त ओळख करून देण्याचा प्रयत्न आहे.

## बाबासाहेबांच्या वैचारिक ग्रंथ संपदा पुढील प्रमाणे

1) **प्राचीन भारतातील व्यापार (ॲन्शिएट इंडियन कॉमर्स )** १९१५ मध्ये भारतातील व्यापार विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण प्रबंध लिहिला. ऐतिहासिक दृष्टीकोणातून भारतात पूर्वी पासून चालत आलेला व्यापार आणि आर्थिक प्रश्नाची उकल या दृष्टीने हा ग्रंथ अत्यंत मौलिक आहे.

२) **भारतातील जाती, तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास (कास्ट इन इंडिया देअर मेकॅनिझम,जेनेसिस अँड डेव्हलपमेंट)** १९१६ या ग्रंथातून डॉ. बाबासाहेबांनी भारतातील विविध जातीच्या स्वभाव वैशिष्टांचा चिकित्सक सांगोपांग व मूल्यमापनात्मक, अभ्यास या ग्रंथातून मांडून आंतर जातीय विवाहाचा पुरस्कार त्यांनी ग्रंथातून केला आहे.

३) **भारताच्या राष्ट्रीय नफाच्या वाटा ( १९१६) आणि रुपयाचा प्रश्न : उदगम आणि विकास (प्रॉब्लेम ऑफ रुपी)** १९२२ या दोन्ही पुस्तकात डॉ. आंबेडकरांनी भारताच्या आर्थिक व्यवस्थे संबंधी मूलभूत चिंतन केले आहे. स्वतंत्र भारताचे चलन हे सोन्यात असण्या पेक्षा सुवर्ण विनिमय प्रमाण अमलात आणावे अशी शिफारस त्यांनी केली. याच त्यांच्या मूलभूत आर्थिक निकषावर रिझर्व बॅक ऑफ इंडियाची,भारताच्या आर्थिक विचारांची उभारणी झाली आहे. आर्थिक विषमता जोपर्यंत दूर होत नाही तोपर्यंत भारतात राष्ट्रीय एकता, अखंडता निर्माण होणार नाही असे त्यांनी या ग्रंथातून मांडले, विचार त्यांचे हे आजही खूप मौलिक आणि प्रासंगिक ठरतात.

५) **जातींची निर्मूलन (अनहिलेशन ऑफ कास्ट) १९३६ :** हा डॉ. बाबासाहेबानी लिहिलेला बहूचर्चित ग्रंथ आहे भारतातील जानी संस्थे विषयी अत्यंत अभ्यासपूर्ण मते त्यांनी या ग्रंथातुन मांडली आहेत.

६) **पाकिस्तान विषयक विचार (थॉट्स ऑफ पाकिस्तान १९४०) :** हिंदुस्थान आणि पाकिस्तान या दोन देशां मधली फाळणी,फाळणीचे बाबासाहेबांनी केलेले समर्थन, त्याची कारण मीमांसां, हिंदुस्थान एक राष्ट्र या संकल्पनेकडे धार्मिक चष्मातून न पाहता देशाच्या हिताच्या दृष्टिने पाहिले पाहिजे असे डॉ. बाबासाहेबांनी या ग्रंथातून अतिशय महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत.

७) **अस्पृश्य आणि भारतीय राज्यघटना**-(१९४२)- या ग्रंथातून बाबासाहेबांनी अस्पृश्यता निवारण आणि अस्पृश्यांचा विकास या संदर्भात सामाजिक विषमता नष्ट व्हावी या संदर्भात महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत.

८) **काँग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्यांसाठी काय केले** (जून १९४५)- या काळात काँग्रेस पक्ष आणि गांधीजींचे कार्य यांना खूप लोकप्रियता होती, त्यांनी अस्पृश्यांसंबंधी केलेल्या कार्याचा आढावा आणि अस्पृश्यतेचे समुळ उच्चाटन करण्यासंदर्भात प्रयत्न करण्याची आवश्यकता त्यांनी या ग्रंथातुन प्रतिपादन केली आहे.

९) **शुद्र पुर्वी कोण होते.** (ऑक्टोबर १९४६) आणि

१०) **अस्पृश्य पूर्वी कोण होते** कोणत्या कारणामुळे ते अस्पृश्य झाले (१९४७)- या दोन्ही ग्रंथातून त्यांनी भारतातील शूद्र आणि अस्पृश्य जमातीबद्दल सखोल संशोधन करुन, आर्य हे इथले मुळ निवासी आहेत याचे सप्रमाण दाखले देत, शुद्रांच्या आणि अस्पृश्यांच्या उत्पत्तीची स्थिती संबंधी त्यांनी या ग्रंथातून मीमांसा केली आहे.

११) **संस्थाने आणि अल्पसंख्यांक** (१९४७)- स्वतंत्र भारतात गरीब पिडीत दलित, भूमीहिन, शेतमजूर, शेतकरी भटक्या जाती जमाती इतर मागासवर्गीय घटकांचे शोषण होणार नाही त्यांना न्याय वागाणूक मिळाली पाहीजे, भांडवलदारी अर्थव्यवस्थेची चिकित्सा या ग्रंथातून डॉ. आंबेडकरांनी अभ्यासपूर्ण रीतीने केली आहे.

१२) **महाराष्ट्र एक भाषिक प्रांत** (१९४८)- याग्रंथातून बाबासाहेबांनी एक भाषा एक राज्य या तत्वाला विरोध केला त्याची कारण मीमांसाहीकेली आहे. महाराष्ट्र राज्याचा भाषावार प्रांत रचनेच्या संदर्भात सखेल चिंतन आणि व्यावहारीक विचार या ग्रंथातून मांडला आहे.

१३) **हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती** (१९५०)-धर्म संस्कृती आणि जाती संस्थांनी रुढीपरंपरेच्या नावाखाली स्त्रिची अवहेलना कशी केली यासंदर्भात अनेक दाखले देत भारतीय स्त्री जीवनाचा विस्तृत पट चिकित्सकपणे या ग्रंथातून बाबासाहेबांनी उलगडला आहे.

१४) **भाषिक राज्यांसंबंधी विचार** (१९५५)- भाषावार प्रांतरचनेचे तोटे सप्रमाण या ग्रंथातून विषद करुन भाषावार प्रांतरचनेमुळे प्रांतिय व विभागीय वाद निर्माण होऊ शकतात. राष्ट्रहिताच्या दृष्टिकोनातून लहान राज्यावर अन्याय होऊ शकतात.भारताच्या स्थैर्य व विकासाच्या दृष्टिकोनातून भाषावार प्रांत रचनेसंदर्भात सांगोपांग विचार या ग्रंथातून व्यक्त झाले आहेत.

१५) **बुध्द की कार्ल मार्क्स**-बाबासाहेबांच्या नजरेतून बुध्द तत्वज्ञान आणि कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानासंबंधी मानवी हिताच्या दृष्टिने या दोन्ही विचारसरणीचा पुरस्कार या गंथातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला आहे.

१६) **बुध्द आणि त्यांचा धम्म** (१९५६) - बुध्द धम्माच्या अभ्यासकाला उपयुक्त अशा मुद्दयाची मांडणी करणारा आणि त्याच्या धम्माच्या गाभ्याजवळ नेणारा बुध्द तत्वज्ञानाची सखोल मांडणी करणारा डॉ. बाबासाहेबांचा अत्यंत मौलीक असा हा ग्रंथ आहे.

१७) **संघराज्य विरुध्द स्वातंत्र्य** (१९५९) - धर्मसंस्था- हुकूमशाही प्रणालीमध्ये स्वातंत्र्य अबाधित राहू शकत नाही यासंदर्भात डॉ.बाबासाहेबांनी या ग्रंथातून स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे विचार मांडले आहेत.

१८) **रानडे, गांधी आणि जिना** (१९५६)- या काळातील हे अत्यंत लोकप्रिय लोकनेते त्यांची पक्षांर्तगत भूमिका त्यांची व्यक्तिमत्वे त्यांच्या कार्याची ओळख आणि या तिघांची तुलना या ग्रंथातून बाबासाहेबांनी

अत्यंत अभ्यासपूर्ण रितीने केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ग्रंथसंपदा मौलिक आणि कालातीत आहे. विविध विषयांवरचा त्यांचा व्यासंग अफाट होता त्यांनी अनेक विषयांवर मुलभूत चिंतन केले त्यातून अत्यंत महत्वाच्या ग्रंथांची निर्मिती झाली. दलितांच्या राजकिय हक्काचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता ही वृत्तपत्रे सुरु केली. भारतातील विद्दयार्थी तसेच युवा यांच्याकडून देशाच्या भवितव्यासाठी असलेल्या अपेक्षा शेती-शेतीविषयक प्रश्न उदयोग व्यापार शहरीकरण अस्पृश्यता निवारण यासंदर्भात त्यांनी विविध फूटलेखांमधून शोधनिबंधामधून भाषणांमधून आपले विचार मांडले आहेत. थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक अत्यंत बुध्दिमान प्रकांडप्रडित सामर्थ्यवान व्यक्ती होते. समाजशास्त्र, कायदेशास्त्र राज्यशास्त्र इतिहास मानववंश शास्त्र अशा विविध विषयांमध्ये त्यांचा हातखंडा होता.त्यांची वैचारिक ग्रंथ संपदा अभ्यासताना ते किती व्यासंगी अभ्यासू आणि प्रगल्भ विद्वान होते याची जाणीव आपल्याला होते मौलिक ग्रंथसंपदेतील विचार आजच्या काळातही तितकेच अमूल्य आहेत.

## संदर्भग्रंथ सूची -

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ-संपा.डॉ.उत्तम सावंत

❖❖❖

# आत्मचरित्र : स्वरूप आणि संकल्पना

**डॉ. शीतल मारुती कोरडे**
मराठी विभाग,
पणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,
बाबुरावजी घोलप कॉलेज, सांगवी.
मो.नं. 7738037206 ईमेल- kshital07@gmail.com

## प्रास्ताविक :

मराठी साहित्यात 'आत्मचरित्र' हया वाड्.मयप्रकाराचे स्वतंत्र स्थान आहे. आत्मचरित्र लेखन करणारी व्यक्ती आपल्या आयुष्याचा पट वाचकांसमोर उलगडून दाखवण्याचा प्रयत्न करीत असते. 'प्रत्येकाच्या जीवनातील 'घटना' व परिस्थिती वेगवेगळया असतात' परंतु त्यापासून फायदा एवढाच की दुसयाच्या जीवनात आपणास आपले प्रतिबिंब थोडयाशा प्रमाणात का होईना पाहावयास मिळते. मराठीमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या अगोदरपासून 'आत्मचरित्र' लेखनाची परंपरा असलेली पाहावयास मिळते. मराठीमधील 'आत्मचरित्र' हया वाड्.मयप्रकाराचा खया अर्थाने विकास इंग्रजी वाड्.मयाशी संबंध आल्यावर झाला आहे. 'आत्मचरित्र' हया वाड्.मयप्रकारचे लेखन विसाव्या शतकानंतर अधिकाधिक समृध्द होत गेलेले आहे. 'आत्मचरित्र' हया वाड्.मयप्रकाराचा विचार करीत असताना हया वाड्.मयप्रकारची संकल्पना आणि स्वरूप समजून घेणे महत्वाचे आहे. 'स्वत:च्या जीवनाची स्वत: लिहिलेली कहाणी किंवा गोष्ट म्हणजे आत्मचरित्र होय.' 'आत्मशोधक वृत्तीतूनच विशिष्ट असं जीवनविषयक असा दृष्टिकोन स्वीकारून आत्मचरित्रकार मांडणी करीत असतात. स्वत:चा जीवनवृत्तांत देत असताना अधिकाधिक व्यक्त करण्याकडे लेखकाचा कल असलेला दिसतो. ज्या व्यक्तीकडे काही सांगण्यासारखे असते, अशीच व्यक्ती लेखन करू शकते. गतकाळाचे सिंहावलोकन, आत्मपरीक्षण, जीवनाच्या सार्थकतेचे मूल्यांकन, आपल्या जीवनानुभवामधून इतरांना प्रेरणा मिळावी अथवा अपेक्षित मार्गदर्शन मिळावे अशा हेतूने 'आत्मचरित्र' लेखनात 'भिन्नता' आढळते. अलिकडच्या काळात 'आत्मचरित्र' लेखनाची संकल्पना बदलत चाललेली आहे. ती संकल्पना पाहत असताना 'आत्मचरित्र' लेखनाची परंपरा बघणे ही महत्वाचे आहे. मराठी साहित्यात 'आत्मचरित्र' हया वाड्.मयप्रकाराचे स्वतंत्र स्थान आहे. आत्मचरित्र लेखन करणारी व्यक्ती आपल्या आयुष्याचा पट वाचकांसमोर उलगडून दाखवण्याचा प्रयत्न करीत असते. 'प्रत्येकाच्या जीवनातील 'घटना व परिस्थिती' वेगवेगळया असतात.' परंतु त्यापासून फायदा की दुस. याच्या जीवनात आपणास आपले प्रतिबिंब थोडयाश्या प्रमाणात का होईना पाहावयास मिळते. मात्र पूर्वी आत्मचरित्राला चरित्राचेच भावंड म्हणून ओळखले जात असे. 'चरित्र' आणि 'आत्मचरित्रा'मध्ये प्रामुख्याने वैविध्य असून देखील आत्मचरित्राला स्वतंत्र स्थान दिले जात नव्हते. परंतु आपल्यातील हया वेगळेपणानेच आत्मचरित्राने आपले वेगळेपण दाखवून दिलेले आहे. माणवाला ज्यावेळी स्वत:विषयी, अस्तित्त्वाविषयी काही प्रश्न पडू लागले तेव्हा आपल्याच गतकालीन जीवनाकडे बघत असताना त्या जीवनानुभवांतून काही एक प्रेरणा घेऊन लिहायला सुरूवात केल्यानंतर आत्मचरित्र लिहिले गेले असावे.

## आत्मचरित्र ह्या वाड्.मयप्रकाराची संकल्पना :

आपल्याकडे प्राचीन युगामध्ये 'आत्मचरित्र' ही वाड्.मयीन संकल्पना अस्तित्वात नसली तरी 'आत्मशोध' ही संकल्पना अस्तित्वात होती. 'भारतीय संस्कृतीमध्ये 'आत्मशोध' संकल्पना तत्वज्ञानाच्या क्षेत्रात प्राचीन युगापासून असलेली दिसते 'आत्मशोध' म्हणजे स्वत:चा स्वत:च शोध घेणे होय, असा अर्थ होतो. 'आत्मचरित्र' हया वाड्. यप्रकाराच्या लेखनात आत्मचरित्राची जाणीव महत्वाची मानली जाते. "Autobiography the account of an individual human Life writer by the Subject himself" [१] अशी व्याख्या हया संदर्भात पहावयास मिळते. आत्मचरित्रात व्यक्तिच्या जीवनामधील वाटचालीचा आलेखच अधोरेखित होणे अपेक्षित असते. वर्तमानकाळात विशिष्ट टप्प्यावरून भूतकाळाचा वेध घेत जीवनकथेची रचना करणे 'स्व' जीवनाविषयक विशिष्ट भूमिकेतून घटना, प्रसंग इ. निवड करणे जीवनाशी निगडित असलेल्या व्यक्तींचे चित्रण करणे, गतजीवनाचे निवेदन करणे हे 'आत्मचरित्र' या साहित्यप्रकाराच्या रचनेमधील महत्वाचे घटक आहेत. 'आत्मशोधक' वृत्तीतून व्यक्त होणारा

लेखकाचा विशिष्ट असा जीवनविषयक दृष्टिकोन आत्मचरित्रांतील आशयाला महत्व प्राप्त करून देत असतो. आत्मचरित्रामधून व्यक्तीने केलेल्या कर्तृत्वाची मांडणी ही प्रेरणादायी असते. 'व्यक्तीच्या जीवनाचा हा आलेख सामान्य स्तरामधून सुरू होऊन असामान्यत्वाच्या पातळींवर पोहचलेला असतो. हया संदर्भातील जीवनपट 'आत्मचरित्र' हया वाड्.मयप्रकारामधून व्यक्त केलेला असतो. ऑक्सफर्ड डिक्शनरीत ष्द ंबबवनदज वि ं च्मतेवदश् सपमि ूतपजजमद इल जीम चमतेवदष  असा अर्थ दिलेला आहे. त्यापुढेच ष्नबी ूतपजपदह ें ं सपजमतंतल हमदतमष[२]  असे म्हटले आहे. म्हणजेच 'आत्मचरित्र' हया संकल्पनेचा अर्थ सांगून हा एक वाड्.मय प्रकार आहे, असे म्हटले आहे. आज मराठी साहित्यामध्ये 'आत्मचरित्र' हया संकल्पनेला एक 'वाड्.मयप्रकार' म्हणून स्थान प्राप्त झालेले दिसून येते.

वर्तमानकाळात विशिष्ट टप्प्यावरून भूतकाळाचा वेध घेत जीवनकथेची रचना करणे 'स्व' जीवनविषयक विशिष्ट भूमिकांतून घटना, प्रसंग इत्यादींची निवड करणे, जीवनाशी संबंधित असलेल्या व्यक्तींचे चित्रण करणे, गतजीवनाचे निवेदन करणे हे 'आत्मचरित्र' या साहित्यप्रकाराच्या रचनेमधील महत्वाचे घटक आहेत. 'आत्मशोधक' वृत्तीतून व्यक्त होणारा लेखकाचा विशिष्ट असा जीवनविषयक दृष्टिकोन आत्मचरित्रांतील आशयाला महत्व प्राप्त करून देत असतो. मराठीमधील 'आत्मचरित्रमीमांसा' हया ग्रंथामधून डॉ.आनंद यादव यांनी 'आत्मचरित्र' या संकल्पनेविषयी मांडलेला विचार महत्वपूर्ण आहे. ते म्हणतात, ''मी माणूस हया नात्याने माझ्या जीवनात जी काही आजवर वाटचाल केली त्या वाटचालीतील माझी स्थितीगती म्हणजे सुख—दु:खे, आशा—आकांक्षा, विकास, विस्तार, भावसत्ये, कृती—कर्मे आणि हया सर्वांतील यश, अपयश, धडपड हयांचा मी केंद्रस्थानी धरून काढलेला आलेख किंवा नकाशा''[३] अशा स्वरूपाचा अर्थ मराठी वाड्.मयीन क्षेत्रात असल्याचा उल्लेख आढळतो. यावरून आपणास असे म्हणता येते की, स्वत:च्या गतजीवनाचा तटस्थपणे काढलेला आलेख म्हणजे 'आत्मचरित्र' होय. साहित्य, कला, शिक्षण, उद्योग, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इ. विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी आत्मचरित्र लेखन केलेले आहे. आत्मचरित्र हा चरित्राचाच एक भाग मानला जातो. व्यक्तीच्या जीवनाचा कर्तृत्वाचा इतिहास सांगितलेला असतो. लेखक स्वत:चा जीवनवृत्तांत देत असताना 'आत्मनिवेदन' करीत असतो.

'आत्मचरित्र' या वाड्.मयप्रकाराच्या मराठीतील नामवंत लेखकांनी आणि अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या खालीलप्रमाणे मराठी विश्वकोशामध्ये प्रा.रा.ग.जाधव यांनी केलेली व्याख्या ''आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्वाचे, स्वत: लेखकाने लेखनरूपाने घडविलेले दर्शन म्हणजे 'आत्मचरित्र' होय.''[४] वरील व्याख्या पाहता आपल्या असे लक्षात येते की, व्यक्तीजीवन जगत असताना किंवा समाजामध्ये वावरत असताना त्याला आलेले जीवनानुभवाचे आणि स्वत:च्या घडत गेलेल्या व्यक्तिमत्वाचे स्वत:च घडवलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय. असे म्हणणे योग्य ठरते. 'आत्मचरित्र' हया वाड्.मप्रकाराच्या लेखनामधून लेखकाच्या व्यक्तिमत्वबरोबर समाजसापेक्ष जीवनही व्यक्त होत असते. हया दृष्टीने वरील विवेचन महत्वाचे ठरते. त्यानंतर प्रा. वा.ल.कुलकर्णी यांची व्याख्या बघूया. ''ज्या अनुभवांची सृष्टी येथे साकार होण्यासाठी धडपडत असते, तो एका व्यक्तिमत्त्वाला जाणवलेला व जाणवणारा एक अनन्यसाधारण अनुभव असतो.''[५] प्रस्तुत व्याख्येनुसार व्यक्तीने मांडलेले अनुभव हे त्याने स्वत: अनुभवलेले असतात. त्यामुळे तो ते अतिशय सूक्ष्मपणे निवडूनच त्याची मांडणी करत असतो. शिवाय ते अनुभव फक्त त्याचे स्वत:चेच असतात त्यामध्ये एक अनन्य स्वरूपाचे वेगळेपण असते. हे आत्मचरित्र वाचतानाही आपल्या लक्षात येते. मराठीतील 'आत्मचरित्र' या साहित्यप्रकाराला एक नवे परिमाण दलित आतमकथांच्या उदयानंतर लाभलेले आहे. या संदर्भात विजया राजाध्यक्ष यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे त्या म्हणतात, ''आत्मशोधाची विशिष्ट गरज म्हणून लेखकाच्या व्यक्तिमनाबरोबरच त्याच्या 'जीवनकथे'चा भाग म्हणून व्यक्त होणारे 'समूहमन' आणि दलित जीवनाशी प्रत्यक्ष संबंधित असणारी सामाजिकता, सांस्कृतिकता हे होय.''[६] 'व्यक्ती' आणि 'समाज' हया दोन्ही गोष्टी परस्परांवरती परिणाम करितच असतात. त्यामुळे लेखकाच्या लेखनामधून त्याच्या स्वत:च्या जीवनकथेबरोबरच समाजाचीही एक 'कथा' कळत—नकळतपणे येतच असते.

## 'आत्मचरित्राचे स्वरूप :

माणसाचे 'जीवन' हा एक प्रवास आहे. या जीवन प्रवासात अनेक सखेसोबती भेटत असतात. जीवन जगत असताना विविध घटना—प्रसंगांना सामोरे जाताना वेगवेगळे अनुभव 'व्यक्ती' घेत असते. आत्मचरित्राचा प्रारंभ हा प्रामुख्याने नायकाच्या जन्मापासून होत असतो. मात्र जीवनातील कोणत्या घटनांची निवड करावी, निवेदनाचा क्रम कसा असावा याबाबतचे स्वातंत्र्य आत्मचरित्रकाराला असते. नायकाच्या जीवनात घडणाया बयाचश्या गोष्टींचा

अंतर्भाव त्या 'आत्मचरित्रा'च्या लेखनासाठी महत्वाच्या तीन टप्प्यांतील चित्रण आवश्यक असते. यासंदर्भात अ.म. जोशी हयांनी 'चरित्र–आत्मचरित्र' हया ग्रंथामध्ये केलेले वर्णन महत्वपूर्ण आहे. ते म्हणतात, ''आत्मचरित्र हया वाङ्.मयप्रकाराच्या लेखनामध्ये महत्वाचे तीन टप्पे म्हणजे एक जन्मपूर्वकाळ, दोन जीवनकाळ आणि तीन मृत्यूनंतरचा काळ हया तीन टप्प्यांपैकी जन्मपूर्वकाळाविषयी माहिती ही बहुधा 'ऐकीव' स्वरूपाची असते. आणि मृत्यूनंतरच्या काळाविषयी तर आत्मचरित्रकार काही लिहूच शकत नाही इतकेच नव्हे, तर आत्मचरित्राच्या लेखनकालापर्यंतच तो लिहू शकतो. हया दृष्टीने 'आत्मचरित्र' अपूर्णच असते. म्हणून त्याचे 'मस्तक व अवयवरहित मूर्ती' असे वर्णन डब्लू.एच.डन हयांनी केले आहे.''[७] यावरून असे लक्षात येते की, लेखकाचा जीवनपट त्याच्या आत्मचरित्रात येत असला तरी सुध्दा बालपणातील किंवा जन्मपूर्वकाळातील माहिती ही ऐकीव स्वरूपाची असते. त्यामुळे त्या मांडणीमध्ये वास्तवाची कमतरता निश्चितच असेल.

आता काळ बदलत चाललेला आहे. समाजातील प्रत्येक घटकाला आता प्राधान्य मिळू लागलेले आहे. आपल्या अस्तित्वाविषयी तो जागरूक आहे. आपल्या सभोवतालच्या वातावरणाविषयी जागरूक असणारा व्यक्ती निश्चितच आत्मचरित्र लिहितो. एक स्वतंत्र वाङ्.मय प्रकार म्हणून 'आत्मचरित्राची' नव्याने ओळख झालेली दिसते. स्वतंत्र 'वाङ्.यप्रकार' मानण्याइतके दर्जेदार लेखन आत्मचरित्रामधून होऊ लागले असून, त्यांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे केवळ चरित्राचाच जोडभाग म्हणून आत्मचरित्रांचा अभ्यास न करता त्याकडे स्वतंत्र वाङ्.मयप्रकार म्हणून पाहणे गरजेचे आहे. लेखकाने आपल्या व्यक्तिगत जीवनाची स्वतःच स्वतःच्या शब्दांत सांगितलेली गोष्ट म्हणजे 'आत्मचरित्र' होय, असे आपण म्हणतो. ज्याने जीवनाचे अनुभव स्वतः घेतले त्यानेच त्याचे लेखन केलेले असते. माणूस स्वतःला जितके ओळखतो तितके त्यास अन्य कुणीही ओळखू शकत नाही. त्याचे व्यक्तिगत जीवन आणि अंतरंग हे त्याच्या स्वतःकडूनच अधिक यशस्वीपणे व प्रभावीपणे प्रगट होणे शक्य आह. कुणाच्याही जीवनाचा 'स्व' लिखित वृत्तान्त आत्मचरित्र या सदरात बसू शकेल. आत्मचरित्रे हा वाङ्.मयप्रकार बराचसा वेगळा आहे.जीवनातील विशिष्ट अशा कालखंडाचे किंवा कधी–कधी संपूर्ण जीवनाचे निवेदन 'आत्मचरित्र'कार करीत असतो. भोवतालच्या घटना, व्यक्ती यांच्या संबंधात स्वतःचे परिक्षण करण्याला 'आत्मचरित्रा'त विशेष महत्व आहे.

'स्व' जीवनातील आणि 'स्व' काळातील घटना, व्यक्ती आणि प्रसंग यांचे उल्लेख आणि संकलन म्हणजे 'आत्मचरित्र' नव्हे, तर आत्मा, स्वतःचे भान, कठोर आत्मपरिक्षण या सर्व गोष्टींना एकत्र घेऊन केलेले लेखन म्हणजे 'आत्मचरित्र' होय. मुळातच 'आत्मचरित्रा'च्या मांडणीबाबत निश्चित असे नियम नसतात. त्यामुळे आत्मचरित्रकाराला मांडणीबाबत स्वातंत्र्य असते. लेखनासाठी 'आत्मचरित्र'काराच्या अंगी शालीनता, समयसूचकता, इतरांबद्दल आपुलकीची भावना, चांगली भाषाशैली इ. गुण गरजेचे आहेत. स्वतःचे गुणदोष दाखविण्याचे धाडस लेखकाकडे असले पाहिजे. 'आत्मचरित्रा'मधून जेव्हा वस्तुस्थितीदर्शक असे 'आत्मनिवेदन' येते, तेव्हा ते विश्वसनीय असे आत्मचरित्र ठरते. गतजीवनातील योग्य घटना–प्रसंगांची निवड, 'स्व' ला केंद्रस्थान आणि 'सत्यकथन' या गोष्टींना आत्मचरित्रात खूपच महत्वाचे स्थान आहे. गतआयुष्यातील सर्वसामान्य घटनांची काटछाट करून निवडक आणि महत्वाच्या घटना ठळक प्रसंगांच्या आधारे लेखकाला आपले व्यक्तित्व व जीवनकर्तृत्व आत्मचरित्रात लागते. कोणत्या गोष्टी पहाव्यात व कोणत्या टाळाव्यात याचा निर्णय लेखकानेच घ्यायचा असतो निवडलेल्या घटनांमधून लेखकाचा जीवनवृत्तान्त मात्र ठळकपणे चित्रित व्हायला हवा. यासाठी लेखकाने आपल्या अनुभवांची मांडणी कौशल्यपूर्णरित्या करणे आवश्यक आहे.

'आत्मचरित्र' केव्हा लिहावे? याविषयावर अभ्यासकामध्ये मतमतांतरे असलेली दिसतात. आयुष्यापर्यंत माणसाने जगाचे वेगवेगळे अनुभव घेतलेले असतात. त्यामुळे आठवणींची बरीचशी गोळाबेरीज त्याच्याकडे जमा असते, म्हणून त्याने वार्धक्यात आत्मचरित्र लिहिणे योग्य आहे, असे प्र.के.क्षीरसागर यांना वाटते. तर आयुष्याच्या मध्यावर लिहिलेली आत्मचरित्रे अधिक यशस्वी ठरतात, असे वा.ल.कुलकर्णी यांचे मत आहे. म्हणजेच आयुष्याच्या मध्यान्हीच्या काळात 'आत्मचरित्र' लिहावे असे ते म्हणतात. स्वतःकडे तटस्थपणे पाहण्याची तयारी झाली की, आत्मचरित्र लिहावे असे आनंद साधले यांनी म्हटले आहे. आत्मचरित्रलेखनाच्या वयोमर्यादेबाबतीत डॉ.मनोहर जाधव म्हणतात, ''संज्ञेच्या दृष्टीने पाहिले तर तरूण वयातील आत्मकथनाला 'आत्मकथन' असेच आज म्हटले जाते . पण कोणत्या वयात लिहावे याविषयीचे संकेत अस्तित्वात असलेले दिसत नाही.''[८] ज्याला ज्या वयात आत्मचरित्र लिहावे वाटे त्या वयात ते लिहिले जाते आहेत, हे अगदी खरे. म्हणजेच त्यासाठी वयाचे बंधन घालण्याची मुळी आवश्यकताच नाही. ज्याने ते भोगलेले आहे त्याला ज्यावेळी ते सांगावेसे वाटते त्याने त्यावेळी ते लिहावे असे अलिखित नियम दिसून येतात.

## ‘आत्मचरित्राची वैशिष्ट्ये :

आत्मचरित्र हा चरित्राचाच एक प्रकार आहे. त्यामुळे स्वाभाविकच चरित्राची प्रमुख वैशिटये आत्मचरित्रात अभिप्रेत असतात. ‘चरित्रविषय आणि चरित्रकार जेव्हा एकच असतो तेव्हा ते आत्मचरित्र होते’ असे सदा कहाडे यांचे मत आहे. स्वत:चे चरित्र लिहावयाचे म्हणजे एक प्रकारे आत्मनिवेदन, आत्मप्रकटीकरण, आत्मकथन करण्यासारखे आहे. ‘आत्मनिष्ठ’ आहे. आत्मनिवेदनाच्या प्रवृत्तीतून निर्माण झालेले बहुतांशी सर्व लेखन आत्मचरित्रात्मकच असते. ‘‘व्यक्ती जीवनाच्या ‘व्यक्तित्त्वाचा’ व ‘कर्तृत्वाचा’ त्याने स्वत:च लिहिलेला इतिहास होय. आत्मचरित्र हा देखील इतिहास असतो. फरक एवढाच की, आत्मचरित्रकारच स्वत:च इतिहासकार असतो. लेखक स्वत:च स्वत:चा जीवनवृत्तांत देत असतो.’’[९] म्हणजे स्वाभाविकच इतरांच्या जीवनवृत्तांताला त्यात फारसे स्थान नसावे. शिवाय ‘आठवणी’ यापासूनही आत्मचरित्राचे वेगळेपण आहे. स्वत:चाच वृत्तान्त सांगत असल्याने स्वाभाविकच स्वेतरांचेही वृत्तांत येतात. आत्मचरित्रकार स्वत:च्या गतकाळातील महत्वाच्या घटनांसंबंधी काही बारीकसारीक सलग कथन करीत असतात. ‘आत्मचरित्र’ म्हणजे स्वत:च स्वत:च्या गतकाळाचा लिहिलेला अन्वर्थक इतिहास असे म्हणता येईल. प्रत्येक माणसाला स्वत:च्या जीवनातल्या घटना अचूकपणे माहित असतात, परंतु हे देखील प्रत्येक माणसाला स्वत:च्या जीवनातल्या घटना अचूकपणे माहिती असतात. परंतु हे देखील मर्यादिपर्यंतच खरे आहे. माणसाला जशी स्मरणशक्ती असते, तशीच माणसात विस्मरणाची प्रवृत्ती असते. अनेक गोष्टी आपण विसरतो. पुष्कळांना तर आपल्या बालपणीविषयी अंधारच दिसतो.

‘‘प्रांजळपणा’ हा आवश्यक गुण आत्मचरित्रकाराजवळ पाहिजे. तो असला म्हणजे आत्मचरित्रकाराला असत्यकथन व विपर्याय टाळता येणे शक्य होते. ‘आत्मचरित्रात’ नेमके काय सांगावे, किती सांगणे, याचे भान ‘आत्मचरित्र’ प्रकाराला असते. हे महत्वाचे विशेष होय. ‘आत्मचरित्र’ हे आयुष्याच्या उत्तरार्धात लिहिले जाते.’’[१०] ही संध्याकाळात लिहिलेली जीवनकाहाणी ही काही वेळा उदासीन असते. ‘आत्मचरित्र’ हा एक वाङ्.मयप्रकार मानला जात असला तरी आत्मचरित्रलेखन करणारी व्यक्ती वाङ्.मयाच्या क्षेत्राशी निगडित असेलच असे नाही. आत्मचरित्रलेखन कोणत्याही नावाने आपल्यासमोर येत असले तरी त्याचा मूळ आधार ‘मी’ हाच असतो. हा ‘मी’ म्हणजे जीवनप्रवाहात प्रत्यक्षात अस्तित्वात असणारी व्यक्ती असते. आत्मचरित्र लेखनात ‘मी’ शी संबंध अशा व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक घडामोडींच्या यथार्थ आकलनासाठी एक समंजसपणा तटस्थता ही हवी असते. अशी काही वैशिष्टये आत्मचरित्राच्या बाबतीत सांगता येतात.

## आत्मचरित्र लेखनाचे हेतू :

आत्मचरित्र हा वाङ्.मयप्रकार ‘वास्तववादी’ आहे. इतर वाङ्.मयप्रकारांपेक्षा ‘वास्तवता’ ही आत्मचरित्रामध्ये अधिक प्रमाणात दिसून येते. लेखकाच्या व्यक्तित्वाचा प्रगट अविष्कार आत्मचरित्रातून होत असतो. या अशा वाङ्. यप्रकाराच्या लेखनामागे काही हेतू असलेले आढळतात. इतरांना काही उद्‌बोधक ठरेल असाही हेतू लेखनामागे असतो. मात्र लेखनामागे एकच एक हेतू असत नाही व्यक्तिच्या प्रकृतीनुसार वेगवेगळे हेतू असतात. त्या सर्व हेतूंचा अभ्यास करणे गरजेचे आहे. ‘आत्मचरित्र’ लेखनामागील हेतू पुढीलप्रमाणे :— जीवनातील अनुभवांपासून इतरांनी ‘बोध’ घ्यावा असाही हेतू काहींनी ठेवलेला दिसून येतो. ‘जीवनातील’ असामान्य प्रसंगांना तोंड देणारी सामान्य माणसेही आपल्या कुटुंबियांना आणि प्रियजनांना मार्गदर्शन व्हावे म्हणून आत्मचरित्राचे लेखन करतात. गतकाळातील आठवणींची उजळणी करण्याची इच्छा प्रत्येक माणसाचया ठिकाणी असते. आयुष्यातला काही विशिष्ट टप्पा ओलांडल्यानंतर शेवटी माणूस अशा ठिकाणी येऊन पोहोचतो की त्यावेळी थोडे थांबून त्याला आपल्या गतजीवनाकडे वळून बघावेसे वाटावे, अशा वेळी आपल्या गतस्मृतींचे लेखन केल्याने वेगळाच आनंद मिळतो. समाजात वावरताना, जगताना माणूस ‘स्व’ चा शोध सातत्याने घेत असतो. आत्मनिरीक्षण करीत असतो. आल्या अस्तित्वालाच शोधत असतो. या भावनेने त्याचा शोध चालू असतो. जीवनाच्या एकूण पार्श्वभूमीवर आणि व्यापक अनुभवांच्या दृष्टीने ‘स्व’ चे प्रगटीकरण करावे या हेतूने आत्मचरित्राचे लेखन होते. जीवन जगताना अनेकविध भूमिका घेऊन जगावे लागते. याप्रकारे ‘स्व’ चा शोध व्यक्त व्हावा या हेतूनेही आत्मचरित्रे लिहिली जातात. ‘आपल्या जीवनातील घटना आणि व्यक्ती यांनी प्राप्त झालेल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घ्यावे अशी इच्छा आत्मचरित्रकाराच्या मनात असते.’

आपले जीवन प्रामाणिकपणे लोकांसमोर मांडल्यामुळे लाभणाया समाधानाकरिता लेखक ‘आत्मचरित्र’ लिहित असतो. स्वत:च्या जीवनाविषयी आत्मपरिक्षण आणि सत्याचा शोध घेण्यासाठी लेखन करणे, मनुष्य

भारावलेले 'मन' हलके करत असतो. त्यात एक प्रकारची स्वयंस्फूर्तता असते. हा आत्मचरित्राचा प्रमुख गुण असून 'आत्मचरित्र' लिहिताना जुन्या आठवणींना उजाळा देणे हा ही हेतू असतो. प्रा.अ.म.जोशी हया संदर्भात म्हणतात, ''गतायुष्याच्या स्मरणातुन पुन:पुन्हा जीवनरस चाखणे, गत सुख–दु:खाच्या हिंदोळयावर हृदयाला 'परिये' देणे भूतकाळाच्या सुकलेल्या वेलीला संस्मृतीचे अमृत सिंचून पुन्हा फुलविणे व गतजीवनाच्या शकलांमधून स्मरणाच्या टाकीचे घाव घालून सुंदर मूर्ती तयार करणे. हया हेतूंनी 'आत्मचरित्रे' लिहिली जातात.''[११] अ.म.जोशी म्हणतात त्याप्रमाणे आपल्या पूर्वायुष्यात घडलेल्या घटना प्रसंग हे 'आत्मचरित्र' लिहित असताना पुन्हा एकदा जगणे किंवा पूर्वायुष्यातील सुख–दु:ख पुन्हा एकदा आठवून त्याचा आनंद घेणे, पूर्वायूष्यातील महत्वाच्या घटनांमधून सुंदर कलाकृती तयार करणे. 'आत्मचरित्र' हा व्यक्तिप्रधान वाड्.मयप्रकार असला तरी व्यक्तिकेंद्री होऊन चालत नाही. व्यक्तीची ओळख त्याच्या सार्वजनिक कृती उक्तीवरून तसेच सामाजिक पद, प्रतिष्ठा आणि सत्ता हयावरून होत असते.

व्यक्ती व सभोवतालचे जग हयांच्या आंतरसंबंधातून आत्मचरित्राला आकार लाभत असतो. ज्या काळामध्ये व्यक्तीच्या जीवनजाणिवा बहरत गेल्या त्या काळाविषयी सारतत्व 'आत्मचरित्रा'तून वाचकांसमोर येणे गरजेचे असते. आत्मचरित्राच्या हेतूविषयी डॉ.विलास खोले हयांनी म.सा.प.च्या 'आत्मचरित्र विशेषांका'त 'आत्मचरित्रा'चे आकलन एक दिशा' हया विषयावरच्या लेखात ते म्हणतात, ''जे नकळत घडून गेलेले असते ते हेतूपूर्वक निर्माण केले जाते. जी प्रक्रिया संमिश्र, गुंतागुंतीची व काहीशी अनाकलनीय असते, ती तर्कपूर्ण विचाराच्या मदतीने सोपी–सुटसुटीत होत राहते. परंतु 'आत्मचरित्रातून होणारी भूतकाळाची मांडणी आत्मचरित्र लिहिणाया लेखकाच्या व्यक्तिमत्वावर अवलंबून असते. तसेच वर्तमानाने केलेला भूतकाळाचा हा भेद 'आत्मचरित्रा'ला नुसता आकरच देतो. असे नाही तर वर्णनपध्दती आणि शैलीही पुरवीत असतो.''[१२] आपल्या पूर्वायुष्यात घडणाया सर्वच घटना सर्वच घटना नकळत घडून गेलेल्या असतात आणि ज्यावेळेस लेखक 'आत्मचरित्र' लिहिणार असतो तेव्हा आपल्या पूर्वायुष्यातील काहीच घटना घेऊन हेतूपूर्वक ते निर्माण करतो. पूर्वायुष्यात नकळत घडलेल्या घटना जरी असल्या तरी लेखन करताना त्या प्रसंगानुसार व्यक्त केलेल्या असतात आणि हे त्या लेखकावरती अवलंबून असते. तसे पाहिले तर ही प्रक्रिया गुंतागुंतीचीच आहे. 'आत्मचरित्र' लिहिणारा लेखक कोणत्या हेतूने हे सर्व लिहितो त्यावर हया सर्व गोष्टी अवलंबून असतात. हे डॉ.खोले हयांचे मत हयासंदर्भात महत्वपूर्णच आहे.

## निष्कर्ष :

१) साहित्यकृतीच्या अभ्यासातून एखाद्या वाड्.मयप्रकाराच्या निर्मितीचा, संकल्पना व्यूहाचा मागोवा घेता येतो.

२) आत्मचरित्र, आत्मनिवेदन, आत्मकथन हे शब्द वरवर जरी समानार्थी वाटत असले तरी त्यातील रोख निरनिराळा आहे.

३) आत्मचरित्र हा एक स्वतंत्र वाड्.मयप्रकार होण्यासाठी आवश्यक असलेली क्षमता, गुणवत्ता या संकल्पनेत असल्याने तो एक सशक्त असा वाड्.मयप्रकार होय.

४) चरित्र आणि आत्मचरित्रातील वेगळेपण हेच आत्चकरित्राचा एक वाड्.मयप्रकार ठरण्यास महत्वाची भूमिका घेताना दिसतो.

५) 'आत्मचरित्र' हे केवळ एका व्यक्तीचा जीवनपटच उभा करते असे नसून त्या व्यक्तिसमूहाचे, व्यक्तिस्वभावाचे, समाजाचे चित्र उभे करत असते.

६) 'आत्मचरित्र' हया वाड्.मयप्रकारामध्येच आत्मकथन वाड्.मयप्रकाराची पाळेमुळे रूजलेली आहेत.

७) अनेकविध घटना, प्रसंग, चांगल्या–वाईट अनुभवांना कवेत घेऊन गतकाळाचा जीवनपट उलगडविणारा वाड्.मयप्रकार म्हणजे 'आत्मचरित्र' होय.

## समारोप :

एकंदरीत 'आत्मचरित्र' या वाड्.मयप्रकाराचा विचार करत असताना चरित्राप्रमाणे आत्मचरित्रातून साकार होणारे विश्व हे कथा, कांदबरीतील विश्वासारखे काल्पनिक नसते तर ते प्रत्यक्ष वास्तवात असलेल्या व्यक्तींच्या जीवनानुभवातुन सिध्द झालेले असते. हया शोध अभ्यासाचा विषय 'स्वातंत्र्यपूर्वकाळातील स्त्रीआत्मचरित्रांचे स्त्रीवादी

आकलन' असा आहे. 'आत्मचरित्र' हया वाड्.मयप्रकाराचा अभ्यासही त्या दृष्टीने करणे गरजेचे आहे. 'आत्मचरित्र' या संकल्पनेचे अभ्यासक प्रा.अ.म.जोशी हयांनी 'आत्मचरित्रा'च्या स्वरूपासंबंधी पुढीलप्रमाणे विधान केलेले आहे. ''गतआयुष्याचया स्मरणातून पुन्हा–पुन्हा जीवनरस चाटवणे, गत सुख–दु:खाच्या हिंदोळयावर हृदयाला परिथे देणे, भूतकाळाच्या सुकलेल्या वेलीला संस्कृतीचे अमृत सिंचून पुन्हा फुलविणे व गतजीवनाच्या शकलांमधून स्मरणाच्या टाकीचे घाव घालून सुंदर मूर्ती तयार करणे''[२१] अ.म.जोशी हयांनी केलेले विधान 'आत्मचरित्रा'च्या स्वरूपावर प्रकाश टाकणारे असून प्रस्तुत प्रकरणामध्ये 'आत्मचरित्रा'ची संकल्पना व स्वरूप, वैशिष्टये, 'आत्मचरित्र' लेखनाचे हेतू, तसेच आत्मचरित्र व चरित्र हयांतील फरक, आणि आत्मचरित्र हया वाड्.मयप्रकाराची बदलती संकल्पना इ. घटकांचा ऊहापोह केलेला असून 'आत्मचरित्र' संकल्पना समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## संदर्भ ग्रंथ


१) Encyclopedia Britanica. Vol No. 02. London. 1764, Page No. 854.
२) Oxford Dictionary of english, oxford university press, New Delhi, 2003, Page No. 107.
३) यादव आनंद, 'आत्मचरित्रमीमांसा' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्र.आ.फेब्रु. १९९८, पृ.क्र ०२
४) जाधव रा.ग. 'आत्मचरित्र' मराठी विश्वकोश खंड–०२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ, वाई, पृ. क्र. १२.
५) गणोरकर प्रभा, 'वाड्.मयीन संज्ञा संकल्पना कोश', जी.आर.भटकळ फाउंडेशन, मुंबई, २००१
६) राजाध्यक्ष विजया, 'मराठी वाड्.मयकोश खंड–४', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आ. २००२, पृ.क्र. ३०.
७) कहाडे सदा, 'चरित्र आणि आत्मचरित्र' (साहित्यरूप), प्र.आ. जुलै १९७६, लोकवाड्.मयगृह प्रकाशन, मुंबई, प्र.आ. जुलै – १९७६
८) जाधव मनोहर, 'दलित स्त्रियांची आत्मकथने स्वरूप आणि चिकित्सा' सुविधा प्रकाशन पुणे, प्र . आ. २००१ पृ.क्र. २०.
९) जोशी अ.म., 'चरित्र–आत्मचरित्र : तंत्र आणि इतिहास', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्र.आ. मे १९६५ पृ.क्र. ११५.
१०) तत्रैव पृ.क्र. ९४
११) तत्रैव पृ.क्र. ९०
१२) खोले विलास, 'आत्मचरित्राचे आकलन : एक दिशा' महाराष्ट्र साहित्य पत्रिका (दिपावली आत्मचरित्र विशेषांक–१९८३), पृ.क्र. २७.


❖❖❖

# प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप

**प्रा.डॉ. अतुल नारायण चौरे**
मराठी विभागप्रमुख
एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे-२८
इ-मेल: choureatul.paru@gmail.com मो.नं. - 8169424517

## प्रास्ताविक :

मानवी जीवनप्रवास हा आज २१व्या शतकाकडे वाटचाल करतो आहे. प्रचंड स्थित्यंतराचे शतक म्हणून या शतकाकडे बघता येते.एकमेकांवरती हक्क गाजवत 'व्यक्तिस्वातंत्र्यावरती' गदा आणणारा काळ म्हणून माहिती तंत्रज्ञानाच्या या युगामध्ये माणूस माणसापासून दुरावत चाललेला आहे. 'ग्लोबल' म्हटल्या जाणाऱ्या या जगात निवांतपणाला वावच राहिलेला नाही. माणसे, नाती, माहिती या सर्व गोष्टी आपल्या अवतीभोवती वावरताना दिसत असल्या तरी ती सारी एकमेकांपासून एकाकी बनत आहेत. रोज नव्याने येणाऱ्या बदलाला स्वीकारत असतानाच माणूस स्वत:ला हरवत चालला आहे. 'माहिती–तंत्रज्ञानाचे, जाहिरातीचे युग' याठिकाणी प्रत्येक गोष्टीची जाहिरात करावीच लागते. 'भारतीय जग भांडवलशाहीकडून कार्पोरेट भांडवलशाहीकडे सरकत चाललेले दिसते' मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारल्यामुळे आर्थिक, सांस्कृतिक दृष्टीने जगाच्या एकत्रिकरणाला प्रारंभ झालेला आहे. 'प्रसारमाध्यमे' ही पूर्वीच्या काळी देखील होती. अर्थात त्याचे स्वरूप हे भिन्न होते. उदा. कीर्तन, प्रवचन, भारूडे, अभंग, वघ, लोककला ही त्यावेळी निर्माण झालेली प्रसारमाध्यमे आपल्या पध्दतीने समाजप्रबोधनाचे कार्य करताना दिसतात. त्यांची म्हणून स्वत:ची अशी रचना, भाषिक कौशल्ये ही आहेत. म्हणजेच काळाचे बंधन हे त्यावेळीही नव्हते प्रसारमाध्यमे १९९०च्या दशकात आली असे म्हणताना 'मध्ययुगीन कालखंड' विचारात घ्यावाच लागतो. आज हिच प्रसारमाध्यमे नव्यारूपात जगासमोर आलेली आहेत. त्यामध्ये छापील माध्यमे आणि इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे असे भाग करता येतात. वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, भित्तीपत्रके, दैनंदिनी, अनियतकालिके, पुस्तक परीक्षण, प्रकाशन संस्था, आकाशवाणी, दूरदर्शन, संगणक, इंटरनेट, मोबाईल, डिजिटल क्रांत्या इ. दोन्ही प्रकारची माध्यमे ही सांगता येतात. आपल्या जीवनाचा एक भाग बनून २१ व्या शतकातसुध्दा निती–नियमांना घेऊन प्रबोधन करताना दिसतात. प्रसारमाध्यमांनी एका नव्या जगाची ओळख समाजाला करून दिली आहे.

''नव्वदचे दशक हा एक महत्वाचा टप्पा होता. या काळात जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मोठे बदल घडून आले. या काळाचा निर्देश करण्यासाठी जागतिकीकरण या समावेशक संज्ञेबरोबरच तिच्याशी निगडित उदारीकरण, खाजगीकरण, माध्यमक्रांती, संगणक, भ्रमणध्वनी, धर्मवाद, दहशतवाद अशा इतरही संज्ञा आपण वापरत असतो. या प्रक्रियेत महानगर, शहर, निमशहर, खेडे हे भूभाग आणि त्यांत वस्ती करून राहणारे लोक यांत लक्षणीय बदल होत गेले. टी.व्ही., संगणक, जाहिरात यांनी आभासी विश्व तयार केले आहे. वस्तूंचे, भौतिक, व्यवहारांचे मायाजालही निर्माण केले आहे. आपण प्रगत अथवा कार्पोरेट भांडवलशाहीच्या युगात आहोत. आणि ही नवी भांडवलशाही संपूर्ण देशाला कवेत घेणार अशी चिन्हे दिसत आहेत.''[१] अशा प्रकारचे नवे बदल जरी समाजामध्ये होत असले तरी देखील इथले जीवनमान उंचावलेले आहे असे म्हणता येत नाही. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, भाषिक अस्मिता हे प्रश्न निर्माण करणारे वास्तव ही या सर्व प्रक्रियेकडे सजगपणे बघण्याचे भान देताना दिसते. जागतिक म्हटल्यावर माहिती ही कुणा एकाच व्यक्ती पुरती मर्यादित न राहता ती सर्वत्र पसरावी आणि आणखी विकसीत बनावी हेच ध्येय माहिती युगाने बाळगलेले आहे. या सर्व परिसिमांमधील अंतर कमी होऊन मानसा– मानसातील अंतर मात्र निश्चितच वाढलेले आहे. ''मनुष्याला आत्मसंवाद करायला मुळीच वेळ न देणारा त्याऐवजी इतरांशी, परक्यांशी, अपरिचितांशी संवाद करायला उद्युक्त करणाऱ्या कम्युनिकेशन क्रांतीचे कर्णकर्कश वास्तव सर्वाभोवती आहे.''[२] जगण्यासाठी चाललेल्या धडपडीत व्यक्तीला स्वत:कडे बघायलाच आज वेळ राहिलेला नाही. स्वत:शी संवाद ही प्रक्रियाच आता संपत चाललेली आहे की काय? अशी अवस्था निर्माण होते आहे. प्रत्यक्षामध्ये जरी हा संवाद हरवला असला तरी मउंपसए बींजजपदहए बिमइववा च्या माध्यमातून भावशून्य एकाकीपणाला आज उधाण आलेले दिसते.

जागतिकीकरणाचा संबंध आर्थिक व्यवहाराशी असला तरी आपण प्रत्येक जण या व्यवस्थेचे घटक बनलेलो आहोत. तसे बघितले तर प्रसारमाध्यमातून कोणत्याही प्रकारचे भरघोस असे उत्पादन, किंवा रोजगारनिर्मिती होत नसली तरी सुध्दा एक नवी सजग दृष्टी, नवा विचार, नवे भाव देण्याचे महत्वाचे कार्य ही प्रसारमाध्यमे करतात हे नाकारता येत नाही. माध्यमांनी जगाची फार मोठी जागा काबिज केलेली आहे. वाढत जाणारी वृत्तपत्रे, केबल, उपग्रह, एफ.एम.रेडिओ, इंटरनेट, टेलिफोन कंपन्या या अतिशय आकर्षक पध्दतीने स्वत:ची जागा निर्माण करत आहेत. या क्रांतीमधून मात्र साहित्य, वाङ्.मय स्पष्टपणाने दिसत नाही असे का झाले ? किंवा होत आहे? या सर्व झगमगाटात वाङ्.मयीन पर्यावरण पूर्णत: एकाकी पडल्यासारखे दिसते आहे. अस्थिरता आणि असुरक्षिततेची छाया सगळीकडेच आहे. असे असूनही हया फसव्या जगाची भूल सर्व जगालाच पडलेली आहे. 'स्पर्धा' ही वेगाने चालली आहे. अशा परिस्थितीमध्ये वाङ्.मयाचे काय? सहज बघितले तरी आपल्या लक्षात येईल की, वाचन ही संस्कार प्रक्रिया आहे ती आज लोप पावलेली आहे. या माध्यमांमध्ये माणूस एवढा गुंतून पडलेला आहे की, त्याला सर्व काही जलद हवे आहे. आपल्याकडे असलेली महाकाव्ये, पुराणे, लोकसाहित्यातील वेगवेगळे प्रवाह हयामधून उत्तमोत्तम साहित्याची निर्मिती झाली आहे तरी या मूळ गोष्टींपासूनच माणूस दुरावत चाललेला आहे. या सर्वांचा परिणाम मानवी अभिरूचीवरती वेगाने होत आहे. या धकाधकीच्या, धावपळीच्या जगात माणसांनासुध्दा काही मनोरंजनात्मक गोष्टीच तेवढया हव्या आहेत. यामध्ये दोष द्यायचा कुणाला? परिस्थितीला? की या आधुनिक स्थित्यंतराला? की स्वत:ला? असे अनेक प्रश्न मनामध्ये उभे राहतात. या सर्व गोष्टींचा उगम किंवा निर्मिती जर मानवासाठीच झाली असली तरी त्याचा फायदा आणि तोटा हा मानवाचाच होणार आहे.

मानवी जीवनाचाच नव्हे तर सर्व समाजाचा आरसा म्हणून आपण प्रसारमाध्यमांकडे बघू शकतो. दैनंदिन व्यवहारातील अनेक चांगल्या—वाईट गोष्टींची माहिती सर्व लोकांपर्यंत एकाचवेळी पोहचविण्याची महत्वाची जबाबदारी या प्रसारमाध्यमांनी स्वीकारलेली आहे. अर्थात त्यामागे त्यांचा व्यावसायिक हेतू असला तरी देखील योग्य माहिती, योग्य वेळी, योग्य घटकांपर्यंत ही प्रसारमाध्यमे पोचवितात. मानवी मूलभूत गरजा जशा नाकारता येत नाहीत त्याच प्रकारचे नव्हे तर काही अंशी कमी—जास्त प्रमाणात अशाच प्रकारची गरज म्हणून आपण या प्रसारमाध्यमांकडे बघू शकतो. वृत्तपत्रे, आकाशवाणी, इंटरनेट, दूरध्वनी याबरोबरच इतर माहिती पुरविणारे लेखनसाहित्य यांचाही समावेश आपण याच गटात करतो. ही सर्व प्रसारमध्यमे 'भाषेच्या' पायावरतीच उभी असलेली आपण पाहतो. भाषा हेच संवादाचे प्रभावी माध्यम ठरलेले आहे. या वेगवेगळया माध्यमांनी त्यांच्या—त्यांच्या भाषांचे एक नवे जाळे विणलेले आहे. त्यामुळे भाषा हाच अतिशय महत्वाचा घटक ठरताना दिसतो. उदा. 'वृत्तपत्र', विभाग जर आपण घेतला तर त्यामध्ये वृत्तलेख, अग्रलेख, बातमी, व्यक्तिचित्रणात्मक लेख, प्रासंगिक लेख, माहितीपर लेख इ. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रांनुसार त्यांची वेगवेगळी मांडणी केलेली दिसते. म्हणजेच त्या—त्या माध्यमानुरूप भाषा, रचना, शब्दसंग्रह, व्याकरणीक नियम या सर्वच गोष्टींचा समावेश करायला हवा. व्याकरणिक नियमांना छेद देत संमिश्र स्वरूपाची भाषा माध्यमांनी स्वीकारलेली आहे.

प्रत्येक माध्यमाचे स्वरूप वेगवेगळे आहे. प्रत्येक माध्यमाची स्वत:ची अशी काही वैशिष्टये नोंदविता येतात. उदा. वृत्तपत्राची भाषा वेगळी, आकाशवाणी वरील निवेदनाची भाषा वेगळी तसेच वेगळे होणारे संवाद, चर्चा, परिसंवाद यांची रचना वेगळी आहे. ''बाजार, लोककला, नाटक, बैठका, चर्चा इ. ही पारंपरिक प्रसारमाध्यमे आहेत. तेथे बोलीभाषेचा अधिक वापर होतो. यात शुध्द अशुध्दतेचा फारसा विचार केला जात नाही. याशिवाय व्यक्ती—व्यक्तीमधील अंतर्गत संवादासाठी पोस्ट तर फोन, मोबाईल इ. चा मोठया प्रमाणावर वापर होऊ लागला. आज रस्त्याने चालणाऱ्या प्रत्येक माणसाच्या हातात मोबाईल दिसतो. एव्हाना ती त्याची गरज बनली आहे. पण आपण दुकानात जाऊन केवळ मोबाईल खरेदी करतो म्हणजे केवळ तीच वस्तू खरेदी करतो असे नाही तर त्या वस्तूबरोबर त्याची भाषा आणि शब्दही विकत घेत असतो''[३] प्रत्येक माध्यम हे आकाराला येत असताना त्याची म्हणून स्वत:ची अशी एक भाषाशैली घेऊनच ते आकाराला येते. उदा. मोबाईल, संगणक इ. जगातील बदलत चाललेल्या बदलांपैकी काय स्वीकारायचे? अन् काय नाकारायचे हे प्रत्येक व्यक्तीने ठरविणे गरजेचे आहे. असे मला वाटते. 'वृत्तपत्र' ही माहिती, करमणूक, लोकशिक्षण या उद्देशांतून उदयाला आलेली आहेत. मराठी वृत्तपत्राचे जनक म्हणून आपण 'दर्पणकार' — 'बाळशास्त्री जांभेकर' यांना ओळखतो. त्यावेळी समाजाचे प्रबोध करणे, लाकजागृती घडवून आणणे आणि मराठीचे भाषिक सौंदर्य जपणे ही उद्दिष्टये होती. आज अशी ही परिस्थिती राहिलेली नाही. तर जाहिरातींच्या जाळयातच वृत्तपत्रे हरवत चाललेली आहेत की, काय? अशी

परिस्थिती निर्माण व्हायला  फारसा वेळ लागणार नाही. वृत्तपत्रांमुळे अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. व्यक्तिमत्व विकासाची सदरे ही समाजविकासासाठी प्रेरणादायी ठरलेली आहेत. आज त्याचे स्वरूप व्यावसायिक बनून केवळ स्पर्धात्मक पातळीवरती संख्यात्मकतेकडे वृत्तपत्रांचा विकासक्रम वेगाने चालू आहे. विविध वृत्तपत्रांमधून चांगल्या साहित्यकृतींबद्दल चांगली परीक्षणे, चर्चा हया होत आहेत. पुस्तकांची जाहिरात करण्याचे काम वृत्तपत्रे करत आहेत. मात्र त्या व्यतिरीक्त फारशी दखल मराठी माध्यमांची आणि साहित्याची घेत नाहीत. हे सत्य नाकरता येत नाही. स्वतःच्या साच्याला छेद देत नव्या रचनातंत्राला स्वीकारून 'साहित्यकृतींचे वेगळेपण' त्यातील विचार, महत्व हे समाजापर्यंत पोहचवायला हवेत. सर्वात लोकप्रिय अन् सर्वदूर पोचणारे वर्तमानपत्र हे माध्यम असल्याने लोकशिक्षकाची भूमिका घेत प्रबोधनाची जबाबदारी त्यांनी स्वीकारायला हवी असे मला वाटते.

चांगले विचार लोकांपर्यंत पोहचवून समाजाच्या हितार्थ चांगल्या भावना, चांगला दृष्टिकोन विकसीत करण्याची जबाबदारी ही वृत्तपत्रे चांगल्या प्रकारे पार पाडू शकतात. दिवाळी अंक, साप्ताहिके पुरवण्या, विशेषांक, वृत्तपत्रे प्रकाशीत करतात. वृत्तपत्रांचा वाचक हा सर्व स्तरातील असल्याने त्याची भाषा ही सर्वसामान्य स्वरूपाची असते. एखाद्या विषयावरील मतमतांतरे, साहित्यिकांची मते, विचार, एखाद्या घटनेबाबतीमधील विचारमंथन असे 'ज्ञान' हे वृत्तपत्रांनी द्यावे. केवळ माहिती पुरविणे हा हेतू न ठेवता आजच्या 'जागृत' आणि 'डोळस' वाचकाला त्याच पध्दतीने नवे भान हे वृत्तपत्र देवू शकतात. 'आकाशवाणी' आणि 'दूरदर्शन' ही आजच्या २१ व्या शतकातली अतिशय लोकप्रिय असलेली प्रसारमाध्यमे आहेत. आकाशवाणी श्राव्य तर दूरदर्शन दृकश्राव्य माध्यम म्हणून ओळखले जाते. समाजातील प्रत्येक स्तरापर्यंत पोहचलेली माध्यमे म्हणून यांचा उल्लेख करता येतो. 'आकाशवाणी' हे कमीत—कमी शब्दांत उत्कट संवाद साधणारे एक प्रभावी माध्यम तर सांस्कृतिक संवर्धनाबरोबरच, शिक्षण, आरोग्य, विज्ञान, शेती, क्रिडा इ. विविध विषयासंदर्भात चर्चा करून माहिती देणारे माध्यम मानले जाते. नामांकित व्यक्तींच्या मुलाखती त्यांचे अनुभव तसेच लहानांपासून ते थोरांपर्यंत सर्वांसाठी माहिती पुरवणारे प्रभावी माध्यम म्हणून आकाशवाणीचा उल्लेख करायला पाहिजे. आजही महिलांसाठी चालविले जाणारे जनजागृतीपर कार्यक्रम हे जीवनातील महत्वाचे विषय हाताळून योग्य ते मार्गदर्शन करताना दिसतात. केवळ भाषेच्या, संवादाच्या आधारेच हा संवाद होतो. नाटयाविष्कार केवळ भाषेच्या, संवादाच्या माध्यमातून श्रोत्यांपर्यंत पोहचविण्याचे कौशल्य हे निवेदकांकडे असते. विविध विषयांवर कथाकथन, नाटयविष्कार अतिशय प्रभावीपणे सादर केले जातात. घरा—घरापर्यंत पोहचलेले साध्या, सोप्या, सरळ भाषेत संवाद साधणारे एक प्रभावी माध्यम म्हणून आपण आकाशवाणीचा उल्लेख करू शकतो.आजच्या दाहक प्रश्नांवरती चर्चा करून त्याविषयी मत—मतांतरे ही आपल्यापर्यंत पोहचवून विचारप्रवृत्त करणारे हे माध्यम आजही प्रभावीरितीने कार्यरत आहे. आरोग्यविषयक जनजागृतीपर कार्यक्रम तसेच अनुभवी डॉक्टर्स लोकांशी चर्चा हा सर्वात महत्वपूर्ण असा उपक्रम आकाशवाणीच्या माध्यमातून घेतला जातो हे आकशवाणीचे वेगळेपण आहे.

जागतिक घडामोडी घरबसल्या दाखविणारे माध्यम म्हणजे दूरदर्शन होय. खाजगीकरणामुळे आज दूरदर्शनवरती वेगवेगळे चॅनेल्स, विवेकवाहिण्या आपल्याला बघता येतात. त्यामध्ये झी टॉकीज, स्टार प्रवाह, ठ्ठच माझा, ए्छ लोकमत, स्टार माझा अशी नावे दिसतात. मात्र या ठिकाणी सुध्दा शीर्षकांमध्ये भाषेबाबतीत मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषांचा वापर केलेला दिसतो. सर्वाधिक लोकप्रिय असलेले माध्यम, जाहिरातींसाठी हक्काचे व्यासपीठ म्हणून दूरदर्शन भूमिका बजावते. साहित्याच्या बाबतीत विचार केला असता विविध लेखकांच्या साहित्यातील सामाजिकता व मूल्ये विचारात घेऊन अनेक कथांचे सादरीकरण ही मालिकांच्या माध्यमातून दूरदर्शन करताना दिसते. उदा. बाबूराव बागूल — 'जेव्हा मी जात चोरली होती', 'लालचिखल', 'धिंड', 'शाळा' यांसारख्या कथा. मालिकांच्या रूपाने आलेल्या आहेत. अशा दृकश्राव्य उपलब्धीमुळे माणूस बऱ्याचवेळा मूळ 'साहित्यकृती'पर्यंत पोहोचतो. हे लक्षात येते. या माध्यमाचा प्रेक्षकवर्ग असंख्य आहे. त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण हे अधिक आहे. 'स्त्री' या व्यक्तिरेखेला केंद्रस्थानी ठेवून तिच्या आजूबाजूचे संदर्भ उलगडताना दिसतात. उदा. अस्मिता, लगोरी, रेशीमगाठी इ. (फक्त मराठी मालिका) स्त्रियांचे विश्व, त्यांचे प्रश्न, स्त्रियांमधील अंतर्गत वाद—विवाद यावरतीच भाष्य करताना दिसतात. रसिक हा जाणकार असल्याने प्रसारमाध्यमांना काही बाबतीत सजग भान ठेवूनच आपले विषय मांडण्यास मोकळीक दिली पाहिजे. दूरदर्शनच्या माध्यमातून विविध लेखकांच्या संदर्भात त्यांच्या साहित्यकृतींच्या संदर्भात काही विशेष कार्यक्रमांचे आयोजन केलेले दिसते. उदा. विशेषतः काव्यवाचनाच्या संदर्भात असे कार्यक्रम घेतले जातात. लेखनामागील प्रेरणा, साहित्यकृती, त्यांचे वेगळेपण, एकूणच समाजाकडे बघण्याचा लेखकाचा दृष्टिकोण या गोष्टींकडे दूरदर्शन हे माध्यम सजगपणे पाहते.

संगणक क्रांतीतून जन्माला आलेले आणि आजच्या जगाचा अन् जगण्याचा 'प्राण' बनलेले माध्यम म्हणजे 'इंटरनेट' यालाच आंतरजाल असे म्हणतात. जगभरातील माणसे एकमेकांशी जोडली जात आहेत ती या माध्यमातूनच. इंटरनेटची भाषा ही जरी इंग्लिश असली तरी मराठी भाषेच्या संदर्भातही विविध कार्य इंटरनेट करते. उदा. आपल्या आजूबाजूला मराठी भाषेतून उपलब्ध असलेले लिखाण वेबसाइड्सची मदत घेऊन एखाद्या लिखीत साहित्याची जाहिरात, पुस्तकाची ओळख, लेखकाचे साहित्य हे एकाच वेळी लाखो लोकांच्या ओळखीचे बनते. याचे श्रेय इंटरनेटला त्याचबरोबर दैनिके, मासिके, वर्तमानपत्रे, नियतकालिके इ. आपण इंटरनेटवरती वाचू शकतो ही फार मोठी क्रांती आहे. एकमेकांचे विचार पोहचविण्याचे एक प्रभावी माध्यम म्हणून फेसबुकचा आपण वापर करतो. म्हणजे याचा एक तोटा सांगता येतो की तुम्ही एकमेकांशी समोरासमोर बोलायला वेळ नाही असे म्हणतात आणि फेसबुक वरती गप्पा मारता, ही एक विसंगती अन् प्रगतीची दुसरी बाजू बघायला मिळते. याचबरोबर वेगवेगळे ब्लॉग्ज, विविध व्यक्ती मराठी भाषेतून आपली मते, विचार, लिखीत साहित्य ब्लॉग्जच्या माध्यमातून प्रकाशित करतात. महाराष्ट्राबाहेरही मराठी व्यक्तींशी संवाद होऊ शकतो. तसेच नामवंत लेखक, कवी, नाटककार, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते यांच्याविषयींची माहितीही मराठीमधून हे माध्यम आपल्या पर्यंत पोहचविते. अर्थात फायद्याबरोबरच तोटेही आहेत. मात्र त्याचा विचार करता जीवनातील बऱ्याच घटकांना स्पर्श करणारे हे माध्यम प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात एक जागा बनवू पाहते आहे.

इंटरनेटच्या माध्यमातून या सर्व गोष्टी उपलब्ध होत असल्या तरी देखील या प्रक्रियेमुळे अनेक फायद्याबरोबरच आपले तोटेही होत आहेत. मोकळा वेळ मिळाला तर पूर्वी तो वेळ एकमेकांशी गप्पा–गोष्टी करण्यात घालवला जात असे मात्र आज वेळ मिळाला की फेसबुक, चॅटिंग यांच्यासारख्या आधुनिक सुविधांचा आधार प्रत्येकजण घेऊ लागलेला आहे. अर्थात हे नाकारायचे का? तर नाही. या वापराबाबतीत काही मर्यादा स्वीकारणे गरजेचे आहे. असे मला वाटते. प्रचंड साहित्य आज उपलब्ध आहे. अनेक चांगले–चांगले ग्रंथ वाचकावाचून पडून आहेत. 'काळ अन् वेळेच्या' या चक्रात वाचनाकडे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे. वाचनातून स्मरणात कायम राहिलेल्या गोष्टींनी लेखनाला नवे संदर्भ लाभत असतात. मात्र आजचा तरूण वर्ग, अवांतर वाचन, लेखन या प्रक्रियेतून बाजूला जातो आहे. ही शोकात्मिका म्हणायला पाहिजे. ''मराठी साहित्यातील नव्या प्रवाहांची, लेखकांची, नावेदेखील या साहित्य शाखेच्या पदवीधरांना सांगता येत नाहीं.''[४] याच्या सारखे दूसरे दु:ख नाही. परंतु हे आजचे वास्तव आहे. केवळ परिक्षार्थी बनून तेवढेच वाचन करून पास होणारे विद्यार्थी चांगले लेखक, पत्रकार, साहित्यिक होतील का? असा प्रश्न पडतो. लेखन–वाचन हया परस्परावलंबी अशा स्वरूपाच्या गोष्टी आहेत. तेव्हा बहुश्रुत बनून अनेक भाषिककौशल्ये आत्मसात करणे ही हया काळाचीच मागणी आहे. हे ओळखून आपला विकास करायला हवा.

प्रसारमाध्यमांची बऱ्यापैकी माहिती आपण ऐकत असतो आणि प्रत्यक्ष त्या माध्यमांचा दैनंदिन जीवनात जवळून अनुभव घेत असतो. चित्रपट हे असेच माध्यम आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय भावना जागृत करण्याचे कार्य चित्रपट करतात. सर्व वयोगटातील व्यक्तींचा माध्यमांनी विशेषत्वाने अभ्यास केलेला असतो. चित्रपटांचे विषय त्यातील अभिनय, पात्रे, एकूणच आजच्या वास्तव प्रश्नांना कवेत घेऊन ते हाताळणारे अनेक दिग्दर्शक समाजाकडे एक सजग भान ठेवून बघताना दिसतात. 'मनोरंजन' आणि 'प्रबोधन' असे दुहेरी काम चित्रपट करतात. मराठी साहित्यप्रवाहातील विविध लेखकांच्या गाजलेल्या कथा, कादंबऱ्यांवरती आधारित अनेक चित्रपट आज आलेले आहेत. उदा. महानंदा, वारणेचा वाघ, नटरंग, जोगवा, भूल, सत ना गत, दुनियादारी, ७२ मैल, इ. चित्रपटांची शीर्षके ही मराठी कादंबऱ्यांचीच आहेत. त्यामधून हाताळलेले विषय हे जीवनवास्तवाला नव्याने प्रश्न विचारणारे आहेत. याबरोबरच आजच्या समाजवास्तवाला सामोरे जाताना स्त्रियांवरती होणारे अत्याचार, त्यामध्ये जाणारे बळी, तिच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण, यावरती मार्मीक भाष्य करणारे चित्रपट म्हणजे 'नॉट ओनली मिसेस राऊत' आणि 'काकस्पर्श' कुणी असेही म्हणू शकते की आज या प्रश्नांची, प्रथांची दाहकता नाहीच. हे प्रश्न जरी आज दाहक नसले तरी ते आपल्या आजूबाजूला आहेतच हे उघडपणे दिसते. चित्रपटांनी मराठी साहित्यप्रवाहातील अनेक उत्कृष्ट कादंबऱ्यांवरती प्रकाश टाकून नवे विषय स्वीकारलेले आहेत. चित्रपट बघितल्यावरती अनेकांना जेव्हा समजले कि हे चित्रपट कादंबऱ्यांवरती आधारित आहेत तेव्हा ती खरेदीकरून वाचनाकडे बऱ्याच लोकांनी प्रवास केलेला दिसतो आहे. हेच त्या कादंबरीचे यश परंतु ती ओळख चित्रपटांनी करून दिल्याने मराठी साहित्याच्या वाटचालीत एक नवा वाचक मिळवून देण्याचे काम चित्रपट माध्यमाने केले आहे हे सांगता येते. 'जाहिरातीचे युग' म्हणून या युगाला आपण ओळखतो. स्पर्धेच्या या युगात जर टिकून राहायचे

असेल तर आपण इतरांपेक्षा कसे वेगळे आहोत हे पटवून द्यावेच लागते. त्यासाठी उदयाला आलेले माध्यम म्हणजे जाहिरातीचे युग होय. कमीत–कमी शब्दांत उत्कट परिणाम साधून आपली दखल जगाला घ्यायला लावण्याचे सामर्थ्य या माध्यमात आहे. जाहिरातींमध्ये वृत्तपत्रातील जाहिराती, रेडिओ वरील जाहिराती, दूरदर्शनवरील जाहिराती यामध्ये बऱ्याच प्रमाण फरक आहे. दैनंदिन वापरातील वस्तूंच्या जाहिराती होतात. पण साहित्यक्षेत्राच्या बाबतीत अशा जाहिराती केलेल्या दिसत नाहीत. काही अंशी आजच्या स्थितीत काही साहित्यकृतींच्या जाहिराती केलेल्या दिसतात. त्यामुळे त्या पुस्तकांना अधिक मागणी वाढलेली दिसते.

लेखकाने लिहिलेला मजकूर वाचकापर्यंत, पोहचविण्याचे काम, प्रकाशन संस्था करतात. पुस्तक प्रकाशित करण्यापूर्वी त्याला अनेक प्रक्रियांमधून जावे लागते. पुस्तक प्रकाशित करून वाचकांपर्यंत पोहोचविण्यात व ते लोकप्रिय करण्यात प्रकाशन संस्था महत्वाची भूमिका बजावत असतात. वाचकांची साहित्यविषयक आवड जोपासण्याची जबाबदारी ही प्रकाशन संस्था घेत असते. आज व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाल्यामुळे 'मागणी तसा पुरवठा' हया नियमानुसार साहित्य प्रकाशित केले जाते. काही महत्वाच्या प्रकाशन संस्थांची नावे सांगता येतील. उदा. मौज प्रकाशन, पॉप्यूलर प्रकाशन, मेहता पब्लिशिंग हाऊस, गंथाली प्रकाशन, राजहंस प्रकाशन, प्रतिमा प्रकाशन, पद्मगंधा प्रकाशन इ. संस्था हया साहित्य, कथा, कविता, कादंबऱ्या, चरित्र, आत्मचरित्र, समीक्षा इ. गंथांचे प्रकाशन करतात. ग्रंथ प्रकाशित करत असताना त्या ग्रंथाची सजावट, अंतरंग, मुख–पृष्ठ या सर्व बाबी अतिशय काळजीपूर्वक विचारात घेऊनच प्रकाशन केले जाते. ही देखील साहित्यव्यवहाराच्या प्रगतीमधील महत्वाची भूमिका घेणारे माध्यम आहे. आधुनिक काळातील विविध प्रकारची प्रसार माध्यमे ही आपापल्या पध्दतीने समाजप्रबोधनाचे आहे जनजागृतीचे कार्य करत आहेत. 'जगाला अतिशय जवळ आणण्याची क्रिया या काळाने करून दाखविलेली आहे.' ज्या व्यक्तीकडे काही कौशल्य असतील ती व्यक्ती बेरोजगार राहणार नाही. केवळ पुस्तकी अभ्यासावरती अवलंबून न राहता इतर ही संधी शोधण्याची खऱ्याअर्थी गरज निर्माण झालेली आहे. व्यक्ती जीवनावरती या माध्यमांचा प्रचंड प्रभाव आहे. त्याचे बऱ्याचअंशी अंधानुकरण ही व्यवस्था करत आहे. भाषेच्या बाबतीत ही स्थिती प्रकर्षाने जाणवते. संमिश्र भाषा ही आज अंगवळणी पडते आहे. प्रसारमाध्यमांनीही तेवढयाच जबाबदारपणे कार्य करणे गरजेचे आहे. समाजविकासाच्या जडणघडणीमध्ये ही माध्यमे महत्वाची भूमिका बजावताना दिसतात. 'माध्यमे आपल्या कौशल्याने एखाद्या गोष्टीला शिखरावरती पोहोचवू शकतात तर एखाद्याचे अस्तित्व संपवू शकतात' हे वास्तव जागोजागी दिसते. बदल होणाऱ्या या जगात काय स्वीकारायचे आणि काय नाकारायचे हे ठरविण्याचे 'व्यक्तिस्वातंत्र्य' प्रत्येकाला आहे.

## संदर्भग्रंथ

१) पुण्यभूषण फाउंडेशन आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, आयोजित ८३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, स्मरणिका – 'आजचा काळा : आजचं साहित्य'. पृ.२८.

२) मृणालिनी शहा, विद्यागौरी टिळक, संपा.'आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता, पद्मगंधा प्रकाशन, प्र. आ. २००७, पृ. १६८.

३) भास्कर शेळके, संपा. 'प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा', 'कर्मवीर प्रकाशन', प्र आ. २०१२, पृ. २९.

४) तत्रैव, पृ. २३.

❖❖❖

# स्वातंत्र्योत्तर भारतातील ग्राम दुर्देशेची कारणे–राष्ट्रसंताचे पोवाडे

डॉ. प्रवीण कारंजकर
श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय
वडनेर, जि. वर्धा
Email ID:pkarnjkar@rediffmail.com भ्रमणध्वनी ९७६५६२३२३४

## प्रस्तावना:

स्वातंत्र्योत्तर भारतातीलग्राम निर्माण हे राष्ट्रसंताचे स्वप्न होतं, गाव आदर्श असावे, स्वयंपूर्ण असावे स्वावलंबी असावे यासाठी त्यांनी आपल्या भजन, व पोवाडयातून ग्रामनिर्माणावर भर दिलेला दिसतो. तथापि यात कोणती धोंड आहे हे सुध्दा त्यांनी सांगीतले ही धोंड जोपर्यंत बाहेर काढली जात नाही. तो पर्यंत ग्रामाची उन्नती होणार नाही. ग्राम दुर्देशेची या कारणाची मिमांसा करतांना, गावातील राजकारणावर बोट ठेवतात, गावात पक्षीय राजकारण असते, गावांत एकाच पक्षातील वेगवेगळया गटांच्या लोकांत बेबनाव असतो. गावात लब्धप्रतिठीत पणा मानसन्मान प्रतिटेच्या कल्पनेने आपल्याच अहं विश्वात वावरणारे लोक असतात, व्यसनाधीन लोकांचा एक वर्ग असतो ज्यांना गावाच्या चांगले वाईट पणात काहीही देणे घेणे नसते. आचार व विचारांनी भ्रष्ट्र झालेली काही मंडळीही असते. ज्यांच्या मळे गावाचे नैतिक आरोग्य ढासळत जाते. दारूचे व्यसन, भरकटलेला तरूण तेजोहीन तारूण्य ही सर्वच ग्रामाच्या दुर्देशेची कारणे महाराजांनी सांगीतलेली आहेत जर गावाचा विकास करायचा असेल तर व्यसनाधिनता घालवावी लागेल. राजकीय विरोध बाजूला ठेवावा लागेल. लन्धप्रतिक्षेच्या कल्पना सोडून दयाव्या लागतील. आचार व विचारांना भट्र असलेल्याचा बंदोबस्त करावा लागेल. दारूचे व्यसन घलवावे लागेल. भरकटलेला तारूण्याला दिशा दयावी लागेल असा विचार राष्ट्रसंतानी आपल्या पोवाडयातून मांडलेला दिसून येतो.

ग्रामजीवनाचा अभ्यास करून त्याच्या पुनरूत्थानाचा विचार मांडणाऱ्या तुकडोजी महाराजांचा जन्म आजच्या अमरावती जिल्हयात झाला. त्यांचे जन्मवर्ष ''३० एप्रिल १९०९''(१) ला झाला. त्यांनी आयुष्यभर ग्रामजीवनाच्या कल्याणकारी व विकसीतभविष्याचा विचार आपल्या साहित्यातुन मांडला' गावाच्या विकासात गावातील काही दोष आडवे येतात त्या पैकी एक दोष म्हणजे व्यसन होय. व्यसनाबाबत ते म्हणतात, ''जहाँ शराब वही मासाहार और वहाँ ही व्यभिचार होंगा।''(२) याच कारणांनी त्यांनी व्यसनाला विरोध केलेला होता. एक व्यसन अनेक व्यसनांना जन्म देणार हे ते ओळखून होते. या सोबतच गावाचे वातावरण कलुषित करणारा एक प्रकार म्हणजे गावाचे राजकारण होते. याबाबत राष्ट्रसतांनी कडक ताशेरे ओलेली दिसतात. गावात सुधारणा व्हावी यासाठी आयुष्य वेचनाऱ्या राष्ट्रसंतानी आपला ग्रंथराज ग्रामगीता ग्रंथाच्या अर्पनपत्रिकेत म्हणतात.

''सर्व ग्रामासि सुखे करावे।
अन्न वस्त्र पात्रादि दयावे.''(३)

अशी भूमिका घेऊन जगणाऱ्या ग्रामनाथाला अर्पण केलेली आहे.

आपल्या विचारांत त्यांनी गावातील दुर्देशेला कारणीभुत ठरणाऱ्या अनिष्ट विचारांचा परामर्ष घेऊन त्यातून सूटका करण्याचा मार्गही सांगीतला आहे. व्यसनमुक्ती, सामोपचाराचे राजकारण, शरीरसंपदा कमविणे, भरकटलेल्या तारुण्याला दिशा, लब्धप्रतिष्ठीतपणाचा त्याग इत्यादी उपाय सांगून ही दुर्दशा टाळता येईल असा विचार मांडला आहे.

## राजकारण:

गावाचे राजकारण हा स्वतंत्रभारतातील गावखेडयात नेहमी चर्चेचा विषय ठरला आहे. गावात दोन पक्ष असायचे दोन्ही कमेकांचे कडवे शत्रू त्यामूळे गावात तनावपुर्ण वातावरण केव्हा होईल हे सांगता येत नव्हते. राष्ट्रसंतानी गावाचे हे राजकारण अभ्यासले होते त्यामुळे गावाच्या दुर्देशेला गावाचे राजकारण व त्यामुळे निर्माण झालेले वैमनस्य कारणीभूत आहे असे त्यांचे मत होते.गावाचे हे राजकारण कशा प्रकारचे होते त्यामुळे गावात कसे अनिष्ट कार्य घडत होते. याच वर्णन त्यांनी आपल्या पोवाडयातून केलेलं आहे.

''एक गाव नाही अस सून, पुढाऱ्यावीन
असे असूनिया झगडे दिसती
गावांगावी पक्ष कीती असती।
मठातील लोक फजिती होती रे जी''(४)

ज्या गावात एकही पुढारी नाही असे गाव शोधून सापडणे कठीण आहे असे सांगून महाराज पुढे म्हणतात असे असले तरी प्रत्येक गावात झागडे– भांडणे नित्याची झाली आहेत. एका का गावात अनेक पक्ष व त्यांचेही एकमेकांशी पटेनासे होने हे प्रकार होत. यात सर्व सामान्य मानसाची मात्र फजिती होत होती.

या राजकारणात काय व्हायचे हे सांगतांना महाराज पुढे म्हणतात.

''गटाचा गोंधळ, पक्ष अपार
न उरला माणूसकीला थार
नाही गरीबांना पुढे आधार
झाले हे लोक कीती बंजार रे, जी.जी''(५)

प्रत्येक गावात राजकीय पक्ष शिरले आहेत या पक्षातही गटा गटाचे वातावरण आहे. एकाच पक्षातील लोकांचे दुसऱ्या गटा सोबत जुळत नाही. त्यामुळे लोकसंख्येचा विचारच राजकारणातून वजा झालेला होता. एवढेच नव्हे तर पुढे पुढे हे राजकारण एकाच घरात भांडणे लावायलाही मागेपुढे बघत नव्हते. याचे वर्णन असे–

''कुत्र्यापरी भांडती सारी, भाऊ भावावरी
करीती हे वार स्वार्थी पायी
अमानुष करीती कारवाई
न्यायनीतीचा पत्ता नाही.
देश का याने सुखी होई? रे जी''(६)

राजकारणाची पातळी एवढी खालावली आहे की गावातला  सख्ये भाऊ आता एकमेकांच्या जीवावर उठत आहे. कुत्र्या सारखे ते भांडत आहेत अस वर्णन तुकडोजी महाराज करतात प्रसंगी एक दुसऱ्यांचे प्राण घेण्यासाठी हे मागे पुढे बघणार नाही. अशी स्थिती आहे. त्यांच्या या वर्तनात न्यायनीतीला कोणतेही स्थान नाही. केवळ स्वत:चा स्वार्थ साधने एवढेच त्यांचे कार्य उरले आहे. खरंच या वागणूकीने देशाचे भले होईल काय हा प्रश्न आत राष्ट्रसंताना पडला आहे.

येथे गावाच्या आरोग्यास गावातील राजकारणाच खऱ्या अर्थाने हानीकारक आहे हे  त्यांना सांगायचे आहे. जोपर्यंत गावातील हे लब्धप्रतिष्ठीत राजकारणी शांततेने व संयमाने कार्य करीत नाही. न्याय नीतीच्या मार्गाने चालत नाही तो पर्यंत गावाची प्रागती शक्य नाही हेच पोवाडयातून सांगीतले आहे.

## लब्धप्रतिष्ठीतपणा:

लब्धप्रतिष्ठीत पणामुळे म्हणजे स्वत:ची प्रतिष्ठा हीच मोठी बाकी सर्व तुच्छ असा आव अंगीकारून लोकजीवनात वावरणारी मंडळी होत. राष्ट्रसंतानी याचा अनुभव आपल्या जीवनात घेतला होता. हा लब्धप्रतिष्ठीतपणा कधी–कधी व्यसनाधीनतेलाही स्वत:चे मोठेपण समजायचा आपण व्यसन करतो कारण व्यसन करण्याची ऐपत आपल्यात आहे. आपण इतरांपेक्षा आर्थिक, सामाजिक किंवा शैक्षणिक दृष्टया वरचढ आहोत त्या कारणाने आपण दारूपिणार, सीगारेट पिणार असे या लब्धप्रतिष्ठीतांना वाटायचे त्यांना इशारा देतांना महाराज म्हणता हे सर्व अधोगतीचे मार्ग आहेत. तर काही लोक मानीभावी स्वभावाचे असायचे स्वत:ला मान सन्मान, प्रतिष्ठा मिळावी यासाठी अडून बसायचे यांनाही पोवाडयातून तुकडोजीनी फटकारले आहे–

''जरी असाल मनाने मोठे
करालकाम खोटे,
ओढतिल लोक गल्ली वरती
हातापायासी तटट्‌ धरती
टाकतिल नाकी तोंडी माती रे जी''(७)

स्वप्रतिष्ठेचा बगडा उभारणाऱ्या लोकांमुळेही गावाला दुर्वेशा आली होती हे लोक खरे–खोटे कामे करायचे त्याची फळे गावाला भोगावी लागायची. या लोकांना इशारा देत त्याची शिक्षा सुध्दा भोगण्यास तयार रहा असे सांगत राष्ट्रसंतानी कानउघडणी केलेली दिसते.

अशा प्रकारे गावाच्या आरोग्यास अहितकारक लब्धप्रतिष्ठीतपणा सोडावा व गावाचा विकास हाती धरावा असा बोध पोवाडयातून केलेला दिसतो.

## व्यसनाधिनता :

ग्रामीणभागात दुर्देशा आली ती काही दोषांमुळे आणि हे दोष दुरकरता येतात हे ही राष्ट्रसंताला माहिती होते. ग्रामीण भागात दारूचे व्यसन आहे. काहींना गांजाचेही व्यसन होते. पाहिलेले होते. त्यामुळे हे दोष ग्राम जीवनाच्या दुर्देशेला कारणीभूत आहे हे ते जाणून होते. आपल्या एका पोवाडयात हे म्हणतात.

''आता दिवस नाही झोपायचे।
आळसी पडून रहायचे।
नाही गांजा दारू प्यायचे।
गावातझगडे उठवायचे।।''(८)

येथे आपल्याला ग्रामजीवनाच्या दुर्देशेस कारणीभूत ठरणारे दोष स्पष्ट दिसतात जर हे दोष नाहीसे झाले तरच गावाचा कायापलट होईल हे तुकडोजींना माहिती होतं म्हणून ते म्हणतात—

''करा करागांव सुंदर
अति स्वच्छ मार्ग घटवार
कर्तव्यवान मुली, पोरं''(९)

पहिल्या भागात दोष दाखविले आहेत पण दुसऱ्या भागात या दोषापासून दूर राहायचे कसे हे ही सांगीतले आहे. यातून त्यांना केवळ दोषच दाखवायचे नव्हते तर ते दोष दूर देखिल करायचे होते हे याच तळमळीत त्यांनी पोवाडे रचले होते. केवळ वर्णन करने हा त्या मागचा हेतू नसून बदल घडविणे हा हेतू होता.

## भरकटलेला तरूण :—

त्यावेळेच्या गावातील तरूणांचे वर्णन करतांना राष्ट्रसंत तुकडोजी आपल्या 'उलटी दुनिया' नावाच्या पोवाडयात म्हणतात—

''झाली दृष्टी वेडीवाकडी, बिघडली घडी,
तरूण हे शान करूनि फिस्ती
घरी राहिली पडित शेती.
स्त्रिया गोशात जीव देती रे जी''(१०)

गावातला तरूण शहरात शिक्षणाची गेल्यावर शहरी संस्कार घेऊन परतायचा. त्याचे वागणे बोलणे, कापड पेहराव बदलेला असायचा केवळ शान मिरवणे यातच ती मोठेपणा मानायचा ना नोकरी ना शेती जमेना अशा वेळी घरची शेती पडित पडून राहायची घरातील स्त्रियांवर आत्महत्या करायची परिस्थिती यायची हे सर्व त्या वेळच्या भरकटलेल्या तरूणांमुळे घडायचे.

असे घडणे गावाच्या दुर्दयोचा प्रतिक होत. त्यामुळे राष्ट्रसंतानी तरूणांना श्रमसंस्काराचा विचार दिला शिक्षणासोबत शेतीकाम सुध्दा जमायला पाहिजे नाही तर उपाशी मरायची वेळ येईल.

असा ईशारा दिला. जर दोन्हीचा मेळ घातला गेला नाही तर गावात दुर्दशेला नवीन पिढी कारणीभूत ठरणार हे ओळखला त्यांनी हा इशारा दिला होता.

## दारूचे व्यसन :—

व्यसन हे मनुष्याच्या अधोगतीला नेणारे असते. गावात दारूचे व्यसन बहुतांश लोकांत असते राष्टसंतानी गावाच्या दुर्देशेला कारण ठरणारे दारूचे व्यसन ओळखले होते. राष्ट्रसंताच्या भजणात दारूच्या व्यसनावर शब्दांचे कठोर प्रहार दिसतात. त्याचप्रमाणे अशाच प्रकारचे शब्दांचे फटकारे त्यांनी आपल्या पोवाडयातूनही ओढलेले आहेत, दारू पिणाऱ्याची काय अवस्था होते हे सांगतांना एका, पोवाडयात ते म्हणतात.

''कसे चळलं मन, हरपल आज,
पर्वा नाही उरती देहाची
लाज खोवली प्रतिष्ठेची
जागी नाही किंमत कवडीची
कुत्र्यापरी गती झाली त्यांची रे जी, जी'' (११)

दारूच्या व्यसनामुळे देहभान राहले नाही, शरीर संपदा नष्ट झाली कमावलेली प्रतिष्ठा नाहीशी झाली जगता कवडीचीही किंमत राहिली नाही. गावातल्या कुत्र्यासारखी त्याची स्थिती झाली असे वर्णन महाराज करतात. असा हा व्यसन घरात आल्यावर बायका मुलांना मारहान करतो, नोंकरांशी तोंड टाकून बोलतो, मासंहार करतो, लहान मोठा कुणालाही ओळखत नाहीथोडक्यात हा विवेकभ्रष्ट झालेला असतो असे पुढे महाराज वर्णन करतात. आणि शेवटी महाराज म्हणत—

''तुकडयाची ऐक बातमी कितीतरी कमी
झाले या दारूच्या पायी
तू तरी सोड दारू भाई
विनंती ऐक माझी काही
नाहीतरी गती बरी नाही रे, जी जी''(१२)

दारूच्या व्यसनामुळे किती तरी लोक स्वत:च्या जीवाला मुकले आहेत. तेव्हा मी विनंती करतो आता तरी तू दारू सोड. दुसऱ्या एका पोवाडयात महाराज म्हणतात—

''माणसा!सरळ हो अस सोड अवदसा
पिउ नको मंदिरा जहरी ले
फजिती बहुतांची झाली
बुध्दी तुज कशी नसे उरली.
यात कीती तरी घरे मुरली. रे जी.''(१३)

मदिरेच्या व्यसनापायी किती तरी घरे नष्ट झाली त्यामुळे यापासून तू दूर रहा असे महाराज स्पष्टपणे बजावतांना दिसतात.

अशा प्रकारे गावाच्या हिताला बाधक असणाऱ्या दारूच्या व्यसना बाबत महाराजांनी जागृती करून लोकांना विवेकाचा मार्ग दाखविण्याचा कार्य केलेले दिसून येते.

## शक्तीहिन जीवन :—

शरीरात शक्ती नसेल तर मनुष्याला कोणत्याही क्षेत्रात प्रगती करता येणे शक्य नाही. केवळ वर वरचा दिखाऊपनाने माणूस मोठा होऊ याकत नाही. त्यावेळचा ग्रामीण तरूण शहरी संस्कृतीचा प्रभाव असणारा होता. हा तरूण कसा होता त्यामुळे गावाला कसे शक्तीहीतांचे स्वरूप आले होते हे महाराज आपल्या पोवाडयात सांगतात.

''तोंडाला उदासी आली, काळिमा पसरली, पोकळी झाली छातीची
गळाली ताकद हाताची
दिसे जणू पुतळी मातीची''(१४)

असा त्यावेळचा तरूण होता, चहा चिरूड आणि चिवडा यांचया आहारी गेलेला सिनेमातील नर नटयांचा प्रभाव असणारा वरवर दिखाऊपणाचा आव आनणारा पण प्रत्यक्षात शरीर व मनाची शक्ती गमाविलेला हा तरूण ग्रामराज्याच्या दुर्दशेला कारणीभुत होता कारण हा धड शेतीच्या कामाचा नव्हता धड चांगली नोकरी मिळण्यापत योग्यता असलेली नव्हता त्यामुळे तरूणांनी शरीर संपला कमवावी आरोग्य मिळवावे या वरवांनी जीवनातून काहीही प्राप्त होणार नाही असा उपदेश महाराजांनी गावात त्या तरूणांना आपल्या पोवाडयातून केलेला आहे.

## आचार भष्ट्रता :—

गावात दुर्दशा येण्यास अनेक गोष्टी कारणीभुत होत्या त्यावेळी आचार भष्ट्र लोक हे सुध्दा त्यात सामाविष्ट होते यांचे वर्णन करतांना महाराज एक पोवाडयात म्हणतात—

''पदोपदी लाचलूचपती वाढली अति,
काळाबाजार, चोरव्यापार
पापचं धव शिकवी व्यभिचार
वाढले शौक,व्यसन शृंगार रे जी जी''(१५)

गावात लाचलूचपत वाढली काळाबाजार, चोरीचे व्यापार आले यातून जे धन आले ते धन पापच असल्याने शौक, व्यसने व्यभिचारही सोबत आलेत. जर हे सर्व थांबवायचे असेल तर गावातील लाचलूचपत काळाबाजार थांबवावा लागेल अन्यथा गाव संपुर्ण भ्रंष्ट्र झाल्या शिवाय राहणार नाही असा इशारा महाराजांनी दिलेली आहे.

## समारोप :

राष्ट्रसंताच्या पोवाडयात ग्रामाच्या दुर्दैशेची कारणे त्यांच्या ग्रामीण जीवनाच्या सखोल परिचयाची साक्ष देतात ग्रामजीवनालालयाप्रत नेण्यास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांवर पोवडयातून प्रकाश टाकून जनजागृतीचे कार्य तकडोर्जीनी केलेले आहे.ग्रामीण जीवनातील लब्धप्रतिष्ठीत पणावर नेमकेपनाने बोट ठेवून ग्रामीतांचे डोळे उघडण्याचे कार्य पोवाडयातून झालेले आहेत.ग्रामजीवनात दुफळीला कारणीभुत ठरलेले राजकारण राष्ट्रसंतानी सर्वांच्या नजरेज पोवाडयातून धानले आहे.ग्रामजीवन अधिक सधन करण्यास ग्रामीण तयार व्हावा यासाठी म्हणून पोवाडयातील हे दोष दिग्दर्शन करण्यात आले आहे.ग्रामाच्या दुर्देशेचे कारण त्यावेळेचा भटकटलेला तरूण होता हे वर्तमान संदर्भातही लागू पडणारे आहे.आचार व विचार भ्रष्टता ही ग्राम दुर्देशेला मुख्यत: कारणीभुत आहे व हे दुर्गुण नवशिक्षित व उच्चपदस्थातच अधिक आहे हे राष्ट्रसंतानी पोवाडयातून पोवाडयातून दाखविले आहे.शक्तिहीन जीवन दुर्देशचे कारण आहे हे सांगून त्यांना सशक्त ग्राम निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले दिसत.व्यसनसधिनतेचा धिक्कार पोवाडयातून स्पष्ट दिसतात.राष्ट्रसंताचे पोवाडे हे नवग्राम निमिर्ती साठी प्रोत्साहीत करणारे व स्वमुल्यांकन करायला लावणारे आहेत.

सर्व सामान्य लोक ज्या छोटया—छोटया गावात राहतात त्या गावात कोणत्या प्रकारचे दोष आहेत हे राष्ट्रसंतानी दाखविले. या दोषांमुळेच गावाच आरोग्य कसे बिघडते हे सांगीतले. या दोषात गावामध्ये लोकांना दिसणारे दारू, गांज्याचे व्यसन, आळशीपणा, राजकारणातील दोन गट या गटात होणारी भांडणे, त्यातून उद्‌भविणारे कोर्ट खटले, या सोबतच लब्धप्रतिष्ठितपणामुळे 'मीच कसा मोठा' व इतर सर्वच कसे लहान कींवा तुच्छ हा भाव नेहमी असायचा. त्यातूनही अनेकदा एकमेकांशी विरोध उत्पन्न व्हायचा या शिवाय आचार व विचारांनी भ्रष्ठ असणारे लोकही गावात असायचे, तरूणवर्गही भटकलेला असायचा या सर्वांमुळे गावाचे आरोग्य बिघडणे स्वाभाविक होते. तुकडोजी महाराजांनी या सर्वांना उपदेश केला व्यसनाधिनतेचा त्याग करायला सांगीतले, राजकारण शांततेने व संयमाने करण्यावर भर दिला लब्धप्रतिष्ठेतपणा कशी घातक आहे याबाबत कानउघडणी केली भ्रष्ट मार्गाचा अवलंब चूकीचा आहे त्याच प्रमाणे तरूण वर्गाचे भरकटत जाने त्यांच्या भविष्यकाळासाठी संपुर्ण हानीकारक भाष्य केलेल दिसते. लोकजागृती होवून ग्राम पुन्हा सुस्थित यावे संपन्न व्हावे यासाठी तुकडोजी महाराजांचा हा प्रयत्न होता.

## संदर्भ ग्रंथसूची :


१) लहर जी बरखा — राष्ट्रसंत तुकडोजी महाराज श्री. गुरूदेव प्रकाशन, गुरूकुंज आश्रम, जि. अमरावती द्वितीय संस्कारण १९९९, पृ. २.

२) दारूबंदी— राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, श्रीगुरूदेव प्रकाशन, गुरूकुंज आश्रम, जि. अमरावती प्रथमावृत्ती १९८६, पृ. १

३) ग्रामगीता— राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निमिर्ती व अभ्यासक्रम संशोधन, मंडळ पुणे. पुनमुद्रण— २००३, पृ. तीन

४) लोकशाहीचे पोवाडे— श्री संत तुकडोजी महाराज श्री. गुरूदेव प्रकाशन, गुरूकुंज आश्रम, जि. अमरावती संस्करण २०००, पोवाडे ७ पृ. तेरावे

५) तत्रैव— पोवाडे ८ पृ. १६

६) तत्रैव— पोवाडे ८ पृ. ७

७) तत्रैव— पोवाडे ३ पृ. ६

८) तत्रैव— पोवाडे २ पृ. ४

९) तत्रैव— पोवाडे ७ पृ. १५

१०) तत्रैव— पोवाडे ४ पृ. ८

११) तत्रैव— पोवाडे ४ पृ. ९

१२) तत्रैव— पोवाडे ५ पृ. १०

१३) तत्रैव— पोवाडे ६ पृ. ११

१४) तत्रैव— पोवाडे ६ पृ. १२

१५) तत्रैव— पोवाडे ८ पृ. १६


❖❖❖

# नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेतील प्रयोगशीलता

**डॉ. सागर गवई**
स्व.भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे
विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा.
भ्रमणध्वनी 9405477431

## प्रस्तावना:

साठोत्तरी आंबेडकरी कवितेत नामदेव ढसाळ, त्र्यंबक सपकाळ, प्रह्लाद चेंदवणकर, यशवंत मनोहर या कवींनी आशय आणि आकृतिबंधांच्या दृष्टीने अनेक प्रयोग करून मराठी आंबेडकरी कविता समृद्ध केली. मुक्तछंद, गझल, अभंग ह्या सारख्या रचनांमधून ते सहज व्यक्त झाले आहेत. आपल्या आविष्कारात प्रयोगशीलता असायला हवी असे काही या कवींनी ठरवून योजलेले नाही, थेट व्यक्त होणे आणि आपल्या पध्दतीने व्यक्त होणे ही या कवींची गरज होती आणि ती तशी कवितेतून व्यक्त झाली आहे. आंबेडकरी कवितेत असे प्रयोग आजतागायत सुरूच आहेत. कवितेतुन सौंदर्याचा प्रत्यय देण्यासाठी असे प्रयोग आंबेडकरी कवी करीत आहेत.

नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेतही आशय, विषय, आकृतिबंध, रचनाशैली, प्रतिमा, अभिव्यक्तीच्या अंगाने नवीन प्रयोग केले आहेत. त्यामध्ये अरुण काळे, लोकनाथ यशवंत, महेंद्र भवरे, केतन पिंपळापुरे,आनंद गायकवाड,राजेश डोंगरे,भगवान भोईर,संजय डोंगरे,संजय घरडें, दिगंबर झाडे, सुनील अभिमान अवचार या कवींची नवे अग्रक्रमाने घेता येतील. प्रस्तुत शोध निबंधातून अरुण काळे,लोकनाथ यशवंत,आनंद गायकवाड,राजेश डोंगरे,भगवान भोईर,संजय डोंगरे,संजय घरडें,दिगंबर झाडे,सुनील अभिमान अवचार या निवडक कवींच्या कवितेतील प्रयोगशीलता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

## विषय विवेचन:

अरुण काळे यांनी जागतिकीकरणाची बदलती जीवनशैली मांडतांना सांगितिक काव्यशैलीचा अत्यंत प्रभावी वापर केला आहे.

'बजाऽऽव, नाचोऽऽ / श्वापदाने मारली शिकार
तोंड खुपसून दिली डकार
जागोजाग शिकारी झाले, नवनवे हाकारे आले
त्यांनी वाटा आडवल्या, पाणवठे आडवले
दुबळ्यांची कोंडी झाली, समूह अस्ताव्यस्त झाले
म्होरके लाभार्थी झाले, स्वतःमध्ये व्यस्त झाले
त्यांचे स्विच ऑफ झाले, नॉट रिचेबल झाले
आऊट ऑफ कव्हरेज झाले, मौजूद नाही म्हणाले
त्यांचे वाढदिवस आले, शुभेच्छांचे पीक आले
चंगळ चंगळ चंगळ चंगळ झाली चंगळीच्या झाल्या कविता,
चंगळीची झाली गाणी खानपान सेवा आहे, ऐश करा नाचाऽऽ
खुल्क है खुदाका आणि मुल्क जनतेचा
हुकूम कंपनीचा आहे, झिग लपालपालपा घुंब घुंब नकानका, झिंग झिग लपालपा'

(मल्टीलूटालुटीचा झिंग लपालपा, पृ.क्र. ९६-९७)

अरुण काळेची कविता ही नव्या प्रयोगाची दिशा घेऊन येताना दिसते. जागतिकिकरणाच्या कालखंडात शोषणाचे नवे संदर्भ घेऊन शिरलेला चंगळवाद आणि त्यामुळे दूषित होत जाणारे सांस्कृतिक पर्यावरण व्यक्त करण्यासाठी अरुण काळे यांनी केलेला 'बजाऽऽव, नाचोऽऽ , झिंग लपालपालपा घुंब घुंब नकानका ' यासारख्या सांगीतिक शब्दांचा वापर कवितेच्या सौंदर्यात भर टाकणारा आहे. अर्थात या कवितेते बदलत्या जीवनशैलीबरोबरच सांगितिक काव्यशैलीचा सुंदर नमुना अरुण काळे यांनी हाताळला आहे.

कवी लोकनाथ यशवंत यांनी केलेला छोट्याछोट्या तुकड्यांच्या अल्पाक्षरी कवितेचा प्रयोग लक्षणीय ठरला. त्यांच्या कवितेतील या प्रयोगासंदर्भात डॉ. अशोक इंगळे म्हणतात, "कवी लोकनाथ यशवंत यांनी कवितेत रचनेच्या दृष्टीने जो प्रयोग सिद्ध केला; त्यामुळे मराठी कविता चकितच झाली आहे. कारण अशा प्रकारची अभिनव रचना, मराठी कवितेत अपवादानेच लिहिली गेली. वास्तविक पाहता या नव्या प्रयोग रचनेमुळे कवीवर कठोर टीका सुद्धा झाली आहे. कुणी या कवितेला गद्यकाव्य म्हटले, तर कुणी विधानात्मक असल्याचे संबोधले. या साऱ्या टीकेनंतरही कवीने आपला आकृतीबंध न सोडता छोट्याछोट्या तुकड्यांची अल्पाक्षरी कविता लिहून मराठी कवितेला एका अर्थाने समृद्धच केले आहे."[१] उदा. 'आणि शेवटी काय झाले?' या कवितेत लोकनाथ म्हणतात,

'दळभद्री जीवनातून वर येताना  
तुम्ही आमच्या अंगणात आला  
आणि सारे आयुष्यच किडून गेले  
तुम्ही नादी लावल्यावर  
आम्ही तुमचीच भजनं गाया लागलो  
प्रचार कराया लागलो,  
स्वतःला गोठवून तुमचे कार्यकर्ते झालो.  
तुम्ही एकाएकी पक्ष बदलला  
अन् सारे तारूण्य नासून गेले.'

(आणि शेवटी काय झाले?, पृ. १६)

लोकनाथची कविता शेवटच्या कडव्यात वाचकाला अंतर्मुख करून विचार करायला - प्रवृत्त करणारी; उपरोध गर्भतेने खच्चून भरलेली कविता आहे. शिवाय या कवितेतील उपरोध शस्त्रासारखा टोकदार बनतो आहे. म्हणून या अल्पाक्षरीय कवितेने मराठी वाचकाला आपल्या प्रेमात टाकले असल्याचे प्रत्ययास येते.

कवी आनंद गायकवाड यांनी 'हिंदान' या काव्यसंग्रहात एका शब्द ओळींची कविता लिहून असा नवा प्रयोग साकारला आहे. त्यासंदर्भात बळी खैरे म्हणतात - "अल्पाक्षरी कवितेच्यापुढे जाऊन 'एकल शब्द ओळ' अशा भूमिकांचे पोस्टमार्टेम करीत एखाद्या निष्णात सर्जनासारख्या संपूर्ण संग्रहाच्या सर्जीकल ऑपरेशन थिएटरमध्ये आपल्या सकस चिंतनातून वावरताना दिसतो."[२] याचा अर्थपूर्ण प्रत्यय 'हिंदान' मधील प्रत्येक कवितेमधून येतो. उदा.,

"तो  
म्हणाला  
तू  
बरेच  
दिवसांपासून  
एकच  
ड्रेस  
वापरतो

मी
म्हणालो
अरे
नंग्याच्या
दुनियेत
एक
ड्रेस
काय
वाईट
आहे ? "

(हिंदान, पृ. ९)

वर्तमान जीवनशैलीवर उपरोधिक पण तीक्ष्ण प्रहार करून चिंतनाला प्रवृत्त करणे हे आनंद गायकवाड यांच्या हिंदानचे वैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्यांवर ही कविता सार्थ ठरली आहे.

'वज्रनाद' मधील दिगंबर झाडे यांची कवितेची शैली लक्षात घेण्यासारखी आहे. 'वज्रनाद' मध्ये दिगंबर झाडे यांनी अनुभवाला काव्यात्म लय बहाल करणारी कवितेची एक आत्मजात लय कवितेने टिकवून ठेवली आहे. उदा.

'ती मूर्तीमंत रचना;
की, बारिक कोरीव नक्षी
ती जाता पंखच गळते
उरले आठवणीचे पक्षी'

(आठवणीचे पक्षी पृ.क्र. १०)

'ति' च्याविषयीची उत्कटता मांडताना कविने वेगळीच शैली बहाल केली आहे. दिगंबर झाडे यांच्या कवितेचे मूल्यमापन करताना डॉ. अशोक पळवेकर म्हणतात, "अभिव्यक्तीच्या दृष्टिने फारसे नवीन प्रयोग या कवितेत नसले आणि प्रचलीत काव्य प्रवाहातील रुढ लय संभाळणारीच अभिव्यक्ती व्यवस्था या कवितेने स्वीकारलेली असली तरी आंबेडकरी विद्रोही कवितेतील प्रारंभीच्या अभिव्यक्तीरुपातील निवेदन आणि घोषणा-वाक्ये (लोकनाथ यशवंतच्या ) कवितेतील अभिव्यक्तिरुपाची तुकडेबंद रचना ह्या दोन्ही अभिव्यक्ती विशेषांच्या काहीशी दूर अंतरावर ही कविता उभी आहे. त्यामुळे गद्यसदृश लय या कवितेत कमी असून अनुभवाला काव्यात्म लय बहाल करणारी कवितेची एक आत्मजात लय कवितेने टिकवून ठेवली आहे. "[३]

राजेश डोंगरे यांच्या 'चळवळीची कविता' या संग्रहामध्ये आकृतीबंधाच्या अंगाने केलेला नवीन प्रयोग दिसून येतो. त्यांनी केलेल्या प्रयोगाविषयी डॉ. अशोक इंगळे म्हणतात, "या दीर्घ कवितेतील एकेका तुकड्यातून त्यांनी चळवळीची चिकित्सा केली आहे. मग ती चळवळ स्वातंत्र्याची वा आंबेडकरी चळवळ अथवा एखादी सामाजिक किंवा राष्ट्रीय चळवळ असो. त्या समग्र चळवळीविषयी कवी वैचारिकतेने कलात्मक भाष्य करतो. या भाष्याला कधी विधानात्मक रूपही प्राप्त होते."[४] उदा.

"चळवळ म्हणजे
'ढोलकीवरची थाप
आणि
घुंगराचा होणारा
अतोनात छळ'

(चळवळीची कविता, पृ. ७)

कवितेच्या छोट्या छोट्या तुकड्यांमधून कवीने सामाजिक व राजकीय चळवळीची साक्षेपी समीक्षा केली आहे. 'ढोलकीवरची थाप, घुंगराचा होणारा अतोनात छळ' या चळवळीसाठी उपयोजलेल्या प्रतिमा प्रयोगशिलतेच्या दृष्टीने अर्थपूर्ण ठरल्या आहेत.

सुनील अभिमान अवचार यांनीही आपल्या कवितेत यादीचे नवे तंत्र वापरले आहे. उदा.

‘ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे
ह्या धावपट्टीवरुन कोणीही टेकअप करु शकतो
ह्या पाऊल वाटेने कोणीही चालू शकतो
ह्या खिडकीतून कोणीही बाहेर पडू शकतो
ह्या दरवाज्यातून कोणीही बाहेर-आत येऊ शकतो
ही सलाईन सर्वांसाठी जीवनवाहिनी
ह्या औषधी आहेत सर्वांना आरोग्य संपन्न करण्यासाठी

(ब्राव्हो ! फॉक्स माइंड्स ऑफ कॅपीटॅलिस्ट, पृ.क्र. ४७)

याचबरोबर सुनील अभिमान अवचार यांनी 'मूर्त कविता' लिहीली आहेत. ही कविता अक्षरांच्या, शब्दांच्या दृश्य रुपाला अथवा ध्वनिरुपाला महत्त्व देऊन लिहीली जाते. सुलेखन किंवा मुद्रणकला यांच्या सहाय्याने मूर्त कवितेची निर्मिती होते. उदा.

‘,'?!"()@/:-;+%*=<>$[]{}¥#
'बो' सत्तर हजार वर्षापूर्वीची भाषा
अंदमान निकोबार मधली आजी मेली
आपल्याही भाषेचा असाच नुसता सांगाडा उरेल काय ?
बो ऽ चला, बो ऽ चला, बोऽ चला, बो ऽ चला, चला ऽऽ चला चलाऽऽ

(ब्राव्हो ! फॉक्स माइंड्स ऑफ कॅपीटॅलिस्ट, पृ.क्र. २०-२१)

सुनील अभिमान अवचार यांनी कि-बोर्ड वरील संकेत चिन्हाचा वापर करुन चिटींग या प्रकारात वापरल्या जाणाऱ्या दोन व्यक्तितील संवादाला कवितारुप दिले आहे.

भगवान भोईरांनी सुद्धा रचनेच्या दृष्टीने प्रयोग करताना पाच ते सहा ओळींची कविता लिहिली आहे. त्यातही पहिल्या चार ते पाच ओळीमध्ये एकेकच शब्द आणि शेवटची एक ओळ लांब; म्हणजेच शेवटच्या ओळीत संपूर्ण कवितेला आशयाच्या अंगाने कलाटणी ते देतात. अशा रचनेमुळे सामान्य रसिकाला एकदा वाचून अर्थ लक्षात येतो व वाचकाला खरा वाङ्मयानंद घेता येतो. उदा.

"मी
अंधारगाणी
गायचे
नाकारले
असतांना
लक्ष किरणांचा वर्षाव झाला !"

(उजेडगाणी, पृ. ९)

'लक्ष किरणांचा वर्षाव झाला!' ही ओळ आशयाला कलाटणी देणारी असून पूर्वीचा 'अंधार' नष्ट झाल्याचे सूचित करणारी आहे. नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेत भगवान भोईरांनी आकृतिबंध व रचनेच्या अंगाने केलेला हा प्रयोग लक्षणीय आहे.

संजय डोंगरे यांनी 'विप्लविका' लिहून आंबेडकरी कवितेला आकृतिबंधाच्या अंगाने प्रयोगशिलतेची ओळख करून दिली आहे. उदा.

"स्वातंत्र्य- देशावर प्रेम करणे
आवडत्या अवयवास मुभा
अंतर्गत आरक्षणाला प्रचंड विरोध.

(हीच ती वेळ आहे, पृ. ५५)

उपरोक्त विप्लविकेमध्ये पहिल्या दोन ओळी वस्तुस्थिती दर्शविणाऱ्या असून तिसऱ्या ओळीत कवीने गौप्यस्फोट केला आहे. तिसऱ्या ओळीत ठासून भरलेली विचारांची आग वाचकांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन तो विचार करायला प्रवृत्त होतो. आंबेडकरी कवितेला ही प्रयोगशीलता पूर्णतः नवी असल्याचे दिसून येते.

संजय घरडे यांनी 'नीलपंख' या काव्यसंग्रहामधून कवी 'पाखरू' ही प्रतिमा योजना करून एक प्रयोगशील अभिव्यक्ती घरडे यांनी साकारली आहे. या प्रयोगशिलतेबद्दल सतेश्वर मोरे लिहितात- "केवळ चार ओळींच्या बंधाची प्रत्येक कविता असलेला एक स्वतंत्र कवितासंग्रह आणि त्यातही एकच सूत्र प्रतिमा वापरून आशयाचा विस्तीर्ण पट उजागर करणारी कविता पृथगात्मतेने मराठीमध्ये यानिमित्ताने दाखल झाली आहे."[५] असा अतिशय वेगळा प्रयोग संजय घरडेंनी साकारून आंबेडकरी कविता समृद्ध केली आहे. 'उदा.

"तहानलेल्या पाखरावर
तू असे उपकार केलेस
एक ओंजळ भरलीस
अन सारे तळे चवदार केलेस."

(मूक नायक, पृ.१९)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या धम्मस्वीकाराच्या मूल्यांतरानंतर मूल्यहीन जगण्याला नवा अर्थ प्राप्त झाला. त्यामुळे दलितांच्या संपूर्ण जगण्यालाच नवा अर्थ प्राप्त झाला आहे. धम्मक्रांतीची फक्त एक घटना घडते नि माणसे एका रात्रीतून नवी मूल्ये स्वीकारतात. हे समग्र परिवर्तन नेमकेपणाने 'तहानलेल्या पाखरावर' या प्रतिमेतून कवीने सूचित केले आहे.

**सारांश,** एकूणच नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेत आशय, विषय, आकृतिबंध, रचनाशैली, प्रतिमा आणि अभिव्यक्तीच्या अंगाने विविध प्रयोग केले गेलेले आहेत. या प्रयोगशिलतेमागे तथागत बुद्ध आणि आंबेडकरी सौंदर्यशास्त्राचे भक्कम अधिष्ठान असल्याचे प्रत्ययाला येते. त्यामुळे समकालीन कवितेपेक्षा वैचारिकता, ज्ञानात्मकता आणि विद्रोहात्मकता या दृष्टीने ही कविता भिन्न असल्याचे सिद्ध होते. आपल्या आविष्कारात प्रयोगशीलता असायला हवी असे काही या कवींनी ठरवून योजलेले नाही, थेट व्यक्त होणे आणि आपल्या पध्दतीने व्यक्त होणे ही या कवींची गरज होती आणि ती तशी कवितेतून व्यक्त झाली आहे. कवितेतुन सौंदर्याचा प्रत्यय देणे या उद्देश्याने ही प्रयोगशीलता नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेत आली असल्याचे सिद्ध होते.

## निष्कर्ष :

१) साठोत्तरी आंबेडकरी कवितेप्रमाणेच नव्वदोत्तर आंबेडकरी कविता प्रयोगशील आहे.

२) नव्वदोत्तर आंबेडकरी कविता जागतिकीकरणाच्या प्रभाव परिणामांची मीमांसा करते.

३) नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेने सांगीतिक काव्यशैली, यादीचे नवे तंत्र, सुलेखन किंवा मुद्रणकला यांच्या सहाय्याने मूर्त कविता निर्मिती, अल्पाक्षरी, एकल शब्द ओळ कविता, एकाच सूत्र प्रतिमेचा प्रभावी वापर असे विविध प्रयोग करून मराठी कवितेला समृद्ध केले आहे.

४) नव्वदोत्तर आंबेडकरी कविता वर्तमान सामाजिक स्थितीवर कलात्मक भाष्य केले आहे.

## संदर्भ:

१) अशोक इंगळे: नव्वदोत्तर आंबेडकरी कविता, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्र. आ. २०१८, पृ. क्र.१२०

२) आनंद गायकवाड:-हिंदान, प्रस्तावना- बळी खैरे, आंबेडकरी साहित्य व कला अकादमी यवतमाळ, प्र.आ.२०१२, पृ. क्र. ११८

३) डॉ. अशोक पळवेकर: दिगंबर झाडे, वज्रनाद, क्रांतीमा प्रकाशन अमरावती २००३, पृष्ठ क्र. प्रस्तावना

४) डॉ. अशोक इंगळे: नव्वदोत्तर आंबेडकरी कविता, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्र. आ. २०१८, पृ. क्र. ११९

५) प्रा. सतेश्वर मोरे: संजय घरडे, नीलपंख, आशय प्रकाशन, बडनेरा, २००८ , पृष्ठ क्र. मनोगत

## आधारभूत काव्यसंग्रह:

१) अरुण काळे - रॉक गार्डन, लोकवाङ्मय गृह मुंबई दु. आ. २००४

२) लोकनाथ यशवंत - आणि शेवटी काय झाले?', यमक प्रकाशन चंद्रपूर, १९९५

३) आनंद गायकवाड - हिंदान, आंबेडकरी साहित्य व कला अकादमी यवतमाळ, प्र आ. २०१२

४) दिगंबर झाडे - वज्रनाद, क्रांतीमा प्रकाशन अमरावती प्र. आ. २००३

५) राजेश डोंगरे -चळवळीची कविता, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्र. आ. १९९७

६) सुनील अभिमान अवचार:मातृ सत्तेच्या कविता सुगम, अमरावती, २०१२

७)संजय घरडे: नीलपंख, आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन संवर्धन मंच अमरावती प्र आ. २००८,

❖❖❖

# साहित्य आणि समाज : एक जैविक अनुबंध

**डॉ. अनमोल शेंडे**
सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख
गोविंदराव वारजुकर कला-वाणिज्य महाविद्यालय,
नागभीड, जि.चंद्रपूर - 441205
ई-मेल : shendeanmol@gmail.com भ्रमणभाष : 9404120409

## सारांश :

साहित्य ही एक शक्ती आहे. साहित्यातून जे शब्द साकार होतात, त्याचा समाजाशी थेट संबंध असतो. समाज आणि साहित्य याचा परस्परपुरक संबंध असून साहित्यकृतीचे विश्व हे समाजवास्तवाने पूर्णपणे नियंत्रित झालेले असते. साहित्यिकाची अभिरूची ही समाजातून विकसीत होत असून समाजजीवनाला गतिमान करण्याचे काम साहित्यकृती करीत असते. समकालिनता हा साहित्यकृतीचा स्वभाव असतो. जीवनाच्या जळत्या रेषेवर उभे राहून साहित्यिक कलाकृती जन्माला घालतो. साहित्य कुठल्याही प्रकारचे असो, त्याचे संदर्भ सामाजिकच असतात. त्यामुळे साहित्य आणि समाज हा एक जैविक अनुबंध आहे असेच म्हटले पाहिजे.

## प्रस्तावना :

साहित्य म्हणजे जीवनाचे प्रवाही नि अखंड रूप ! साहित्य म्हणजे समाजाचा क्रांतदर्शी डोळा ! साहित्यिक हा समाजातील शक्तीशाली असा घटक असतो. जीवनाला सौंदर्याकडे, उज्ज्वलतेकडे नेण्याची फार मोठी भूमिका साहित्यिक निभावत असतो. साहित्यकृतीतून तो समाजाला केवळ ज्ञानच देत नाही; तर क्रांतीमनस्कताही जन्माला घालतो. समाजाच्या जाणिवा प्रफुल्लीत, जीवंत ठेवण्याचे काम करतो. समाजजीवनाच्या जाणिवा व्यक्त करण्याबरोबर समाज प्रवाही, एकसंध ठेवण्याचे काम साहित्यिक करतो.

साहित्य ही मूल्यगर्भ निर्मिती आहे. या निर्मितीचे झरे समाजातूनच उगम पावलेले असतात आणि ते थेट साहित्यिकांपर्यंत पोहचतात. साहित्यिक हा सामाजिक प्राणी आहे. समाजाचे नैतिक आरोग्य बिघडू नये याची तो अपार काळजी घेतो. समाजजीवनाला वगळून कुठल्याच साहित्यिकाला साहित्यनिर्मिती करता यावयाची नाही. माणूसकीचे मजबुत बांधकाम कुठल्याही परिस्थितीत कोसळू नये याची त्याला सतत काळजी घ्यायची असते. साहित्यव्यवहार हा मानवी उपक्रम असून समाजाच्या क्षमतेनुसार, गरजेनुसार साहित्यनिर्मिती होत असते. साहित्य हा समाजशास्त्रीय दस्तऐवज आहे. मात्र एक बाब लक्षात घ्यायची ती ही की, केवळ फोटोरेखन पद्धतीने साहित्यातून कधीच समाज आविष्कृत होत नसतो, तर समाजजीवनाची विविध अंगे साकारत असतांना जीवनाचा कलात्मक पद्धतीने शोध साहित्यिकाला घ्यावा लागतो. केवळ समाजाच्या बाहय गोष्टींचे वर्णन करून चालत नाही, तर मानवी जीवनाचा सर्वांगाने विचार करून साहित्याला आपली उज्ज्वलता सिद्ध करावी लागते. साहित्य आणि समाज यातील नाते अतूट असून समाजाला आशयदृष्ट्या पूर्ण रूप देण्याचे काम साहित्यिक करतो.

साहित्यकृतीतून समकालिनता वजा होऊ न देता समाजाच्या कल्याणासाठी साहित्याची सदैव धडपड चाललेली असते.

## उद्‌देश :

१) साहित्य आणि समाज यांच्यातील संबंध परस्परपुरक असून ते कुठल्याही पातळीवर नाकारता येत नाही.

२) साहित्य ही व्यक्तिच्या जीवनानुभव आणि जीवनदृष्टी यातून आकारास आलेली सेंद्रीय घटना आहे.

३) समकालिनता साहित्याचा स्वभाव असून समाजाला शक्तिसौष्ठव प्राप्त करून देण्याचे काम साहित्य करीत असते.

४) साहित्यात समकालिनता जेवढी महत्वाची, तेवढीच प्रामाणिकताही महत्वाची असते.

५) काळाच्या पलिकडे जाऊन कलाकृतीने विचार केला पाहिजे. त्यातच साहित्यकृतीची अस्सलता दडलेली असते.

## समाज, साहित्य, संस्कृती आणि समकालिनता :

साहित्यिक हा सामाजिक प्राणी आहे. साहित्यिकाला समाजातूनच पोषकद्रव्ये मिळत असतात. समाजातील चांगल्या-वाईट अनुभवातूनच साहित्यिकाच्या व्यक्तिमत्वाला आकार प्राप्त होत असतो. त्याच्या जाणिवा आणि नेणिवा भरभक्कम करण्याचे काम समाज करतो. साहित्यिक हा मानवप्राणी समाजात जन्माला येतो आणि या समाजातून प्रेरणा घेत तो त्याच्या जीवनाची दिशा ठरवतो. ज्याप्रमाणे झाड हे जमिनीशी असलेले आपले नाते नाकारू शकत नाही, तसे साहित्यिक हा समाजाशी असलेले आपले नाते नाकारू शकत नाही. त्याची सगळी पाळेमुळे ही समाजजीवनात खोलवर रूजलेली असतात. साहित्यिकाची अभिरूची ही समाजातूनच आकाराला येते. त्याच्या जगण्याचा पोत समाज निश्चित करतो. समाजाच्या संस्कारशाळेतून साहित्यिकाला विविध पैलू पडत जात असून त्याच्या व्यक्तिमत्वाला उभे करण्याचे काम समाज करतो. याचा अर्थच असा की साहित्य आणि समाज यांच्यातील संबंध हे परस्परपुरक अशा प्रकारचे असतात. साहित्य आणि समाज हा एक जैविक अनुबंध असून समाजवास्तवाला समांतर राहून साहित्यिक आपली विचारसृष्टी उभी करीत असतो.

साहित्य हा एक अतिशय प्रसन्न असा भावनिक नि मानसिक आविष्कार आहे. परंतु या आविष्काराचे मूर्त रूप समाजातूनच तयार झालेले असते, म्हणजेच साहित्यातून समाजाच्या जाणिवेचे, आशा-आकांक्षेचे आविष्करण झालेले असते. साहित्यिकांची संवेदनशीलता, मर्मभेदता, जीवन समजून घेण्याची वृत्ती आणि जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोण समाजातून तयार होत असतो. त्यातून साहित्यिक दिवसागणिक चोखंदळ होत जातो. अशा विलक्षण अनुभवातूनच तो साहित्यकृतीची कल्पना करतो. साहित्यिक ज्या समाजात जगतो, त्या समाजाशी तो आपले अतूट नाते प्रस्थापित करतो. असे नाते प्रस्थापित झाल्याशिवाय तो कुठल्याही अनुभवाला संचिताचे रूप देऊ शकत नाही. साहित्यकृतीचे विश्च हे समाजवास्तवाने नियंत्रित झालेले असते. साहित्यकृतीला विवक्षित आवाज पुरविण्याचे काम समाजालाच करावे लागते. साहित्यकृतीमधील तपशील साहित्यिक तयार करतो समाजातून ! या तपशीलाचे मर्म अनेक गुंतवळ्यासह, त्यातील जीवनजाणिवांसह साहित्यकृतीतून उभे राहते. “साहित्यकृतीचे प्रयोजन असते

अनुभूती. नवीन संगती लाभलेली अनुभूती. अनुभूती हा समाजजीवनाचा अर्क असते. अनुभूती या समाजाचाच इत्यर्थ असतात. समाजाच्याच प्रतीती असतात. आध्यात्मिक, निराशावादी वा व्यक्तिवादी अशा कोणत्याही प्रकारच्या अनुभूतींना समाजाचा या ना त्या प्रकारचा संदर्भ असतोच!"[१] साहित्यिकाच्या व्यक्तिमत्वात सामाजिकता सदैव तरंगत असते. त्यांच्या कलाकृतीतून विविध पध्दतीने समाजाच्या चालिरीतीचे संदर्भ, त्यातील सूक्ष्म छटा अधोरेखित झालेल्या असतात.

'साहित्य सामाजिक असते' असे म्हणणे म्हणजे सूर्य प्रकाशमान असतो असे म्हणण्यासारखे आहे. साहित्य सामाजिक असते असे म्हणणे म्हणजे आकाशात चंद्राचे अस्तित्व आहे, आकाशात ताऱ्यांचे अस्तित्व आहे असे म्हणण्यासारखे आहे. साहित्यातून सामाजिक तत्वाची जशी चर्चा होते, तशी असामाजिक तत्त्वाचीही बऱ्याचदा चर्चा होते. जे तत्व समाजहित जोपासणारे असते ते सामाजिक तत्व, ज्या तात्विकतेमुळे समाजाच्या हिताला कुठल्याही प्रकारचे नख लागत नाही ते सामाजिक तत्व. परंतु ज्यावेळेला असामाजिक तत्वाची आपण चर्चा करतो, त्यावेळेला त्यात सामाजिक हित सामावलेले नसते, समाजाच्या आरोग्याची काळजी त्यात सामावलेली नसते असा निष्कर्ष सहजपणे आपल्याला काढता येत असतो. परंतु एक बाब लक्षात घेतली पाहिजे ती अशी की साहित्यकृतीत अधोरेखित झालेले असामाजिकतेचे तत्व देखील समाजातूनच निर्माण झालेले असते. असामाजिकतेचा परिचय देणाऱ्या मनाचाही समाजाशी संबंध असतो. साहित्यात क्रांतीकारी विचारांचा जसा समावेश असतो, तसा प्रतिक्रांती साकारणाऱ्या विचारांचाही समावेश असतो. आपलं मन नेमकं कुठल्या पध्दतीनं विचार करतं, कुठल्या विचारांशी आपण नातं सांगतो, त्यावरच साहित्यकृतीत प्रकट झालेली मूल्ये सुनिश्चित होत असतात. वर्तमानाशी नाते सांगणारे मन नेहमीच गतीसोबत चालत असते. परिवर्तनवादी स्वभाव जपणारे मन नेहमीच समाजाच्या कल्याणाचा विचार करते. परंतु भूतकाळात रमणारे मन बऱ्याचदा पुनरूज्जीवनादी असते. पलायनवादाचा स्विकार करण्यातच परंपरागत विचारसरणी बाळगणारे मन धन्यता मानत असते.

व्यक्तींची एक सामाजिक संस्था असते. या संस्थेच्या काही गरजा असतात. त्या गरजेनुसार साहित्याची निर्मिती होत असते. समाजाची चक्रे उलटी फिरली की साहित्यातून मानवी मूल्ये प्रकाशमान होत असतात. समाजाचे नैतिक आरोग्य बिघडले की साहित्यातून स्वच्छ विचारांचा प्रकाश सांडत असतो. समाजाला जेव्हा थांबलेपणा प्राप्त होते, तेव्हा समाजाला गती देण्याचं काम साहित्य करीत असते. समाजात कुठल्याही प्रकारचा अंतर्विरोध होऊ नये यासाठी पापण्यांचा कडा पहारा देण्याचं काम साहित्याला करावं लागते. जीवन जगण्याचे मजबुत रचनाबंध कोसळू नयेत आणि समाजाने धावण्याची योग्य दिशा बदलू नये यासाठी साहित्य सतत जागल्याची भूमिका पार पाडीत असते. "साहित्याचा विचार मानव्यवादी दृष्टीकोणातून करायला हवा. मार्क्सवाद स्विकारायचा की आंबेडकरवाद स्विकारायचा, बौद्धवाद स्विकारायचा की गांधीवाद स्विकारायचा हे तर मतभेदाचे प्रश्न असतातच. परंतु दोन गोष्टी आवर्जून लक्षात घ्याव्या लागतात. साहित्य हा मानवी उपक्रम आहे म्हणून साहित्याला मानवतावादाचे अधिष्ठान असले पाहिजे."[२] मानवी मूल्यांचा हात सोडून किंवा समाजाला दुर्लक्षून साहित्यनिर्मिती होणे शक्य नाही. समाजाच्याही काहीएक ज्या गरजा असतात, त्यात साहित्यनिर्मिती ही एक महत्वाची गरज असते.

प्रत्येक गावाची जशी संस्कृती असते तशी साहित्याचीदेखील संस्कृती असते. मानवी जीवन टिकून राहावे, त्याला कुठल्याही वाईट पद्धतीने धक्का लागू नये यासाठी या साहित्यसंस्कृतीला सतत झगडावे लागते. समाजाचा सांस्कृतिक-राजकीय व्यवहार हा साहित्यसंस्कृतीतूनच नेमकेपणाने आविष्कृत होत असतो. साहित्याचा स्वभाव हा नेहमी मानवी मूल्यांचा उद्घोष करणारा असतो. माणूस हा जसा

पारंपरिक चाकोरीत राहून नीट जगू शकत नाही, तसा त्याला जगण्यासाठी भाषेचा, संस्कृतीचा आधार घ्यावा लागतो. समाजात चालत आलेल्या अनेक प्रथा, परंपरा, चालिरीतीशी तो आपोआप जोडला गेलेला असतो. त्यातूनच त्याची सांस्कृतिक मूल्यसरणी निश्‍चित होत असते. जीवन जसे गतिमान असते तसे साहित्याला देखील गतिमान असावे लागते. साहित्याची प्रकृती नवनवोन्मेषशालिनी अशीच असली पाहिजे. नुसते भूतकाळाचे ओझे अंगावर घेऊन साहित्य समाजासमोर नीट उभे राहू शकत नाही. साहित्य हे आकाशातून पडत नाही तर ते समाजातूनच उगवत असते. साहित्यिक हा समाजाचाच एक बलशाली घटक असल्यामुळे आणि तो ज्या काळात जगतो, त्या काळाचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. या अर्थाने साहित्य हे समकालीन असते आणि समकालीनतेकडे दुर्लक्ष करणारे साहित्य प्रगट होण्याला फारसा अर्थही नसतो. “काळ आणि त्याचे चलन, विशिष्ट काळात निर्माण होणाऱ्या राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक आणि भाषिक समस्या यांमुळे त्या-त्या काळातील साहित्य जसे नवे रूप घेते आणि नवा आशय व्यक्त करते तसेच ते एका नवीन जीवनदृष्टीलाही जन्म देत असते.”[३] ही जीवनदृष्टी व्यक्तिचे विवक्षित जगणे निश्‍चित करीत असते. साहित्य हे त्या त्या काळाचे अपत्य असते. समकालीन जीवन हाच त्याचा विषय आणि आशय असतो तथा संवेदना आणि भावनांमधून समाजाच्या जगण्याची स्पंदने मोहोरत असतात. साहित्य हे समकालीन काळातील वाद-संवादात उतरते. समकालीन काळात निर्माण झालेल्या धुमश्चक्रीत ते जीवंत हजेरी लावते. त्यातून जीवनाला उर्जा पुरवणाऱ्या आशयाची स्थाननिश्‍चिती साहित्य करीत असून जीवनाला अर्थपूर्ण, सौंदर्यपूर्ण आणि शक्तिसौष्ठव प्राप्त करून देण्याचे काम साहित्य करीत असते.

साहित्य आणि समाजाचे नाते हे जैविक असते. साहित्याचे समाजाशी असलेले नाते हे अतूट असते. हे दोन्ही घटक एकरूपच असतात असे म्हणत असतांना साहित्याला आपली अन्वर्थकताही नित्यनेमाने सिद्ध करावी लागते. भोवतीच्या संघर्षसामूग्रीत साहित्य स्वत:ला कसे सिद्ध करते, यावरच साहित्याचे यशापयश अवलंबून असते. साहित्य हे केवळ दस्तऐवज असत नाही तर युगांतर घडविणारी ती कलाकृती असते. निस्तेज मनांना चेतवणारी आणि माणसांच्या स्पंदनांना अत्यंत प्रामाणिकपणे आविष्कृत करणारी साहित्यकृती ही काळाच्या पलीकडे पाहणारी असते. साहित्य हे नुसते समाजाचे प्रतिबिंब असूच शकत नाही; तर समाजाला विधायक चेहरा प्राप्त करून देणारी ती शक्ती असते. साहित्याचे नाते समाजाला उज्ज्वलतेकडे नेणाऱ्या घटितांशी असते. समाजाच्या चेहऱ्यावर अमानुषतेचे डाग पडू नये आणि कुठल्याही प्रकारची अनैतिकता समाजात स्थापित होता कामा नये यासाठी साहित्याचा विद्रोह असतो. साहित्यकृती ही समाजाला व्यापक पातळीवर घेऊन जाणारी असून संस्कृतीची ती देखणी प्रतिमा असते. समष्टीचे हित सांभाळत समाजाच्या समस्यांचा स्वर साहित्याला मुखरीत करावा लागतो. केवळ समाजाच्या बाह्य गोष्टींचे वर्णन करून किंवा जीवन जसे आहे तसे चितारून साहित्याला आपली उज्ज्वलता सिद्ध करता येऊ शकत नाही. “खरे तर साहित्याच्या अंतिम प्रभावात एक नैतिक गुणवत्ता असते. ही नैतिक गुणवत्ता परंपरागत नीतितत्वांनी बांधलेली नसते. उलट काही वेळा ती त्यांना विरोधीच असते. साहित्याचा नैतिक संस्कार म्हणजे मानवी मनाला समृद्ध करणे, परिपक्व करणे हा असतो. एका मूल्यवान आविष्काराने माणसाचे मन आच्छादून टाकणे आणि त्यातून परिपक्वता साधने हा साहित्याचा प्रभाव, परिणाम वा संस्कार.”[४] साहित्यातील समकालीनतेबरोबर लेखकाच्या प्रामाणिकपणालाही अर्थ असतो. तो किती ताकदीने आणि समाजाच्या अंतर्मनात शिरून साहित्यनिर्मिती करतो हेदेखील महत्वाचे असते. हरवलेल्या मनाला ताळ्यावर आणण्याचे आणि परंपरेलाच सत्य मानणाऱ्या मनात आधुनिकता प्रसवण्याचे काम तेच साहित्य करू शकते, जे साहित्य अंतर्बाह्य सामाजिक झालेले असते. वाचक तेव्हाच

साहित्यकृतीकडे वळतात जेव्हा साहित्यकृतीची अस्सलता त्यांच्या नजरेत भरते. वाचकांच्या भावनांना आव्हान देण्याचे काम आणि काळाच्या पलिकडे जाऊन विचार करणारे भान खरी साहित्यकृती देत असते.

जीवनाच्या मध्यभागी उभे राहून साहित्यिक निर्मिती करीत असतो. जात, धर्म, वर्ण, वर्ग, वंश मानवजातीवर स्वार होऊ नये आणि समाजाचा मैत्रभाव, बांधिलकीचे बंध कुठल्याही सबबीवर तुटू नये यासाठी साहित्यिक सतत काळजी वाहत असतो. समाज सदैव सरळ पद्धतीने चालेलच असे नाही. समाजाचे जगही अनेक गुंतागुंतीने भरलेले असते अशा जगाला अर्थपूर्ण करण्याचे काम साहित्य करीत असते. केवळ समाजाची एक बाजु मांडून साहित्याला थांबायचे नसते. तर जीवन अधिक अर्थपूर्ण, सौंदर्यपूर्ण होण्यासाठी जीवनाच्या अनेक अंगाचा विचार साहित्यिकाला करावा लागतो. जीवनाचा खरा आशय आणि आकार लक्षात घेत माणूसकीची शिल्पे कोरायची असतात. "साहित्याच्या सामाजिकतेचा विचार वर्णनात्मक व मूल्यात्मक अशा दोन अंगांनी करता येतो. वर्णनात्मक अभ्यासात समाज, लेखक, वाचक, भाषा इत्यादींचा समावेश करता येतो. साहित्याची कलात्मक मूल्ये, सामाजिक बांधिलकी किंवा जीवनमूल्ये, वैश्विक प्रत्ययकारिता इत्यादी बाबींचा विचार मूल्यात्मक अंगाने करता येतो. एकूण साहित्याच्या सामाजिकतेचे स्वरूप हे व्यामिश्र आणि गुंतागुंतीचे असते."[५] अनेक आरोह-अवरोहांचा आणि अनेक स्तरावरील धुमश्चक्रिचा प्रत्यय समाजातून सतत पहायला मिळतो. अशा समाजाला वाहतेपण देण्याचे कार्य साहित्याला करावे लागते. बंधनात दडपून राहिलेले स्वर मोकळे करावे लागतात. साहित्याला माणूसकीचे सोहळे काळाच्या कसोटीवर तपासत साजरे करावे लागतात.

साहित्य आणि समाज हे दोन्ही घटक परस्परपुरक आणि परस्परावलंबी असे असतात. साहित्यिक हा मानवप्राणी समाजात जन्माला येतो आणि समाजाला पूर्णरूप देण्यासाठी धडपडतो. समाजाच्या नेणिवा भरभक्कम होण्यासाठी साहित्याच्या पंखात मूल्यांचा प्रकाश भरतो. समाजाच्या संस्कारशाळेत साहित्यिकाचे भरणपोषण होत असून समाज प्रतिकुलतेकडे वळू नये यासाठी तो काळजी घेतो. साहित्यिकाला जसे सुंदर व्यक्तिमत्व प्राप्त झालेले असते तसे सुंदर व्यक्तिमत्व कलाकृतीला लाभावे यासाठी साहित्यिक धडपड करतो. अनेक चित्र-विचित्र अनुभव घेत समाजवास्तवाशी समांतर राहून जगण्यायोग्य जग निर्माण करण्यासाठी साहित्यिक लेखन करतो. लेखकाचे अनुभव सच्चे असले की कुठलीही कलाकृती मग समाजाचा विश्वासघात करूच शकत नाही. अशी कलाकृती जीवनाबरोबर चालत असते. कुठल्याही सबबीवर ती जीवनाचा हात सुटू देत नाही. समाजाचे कल्याण हा खऱ्या कलाकृतीचा धम्म असतो. तेच तिचे प्रयोजन असते. परिघावर राहून जीवनाच्या भव्यतेची कल्पना कुठलीही कलाकृती करू शकत नाही. साहित्य आणि समाज हे एक अभेद्य नाते असून साहित्य कुठल्याही प्रकारचे असो, त्याचे संदर्भ सामाजिकच असतात. प्रश्न एवढाच असतो की, ही सामाजिकता ही कुठल्या पातळीवर साहित्यातून आविष्कृत होत असते!

## निष्कर्ष :

प्रस्तूत संशोधनपर लेखामध्ये साहित्य आणि समाज यांच्यातील जैविक अनुबंधाची चर्चा केलेली आहे. साहित्यकृतीचे प्रयोजन, साहित्यकृतीची वैश्विकता, साहित्याची कलात्मक मूल्ये, साहित्यातील सामाजिकतेचे स्वरूप या संशोधनपर लेखामध्ये मांडून दाखविले असून साहित्यिकाची जबाबदारी निश्चित केलेली आहे. समाजातील अनेक विस्तीर्ण गुंतवळ्याचा आणि विविध जीवनजाणिवांचा पट मांडत असतांना साहित्यकृतीसमोर असलेल्या आव्हानांचीही चर्चा केलेली आहे.

## संदर्भग्रंथ :


१) यशवंत मनोहर, समाज आणि साहित्यसमीक्षा, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९२, पृ. २४

२) सदा कऱ्हाडे, समाज आणि साहित्य, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९९९, पृ. २८

३) विजय तापस, साहित्य आणि समाज, (चळवळी आणि साहित्य - संपा : मोतीराम कटारे), गोदा प्रकाशन, औरंगाबाद, २०१३, पृ. १०७

४) के. रं. शिरवाडकर, संस्कृती, समाज आणि साहित्य, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१३, पृ. २९

५) मृणालिनी शहा, नवे साहित्यप्रवाह आणि बदलती भाषा, (आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता : संपा. डॉ. मृणालिनी शहा, डॉ. विद्यागौरी टिळक) पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००७, पृ. २४८-२४९


❖❖❖

# जीवनाच्या संघर्षाची गाथाः दडपलेल्या व्यथा

**प्रा.डॉ. मिलिंद भिवाजी कांबळे**
मराठी विभाग
विद्या विकास महाविद्यालय, समुद्रपूर
Email: milindkamble777@gmail.com Mob.No. 97 65 76 83 32

## प्रस्तावना:

कविता हा साहित्यप्रकार माणसाला व्यक्त होण्यासाठी खूप उपयुक्त आहे. माणूस आपल्या भावना कवितेतून शब्दात उतरवत असतो ,त्याच्या वाट्याला आलेला संघर्ष, त्याची वेदना ,त्याची व्यथा ,त्याची पिळवणूक तो कवितेतून मांडत असतो .जगताना त्याला आलेला अनुभव तो काव्य रूपाने साकारत असतो असा जीवनाचा व्यापक अनुभव कवी के.जी गादेकर यांनी त्यांच्या दडपलेल्या व्यथा या काव्यसंग्रहात मांडला आहे त्यांच्या वाट्याला आलेला वेदनामय जीवन संघर्ष, पदोपदी होणारा अपमान तसेच जीवनाचा व्यापक पट काव्यातून साकारतो कवी कधी अस्वस्थ तर कधी आत्मशोधाच्या अंतरिक भावनेने अस्वस्थ तर कधी आत्मशोधाच्या आंतरिक भावनेने पेटून उठतो तो आजचे बेगडी, ढोंगी समाजजीवन ते कवितेतून मांडतात. प्रस्तुत 'मानवी जीवनाच्या संघर्षाची गाथा: दडपलेल्या व्यथा' या शोधनिबंधातून कवी जे.के गादेकरांना आलेला जीवन अनुभव त्यांच्या काव्यातून शोधूया.

कवी के .जे गादेकर यांची माणसावर खूप श्रद्धा आहे त्यांच्या जगण्याचा केंद्र माणूसकी आणि मानवतावाद आहे. माणुसकी धर्म आणि माणुसकी जात मानणारी त्यांची भूमिका आहे ते मानवतावाद या कवी ते सांगतात की,

"जगी धर्म तो थोर मानवता
सुखी जीवन ते शांती समता
जगणे सुरक्षिततेची एकता जगी
ममता नी सत्य नीतिमत्ता हेची सूत्र खरे जगी तारता
सदभाव हाच आचारसंहिता जगी
कर जोडुनी झुके तेथे माथा
जगी एक तोचि थोर मानवता"१

या समाज जीवनात सत्य असत्य चालू आहे नेमके सत्यवादी कोणाला म्हणावे हा प्रश्न निर्माण झाला आहे सत्यवादी माणसाला समाजात कोणीच विचारत नाही तर चोर कावेबाज ,कपटी आणि कारस्थानी अशा असत्यवादी माणसाला समाजात मान आहे असे विचार कवी गादेकर यांनी त्यांच्या जाहिरात या कवितेत सांगितले आहे की ,

"खरे खोटे कळेना तळमळ जुळेना
वागाणे समजेना चालू दुनियेत
चालूची चलती
सत्य गोच्याखाली
खोटे भाव मारती फुकटचा

सत्य हे पडते
असत्य ताट राहते
मन कच खाते विचारात
ती दिखाऊ जाहिरात निसर्ग संकेत ही ठेवुनी मनात
सत्याची ही जात ठरलेली "२

तसेच गर्दीतले माणूस पण या कवितेत ही सत्य असत्य संदर्भात कवी सांगतात की,

"हरवले माणूस पण माणसाच्या गर्दीत
जो तो पाहतो आपापले हित
गर्दी दाटली बस मोटारीत
धीट धटिंगण जागे पकडता
गर्दी झाली दवाखान्यात सत्य हरपले वशिले लागतात"३

माणसाला जन्मजात प्रत्येक गोष्टीची लालसा मोह अपेक्षा असते तो रोज काही ना काही मिळवण्याची लालसा ठेवत असतो या लालसे पोटी तो स्वतःला विकण्याचा प्रयत्न करतो स्वतःचा आत्मसन्मान स्वाभिमान गहाण ठेवत असतो तरी पण त्याची लालसा काही केल्या संपत नसते अशीच लालसा कवी गादेकर यांनी त्यांच्या लालसा या कवितेत व्यक्त केली ती त्यांच्या शब्दात पहा,

"मानव तुझे ते मन
ओढ त्याची मिळविण्या मान
दाखवून फुकटची शान
त्याला ना कसली कर्तव्याची जाण
जसा खोट्याचा खप खऱ्या पैशात
उजळ माथ्याने फिरतो दिमाखात
स्वतःची करतो स्वतः जाहिरात
धडपड सारी स्वार्थ साधण्यात
नको हा उगी मिळवण्यात मान
जाणून घे हे तू तुझे अंतर्मन
ठेव काही तू कर्तव्याची जाण
चालून येतो तेव्हा आपोआप अपमान"४

तसेच कवी गादेकरांच्या हळव्या मनातील अंतरंगाने माणसाच्या आत दडलेला स्वार्थी भाव लाचारी कशी असते हे बेईमान या कवितेत त्यांनी व्यक्त केली ती कविता पहा,

"दिसतोस तू बेईमान बेईमान
दाखवतोस वर नीतिमान
नेतृत्वाचा तोरा मिळवून
तू करतोस आपलीच शान
लोक नेता तू सज्ञान
असा रे कसा स्वार्थी बेईमान

लुबाडूनी तू अज्ञानी जन
करतोस गोळा संपत्ती धन
काय वागणे वारे शहाणपण
दाखवतोस वर तू नीतिमान "५

कवी गादेकर यांची या देशावर आणि लोकशाही वर प्रेम आहे माणसाने माणसासारखे वागावे लोकशाही ऐक्यासाठी सतत धडपडत राहावे मानवी कल्याण साधावे पण आज देशात अनेक प्रश्न आहेत लोकशाहीत संपूर्ण रसातळाला गेली आहे आजच्या लोकशाहीचे भवितव्य नेमके कसे आहे या संदर्भातील लोकशाही या कवितेत कवी सांगतात की,

". निवडून येती मागेन पाहती
गरिबांचे रक्त शोषिती
अशीही लोकशाही का ढेकूणशाही ?
राजसत्ता ठरली मक्ता
गोड बोलून मतलब साधती
अशी ही घराणेशाही
कसलीही लोकशाही?
भ्रष्टाचारी वशिला भारी
ही तर आहे जुलूमशाही
स्वातंत्र्यात लोकराज्यात
कायदा हा हो गप्प राही"६

तसेच कवी गादेकर लोकशाही संदर्भात प्रश्न? या कवितेत पुढे सांगतात,

" सगळे झाले शहाणे
सांगतात ज्ञान
ऐकावे ते कोण कोणाचे
नाही आदर मान
जो तो स्वतः महान
मोठा लहान कोण हेच कळेना
अन्याय जुलूम उद्रेक होऊन
क्रांतीची पडते ठिणगी
असे का होते या लोकशाहीत? "७

कवी गादेकरांच्या मनात जशी लोकशाही संदर्भात सहानुभूती आहे तसेच त्यांच्या मनात संविधाना संदर्भात सहानूभूती आहे पण या देशातल्या माणसाला ना लोकशाहीची ना संविधानाची गरज वाटत नाही.या देशात कशी अराजकता वाढत आहे माणसाला माणूस रागाने पाहत आहे दिन दुबळी जनता पायदळी तुडवली जात आहे समता, स्वातंत्र्याचा या देशात फक्त खोटा खेळ चालू आहे या सर्व परिस्थितीवर भाष्य करताना कवी गादेकर विडंबन कवितेत म्हणतात,

" भारतात नाना जाती धर्म पंथ
जपतात जेथे आपले हित

चालत आली ही पिढ्यांन पिढ्या रीत
दीन दुबळी जनता पायदळी तुडवीत
पारतंत्र्याच्या शेकडो वर्षात
भोग भोगला गुलामगिरीत
समता बंधुत्वाची घेऊ शपथ
प्रति दिवस शाळा कॉलेजात
शपथ ती धरुनी गृहीत
मतदानाने निवडणूक होतात
जाती धर्माची मते हेरतात
मानवता नी समता उपेक्षित राहते
संविधान असे विडंबन होते "८

तसेच हाच धागा पकडत कवी गादेकर प्रजासत्ताक या कवितेत देशाविषयी माणसाविषयी म्हणतात की,

"प्रजासत्ताक दिनी
सत्तेची आठवण होऊन
मन हे हुरहुरे
दुबळे मन हे हुरहुरे
प्रजा एकीकडे सत्ता दुसरीकडे
स्वातंत्र्यांनी विकास कुठे राबते ?
मन हे हुरहुरते
स्पर्धा चालते राजकर्यांत
स्वातंत्र्याच्या या काळात
संबंध काय ते निवडणुकीपुरते
मन हे हुरहुरते
जाती धर्म वाद वाढू लागला
देश अभिमान संकुचित झाला "९

कवी गादेकर यांच्या मनात सध्याच्या काळाविषयी प्रचंड प्रमाणात खदखद आहे आजचा काळ माणुसकीचा न राहता विषमतेचा आहे या काळात माणसाच्या शब्दाला किंमत नाही सर्व नीती मुलांचा ऱ्हास या काळात होत चालला आहे कोणी कोणाचा मान ठेवायला तयार नाही अशा या काळात समाजाचे माणसाची कसे होईल या संदर्भात विदारकपणा कवींनी मातला हा काळ या कवितेत मांडलेला आहे ते म्हणतात,

"सध्याचा हा काळ जगणे महाग
मरण सुकाळ मातला धुमाकूळ
माणसाच्या गर्दीत हरवले माणूस पण
माजली अंदाधुंदी आली कठीण वेळ
वाढती महागाई जीव घेता घाही
करुनी कमाई पोटाची आबाळ

माणसे झाली उन्मत
कुणाला कुणी जुमानीत
मुलगा नाही बापात माजली बंडाळ
नीतिमत्ता गेली फसवेगिरी वाढली
भ्रष्टाचारी माजली सगळीकडे
घोटाळेच घोटाळे कुणी कुणा विचारावे"१०

तर पुढे विकृत हा काळ या कवितेत कवी गादेकर म्हणतात,

" टी.व्ही आला टेबलावर
दप्तर कानाकोपऱ्यात
लक्ष टीव्हीवर खेळते
अभ्यास होतो वंचित
शरीर प्रदर्शनाने
नटी प्रसिद्धीला येते
हिरो ढसतो मनात
खोट्या फसवीगिरीत
नेता नवीन होत नाही
रूढ झाली घराणेशाही
पैसा देऊन देऊन निवडून येतो"११

## सारांश

कवी के. जी गादेकर यांच्या दडपलेल्या व्यथा या काव्यसंग्रहातून मानवी जीवनाचा सार आला आहे. समाजातील समकालीन प्रश्न हाताळलेले आहेत. समाजातील दुष्ट वृत्तीचे दर्शन कवी काव्यात करतात .कवीच्या वाट्याला आलेला जीवघेणा संघर्ष येतो, नितीमूलांचा ऱ्हास, मानवी मूल्यांचा ऱ्हास काव्यातून येतो .कवींनी काव्यातून संविधान आणि भारतीय लोकशाहीच्या अवस्थेची चर्चा केली .माणूस कसा स्वार्थी झाला आणि संविधानाला संपवण्याचा प्रयत्न करू लागला आहे याचे दुःख कवी मनाला आहे. एकूणच कवी गादेकारांनी काव्यसंग्रहातून समाजातील अनेक प्रश्न व उपेक्षित प्रश्नांना वाचा फोडण्याचे खूप मोठे काम केले आहे असे म्हणावे लागेल.

## निष्कर्ष

१) नितीमूल्यांची आणि मानवी मूल्यांची पडझड हा काव्याचा केंद्र आहे.
२) समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांचा पुरस्कार कवी काव्यातून करतात
३) लोकशाहीची कशी समाजात विटंबना होते याचे चित्रण येते
४) संविधान वाचवणे काळाची गरज आहे असे आव्हान कवी काव्यातून करतात
६) कवी मनाचा संघर्ष आणि कवीच्या जीवनाची उपेक्षा कवितेत जाणवते
६) बदलणारा माणूस आणि बदलणारे मानवी जीवन पाहून कवी हतबल होताना दिसतात
७) माणसांनी माणसासाठी जगावे आणि लढावे हा संदेश कवी कवितेतून देतात.

## संदर्भसूची

१) के.जी गादेकर धडकलेल्या व्यथा, प्रबोधन प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती २०१७, पृष्ठ क्रमांक १६-१७

२) तत्रैव ,पृष्ठ क्रमांक, १८-१९

३) तत्रैव, पृष्ठ क्रमांक, २२

४) तत्रैव,प्रष्ठ.क्रमांक, २४

५) तत्रैव,पृष्ठ क्रमाक, २७-२८

६) तत्रैव, पृष्ठ क्रमांक, ३८-३८

७) तत्रैव,पुष्ठ क्रमांक, ३१-३२

८) तत्रैव,प्रष्ठ क्रमांक, ३३-३४

९) तत्रैव,पृष्ठ क्रमांक ,३९

१०) तत्रैव, पृष्ठ क्रमांक, ४३

११) तत्रैव,पृष्ठ क्रमांक, ५१

❖❖❖

# 'प्रवाहपतीत' या कादंबरीतील व्यक्तिचित्रण

**डॉ. लालबा चां. दुमटकर**
गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
चांदूरबाजार, जि. अमरावती

दिनेश काळे यांच्या 'सटाऱ्या भपाऱ्या' या कादंबरीच्या प्रवाहपतीत या दुसऱ्या भागात त्यांच्या अंगी असलेल्या संवेदनशीलतेचा, भावनाशीलतेचा, कल्पनाशक्तीचा खऱ्या अर्थाने त्यांनी कादंबरीत साकारलेल्या 'मधु' या व्यक्तिरेखेच्या रूपाने जाणीव होते; प्रवाहपतीतमध्ये मधु ही व्यक्तिरेखा अतिशय संवेदनशील, भावनाशील, विचारशील, नम्र, हळवी, स्वप्नाळू, सुंदर जीवनाचे स्वप्न पाहणारा असा एका आदर्श सुसंस्कारी कुटुंब वत्सल जीवनाचा तो टोक आहे. पुण्यासारख्या शहरात एक ग्रामीण भागातून शिकण्यासाठी आलेला तरुण शिक्षण घेवून तिथेच नोकरी करतो आणि पुण्यातीलच एका सुशिक्षित सुसंस्कारी सुंदर जोडीदाराचे स्वप्न पाहतो आणि ते स्वप्न पूर्णही करतो. या दरम्यान त्याच्या वैवाहिक जीवनात अनेक चढउतार येतात त्या चढउताराला सामोरे जात तो अलीकडे या धावपळीच्या जीवनात तरुण-तरुणीच्या समोर एका आदर्श जीवनाचा भाग बनतो असे हे प्रवाहपतीतचे कथानक वाचकाच्या मनावर मोठा भावनिक परिणाम करून जाते; तसे पाहता दिनेश काळे हे मराठी साहित्य क्षेत्रात एक ठोस मानवतावादी भूमिका घेऊन लेखन करणारे कथाकार, कादंबरीकार, नाटककार आणि कवी म्हणून परिचित आहेत. त्यांची समाजाप्रती असलेली निष्ठाच त्यांना विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कौटुंबिक विषयावर लिहिती करते नव्हे लिहिण्याचं बळ देते. मराठी साहित्यातील जवळपास सर्व वाडमय प्रकार त्यांनी हाताळलेले आहेत. कृतांत, निशब्द शांतता, डिव्होर्स, अधांतरी, कर्तव्य, निराभास, प्रवाहपतीत, समर्पित, आसक्ती, कायमचा घर जावई हवा, घरातल्या सावल्या, नियतीचा डाव, सटाऱ्या भपाऱ्या, एक सत्य, ती दोघं या कादंबऱ्या; सारे दिवस सारखेच, अनपेक्षित, मनाची अभिलाषा, अश्रू पावसात भिजले हे कथासंग्रह; ध्यासपर्व, जावयाच रामायण, तिसरी प्रतिमा आणि इतर एकांकिका, कलेतले पक्षी (दोन अंकी नाटक) वादळी वाऱ्यासारखं ही नाटके; साद पडसाद, मनातले, कळायला लागल्यापासून हे लेखसंग्रह; चिवचिवाट हा बालकवितासंग्रह; आवडत्या गोष्टी, बालकथासंग्रह; निसर्ग माझा मित्र, बालकादंबरी; वाघाला समज सारे खुश ही बालनाटिका आणि मन की तलाश हा हिंदी कथासंग्रह इत्यादी ग्रंथसंपदा प्रकाशित असून त्यांच्या लेखनाचा पिंड मात्र सामाजिक आहे. मराठी वाचकाला लेखक म्हणून परिचित असले तरी मुळात ते एक कवी सुद्धा आहेत. त्यांचा 'चिवचीवाट' नावाचा बालकवितासंग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या चिंतनशील, विचारशील बुद्धीला बालमनाची जोड मिळाल्यामुळे त्यांच्या लेखनाची भाषा ही अधिक निखळ, निस्वार्थ, चिंतनशील, जिज्ञासू आणि तेवढीच संवेदनशील बनत गेल्याची वाचकाला त्यांचे साहित्य वाचताना जाणवते. त्यांच्या एकूणच लेखनाचा परिसर हा ग्रामीण व शहरी असल्यामुळे बदलत्या सामाजिक, कौटुंबिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात प्रकर्षाने उमटताना दिसतात.

त्यांची 'सटाऱ्या भपाऱ्या' ही कादंबरी दोन वेगवेगळे कथानक घेऊन वाचकांसमोर अवतरते, पहिल्या भागात दिनेश काळे यांनी कादंबरीच्या नावाप्रमाणेच एका गावातील दोन बड्या राजकारण्यांचे, त्यांच्या वागण्या बोलण्याचे सटाऱ्या भपाऱ्याच्या रूपाने अलीकडच्या काळातील अतिशय बोलके व वास्तवदर्शी चित्र वाचकापुढे उभारते तर कादंबरीच्या 'प्रवाहपतीत' या दुसऱ्या भागात पहिल्या भागाचा काही संबंध येऊ न

देता एकदम नवे आणि वेगळे कथानक घेऊन मधू व अनघा या व्यक्तिरेखेच्या रूपाने एक आदर्श वैवाहिक जीवन जगणाऱ्या, जीवनातील कठीण प्रसंगाला तोंड देत जीवन सुखी बनवणाऱ्या अतिशय हळव्या, प्रेमळ, प्रामाणिकपणाचे टोक असलेल्या निस्वार्थी, जबाबदार, कुटुंबवत्सल, माणुसकीची जाणीव असलेल्या वैवाहिक जोडप्याचे आदर्शवत जीवन दर्शवतात. अशी ही दोन वेगवेगळ्या भागात विभागलेली कादंबरी वाचकाला मात्र एका बाजूने बदलत्या खोटारड्या राजकीय जीवनाची ओळख करून देते तर दुसऱ्या बाजूने वाचकावर आदर्श जीवनाचे संस्कार करते.

'प्रवाहपतीत' या दुसऱ्या भागात दिनेश काळे यांनी मधुचे व्यक्तिचित्र साकारलेले आहे. ते अतिशय प्रामाणिक असून वाचकाला खीळऊन ठेवणारे आहे. मधु मनाने खूप हळवा आहे, विचारशील आहे आणि तेवढाच चिंतनशीलपण आहे. त्याला अगदी लहानपणापासूनच आपल्या परिस्थितीची जाणीव आहे तो कधीही कुणाचे वाईट चिंतत नसतो. सतत तो कोणत्या ना कोणत्या विचारात असतो. ज्यावेळेस तो स्वतःच्या लग्नाचा विचार करतो तेव्हा तो अतिशय चिकित्सक बुद्धीने प्रत्येक गोष्टीकडे पाहतो. त्यात माणूसपण खूप भरलेला आहे. तो आपल्या जोडीदारासोबतचे अनेक स्वप्न पाहतो. त्याला त्याच्या जोडीदाराविषयी विचारल्यानंतर अतिशय प्रामाणिकपणे आपला जोडीदार कसा असायला पाहिजे यासंबंधी आपले मत आपल्या मित्रांसमोर मांडतो तो म्हणतो, "फार वेगळी म्हणजे चारचौघी सारखी नसावी, मर्यादा पाळणारी, जबाबदारीची जाणीव...मोठ्यांचा आदर करणारी असावी. अहंकाराला जवळ न करणारी मितभाषी असावी"1 आणि खरंच त्याला त्याच्या स्वभावाला जुळून घेईल असा जोडीदार मिळतो. मधुला प्रत्येक गोष्टीची जाणीव आहे आणि म्हणूनच तो अतिशय नम्रपणे आपले कर्तव्य बजावत असतो. यामुळेच त्याच्या ऑफिस मधील त्याच्यापेक्षा ज्येष्ठ मंडळी असून देखील त्याच्या कामाच्या प्रगतीमुळे त्याचं प्रमोशन केल्या जाते. तो पहिल्यांदा यासंबंधी अचंबित होतो. हे सर्व केवळ त्याच्या चांगल्या कामामुळे आणि चांगल्या स्वभावामुळे त्याला मिळत असते. खानावळीमध्ये यशोदाबाई ही त्याची जेवनासाठी वाट पाहतच असते यशोदाबाईला कोणीही नाही. त्यामुळे कोणावर आपण अवलंबून राहू नये म्हणून यशोदाबाई सासर व माहेर यांच्यापासून दूर राहून स्वतःची खानावळ चालवते. त्याच खानावळीत मधू संध्याकाळच्या जेवणासाठी जात असतो. एकदा यशोदाबाई मधुला अस्वस्थ दिसतात तेव्हा मधू त्यांना मन मोकळं करण्यासाठी आपल्या गावी आपल्या आई-वडिलांना भेटण्यासाठी जायला सांगतो. त्याने तुमचं मन थोडं हलकं होईल ही मधुची भावना असते. थोडक्यात मधू हा अतिशय प्रामाणिक, कर्तव्यदक्ष, वडीलधाऱ्यांचा मानसन्मान करणारा, मित्रात मिसळून जाणारा, परिस्थितीची जाणीव असणारा, इतरांना मदत करणारा मुलगा आहे.

'मधू' ही व्यक्तिरेखा लेखकाने अतिशय विचारपूर्वक या कादंबरीतून साकारलेली आहे. या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून वाचकावर माणुसकीची छाप सोडलेली आहे, असा प्रश्न कादंबरी वाचताना वाचकांच्या मनात निर्माण होतो. मधुच्या स्वभावाची चित्रण करताना, "त्या सर्वांमध्ये मधु कुठेही कमी पडत नव्हता. लाखात शोभून दिसावा असा आणि लाखात सापडणार नाही अशा स्वभावाचा तो होता. अनेकांनी मनातल्या मनात त्यांच्या परिचयातील मुलींसाठी मधुची निवड केली होती"2 या कादंबरीतील प्रत्येक पात्र अतिशय आदर्शवत जीवन जगताना दिसून येते. मधू तर आदर्श जीवनाचा टोक आहे. असं म्हटले तरी काही वावगे ठरणार नाही. सद्यपरिस्थितीत समाजात अशा आदर्श व्यक्तीची कमतरता आहे. माणूस माणसासारखे न वागता जनावरासारखा वागताना दिसतो आहे. माणूसपणाची सर्व मूल्य आज नष्ट होताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत या तरुण पिढीवर चांगले संस्कार करण्यासाठी चांगले शिकवण देणे ही काळाची गरज आहे आणि ते अशा संस्काररूपी कथा, कादंबरीच्या माध्यमातून समाजावर करणे

आवश्यक आहे. समाजात आज मूल्यांचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होताना दिसत आहे. ही जीवनमूल्य समाजात रुजली पाहिजेत त्यासाठी अशा मूल्यात्मक साहित्याची मोठ्या प्रमाणात निर्मिती होणे गरजेचे आहे.

लेखक मुंबईसारख्या मोठ्या मेट्रोसिटीत राहतो. तिथे एका बाजूने विकासच विकास आहे तर दुसऱ्या बाजूने तरुणात मोठ्या प्रमाणात मूल्यांचा ऱ्हास होताना दिसतो, त्यांच्यात व्यसनाधीनता वाढलेली दिसते, कोणाचेही कोणाशी देणे घेणे नाही, माणूस वरचेवर हा असंवेदनशील, विचारशून्य होताना दिसतो आहे. प्रत्येक जण पैशाच्या मागे धावताना दिसतो. अशा वेळेस मन खिन्न होते; ते माणूसपण शोधण्याचा प्रयत्न करते. मधू आणि अनघा यांच्या लग्नानंतर दोघांमध्ये काही गैरसमज निर्माण होतात त्यावेळेस यशोदाबाई मधुला विश्वासात घेऊन लाख मोलाचा सल्ला देतात त्या म्हणतात, "मधु मी वयानं तुझ्यापेक्षा खूप मोठी आहे म्हणून एक सांगते, बायकोच्या मनाला खूप माया दिली आणि तिला समजून घेतलं तर ती नवऱ्यावर मनापासून प्रेम करते. जराही कसूर ठेवत नाही आणि एकदा का तिच्या मनाविरुद्ध होत असेल तर तिला सहवास नकोसा होतो आणि दूर जाण्याचा प्रयत्न करते. त्यातून दुरावा निर्माण होतो"3 असे सूखी जीवनाचे मंत्र यशोदाबाईकडून मधुला आईच्या रूपाने शिकायला मिळतात.

कादंबरीच्या या दुसऱ्या भागात मधू, अनघा, श्रीकांत, यशोदाबाई, केरूळकरबाई हे सर्व पात्र अतिशय आदर्शवत जीवन जगणारी आहेत. विशेषत: आधुनिक काळात नवतरुण मुला-मुलींचे नोकरीच्या निमित्ताने शहरात आई-वडिलांपासून दूर राहून नोकरी करीत असताना, वैवाहिक जीवन जगताना कोणत्या गोष्टीची काळजी घेतली पाहिजे, आदर्श जीवन कसे जगले पाहिजे, एकमेकांना कसे समजून घेतले पाहिजे आणि आपले जीवन कसे सुखी, समृद्ध करायला पाहिजे हे तत्वज्ञान सदर कादंबरीतून जागोजागी वाचायला मिळते. वैवाहिक जीवनात कटू अनुभव येतच असतात, संकटे येतच असतात, धकाधकीच्या जीवनात एकमेकाप्रति समज गैरसमज निर्माण होतच असतात, यातून सावरण्यासाठी आपण एकमेकांना कसे समजून घेतले पाहिजे याचे अतिशय मर्मभेदक, प्रेरणादायी शिकवण मधू, अनघा, यशोदाबाई यांच्या रूपाने वाचायला मिळते म्हणून ही कादंबरी अतिशय वाचणीय आहे.

सारांश कादंबरीच्या पहिल्या भागात गावातील राजकारण, समाजकारण, हेवेदावे, गावगाड्यांची रचना, वेगवेगळ्या प्रवृत्तीची माणसे, राजकारणातील चढाओढ, एकमेकांना कमी लेखने, वरचढपणा आणि सत्तेसाठी चाललेली स्पर्धा याचे ग्रामीण भागातील बोलीभाषेसह केलेले चित्र अतिशय प्रत्ययकारी असून शहरातील राजकारणाचे वारे आता खेड्यापर्यंत पोहोचले असल्याची जाणीव करून देणारे आहे. कादंबरीची भाषा अतिशय सुंदर असून छोटी छोटी वाक्य रचना, मनातील सहज भावनांचे प्रकटीकरण, नाजूक, हळुवार भाषा कधी कधी नटखट शृंगारिक रूप धारण करते. प्रसंगानुसार भाषेतील लकब बदलत जातात. कधी ती रोखठोकपणा धारण करते तर कधी ती शृंगारिक, विचारशील, चिंतनशील, तत्वज्ञानाचे बोलही बोलते. माणसाला विचार करायला भाग पाडते तर कधी संबंध जीवनाचे तत्वज्ञान, जगण्याची रीत एका क्षणात शिकून जाते.

## संदर्भसूची :

1) दिनेश काळे - सटाऱ्या भपाऱ्या (कादंबरी) - सयाजीराजे प्रकाशन, अकलूज. नवीन आवृत्ती 2019, पृष्ठ क्रमांक 95

2) तत्रेव पृष्ठ क्र. 168

3) तत्रेव पृष्ठ क्र. 142

❖❖❖

# संत साहित्य आणि समाजप्रबोधन

**डॉ. पद्माकर डिगांबर वानखडे**

नेवजाबाई महाविद्यालय ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर (महाराष्ट्र राज्य)

इमेल :- padmakarvishu@gmail.com भ्रमणध्वनी :- 9975190539

## सारांश :-

महाराष्ट्र ही संतांची व वीरांची भूमी म्हणून सर्वत्र प्रख्यात आहे. महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, शैव संप्रदाय ते आजपर्यंतचे विविध संप्रदायामध्ये संताची मोठी परंपरा आलेली दिसून येते. संतांच्या या परंपरेने सामान्य जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणला. महान असे अनुभव असलेल्या महानुभावांनी समाजातील अंधश्रद्धा दूर करून समता, बंधुता व प्रेम या मूल्यांना चालना देऊन जातिभेद दूर सारून दीनदलितांना, सर्वसामान्यांना जवळ केले. संत तुकारामांनी आपल्या अभंगातून, ज्ञानदेवांनी ओव्यांमधून, दासबोधांनी आपल्या श्लोकांमधून, एकनाथांनी भारुडे व स्फूट काव्यातून समाज प्रबोधनाचे अमूल्य असे धडे गिरवले. अक्षयरूप अशा अभंगातून संत तुकारामांनी तत्कालीन समाज व्यवस्था, भोंदूगिरीपणा, कर्मकांड याबाबत परखड टीका केली. संत ही पृथ्वीतलावरील साक्षात कल्पतरूच होत, असे ज्ञानदेवांनी पसायदानातून सांगून संतांची महती सर्व जगाला उलगडवून दाखविली. संताच्या संगतीने सामान्य माणूस असामान्य होऊन जातो. शिक्षणापासून वंचित असलेला समाज तारण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संताच्या विविध ग्रंथसंपदेने केले. संताची कृती आणि विचार यामध्ये एकत्व असल्यामुळे हे सहज शक्य झाले. ज्या काळात संस्कृत भाषेचे प्राबल्य होते, त्या काळात लोकभाषेतून 'ज्ञानेश्वरी' सारखा महान ग्रंथ लिहून संत ज्ञानदेवांनी एकप्रकारे क्रांतीच केली. संताच्या समाजप्रबोधनामुळे सामान्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडून आला, असे म्हटल्यास वावगे ठरत नाही.

## प्रस्तावना :-

संत हे समाजासाठी लोकशिक्षक ठरलेत. अध्यात्मिक समता ही त्या काळाची गरज असल्याने संतांनी त्याप्रकारे प्रबोधन केले. संताचा मार्ग हा सामान्यजणांचे जीवन अंतर्बाह्य उजळून टाकण्याचा राजमार्ग ठरला. समाज चारित्र्यसंपन्न विवेकनिष्ठ व्हावा, आपुलकी, सहानुभूती वाढीस लागावी, समाज वैचारिकदृष्ट्या सुदृढ व्हावा, यासाठी सर्व संत मंडळींनी आपल्या सर्व संसाराचा त्याग करून, लोभ, माया बाजूला सारून परहितासाठी आपले सारे आयुष्य वेचून टाकले. संताचा जन्म हा लोककल्याणाशी जुळलेला असतो. 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती, देह कष्टविती उपकारे' समाजाचा सर्वांगीण विकास त्यांचे हित साधणे, त्यांना सुख मिळवून देणे हेच संताच्या कार्याचे उद्दिष्ट असते व संत आपल्या उद्दिष्टप्राप्तीसाठी सतत झटलेले दिसून येतात.

**बीजशब्द :-** संत परंपरा, अध्यात्मिक समता, अध्यात्मक्षेत्र, अध्यात्मदृष्टी, संप्रदाय इत्यादी

## संतानी कृती व उक्तीतून केलेले समाज प्रबोधन :-

महाराष्ट्राला लागलेली संत परंपरा ही सौभाग्याचे लेणेच आहे. संतांनी आपल्या वाणीतून, कृतीतून, उक्तीमधून केवळ समाजहित लक्षात घेऊन आपले आयुष्य वेचले. दिशाभूल झालेल्या समाजाला वाटसरू बनून मार्ग दाखविण्याचे महत कार्य संतांनी केले आहे. संत ज्यांच्या शिकवणीचा कधी अंत होत नाही, त्याला आपण संत म्हणावे. ज्यांचे विचार त्रिकालबाधित सत्य आहेत, असा जो तो संत होय. असे आपण सर्वसाधारणपणे म्हणत असलोतरी त्या म्हणण्यामध्ये पूर्ण तथ्यता आहे.

'संत साहित्य आकलन आणि अध्यापन' या ग्रंथामध्ये 'संत साहित्याची प्रस्तुतता : काल आज आणि उद्या' या लेखांमध्ये संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. र.बा मंचरकर संत शब्दाचा अर्थ उलगडतांना म्हणतात, "संत ही अध्यात्म क्षेत्रातील अत्यंत उच्च कोटीची अवस्था आहे. 'सेंट' या इंग्रजी शब्दाने त्यांचे भाषांतर करण्याची पद्धत योग्य नाही.' अद्भुत कृत्य करणारा पवित्र माणूस' हा 'सेंट' चा अर्थ आहे. तर 'सर्वभूतहितरत ज्ञानी, प्रेमळ भक्त' हा 'संत' शब्दाचा अर्थ आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला सामाजिक परिमाणही आहे. संत युगंधर लोकनायक होते. इह-परलोकीचे मार्गदर्शक होते."[1] संत या शब्दाची व्याख्या अतिशय माफक स्वरुपाची अभ्यासकानी येथे केली आहे.

## संतांनी लोकभाषेचा वापर केला :-

संतांनी आपले विचार, तत्त्वज्ञान मांडण्यासाठी लोकभाषेचा वापर केलेला दिसून येतो. महानुभाव संप्रदायातील शिष्य परंपरेने ग्रंथाची भाषा ही लोकभाषा ठेवली आहे. संत ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेचा वापर न करता आपली मायबोली मराठी भाषेतून 'ज्ञानेश्वरी' उर्फ 'भावार्थदीपिका' हा ग्रंथ पूर्ण केला. माझी मराठी भाषा अमृताहून गोड असून तिच्यापुढे सर्व फिके पडत असल्याचे ज्ञानदेव आपल्या ओव्यातून सांगतात. संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथांनी, समर्थ रामदास यांनी सुद्धा आपले ज्ञान लोकांसमोर आपल्या भाषेतूनच मांडलेले दिसून येते.

## अंधश्रद्धा निर्मूलन :-

अठरापगड जाती असलेल्या महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संतपरंपरेने केलेले दिसून येते. संत तुकारामांनी, संत नामदेवांनी ढोंगी साधू वर परखड टीका केलेली दिसून येते. 'ऐसे कैसे झाले भोंदू, कर्म करून म्हणती साधू, 'अंगाला लावुनी राख,डोळे झाकून करती पाप... अशा ढोंगी बाबांच्या कर्मकांडाला थांबवण्याचे कार्य या सर्व संतांनी केलेले दिसून येते व त्याचा समाजावर पुढच्या काळात उचित परिणाम झाल्याचे लक्ष्यात येते. या संतपरंपरेच्या प्रभावाबद्दल प्रा. भीमराव य. संभाजी आपल्या लेखात म्हणतात, "संत परंपरेच्या प्रभावामुळे जातीपातीच्या उच्चनीचतेचे प्रस्थ कमी झाले. सोवळ्या ओवळ्यांच्या विचारांचे स्तोम कमी झाले; अंधश्रद्धा, धार्मिकता यांचा पगडा कमी झाला; कर्मकांडाचे प्रस्थही नगण्य ठरले."[2]

बहुजन समाजाला आत्मसन्मानाने जगण्याची उमेद संताच्या प्रबोधनामुळे झाली. संतांनी समाजात नीतिमत्ता, भूतदया समता, बंधुता प्रस्थापित केली. त्याचा सामाजिक परिस्थिती सुधारण्यास फायदा झाला. देवळातल्या देवापेक्षा माणसातला देव पाहण्याची दृष्टी संताच्या विचारामुळे शक्य झाली. मानवतावादी विचारधारा समाजात दूरवर पसरली गेली. संत दु:खीतांचे आधारस्तंभ बनले. संताच्या समाजप्रबोधनात समाजाबद्दलची कळकळ आणि आत्मीयता जागोजागी दिसून येते. समाजात असलेल्या

अज्ञानामुळे सामान्य लोक कर्मकांडाच्या, बाह्य तंत्राच्या मागे लागतात व स्वतःचे नुकसान करून घेतात. संत तुकारामांनी 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही, 'मानियेले नाही बहुमता' या विचाराला प्राधान्य देऊन समाजाला उपदेश केला. जातीय आणि वर्गीय विषमतेवर सर्वात प्रखर वैचारिक हल्ला त्यांनी केला.

## समाजोद्धारासाठी स्त्रियोद्धार :-

संत विचारामुळे स्त्री शुद्रांना देखील मोक्षाचा मार्ग खुला झाला. महानुभाव, वारकरी, समर्थ संप्रदायातील प्रामुख्याने महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई आणि वेणाबाई यासारख्या ठळक स्त्री संतांनी आपल्या अभंगातून, स्फूट काव्यरचनेतून आपल्या मनात दडलेल्या भावनांना वाट करून देण्याचे काम केले. त्यामुळे समाजातील इतर स्त्रिया देखील व्यक्त होऊ लागल्या. स्वतःच्या उद्धारासोबतच जगाचा उद्धार करणे, त्यांना महत्त्वाचे वाटू लागले. स्त्री संताचा कल आत्माविष्काराकडे असला तरी समस्त प्राण्यांमात्राचे कल्याण ही भावना देखील त्यामध्ये दिसून येते.

## संसारी माणसाला उपदेश :-

संतांनी विशेषत; संसार करून परमार्थ करणाऱ्या व्यक्तीला महत्त्व दिल्याचे दिसून येते. संत ज्ञानदेवांनी संन्याशी होण्यापेक्षा गृहस्थाश्रमी व्हावे, असा उपदेश केला ज्ञानेश्वरीच्या ९ व्या अध्यायात तर संत तुकारामांनी संसारात राहून जगाचे कल्याण करता येते असे जागोजागी स्पष्ट केले. गृहस्थाश्रमात राहून सत्कर्म करता येतात यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. म्हणूनच ते सामान्यजणांना उपदेश करताना म्हणतात की,

''जोडोनिया धन उत्तम व्यवहारे
उदास विचारे वेच करी''

अशा अनेक अभंगातून आपण सज्जनपणे व्यवहार करून स्वहितासोबत परहितही साधावे, असे ते सांगतात. समर्थ रामदासांनी देखील आपल्या मनाच्या श्लोकमधून प्रथम स्वतः चिंतन करावे व दुसऱ्या सोबत चांगल्या प्रकारे व्यवहार करावे यावर भर दिल्याचे दिसून येते.

## मानवता हाच खरा धर्म :-

सर्व संत महात्म्यांनी जात-धर्म-पंथ यापेक्षा 'मानवता हाच खरा धर्म' असल्याचे सांगितले. संत ज्ञानदेवापासून तर चोखामेळापर्यंत, महानुभाव संप्रदायापासून समर्थ संप्रदायापर्यंत सर्व संतानी श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, शूद्र-अशूद्र याला महत्त्व न देता समाजात 'मानवता हाच खरा धर्म' रुजवण्याचा पूर्ण प्रयत्न केला. जगाला प्रेम अर्पण करणारा 'मानवता हाच खरा धर्म' संतानी समाजात प्रस्थापित करण्याचा पूर्ण प्रयत्न केला आहे. गावकुसाबाहेरील पिडीत समाजाला संतानी जवळ करून आपल्या वारीत सामावून घेतल्याचे दिसून येते. माणसामाणसामध्ये भेदभाव न करता संतानी वारीची परंपरा पुढे चालू ठेवल्याचे दिसते.

## संताच्या दृष्टिकोनातून 'देव' ही संकल्पना :-

देव दगडामध्ये, लाकडामध्ये, मुर्त्यांमध्ये किंवा कोणत्याच धातूमध्ये नसून माणसांमध्ये, प्राणीमात्रांमध्ये आहे. संतांनी देव भक्तिभावामध्ये मानला आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या 'ज्ञानेश्वरी' मध्ये

परमेश्वराचे अस्तित्व सकळ ठाई असून तो निर्गुण व निराकार असल्याचे सांगितले आहे. 'वायु असे सकळ ठाई, त्याची बिऱ्हाडची नाही...' वायु ज्याप्रमाणे सर्वत्र आहे, त्याचप्रमाणे परमेश्वराचं अस्तित्व सगळीकडे असलेले दिसून येते, असे त्यांनी सांगितले आहे. संत तुकारामांनी रंजल्या-गांजल्याची सेवा यातच ईश्वर सेवा असल्याचे सांगितले आहे. संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या कीर्तनातून, भजनातून समाजाची सेवा करून ईश्वरप्राप्ती करून घेता येते,असे सांगितले. उच्चवर्णांनी, भट लोकांनी सामान्यजणांना देव मूर्तीमध्ये पाहायला सांगून भुलवल्याचे दिसून येते.

## संतांनी आध्यात्मिक लोकशाही रुजवण्याचे कार्य केले :-

महानुभाव संप्रदायापासून ते समर्थ संप्रदाय तसेच आजपर्यंत संतांनी आपल्या कृतीतून, विचारातून खऱ्या अर्थाने आध्यात्मिक लोकशाही रुजवण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. लोकशाहीची त्रिसूत्री समता, स्वातंत्र्य, बंधुता सर्व संप्रदायांनी समाजात आणली. जात धर्म पंथ यांच्या पलीकडे जाऊन समाजात बंधुभाव आणून एकी प्रस्थापित केली. सर्वज्ञ चक्रधर स्वामींनी अस्पृश्य समाजाच्या कोथळोबाला उमाईसेला गुरुबंधू मानण्यास सांगितले. तर संत नामदेवांनी जनाबाईला वारकरी संप्रदायात जवळ करून मानसन्मान मिळवून दिला. संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत कर्ममेळा यांना जातधर्मावरून कमी न लेखता वारकरी संप्रदायात मानाचे स्थान देऊन सर्वांसाठी भक्तीची वाट खुली करून दिली. संताचे हे कार्य समाज उद्धारासाठी महत्वपूर्ण असे ठरले.

## वसुधैव कुटुंबकम संकल्पना :-

पृथ्वीवर राहणारी सर्व मानवजात, प्राणीजात हे सर्व एका कुटुंबाचे घटक आहेत. ही सनातन, वैदिक धर्मातील संकल्पना संतांनी आपल्या कृतीतून खऱ्या अर्थाने साकार रूपास आणली. सर्वांनी एकोप्याने मनामनातील द्वेष बाजूला सारून प्रेमपूर्ण संबंधाने एकत्र राहावे. आयुष्य क्षणभंगुर असून उगाचच भांडण करत बसणे योग्य नाही तर सर्वांशी प्रेमपूर्ण व्यवहार करणे. यातच जीवनाचे सार्थक असल्याचे संतानी सांगितले आहे. संपूर्ण जग एक कुटुंब ही एक भावना ठेवून व्यापक दृष्टीकोन बाळगून प्रेमपूर्ण,सौदार्यपूर्ण राहणे होय. संतानी आपल्या विचारातून, कृतीतून वरील संकल्पना खऱ्या रुपात साकाररुपास आणली, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

एकूणच संत हे दुःखितांचे आधारस्तंभ, लोकजीवनाचे उद्धारक, जाणते समाजसुधारक होत. समाज प्रबोधनाच्या वाटेवरील प्रकाशस्तंभ म्हणजे संत होत. वर्षानुवर्ष अज्ञानात खितपत पडलेल्या, अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकलेल्या समाजाला ज्ञानाच्या प्रकाशात आणण्याचे महत्वपूर्ण असे कार्य संतांनी विनामूल्य केले आहे. त्यामुळे आपणास संताची परोपकारवृत्ती विसरून चालणार नाही.

## निष्कर्ष :-

1) संत हे बुद्धिवादी, विज्ञानवादी दृष्टिकोनाचे होते. त्यांनी अंधश्रद्धा व अंधानूकरणाचा जीवनभर विरोध केला. दिशाभूल झालेल्या समाजाला योग्य वळण देऊन उचित मार्गावर आणण्याचे महत्वपूर्ण कार्य संताच्या वाणीने व कृतीने केल्याचे दिसून येते.

2) संताचे अध्यात्मदृष्टी जातीनिरपेक्ष होती. त्यांनी भक्तीला प्राधान्य दिल्याचे दिसून येते. प्रेम, सहानुभूती, जिव्हाळा, अहिंसा या जीवन मूल्याचा पुरस्कार केल्याचे दिसते.

3) संतांनी आपल्या कृतीतून समाज शिक्षकाची भूमिका बजावल्याचे जागोजागी दिसून येते. मोक्ष सुखापेक्षा कर्तव्य कर्म असले पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. संतांनी आपल्या ग्रंथसंपदेतून मानव जन्म सार्थक करण्याचा उपदेश केला.

4) संत साहित्य स्त्री विरोधी नसून स्त्रीचा सन्मान करणारे साहित्य आहे. स्त्री ही परमार्थ मार्गातील अडसर नसून तिला देखील भक्ती करण्याचा मनुष्याप्रमाणेच अधिकार आहे.

5) एकूणच संत हे लोकजीवनाचे उद्धारक, दुःखितांचे आधारस्तंभ, जाणते समाजसुधारक होत. समाज प्रबोधनाच्या वाटेवरील प्रकाशस्तंभ म्हणजे संत होत. वर्षानुवर्ष अज्ञानात खितपत पडलेल्या समाजाला ज्ञानाच्या प्रकाशात आणण्याचे अमोघ असे कार्य संतांनी विनामूल्य केले आहे. संताची परोपकारवृत्ती विसरून चालणार नाही.

## संदर्भग्रंथ :-

1. संतसाहित्य आकलन आणि अध्यापन : लेख- डॉ. र.बा मंचरकर संपादक प्रा.वसंत आबाजी डहाके, व इतर, पुणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे प्र.आ. १५ सप्टे.२००५, पृष्ठ क्र. ३१४
2. संतसाहित्य आणि समाजप्रबोधन : संपा. रा.तु.भगत दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि पुणे प्र.आ. १५ सप्टे.२००५ पृष्ठ क्र.१११
3. महाराष्ट्रातील भक्तीसंप्रदाय : संपादक डॉ.पांडुरंग भोसले, डॉ.सचिन रुपनर, इतर समीक्षा पब्लिकेशन,पुणे पंढरपूर २८ मे २०२२

❖❖❖

# रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील सामाजिकतेचे परिशिलन

**प्रा. डॉ. भास्कर पाटील**
(प्रोफेसर तथा विभाग प्रमुख)
सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय, अकोला
इमेल- drbhaskarpatil7@gmail.com संपर्क- ९७६७५२८४५८

**प्रस्तावना:**

एकूणच आंबेडकरी कवितेचा प्रवास अर्धशतकाच्या पुढे गेलेला आहे. या अर्धशतकात असंख्य काव्यप्रतिभांनी आंबेडकरी कवितेला समृद्ध केले आहे. जलसेकारांच्या कवणांपासून ते समकालीन कवितेपर्यंत तिन पिढ्यांनी या प्रांतात मोठे योगदान दिले आहे. आजमितीला तिसरी पिढीही आंबेडकरी कवितेला अधिक दृढमूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. या पार्श्वभूमीवर कवी रमेशचंद्र कांबळे अनुभव व वयमानाने पहिल्या पिढीचे, तर काव्यसंग्रहाच्या अनुषंगाने दुसऱ्या पिढीचे कवी जाणवतात. परंतु त्यांची कविता पहिल्या पिढीशी समांतर आशय व्यक्त करणारी आहे. त्यांच्या कवितेने आंबेडकरी काव्यविश्वाला समृद्ध करणारी रचना आविष्कृत केली आहे.

## रमेशचंद्र कांबळे यांचा काव्य प्रवास :

आजमितीला रमेशचंद्र कांबळे यांच्या नावे ***मृत्यू जगलेला माणूस - २०१२, चौथी भिंत - २०१६,*** आणि ***एका महिला कैद्याचा मृत्यू- २०२१*** हे तीन संग्रह आहेत. आंबेडकरी काव्यप्रांतातील संग्रहांची शीर्षके ही देखील विचारप्रवण, सूचक व गर्भितार्थ प्रदान करणारी असतात. याचा प्रत्यय कांबळे यांच्या संग्रहांची शीर्षकेही देतात. कवी कांबळे यांचे आजचे वयमान पाऊन शतकाच्या पुढचे आहे. त्यातही त्यांचा पिंड चळवळ्या कार्यकर्त्याचा राहिला आहे. विविध पुरोगामी चळवळीत कार्यकर्त्याची लढवय्यी भूमिका त्यांनी निभावलेली असल्याचे, संग्रहातील त्यांच्या मनोगतातून सुचित होते. आंबेडकरी कविता ही चळवळीचेच अपत्य आहे हे सर्वमान्य आहेच. आंबेडकरी चळवळ आणि साहित्य हे अभिन्न अंग आहे. त्यातूनच कितीतरी कवी- लेखक जन्मास आलेत. रमेशचंद्र कांबळे हेही याच प्रवासाचे पथिक ठरतात. त्यांनी प्रारंभापासूनच चळवळी अनुभवल्यात. मैदानी लढ्यात अग्रेसर राहणे हा त्यांचा स्था यीभाव असल्याचे त्यांच्या भूमिका तथा काही कवितामधूनही निदर्शनास येते.

## रमेशचंद्र कांबळे आणि आंबेडकरी कविता वैचारिक अनुबंध :

कांबळे यांची कविता संग्रह स्वरूपात २००० नंतर जरी पुढे आली असली तरी; तिचे बीज हे त्यांच्या चळवळकर्त्या काळातच रुजले आहे. अनुभवांची खोली समाजाचे निरिक्षण, ताकदीची शब्दसंपदा व समाजाबद्दलची तळमळ अशी कितीतरी वैशिष्ट्ये त्यांच्या कवितेमधून अवतीर्ण झालेली दिसतात. शब्दसंपदा आणि आंबेडकरी बाण्याच्या बाबतीत ते ढसाळांच्या समिप असल्याचे अंशतः जाणवते. 'ढसाळ ढसाळच आहेत', परंतु त्याच पद्धतीचा आक्रमक विद्रोह, शब्दांगार कांबळे यांच्या कवितेत काही प्रमाणात आलेला दिसून येतो.

आंबेडकरी कविता ही 'स्वान्त सुखासाठी' जन्मास आली नाही. ती विषमतावादी समाजाच्या क्रूर कृत्याचे अपत्य आहे, याचे भान इतर कवींप्रमाणेच रमेशचंद्र कांबळे यांनाही आहे. म्हणूनच त्यांची कविता ही आंबेडकरी प्रेरणा, विचार यांच्याशी घट्ट नाळ जोडणारी आहे.

कवी आणि त्यांची कविता समजून घेतांना त्याचे भाव विश्व समजून घेणे अगत्याचेच असते. किंबहुना आंबेडकरी कवितेच्या बाबतीत तर ते अधिकच महत्त्वाचे आहे. कारण या प्रांतातील कवी- लेखक हे उसण्या जाणीवने लेखन करीत नाहीत. त्यांच्याकडे विविधपदरी असे जीवनानुभव असतात. प्रश्न-समस्यांकडे बघण्याची त्यांची इतरांपेक्षा भिन्न दृष्टी असते. म्हणून त्यांची कविता ही रमनीय वा मनोरंजक होत नाही. ती काहीतरी चिंतन, विचार प्रकट करते. पुढील काळाचे सुचनही करते. याच पद्धतीने कांबळे हे देखील आपल्या संग्रहांमधून अत्यंत जाज्वल्यपणे, रोखठोक अनुभूतीसह अभिव्यक्त झालेले दिसून येतात. आंबेडकरी कवितेच्या विद्रोही, बंडात्मक, शब्दांगार पेरणाऱ्या काळाची अनुभूती समकाळात जर कुणाची कविता देत असेल; तर ते नाव म्हणजे रमेशचंद्र कांबळे स्वीकारायला हरकत नाही.

## रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील सामाजिकतेचे परिशिलन :

सामाजिकता आंबेडकरी कवितेचा स्थायीभाव आहे. आंबेडकरी साहित्याचे निर्मितीस्थळ हे भारतभूमी असल्यामुळे; आणि या देशात असणारी सर्वस्तरीय विषमता, मानवी भेद, वर्णभेद, जातीच्या उतरंडी इत्यादीमुळे 'नाही रे' वर्गाच्या वाट्याला नेहमीच छळ आला. आंबेडकरी साहित्य हे समाज जागरण, उद्‌बोधन आणि प्रबोधनासाठीच प्राधान्याने जन्मास आले आहे. त्यामुळे या परिवेशात लेखन करणारा कवी- लेखक स्वपेक्षा 'आम्हीसाठी' लिहिणारा आहे. रमेशचंद्र कांबळे हे देखील 'मी' पेक्षा 'आम्हीचाच' स्वर आळवणारे कवी आहेत. त्यांची कविता ही अनेकानुभूतीचे दर्शन घडविणारी आहे. पर्यायाने सामाजिक बांधिलकी देखील त्यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाली आहे. आंबेडकरी कवीने कलाकृती म्हणून निर्माण केलेली साहित्य कृती ही वाङ्मयमूल्य - कलामूल्य घेऊन यायलाच हवी, तरच ती विविध कसोट्यांवर टिकू शकते. सोबतच त्या-त्या कवी लेखकाने समाजहित अधिक जोपासावे, हेच बाबासाहेबांनाही अपेक्षित होते.

***"व्यक्तीने समष्टीकरिता म्हणजे समाजाकरिता लिहायला हवे. साहित्यिक, त्यातही आंबेडकरवादी साहित्यिक समाजापासून अलिप्त राहू शकत नाही. मध्यमवर्गीय पांढरपेशी लेखकांचे अनुभवातून आकृतीवाद व लिंगवाद यांचा दुष्प्रभाव साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेला अध:पतीत करतो. असल्या साहित्याची लागण दलित मुक्ती साहित्याला न होऊ देण्याची काळजी घेतली पाहिजे"***[१] (आंबेडकरी साहित्य विचार दिशा आणि दृष्टी पृ. क्र.६८.) असा मौलिक संदेश विख्यात समीक्षक डॉ. वसंत शेंडे या संदर्भात देतात, तेव्हा आपसूकच आंबेडकरी कवीच्या लेखनाची दिशा निश्चित होते. रमेशचंद्र कांबळे यांचे चळवळीचे अनुभव, आंबेडकरी साहित्य, कविता इत्यादींचे आकलन सूक्ष्म आहे, नव्हे ते अनुभवातीत आहे. त्यामुळे प्रखर शब्दज्वाला त्यांच्या कवितेतून अधोरेखित झाली आहे. ज्या परिसरात त्यांची वाढ झाली, जीवन जगलेत, तो परिसर इतरांच्या तुलनेत बदनाम. या परिसरातील व्यक्तीजीवन, आपले समाजजीवनही अत्यंत वेदनादायी होते. अवतीभोवती समाजात त्यांना दारिद्र्य, अज्ञान, व्यसनाधीनता आणि गुन्हेगारी बघायला मिळाली. या पर्यावरणाने त्यांच्यातील कवी जागृत झाल्याचे ते नमूद करतात. याचाच अर्थ आपल्या अवतीभोवतीच्या समाज बांधवांची ही ससेहोलपट त्यांना बघवली नाही. म्हणूनच ते लिहितात-

***मी पाहतोय तन्मयतेने तटस्थ न राहता / सभोवतालचे दुःख खोलवर / नि बदलतात चेहऱ्यावरील हावभाव / मुठीत संचारतेय  हत्तींचे बळ / अन् प्रचंड निनाद येतात नव्या सकाळ सह / नव्या सूर्याच्या...... परावर्तित पावलांचे ध्वनी....*** (परावर्तित पावलांचे ध्वनी, पृष्ठ -१०- मृत्यू जगलेला माणूस)

मानवी दुःख मुक्तीसाठी कवी स्वतःच हत्तीचे बळ निर्माण करू पाहतो तेव्हा लक्षात येते की माणसाप्रती, समाजाप्रती त्यांची निष्ठा अविचल आहे. यातूनच उद्याच्या परावर्तित बदलाचीही त्यांना आस आहे. सर्वहारा समाजाचे प्रश्न गणित आहेत, नि  असतातही. एक सुटला की दुसरा 'आ' वासून पुढे उभा असतो. सर्वांनाच प्रश्नांची उकल करता येईल असे होत नाही. कुणीतरी 'म्होरक्या' म्हणून त्यांना सजीव करावे लागते. कविचा ध्यास याच पद्धतीचा आहे. मात्र बेगडी प्रवृत्तीचे समाजधुरीन या सजीवांना कायमच  निर्जीव- निर्बुद्ध  करण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी कवीला चीड येते आणि व्यक्त होतात -

***आमची सुख – दुःखं, दारिद्र्य, अज्ञान, विषमता / नि बदलत्या संभ्रमांच्या संदर्भात / वाढती अनुत्तरीत प्रश्नांची सनद / आणि त्यांची तीच ती गोठवून ठेवलेली अचूक उत्तरे... देण्यातच / समाजधुरीन आणि अनुयायी / आपली एनर्जी खपवत आहेत..*** ( सनद, पृष्ठ – ३६, मृत्यू जगलेला माणूस )

आंबेडकरी कवितेने जे विद्रोहाचे बीज पेरले, समूहमनात एक सचेतन ऊर्जा निर्माण केली होती, परंतु कालांतराने ती काहीशी संदिग्ध झाल्याचे कवीला जाणवते. त्यामुळेच 'शहर दिस्तं भेसूर' या रचनेत ते लिहितात-

***कुठून कुणी पेरला होता विद्रोह / या भुके कंगालांच्या नसनसात / की, त्यांच्या अभेद्य एकजुटीने  तेव्हा / या शहराच्या परकोटही  हालत असे..*** ( शहर दिस्तं भेसूर-, पृष्ठ- ५- मृत्यू जगलेला माणूस )

अनेकार्थ सूचन करणाऱ्या या ओळी आहेत. सोबतच 'एकीच्या बळाने',  सामाजिक एकोप्याने काय क्रांती होऊ शकते, हे देखील व्यक्त होते. मात्र फाटा- फूट, बेकी यामुळे एकूणच चळवळीचे; आणि पर्यायाने समाजाचे काय वाईट होते, हे आपण सर्वच अनुभवतो. रमेशचंद्र कांबळे यांची तीक्ष्ण व सूक्ष्म दृष्टी समाजाच्या प्रत्येकच वर्तनावर लक्ष केंद्रित करीत असल्याचे यातून स्पष्ट होते.

***त्यांच्या बुद्धिबळातील प्यादे होताना / ते देतात आपल्या / श्वासांना पूर्ण शह / नि आपल्या सैद्धांतिक / स्वप्नांचा बळी घेऊन / करतात शतकानुशतकांचे गुलाम / ते लावताहेत बुद्धिवंतांच्या मेंदूला सुरुंग / उभ्या करून कडेकोट भिंती अवतीभवती..*** (एक कविता कैदेतील,पृष्ठ -१६ - मृत्यू जगलेला माणूस )

भारदस्त शब्दकळेच्या माध्यमातून अत्यंत वास्तव चित्र या रचनेतून कवी प्रकट करतात. 'ते' आणि 'आपल्या' हे दोन्ही शब्द इथली व्यवस्था प्रकट करतात. आंबेडकरी समाजातील बुद्धिवंत, ज्ञानवंत व समाज जागृत करणाऱ्या व्यक्तींना कसे वेठीस धरले जाते, याचे उदाहरण कवीने जे व्यक्त केले ते काही निव्वळ कल्पचित्र नाही; तर अवतीभोवती घडणारे वास्तव आहे. हे वास्तव कवीला याच समाज जीवनात प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले आहे. समाजशील, कृतिशील, समाजप्रिय व लढवय्या माणसाला कसे कुनितीने जेरबंद केले जाऊ शकतेत्याचेच हे उदाहरण. म्हणूनच कवी अनेकांना पुढील धोक्यांचेही सूचन इथे करतात. याच कवितेत पुढे ते आशावाद बाळगत लिहितात-

***चिरेबंद ही तटबंदी तोडून / कोण कोरतोय या दगडी भिंतीवर / सर्वहारा समुदायांचा पारदर्शक चेहरा / काळाला हाक देत डोळ्यातून / कोण करेल या लादलेल्या / गुन्ह्यांची मीमांसा / वर्गवारी / कोठून अवतरेल भूमीवर / एखादं देखणं शस्त्रधारी शिल्प / जो विझलेल्या या निखाऱ्यावर / फुलवत नेईल काळाची 'चिलीम'*** ( एक कविता कैदेतील,पृष्ठ -१६,मृत्यू जगलेला माणूस )

कालसापेक्ष समाज जीवनात आलेली शिथिलता कवीला टोचण्या मारते. नेतृत्वांची झालेली शकले, हे त्यांना विषण्ण करतात. म्हणूनच बाबासाहेबांसारखे निष्ठेने कुणीतरी पुढे येणे त्यांना अपरिहार्य वाटते. त्यासाठीच ते आपल्या आंतरवेदना इथे प्रकट करतात.

***"दलित कवितेतील जाणीव ही सामाजिक व्यापकतेला भिडणारी असून जीवनाचा अर्थ लावणारी अन्वेषण दृष्टी लाभल्यामुळे जीवनाचे विविधंगी आकलन तिने मांडले आहे. प्रखर सामाजिकता, मूल्यगर्भता हे तिचे खास विशेष आहेत,"*** [२] असे आंबेडकरी कवितेतील सामाजिक जाणिवेविषयी विख्यात आंबेडकरी काव्य समीक्षक डॉ. महेंद्र भवरे लिहितात. (दलित कविता आणि प्रतिमा, पृष्ठ- ५ ) याचाच अर्थ आंबेडकरी कवी समूहनिष्ठ जाणिवेनेच व्यक्त होतो. त्याच्यातला 'मी' केव्हाच गळून पडलेला असतो. त्यातही चळवळीतून पुढे आलेला कवी तर अधिकच समाजशील बनतो. रमेशचंद्र कांबळे हे देखील याच पद्धतीचे कवी असल्याचे दिसून येते.

'आपणही आपणासाठी' ही एक सुरेख रचना 'मृत्यू जगलेला माणूस' या संग्रहात आहे. आपल्या साथसंगीनीचा त्याग, समर्पण व्यक्त करतांना समाजाप्रतीची आंतरिक भावनाही कवी प्रकट करतात.

***अशा अस्थिर वेळी एवढचं अभिवचन तुला की, / या सर्वांचे संसार सजविल्यानंतर / उरलोच आपण दोघं / तर बसवू एक घरटं / आपणही आपणासाठी*** (आपणही आपणासाठी, पृष्ठ क्र. -३०, मृत्यू जगलेला माणूस) घरादाराची पर्वा न करता चळवळ, समाजहित बाळगणारी नेमकी व्यक्तिमत्त्वे आंबेडकरी चळवळीत दिसतात. बाबासाहेब तर त्याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. रमेशचंद्र कांबळेही याच विचारांची कास धरतात. आपले स्वतःचे घर सजविण्याआधी रंजल्या गांजल्या शोषित पीडितांचे, समाज बांधवांचे संसार उभे करण्याचा त्यांचा ध्यास म्हणजे, सच्चा समाजसेवी माणसाचे प्रतीक आहे. म्हणूनच रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेविषयी विख्यात समीक्षक डॉ. किशोर सानपांनी प्रस्तावनेत नमूद केले की ***"रमेशचंद्रची कविता म्हणजे निळ्या युगाचा निळा अवकाश होय. माण्सांसाठी कवी माण्सानं समाजाला दाखविलेली निळी पहाट होय. आंबेडकरी युगाची ती सांस्कृतिक नांदी मानवी लागेल "*** (प्रस्तावनेतून- मृत्यू जगलेला माणूस)

कवीच्या मन-मानसी विचार कृतीत समाजाबद्दलचा कळवळा का आहे? तर त्याचे उत्तर स्वतःच कवी देतात. बाबासाहेब नावाच्या माझ्या 'बापाने' ही विचारदृष्टी मला प्रदान केली आहे; आणि म्हणूनच कवी माणसांभोवतीच्या सर्वच घटकांकडे बारकाव्याने पाहतात. त्यातील वैगुण्य टिपतात व आपली दिशा काय असावी, याची आखणीही करतात. 'माझ्या बापाने' या रचनेत ते व्यक्त होतात-

***राजकारणातील बदलते संदर्भ / व गतीने चालणाऱ्या जगाची / नव्याने ओळख देत मला / नवसमाज रचनेचा विचार / व दुःखाची नाळ / जागतिक दुःखाची जोडत / मला ग्लोबल बनविले / माझ्या बापाने..***

(माझ्या बापाने, पृष्ठ क्र.२१-चौथी भिंत) हा बाप कोण? तर ते आहेत आयुष्यभर समाजासाठी, माणसासाठी झटणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. बाबासाहेबांनी जो नवसमाज रचनेचा ध्यास बाळगला, त्याला यशस्वी केले. याचा मार्गाची अपेक्षा कविचीही आहे.

तर 'धूसर सीमारेषेवर' या रचनेतूनही अत्यंत सुरेख विचार प्रकटतांना ते लिहितात-

***माणूस असण्या नसण्याच्या / धूसर सीमारेषेवर / आपण आपलाच चेहरा / घेऊन जगताना / समाज स्वास्थ्याची चिकित्सा / नि तत्त्वज्ञानाचे सखोल आदर्श / उपाशी पोटाला पेलवत नाही ..***(धूसर सीमारेषेवर, पृष्ठ – २५, चौथी भिंत) अत्यंत दाहक वास्तवताच इथे कवी स्पष्ट करतात. चळवळीत राबणाऱ्या माणसाची ही खरी व्यथा आहे. तो समाजासाठी जगतो, तात्त्विक विचारांची मांडणी करीत समाजाला नवे विचार प्रदान करण्याचा प्रयत्न करतो, पण हे करतांना समाजानेही त्याच्या झटण्या-झगडण्याचे मोल जाणले पाहिजे. सोबतच समाज देखील पोटभर अन्न

घेऊन तृषार्त असावा. तेव्हाच कुठलाही विचार अधिक जाणीवने रुजला जाऊ शकतो. ही रचना म्हणजे समाज स्वास्थ्याचे एक महत्त्वपूर्ण चिंतनच आहे. या विचारांना लागू पडणारे एक महत्त्वपूर्ण भाष्य विख्यात काव्य समीक्षक डॉ. संजय मून करतात.

***"दलित कवितेचा एकूणच आशय हा समाजाशी निगडित, समाजाच्या सुधारणेशी निगडित आणि समाज सुधारणेच्या तत्वज्ञानाशी निगडित असल्याने या कवितेला सामाजिक कविता म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल.असे असले तरी 'सामाजिकता' हे या कवितेचे केवळ विशेषण नव्हे तर, या सामाजिकतेत समाजाच्या पुनर्व्यवस्थापनाचे एक सूत्र आहे. समाजाबद्दलचे एक भान असणे, समाजातल्या प्रत्येक घटकांचे भान असणे, ही जाणीव या विशेषणात दडली आहे"*** [३] (शैली दलित कवितेची - डॉ. संजय मून पृष्ठ क्रमांक -९५) रमेशचंद्र कांबळे यांच्या काही कविता या समाजाशीच निगडित आहेत. आपण समाजाचाच एक घटक आहोत, त्यांच्याप्रती आपले काही देणे आहे; याचे भान या कवीला आहे. म्हणूनच ते शब्दातून आपल्यातील संवेदन प्रकट करतात. समाज म्हणजे काय? तर व्यक्ती-माणसे-कुटुंब यांचा समूह. माणूस सुखी तर समाज सुखी. पण इथली व्यवस्था तसे घडू देते का? ही कवीची चिंता आहे. म्हणून ते व्यक्त होतात-

***समूळ उलथून टाकावा / माणसास हद्दपार करणारा / येथील सनातन संदर्भ / नि अस्वस्थ करणारा / नकार रात्रीचा काळोख /आता उजेडाने उघडावेत अंधारातील डोळे / वर्तमानातील सुन्नपणा झटकून / उपाशी पोटांच्या वेदनांचे / व्हावेत तर्कशुद्ध संशोधन...***(नकार रात्रीचा काळोख, पृष्ठ क्र.३२, चौथी भिंत) अशा या समाजाशील रचनेवर वेगळे भाष्य करण्याची गरजच उरत नाही. 'डोळस होतोय अंतर्मुख' या रचनेत अत्यंत उद्वेग व्यक्त करीत कवी रमेशचंद्र कांबळे व्यक्त होतात-

***शस्त्र आणि शास्त्राच्या बळावर / जात धर्म संप्रदायाच्या सूड चक्रात/ उसळतोय भवतालचा हिंसक उद्रेक / आंधळा घेतोय वास्तवाचा आधार / आणि डोळस होतोय अंतर्मुख..***(डोळस होतोय अंतर्मुख, पृष्ठ क्रमांक ४७, चौथी भिंत) ही कविता म्हणजे सत्ता, धर्मशास्त्रे आणि धर्ममार्तंडांनी लावलेल्या आगीची दाहकता आहे. यात होरपळतो तो फक्त सामान्य माणूस. याचीच खरी वेदना या कवीला असल्याचे अनेक रचनांमधून लक्षात येते.

***"आंबेडकरी जाणिवेने प्रेरित झालेल्या कविंमध्ये सामाजिक बांधीलकीचा प्रत्यय प्रामुख्याने येतो. सामाजिक भानातूनच हे कवी जनसामान्यांच्या व्यथा वेदनांना प्रखरपणे मुखर करीत असतात,"*** [४] असे विख्यात कवी- समीक्षक, संशोधक डॉ. अशोक इंगळे आपल्या ग्रंथात नोंदवतात.(नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा,पृष्ठ-३००) तेव्हा रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेचे आशय सूत्र हे सामाजिक बांधिलकीला वगळणारे नाही याचा प्रत्यय येतो. पुढे डॉ. अशोक इंगळे असेही नोंदवतात की,***"कवी हा समाजाचा एक घटक असल्यामुळे सामाजिक भाषेतूनच तो अभिव्यक्त होत असतो. म्हणून कवींच्या भाषेचा विचार सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेऊनच करावा लागतो."*** [५] (नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा, पृष्ठ-३२४)

कांबळे यांच्या एकूण कवितांचे आकलन करता लक्षात येते की, त्यांच्या रचनेत सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक संदर्भ यांची रेलचेल आहे. गतकालीन व समकालीन शोषणस्थळे यांचेही असंख्य दाखले त्यांनी रचनांमधून दिली आहेत. आंबेडकरी कविता समजून घेतांना वाचक व अभ्यासकांना संदर्भ आकलन असणे गरजेचे असते, त्याशिवाय नेमक्या आशयापर्यंत त्यांना पोहोचता येत नाही. असे असेल तरच ती कविता रुचते अथवा भावते. अन्यथा ती 'दुर्बोध' वाटल्याशिवाय राहणार नाही. रमेशचंद्र कांबळे यांची कविता ही या पठडीतील आहे. धर्म,संस्कृती,इतिहास,चळवळ व राजकारण यांचे संदर्भांकित आकलन असणाऱ्यांना ती समजण्यास कठीण वाटणार नाही. कारण ती शेवटी माणूसकेंद्री, समाजकेंद्री रचना आहे.

नव्या पिढीचे काव्य समीक्षक प्रा. डॉ. कैलास वानखडे यांनी आपल्या ग्रंथात नोंदविलेले एक मत मला याप्रसंगी अत्यंत महत्त्वाचे वाटते. ते लिहितात ***"दलित कवी हा एकदाच कार्यकर्ता बनून आपले हक्क मिळविण्यासाठी रस्त्यावर घोषणा देतो, समाजाला जागृत करतो; आणि त्याच वेळी हा संघर्ष अधिक गतिमान करण्यासाठी कविताही लिहितो. ही त्याची भूमिका असल्याने; त्याची सामाजिक जाणीव आणि कलावादी मराठी लेखक कवींची सामाजिक जाणीव वेगळी आहे."*** [६] (दलित कवितेची निर्मिती प्रक्रिया,पृ. क्र.४०) उपरोक्त भाष्य रमेशचंद्र कांबळे या कवीला तंतोतंत लागू पडणारे आहे. स्वतः कवी अशा विविध भूमिकेतून समग्र जीवन कंठीत आले आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेला एक प्रकारची धार आली आहे. त्यासाठीच ते लिहितात- ***काळाच्या ओघात / मुठीत संचारेल बळ / संस्कृतीकरणाची होईल ऐशीतैशी / धर्मांध सत्ता गाढली जाईल कबरीत / वळसे घेत वळणाऱ्या मुठी / दमनाच्या वादळातही / पेटवतील संघर्षाच्या / मशाली / अखेर पर्यंत...*** (प्रारंभ करून, पृष्ठ क्र.२१- एका महिला कैद्याचा मृत्यू) असा आशावाद बाळगणारा हा कवी; कधी समाज वर्तणुकीबद्दल अस्वस्थ आणि हतबलही होतो. तेव्हा त्यांच्या लेखणीतून आविष्कारते- ***तसा समाज बेरकी असतो / सत्याचा मृत्यू जाळीत, / जाहीर कौतूक एकाचं / तर मनपसंती दुसऱ्याला देतोय...*** (सत्याचा मृत्यू जाळीत, पृष्ठ क्र.५५- एका महिला कैद्याचा मृत्यू) अशा विविध पद्धतीने कवी रमेशचंद्र कांबळे आपल्या एकूणच रचनेमधून अभिव्यक्त झाले आहेत.

## सारांश :

रमेशचंद्र कांबळे यांच्या तिनही संग्रहातील कविता या आंबेडकरी विचार आणि चळवळनिष्ठा व्यक्त करणाऱ्या आहेत. त्यांच्या कवितेमध्ये अनुभवाची खोली आहे. शब्दांच्या बाबतीत हा कवी अत्यंत संपन्न आहे. त्यांच्या कवितेने अनेक विषय हाताळलेले दिसतात. धर्म, संस्कृती, शोषण पिडण, मदमत्त सत्ता, समाजाची अगतिकता व दौर्बाल्य असे विषय ओघाने आलेत. परंतु 'समाजशीलता' हा देखील त्यांच्या कवितेचा एक पाया आहे. त्यासाठी त्यांनी सोज्ज्वळ व करुणामयी शब्द वापरले नाहीत. त्यांना बुद्धाची करुणा, दुःखमुक्ती मान्यच आहे. परंतु काही ठिकाणी ते शब्दास्त्रांचा उपयोग करीत; अमानवी व्यवहाराबद्दलची चीड व्यक्त करतात. रमेशचंद्र कांबळे यांच्या कवितेतील सामाजिकतेच्या परिशिलनाचे आकलन करतानाही आवर्जून लक्षात येते की, त्यांनी काव्यरचनेचा ध्यास हा स्वतःसाठी घेतला नाही. जीवनव्यवहारात जाणवलेले सामाजिक वैमानस्य, विदारकता, दुःखं, सामान्यांचे दमन, कार्यकर्त्यांचा छळ इत्यादीबद्दल त्यांना चिड आहे. मूलतः हा कवी लढवय्या, झुंजार आहे. परंतु व्यवस्थेपुढे त्याला टिकाव धरता आलेला नाही,तरीही त्याने आपली शस्त्रे म्यान केली नाहीत.

व्यवस्था ही सामाजिक, समाजप्रिय आणि निष्ठावंत कार्यकर्ता असणाऱ्या माणसाच्या पाठीमागे हात धुऊन लागलेली असते. त्यातही असा कार्यकर्ता हा आंबेडकरनिष्ठ विचारांशी बांधील असेल तर, त्याची काय गत करायची; हे निष्ठूर व्यवस्था व्यवस्थित जाणते. कदाचित याचेच बळी ठरलेले कवी रमेशचंद्र कांबळे आहेत. तरीही कार्यकर्ता म्हणून या कवीने कधीही हार मानलेली नाही. सामाजिक कृतिशीलतेच्या माध्यमातून त्यांना जे-जे करता यायचे होते, ते त्यांनी साकार केले. परंतु आपल्यामध्ये असणारी उद्विग्नता, व्यवस्थेबद्दलची चीड व्यक्त करण्यासाठीच त्यांनी काव्यास्त्राची निवड केलेली आहे. त्यामधून ते एकूणच संग्रहांमधून त्याच पद्धतीने अभिव्यक्त झालेले दिसतात. त्यांची ही कविता सगळ्यांना रुचेल,पचेल व समजेल अशीही नाही. कारण कविचा स्वप्रत्ययात्मक अनुभव या कवितेमधून मोठ्या प्रमाणात व्यक्त झाल्याचे दिसते. असा अनुभव सगळ्यांच्याच ठायी असेल असे नाही. म्हणूनच कधी कधी त्यांची कविता अधिक शब्दबंबाळ झालेली, अनावश्यक शब्दांचा वापर झालेली देखील जाणवायला लागते.

कवीचे जीवन कार्यकर्ता म्हणूनही समाजशीलच होते; आणि त्यांची कविता देखील समाजाचेच विविधरंगी रूप या निमित्ताने व्यक्त करणारी आहे. म्हणूनच त्यांच्या कवितेचे सामाजिक परिशीलन करत असताना लक्षात येते की, हा कवी भलेही प्रसिद्धीच्या झोतामध्ये फार प्रदर्शित झालेला नसेल, परंतु त्यांनी मांडलेला विचार हा अत्यंत ज्वलंत आहे. निष्ठावंत आणि सामाजिक बांधिलकीचा आहे. याचा प्रत्यय त्यांच्या संग्रहातील कविताच आपल्याला देतात. एकूणच आंबेडकरी कवितेमध्ये त्यांची कविता ही विचारी, संघर्षमयी, चिंतनशील व समाजप्रिय अशी आहे. प्रत्येक कवीच्या सगळ्याच रचना प्रभावी असतीलच असे नाही. त्यांच्या काही कविता गद्यप्राय आहेत. काहींमधून त्वरित नेमका आशय हाती लागत नाही. काही शब्दांबद्दल त्यांना अधिक प्रियताही जाणवते. अंतिमत: हेच सत्य आहे की, सगळ्याच कवितांपर्यंत वाचक- अभ्यासक पोहोचतील असे नाहीरमेशचंद्र कांबळे यांनी आपल्या एकूणच काव्य प्रवासातून आंबेडकरी कवितेत मौलिक भर टाकली आहे, हे कोणीही नाकारणार नाही. याची सत्यता त्यांच्या एकूणच संग्रहातील कवितेतून पटून जाते.

## निष्कर्ष-

१. रमेशचंद्र कांबळे यांची कविता विचारी, संघार्षामयी व चिंतनशील स्वरुपाची आहे.

२. अनुभवजन्य वास्तवासह या कवितेने समाजाचे विविधांगी रूप व्यक्त केले आहे.

३. या कवीची कविता ही आंबेडकरी चळवळ, विचारनिष्ठ यांचेशी बांधील असल्याचा प्रत्यय येतो.

४. कवीचे सामाजिक व वाङ्मयीन आकलन तथा चळवळी बद्दलची सूक्ष्म निरीक्षणे याचा परिपाक म्हणजे ही कविता.

५. आंतरवेदना व समूह वेदना व्यक्त करतांना काही रचना मात्र गद्यप्राय झालेल्या जाणवतात.

## अभ्यासपुरक कविता संग्रह -

१. **मृत्यू जगलेला माणूस** (काव्यसंग्रह) – रमेशचंद्र कांबळे – सर्वमंगल प्रकाशन, ४२, सहजानंद नगर मोर्शी रोड, अमरावती. प्रथमावृत्ती- २०१२.

२. **चौथी भिंत** – (काव्यसंग्रह) – रमेशचंद्र कांबळे – साक्षी प्रकाशन, नवानकाशा , डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर. प्रथमावृत्ती- २०१६.

३. **एका महिला कैद्याचा मृत्यू** - (काव्यसंग्रह) – रमेशचंद्र कांबळे – साक्षी प्रकाशन, नवा नकाशा, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर. प्रथमावृत्ती- २०२१.

## संदर्भ ग्रंथ -


१. **आंबेडकरी साहित्य विचार दिशा आणि दृष्टी** - वसंत शेंडे, पृ. क्र.- ६८, नभ प्रकाशन, श्याम नगर , कॉंग्रस नगर रोड, अमरावती, प्रथमावृत्ती - २०१४.

**२. दलित कविता आणि प्रतिमा**- डॉ. महेंद्र भवरे, पृष्ठ – ५, लोकवाङ्मय गृह मुंबई, प्रथमावृत्ती - फेब्रुवारी-२०१२

**३. शैली दलित कवितेची** - डॉ. संजय मून, पृष्ठ क्र. – ९५,गोदा प्रकाशन, औरंगाबा प्रथमावृत्ती – नोव्हेंबर- २००९.

**४. नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा** - डॉ. अशोक इंगळे, पृष्ठ क्र. – ३००, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती -२० मार्च २०१८.

**५. नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा** - डॉ. अशोक इंगळे, पृष्ठ क्र. -३२४, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती -२० मार्च २०१८.

**६. दलित कवितेची निर्मिती प्रक्रिया** - डॉ. कैलास वानखडे, पृ. क्र.-४०, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती -१४ जानेवारी २०२१.


❖❖❖

# संत साहित्य व समाज प्रबोधन

**प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके**
सहयोगी प्राध्यापक
यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय , मंगरुळपीर जि. वाशिम
Pramoddevke66@gmail.com Mo.No. 9604674723

## गोषवारा :

भारत ही संतांची कर्मभूमी आहे आणि संतांचे साहित्य हे समाजप्रबोधनाचे एक समृध्द् भांडार आहे. आपल्या देशतील संतांनी 'माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे' हा मानवतावादाचा, प्रबोधनाचा विश्वव्यापी विचार मांडला. समाजातील अनेक अनिष्ट् रुढी, परंपरा , कालबाह्य गोष्टीचा नायनाट करावा या हेतूनेच त्यांनी आपल्या साहित्यातून शब्दभांडार सर्वांसाठी खुले केले. संत हे समाजाला दिशा दाखविणारे असतात . आधुनिक भारताच्या विकासात संत साहित्याचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या विचारांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न् केला आहे.

**बीजशब्द :** लोकशिक्षण, लोककल्याण, ईश्वरभक्ती, मानवता, भूतदया, कर्मकांड, अंधश्रध्दा.

## प्रस्तावना :

देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासामध्ये सर्व संतांचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. संतांनी अभंग,ओवी, गौळणी, भारुडे, पदे,स्त्रोते, आरत्या इत्यादी साहित्य् प्रकारात लेखन केलेले आहे. समाजाची अवनत स्थिती दुर व्हावी, त्यांचा विकास व्हावा, व्य् क्तीच्या चारित्र्याचे उन्न्यन व्हावे, जातीभेद विसरुन समाज एक व्हावा, विविध धर्म , पंथ , दैवते,यामुळे उडालेला गोंधळ लोकमानसातून नष्ट् व्हावा, लोकांची जिवननिष्ठ् बळावली जावी, देशीभाषेतून सर्वापर्यंत ज्ञानाचा प्रसार व्हावा अशा अनेक प्रेरणातून संत साहित्याची निर्मिती झालेली दिसून येते. सर्वच संतांचे वाड्मय हे समाज प्रबोधनाच्या हेतूने निर्माण झालेले दिसून येते. समाजाच्या सर्वांगिंण विकासात संत व संतसाहित्याचे योगदान फार मोलाचे आहे.

## उद्देश :

१) संतांचे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्य स्पष्ट् करणे.
२) संतांच्या शैक्षणिक , सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक विचारांचा अभ्यास करणे.
३) संतांचे लोकोध्दाराचे व लोकशिक्षणाचे कार्य अभ्यासने.
४) संत साहित्याने अध्यात्मासोबतच विज्ञानवादी दृष्टीकोन समाजाला कसा पटवून दिला त्याचा अभ्यास करणे.

## विषय विवेचन :

संतांना समाजातील लोकांविषयी कळवळा होता. समाजीतील दु:खी लोक पाहून त्यांचे अंत:करण दु:खाने भरुन जात असे . बुडती हे जन न देखवे डोळा, म्हणवुनी कळवळा येत असे. ही संतंवृत्ती होती. सर्वच संतांनी समाजाला समतेची व ममतेची शिकवन दिली. त्यांनी प्रत्येक

व्यक्तीमध्ये भगवंत पाहण्याचे काम केले. लोकांना त्यांच्या जगण्यामध्ये कोणकोणत्या जिवनमूल्यांचा अंगीकार केला तर मानवी जीवन अधीक सुखमय होवू शकते. असा संदेश त्यांनी आपल्या विचारातून व साहित्यातून दिला.

## १) श्री. चक्रधरस्वामी व त्यांच्या साहित्याचा समाजावरील प्रभाव :

श्री चक्रधर स्वामीनी बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात समाज प्रबोधनाचे कार्य केले. ते मुळचे गुजराची असून महाराष्ट्र ही त्यांची कर्मभूमी. त्यांनी केवळ तात्विक क्षेत्रातच नाही तर दैनदिन जीवनात देखील स्त्रिया आणि शुद्रतिशूद्र अशा अनेक उपेक्षित घटकांना धार्मिक समतेचे हक्क आणि प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्यासाठी महानुभाव पंथांची स्थापना केली. यादव राजाच्या काळात धर्ममार्तंडांची समान घट्ट पकड होती, त्या काळात व्रतवैकल्पं, यज्ञयाग इत्यादी. कर्मकांडाचे प्रस्थ फार माजले होते. आणि त्या सर्वांचे माहात्म्य वर्णन करणारे 'चतुवर्ग चितामणी' यासारखे संस्कृत ग्रंथ हेमाद्रि पंडित यादव राज्यसभेचे श्रीकरणाधिप रचित होते. त्यात वर्षभर करावयाच्या दोन हजार व्रतांची आवश्यकता वर्णन करुन कर्मकांडात गुंतवून ठेवले होते. अशा काळात श्री चक्रधरांनी आमूलाग्र समाजक्रांतीची घोषणा अमलात आणण्याचे धारिष्टय केले. अंधश्रद्धेतून समाजाला बाहेर काढण्याचे, जातिभेद मोडण्याचे, स्त्री-पुरुष समानतेचे कार्य हे एक समाज प्रबोधनाचेच कार्य होते.

## २) संत ज्ञानेश्वर व त्यांच्या साहित्याचा समाजावरील प्रभाव :

संतश्रेष्ठ् ज्ञानेश्वर हे भारतीय संस्कृतीचे हृदय आहे. ज्ञानेश्वरी हा त्यांचा गीताभाष्याचा ग्रंथ म्हणजे अव्दैत तत्व ज्ञानाचा महामंगल आणि परमपवित्र अशा भारतीय साहित्यातील कलश आहे.संत ज्ञानेश्वरांनी वयाच्या २१ वर्षात असामान्य अशी ग्रंथसंपदा निर्माण केली. मराठी वाङ्मयास ती निश्चीतपणे भूषणावह आहे. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, अभंगवाणी, हरिपाठ हे सर्वच ग्रंच ज्ञानदेवांनी सामान्य जनतेसाठी मराठी मायबोलीतून रचले. भगवद्गीतेवरील सर्व टीकाग्रंथात विख्यात नि लोकप्रिय अशी टीका म्हणजे ज्ञानेशांची ज्ञानदेवी होय. या नऊ हजार ओव्यांच्या विस्तृत व्याख्यानात ज्ञानेश्वरांनी गीतेच्या ७०० श्लोकांचा आशय उपमा-दृष्टांताच्या आधारे सुलभ नि सुरस करून सांगितला आहे. ही ओवीबध्द टीका शके १२१२ मध्ये नेवासेक्षेत्री रचून पूर्ण झाली. संत ज्ञानेश्वर ग्रंथलेखन काल आणि लेखनकर्त्याविषयी म्हणतात,"शके बाराशे बारोत्तरे । ते टीका केली ज्ञानेश्वरे सच्चिदानंदबाबा आदरे । लेखकु जाला ।।"वारकरी संप्रदयात ज्ञानेश्वरी हा प्रमाणग्रंथ मानल्या जातो. या ग्रंथाला ज्ञानेश्वरी, ज्ञानदेवी, भावार्थदीपिका अशीही नावे आहेत. गुरूदेव रानडे यांच्या मते "ज्ञानेश्वरी ही सर्वश्रेष्ठ टोका आहे. मौलिक स्वरूपाचे तत्वज्ञान आणि अव्वल दर्जाचे काव्य या दोहोंचा इतका मनोहर संगम दुस-या कोठल्याही भाषेत आढळणार नाही." ज्ञानेश्वरी ग्रंथा विषयी संत तुकाराम महाराज म्हणतात, "गीता अलंकार ग्रंथ ज्ञानदेवी । ब्रम्हानंद लहरी हेलावल्या ।" ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानातील मुख्य सिध्दांत अव्दैताचाच आहे. सर्वत्र एक आत्मतत्व भरून राहिले आहे. त्याखेरीज दुसरे काही नाही. आत्माच सर्वत्र भरलेला आहे. संत ॥ज्ञानदेवांनी आपल्या विचारांच्या माध्यमातून धर्म नीती संबंधीच्या कल्पनात बदल घडवून आणला. "गृहस्था श्रमातून न सांडिता कर्मरेखा ओलांडिता । भक्तीमार्ग आचारीता येतो ।" आपल्या कर्मातच परमेश्वर आहे हे महत्वाचे तत्वज्ञान त्यांनी सांगितले. कर्मकांडाला अजिबात थारा दिला नाही. त्याचबरोबर गीतेमधील संस्कृतमध्ये बंदिस्त असलेले ज्ञान सर्वसामान्यांना समजावे म्हणून ज्ञानेश्वरीत सामान्य जनांची मराठी भाषा वापरली.

"माझा मराठीचि बोलु कौतुके । परी अमृतातेही पैजासि जिंके। ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन।" या ओवीवरून मराठी भाषेचा सार्थ अभिमान त्यांना होता हे दिसून येते.

## ३) संत नामदेव व त्यांच्या साहित्याचा समाजावरील प्रभाव :

ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आणि रामदास या संत मालिकेतील एक महत्वाचे संत म्हणून संत नामदेवांचा उल्लेख करावा लागतो. संत नामदेवांनी विठ्ठलाला आपलासा करून त्याच्या नामघोषाच्या संजीवनीने महाराष्ट्रात नवचैतन्य निर्माण केले. 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' हे त्यांचे ब्रीद होते. ते साध्य करण्यासाठी त्यांनी थेट पंजाब पर्यंत भागवतधर्माचा प्रचार केला. सर्व संत कविमध्ये नामदेवांचे अभंग अधिक उत्कट भावभक्तिच्या अनेक छटा व्यक्त करणारे आहेत, सोपे आणि गोड आहेत. शिखांचा धर्मग्रंथ 'गुरूग्रंथ साहिब' यामध्येही नामदेवांच्या काही पदांचा समावेश आहे. ही पदे 'मुखबानी म्हणून प्रसिध्द आहेत. अंतर्मुखता, आत्मपरता,व जिव्हाळा हा नामदेवांच्या कवितेचा गाभा आहे. परद्रव्य, परनिंदा सोडून वैराग्य पत्करण्याचा संदेश त्यांनी काही अभंगातून दिला आहे. संसाराशी दुरावा, ईश्वराचे प्रेम, ओढ, आर्तता, शरणागती त्याच्या दर्शनाची तीव्र तळमळ व तो भेटल्यानंतरचा परमानंद असे अनेकाविध भाव या अभंगातून व्यक्त झालेले आहेत. किर्तन आणि नामस्मरण ही दोन प्रभावी माध्यमे वापरून भक्तीचा विचार त्यांच्याव्दारे नामदेवांनी लोकांपर्यंत पोहोचविला. नामदेवांची कविता भावनांच्या उमाळयातून निर्माण झाली आहे. म्हणूनच "नामयाची वानी, अमृताची खानी" असे म्हटले जाते. त्यांच्या अभंगातील भाषेचा,अभिव्यक्तीचा गोडावा अलौकिक होता."विठ्ठलची ध्यावो, विठ्ठलची गावो । विठ्ठलची पाहो, सर्वाभूती ।"अशी त्यांची विशाल भूमिका होती.)

## ४) संत एकनाथ व त्यांच्या साहित्याचा समाजावरील प्रभाव :

न्या. गोविंद रानडे यांनी हे खरे महाराष्ट्राचे नाथ होत असे गौरव उदगार संत एकनाथांविषयी काढले आहेत. संत एकनाथांचा कालखंड हा अस्मानी सुलतानीचा तर होताच पण अंधारयुगाचाही होता. समाज अज्ञान आणि अंधरश्रध्देच्या आहारी गेलेला होता. अशा अज्ञानी समाजाला सत्मार्गावार आणण्यासाठी संत एकनाथांनी बहुविध प्रकारचे पंच लेखन केलेले आहे.संत एकनाथांचा एकनाथी भागवत ग्रंथ भोळया समाजाला भक्तीमार्गाचे ज्ञान व्हावे यासाठी लिहीलेला आहे. रुक्मिणी स्वयंवर हे एकनाथांचे आख्यान काव्य आहे. जीव आणि शिव यांचे मिलन म्हणजे लग्न असे रुपक रचून नाथांनी तत्कालीन समाजाला बोध केलेला आहे. नाथांचे भावार्थ रामायण हा ग्रंथ बंधुप्रेमाची शिकवण देणारा आहे. राम म्हणजे मानवी मनातील सदगुण आहे. सीता म्हणजे सूबुध्दी आहे. लक्ष्मण म्हणजे विवेक आहे. भरत म्हणजे प्रेम आहे, हनुमंत म्हणजे वैराग्य आहे, आपले शरीर म्हणजे अयोध्या नगरी आहे, अहंकार म्हणजे रावण आहे. अशा प्रकारचे विचार नाथांनी या ग्रंथामधून सांगितले आहेत. समाजामध्ये असणा-या भोंदूंच्या नादी समाजाने लागू नये. यासाठी त्यांनी भारुडातून अंधश्रध्दा निर्मूलणाचे प्रबोधन केले. सत्त्र पावगे मला | भवानी आई रोडगा वाहीन तुला किंवा 'गोंधळ' सारख्या भारुडांमधून त्यांनी समाजालाअंधश्रध्देच्या जोखडातून बाहेर काढले दादला, विचू यासारख्या रुपकात्मक भारुडातून त्यांनी मौलिक समाजप्रबोधन केले. नाथांचा शांती संदेश आजच्या समाजाला सत्वगुणांकडे नेणारा आहे. भागवत मंदिराच्या विचारांचा भक्कम खांब म्हणजे नाथांचा एकनाथी भागवत ग्रंथ आहे.

## ५) संत तुकाराम व त्यांच्या साहित्याचा समाजावरील प्रभाव :

(संत तुकारामांनी आपल्या जन्मघेण्यामागील काय उद्देश होता हे जसे सागीतले तसेच त्यांनी आपले कर्तव्य देखिल कथन केले आहे." आम्ही वैकुंठवासी। आलो याच कारणासी।बोलिले जे ऋषी। भावे साच वर्ताया ।।ऋषीमुनीनी जो धर्म सांगीतला, जी नीती सांगीतली आणि जो आचार सांगीतला त्यातील यथार्थ भाव जाणून त्याप्रमाणे आचरण करण्यासाठी आम्ही या मृत्यूलोकात आलो आहोत. याची

जाणीव ते करून देतात. इतकी स्पष्ट भूमिका ते घेतात. ज्याप्रमाणे संत तुकाराम आपल्या आचरणाचा आदर्श समाजापुढे ठेवतात त्याचप्रमाणे ते वाणीने मार्गदर्शन करतात. अशा उक्ती आणि कृतीचा संगम त्यांच्या व्यक्तित्वात आढळतो. त्यांनी संसारसागरात बुडणा-या लोकांना, मोठ्या कळवळ्याने सावध करून उध्दाराचा सुलभ भक्तिमार्ग दाखविला. प्रसंगी कठोर वाणीने लोकांना कुमार्गापासून दूर केले, दुर्जनांना अपमानित केले परंतु हे सर्व त्यांच्यावरील प्रेमापोटी केले. त्यांचे हित साधणे हाच यामागे तुकारामांचा हेतू होता. त्यासाठी भक्तीचा डांगोरा पिटून लहान, थोर, नारी-नर यासर्वांनाच आवाहन केले. फुकाचे ते लुटा सार। व्हावे अमर सदैव ।। असे सांगून भवसागरात बुडणा-यांसाठी नामाचे तारु सज्ज केले. त्यामुळेच आज चारशे वर्षानंतरही त्यांच्या कवितेचे अभंगत्व टिकून आहे. इतकेच नव्हे तर तुकारामांची कवीता मराठी माणसाच्या अंतःकरणात घर करून बसली आहे हे त्यांच्या अभंगवाणीचे सर्वात मोठे सामर्थ्य आहे.

## ६) संत गाडगे बाबा व त्यांच्या कीर्तनांचा समाजावरील प्रभाव :

(जनसेवा हिच ईश्वर सेवा असे मानून मानवपूजा हा गाडगेबाबांच्या विचारप्रणालीचा मध्यबिंदु होता. त्यामुळे देवाच्या शोधात देवळाकडे जाण्याची गरज नसून दरिद्री नारायनाच्या रुपात त्याला पाहण्याची गरज आहे. असे बाबांचे मत आहे. ते म्हणायचे खरा देव ओळखा व त्याचीच पूजा करा. देव तिर्थात किंवा मूर्तित नाही. तो तुमच्या समोर दरिद्री नारायनाच्या रुपाने प्रत्येक्ष उभा आहे. त्याचीच प्रेमाने सेवा करा.म्हणून बाबा म्हणतात.

1. भुकेल्यांना जेवन द्या.
२. तहानलेल्यांना पाणी द्या.
३. उपडयानागडयांना वस्त्र द्या.
४. गरीब मुलांमुलीना शिक्षणासाठी मदत द्या.
५. बेघरांना आश्रय द्या
६. अंध पशू रोग्यांना औषधोपचार द्या
७. पशुपक्षी मुक्या प्राण्यांना अभय द्या.
८. बेरोजगारांना रोजगार द्या.
९. गरीब तरुण तरुणीचे विवाह करून द्या.
१०. दुःखी व निशाना हिम्मत द्या.

हाच आजचा रोकड धर्म आहे. हिच खरी भक्ती व देव पूजा आहे, अशी त्यांची धर्म कल्पना होती. हे विचार त्यांनी आपल्या कीर्तनामधून लोकांना पटवून दिले.

## ७) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व त्यांच्या साहित्याचा समाजावरील प्रभाव :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आजच्या युगाचे समाजप्रबोधनकार होते. त्यांनी राष्ट्रभक्ती, राष्ट्रनिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मतेची शिकवण आपल्या कृतीतून व साहित्यातून दिली. भारतीय संस्कृती ही संमिश्र संस्कृती आहे. आणि या विविधतेत एकता हे तिचे वैशिष्टय आहे. आपल्या भारतामध्ये हिंदू, मुस्लिम, शीख, ईसाई, खिस्ती, पारशी, जैन, बौद्ध इत्यादी धर्माचे लोक राहतात. मानवतेच्या नावाखाली सर्व लोक व एकसमान समजल्या जाणे हा राष्ट्रीय एकात्मतेचा खरा अर्थ आहे. राष्ट्रसंतांनी बंधुभाव, स्वातंत्र्य, समता, निर्भयता व ऐक्य निर्माण होण्यासाठी जगदीश्वराला वर मागतांना म्हटले,"या भारतात बंधूभाव, नित्य वसू दे ।दे वरचि असा दे ||धृ||हे सर्व पंथ, संप्रदाय एक असू दे ।मतभेद नसू दे |

आपल्यात भिनली पाहिजे म्हणून राष्ट्रसंत म्हणतात की,"सकळास कळो मानवता, मानवता राष्ट्रभावना" तसेच 'मानवता है पक्ष मेरा | मानवता है पंच मेरा ||' अशी प्रत्येक भारतीयाची वृत्ती, प्रवृत्ति आणि कृती असली पाहिजे. देशाच्या रक्षणसाठी, संवर्धनासाठी सतत जागृत राहिले पाहिजे हा संदेश त्यांनी दिला.

## निष्कर्ष :

१) संतांच्या साहित्यातील विचार विश्वाच्या कल्याणासाठी अत्यंत उपयुक्त् ठरतात.

२) संत साहित्याने अध्यात्मासोबतच विज्ञानवादी दृष्टीकोन समाजाला पटवून दिला.

३) संत साहित्य् हे वर्तमानकाळ, भूतकाळ, आणि भविष्यकाळासाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे.

४) नाचू कीर्तनांचे रंगी , ज्ञानदीप लावू जगी. ही संताची शिकवन होती.

## संदर्भ ग्रंथसूची :

१) तुळपुळे शं.गो.- पाच संतकवी
२) सरदार गं.बा.- संतवाङमयाची सामाजिक फलश्रृती
३) भगत (संपा) रा.तु- संतसाहित्य् आणि समाजप्रबोधन
४) पठाण डॉ. यु.म. - मध्य् युगीन संत साहित्य् काही आयाम
५) भगत प्राचार्य रा.तु. -संत साहित्य् आणि अंधश्रध्दा निर्मूलन
६) कोलते डॉ. वि.भि. - मराठी संतांचे सामाजिक कार्य.

❖❖❖

# अंजनाबाई खुणे यांच्या पाच निवडक कविता

प्रा. डॉ. अनंत वराडे
दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय, मलकापुर, जि. बुलडाणा
निवास – रामकृष्ण मार्ग, बंसीलाल नगर, मलकापुर
ता. मलकापुर, जि. बुलडाणा, महाराष्ट्र, ४४३१०१
मो. ९८२२३१५७३६, ९०२१२२५४८७

## 1. 'बहिण पावनी'

अंजनाबाई यांची 'बहिण पावनी' ही कविता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर विद्यापीठाच्या बी. कॉम. च्या वर्गाला लावलेली कविता

आली बहिण पावनी, भाऊ मंते रांद दार
मंते भावज, घरी या नसं मुंगाचा वापर
आली बहिण पावनी, भाऊ मंते रांद खीर
मंते भावज, घरीया नसं नुकूसी साकर
आली बहिण पावनी, भाऊ मंते रांद भात
मंते भावज, घरीया कन्य नसल गुंडात
मंते बाईन, दादा गा नको मालं तुप पोळी
देजा तुम्ही इतलुसी आंबोल काजी अना कडी [१]

बहिण पावनी भावाकडे येते तेव्हा भावजई कशी वागते. त्याच उत्तम उदाहरण अंजनाबाई आपल्या लक्षात आनुन देते. वहिनी नंदेचा तिटकारा करण्याचा प्रत्यय कवितेतून दिसून येतो. भाऊ पत्नीला आदेश देतो. दाळ, भात, खीर साखर करायला सांगतो तेव्हा पत्नी म्हणते घरातील सामान संपल आहे. हे सर्व एकूण बहिण भावाला उद्देशुन म्हणते. दादा मला तूप, पोळी नको. मला थोडीशी आंबील, कढी दया. पण भावजईचा नकार पाहून बहिण पुन्हा म्हणते,

मंते बईन, दादा गा, नको मला तूप साकर
देजा तुम्ही कोरभर सादी चटनी भाकर
भाऊराया मालं नको, साडी, चोरी अन् खाजा
मलं मायेची गा भुक तेच भाउ भाभी देजा
बईन मंते, भाउराया काई नाई मी मांगा
वागजा आपुलकीना तुम्ही मायेबापा संगा [२]

बईन म्हणते दादा, मला तुप पोळी नको तर मला फक्त अंबील कढी, अना कांजी हवी बाकी काहीही नको मला तुप, साखर नको तर मला साधी चटणी भाकर द्या. तसेच मला साडी चोडी वा पैसा नको आहे. भाऊराया मला फक्त एकच द्या माझी इच्छा आहे. मला माहेरची भुक आहे. त्यात भाऊ भाभी द्या व मायेबापासंग आपुलकीन वागा बस.

## 2. 'मान अपमान'

या कवितेत तिम्या मुलगा सून व आई यांच्यातील संबंध कसे होते याचा विचार अंजनाबाई या कवितेतून व्यक्त करतांना दिसतात.

सात माहिन्याचा पानी पोटी होता तई बाई
रांडपन रंगारलू या पोरा तिम्याच्या पायी
वनमजुरी मी केलू तिम्या कॉलेजात गेली
तिम्याला मी शिकवल मग साहेब तो झाला

मी मनलू, दादा माज्या तू जवरपास राये
इतवाऱ्या दिसी येजो, आपली जमीन पाये
माजा बोल आयेकून राग तिम्यालं वो आला
बायकोला घेउन तो सिदा नागपूरा गेला
साल पाच आला नाई, येक्या दिसी चिठ्ठी आली
झाला वो बारतपन तुलं नातीन भेटली
नातीनचा तोंड बापा पाहावाची इच्छा झाली
गेलू घरुन खाजा संगाा झोयन्यात पोये, भेली [२]

पती निधनानंतर तिम्या आईच्या पोटात होता. वनमजुरी करुन आईन तिम्याला शिकवल षाळेत टाकल. तिम्या कॉलेजात गेला. तो साहेब झाला आई म्हणते जवळपास नोकरी कर रविवारच्या दिवशी आपली शेती पाहा. तिम्याला आईच्या बोलण्याचा राग आला. तिम्या सिधा बायकोला घेउन नागपूरला गेला. पाच वर्ष फिरुनही पाहिल नाही. शेवटी चिठ्ठी आली. तिम्याला कन्या प्राप्त झाली. आईला वाटल नातिनीचा तोंड पहावा. म्हणून नागपूरला गेली. झोलन्यात पोये भेली. पाळण्यात नातिन खेळते. हातपाय धुवून माय वसरीत बसली. तर घरात नातिनीचा बारसा चालू होता. बारश्याला नवाड्या बाया होत्या एकमेकींना हसत होत्या. नाश्ता करत होत्या, पण एकही म्हणाली नाही की एक घास खा म्हणून

मी मनलू सुनपोरी मला भूक वो लागली
ते मंते कशी? पहा मोठी अप्सरा हे आली
अशी कहा बोलतेस बोल रटका वो माये?
पोटी तुझ्याई माऊले एक लेकरु हा आये
पान पिकला पडते त्यालं हिवरा हासते
सून पोरी, या रस्त्याना जावा सप्याल लागते
सून इतकी बोलली, तिम्याल सांगलू नाई
तिच्या सावलीत मालं आये टेकावाची डोई

सासून सूनेला म्हटल, मला भूक लागली सून म्हणते मोठी अप्सरा ही आली. अशी काहो बालते बाई रटका बोल तूझ्या पोटी एक मूलगी आहे आली. झाडाच पिकलेल पान खाली पडते तेव्हा त्याला हिरवा पान हासते. असा प्रसंग सर्वानवरच येतो. पण आईन तिम्याकडे तक्रार केली नाही. कारण शेवट हा त्यासोबतच राहूनच होणार असते.

## 3. 'जन्मदात्याचे उपकार'

संसार म्हणजे नव्हे भातुकलीचा खेळ
जन्माला येतो मानव फक्त एकच वेळ
संसार चक्रात तुम्ही सदा सौजन्याने वागा
देवबाप्पा पाशी तुम्ही चांगली बुध्दी मागा
माय आणि बाप नाही नव्या पिढीसाठी षाप
जन्मदात्यांच्या कष्टाचे जरा करा मोजमाप [३]

अंजनाबाई जन्मदात्यांच्या बाबतीत म्हणतात हा संसार म्हणजे भतूकलीचा खेळ नाही. प्रत्येकान संसारात येउन सर्वाशी सौजन्याने वागाव. माय बापाच जतन करावं त्यांच्या कष्टाची किंमत करावी.

माय बापाची गा माया असते विहिरीहून खोल
नव्या पिढीला वाटते ही भवना का रे फोल ?
माय बापाची माया आहे, सागऱ्याहून आहे मोठी
स्वत: राहती अर्धपोटी पहा, पोटच्या गोळयासाठी

मायबापाची माया विहिरीसारखी खोल असून सागराहून मोठी आहे. पोटच्या पोराला खायाला देवुन स्वत: उपाशी राहतात. अशा प्रकारच वर्णन कवयित्री करतात.

## 4. ‘राष्ट्रीय उद्यान’

या कवितेत माधवराव पाटील यांनी तलाव बांधाला ता सरकारला दिला अन त्याचा वृंदावन केला. तेथे देशोदेशीचे पर्यटक येतात. हरण, मोर, लांडोर बघतात व आनंद लुटतात तसेच आजूबाजुला डोंगर असून झाडी आहे. ते सौदर्य न्याहळत जीवनात आनंद लुटतात  तसेच तिथे सात बहिनी पाळ असून अथांग पाणी जमल आहे.

पूर्वजानी बांधला तलाव दिला षासनाला माधवरावनं
झाला कायापालट पहा, साकारले तेथे वृंदावन
देशी विदेशी पर्यटक येती पहा सहलीला
साप, हरीण, मोर, लांडोर आनंद देती मानवाला
आजूबाजुला डोंगर अन् मध्ये आहे झाडी
पाहण्यात दंग सारे चाखती सौदर्याची गोडी [४]

## 5. ‘माज्या मरणाच्या येडी’

अंजनाबाई आपल्या मरनानंतर काय काम केल पाहीजे त्या संपूर्ण विधीचा वर्णन कवितेतुन करतांना दिसतात

माज्या मरणाच्या येडी जागा बाक्का सावरजो
माजी मंग कुडी बाई, भुईवर तू ठेवजो
माज्या मरणाच्या येडी जमतील आयाबाया
माज्या मुकात ठेवजो तू कलदार रुपया
माज्या मरणाच्या येडी पाचजनी सवासनी
माज्या मुकात टाकजा येक सोनियाचा मनी
माज्या मरणाच्या येडी जमतील सुना पोरी
देजा टाकून गा बाई नाकामंदी माजी बारी
माज्या मरणाच्या येडी येयेल वो माजी सकू
लावलं कपारलं ते मरवट अना कुंकू

अंजनाबाई म्हणतात माझ मरण जेव्हा होईल तेव्हा जागा सारवजा मग माझी कुडी जमीनीवर ठेवजा. तोंडात रुपया ठेवा ,सोन्याचा मनी ठेवा. आजुबाजूला बाया पाच सवासिनी येतील नाकात बारी टाकतीन माझी सकू येईन मरवट भरवीन कुंकू लावीन. माझ्या सकूला माझ्या मरणाची बातमी नदीवर सांगू नका.

माज्या मरणाची बातमी नको सांगू नदीवर
भरली घागर माज्या सकूच्या वो डोक्यावर
पाच रंगायच्या फुलाची सकू वोवजो तू मार
तूजा बाप टाकल तो माज्या गयामंधी हार
मजा जीव गेला बाई माज्या वसरीच्या केरा
मांडी देजो बापा, मालं माज्या लाडक्या गा डेरा
माजा जीव गेला बाई सासूसासऱ्याचा कोर
माजं मायेबाप झालंज जालम देउन दुर
माझा जीव बाई षेजारीन कुणाकाटी
बार बसून रायला निंदनाचा उस्याकाटी [५]

माया मरणाची बातमी नदीवर सांगु नका कारण तिच्या डोक्यावरची घागर खाली पडेल. मग सासू घरी रागवेल, माझी सकू जेव्हा येईल तेव्हा पाच प्रकारच्या फुलांची माळ ओवाळून तिचा बाप माया गळयात हार घालीन माझा जीव गेला पण माझ्या सकूची वाट पहा. पुढे त्या देराला म्हतात मांडी देजो बापा माझे सासू सासरे मायबाप जनम देउन दूर निघुन गेले. षेजारीन आया बायांनी कुळीच्या अवबत चौबत जमल्या आहे. माझा बाळ माज्या उस्याजवळ बसला आहे. माझ्या मरणाची बातमी माहेरी जाईन मग भाऊ मला साळी चोळी आणिल, भाऊजई बांगळ्या आणिन व षेवटी त्या म्हणतात

नाशिवंत जिवाला या मोल कवडीचा नाई
घाई सोयर करती, आता वक्ता नसं काई
सकुली गा धरतील चवगं जना मिरुन
मरणाच्या घाटावर पेटवतील सरन

मृत झालेल्या षरीराला फार काळ ठेवता येत नाही. म्हणून सोयरे नेण्याची घाई करतात. चौघ जन मला खाद्यावर घेतील व मसनवाटेवर घेउन जातील व सरन पेटवतील. शेवटी अंजनाबाई खुणे म्हणतात

'जसा जीव येती आला
तसा, बाई जीव गेला
संगा नाई काई नेला
मंगा याद वो ठेवला'

या अशाप्रकारे माज्या 'मरणाच्या येडी' या कवितेतून समाजाला प्रबोधन करताना त्या म्हणतात मनुष्य मृत झाल्यावर काहीही नेत नसुन जसा जीव धरतीवर येतो. तसाच मृत्युनंतर माणुस काहीच सोबत नेत नसतो. असा निर्वाडा अंजनाबाई देतात.

## संदर्भ सूची

१ झाडीकन्या अंजनाबाईची कविता 'बहिण पावनी' पृ. क्र. ३,४ संपादक हिरामन लांजे विवेक प्रकाशन नागपूर
२ झाडीकन्या अंजनाबाईची कविता 'मान अपमान' पृ. क्र. ९, १० संपादक हिरामन लांजे विवेक प्रकाशन नागपूर
३ झाडीकन्या अंजनाबाईची कविता 'जन्मदात्याचे उपकार' पृ. क्र. ९१ संपादक हिरामन लांजे विवेक प्रकाशन नागपूर
४ झाडीकन्या अंजनाबाईची कविता 'राष्ट्रीय उद्यान' पृ. क्र. ९० संपादक हिरामन लांजे विवेक प्रकाशन नागपूर
५ झाडीकन्या अंजनाबाईची कविता 'माज्या मरनाच्या येडी' पृ. क्र. ५१,५२,५३ संपादक हिरामन लांजे विवेक प्रकाशन, नागपूर

❖❖❖

# आनंद यादव यांची कविता: एक अवलोकन

**डॉ. गजानन भाऊराव घोंगटे**
श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय
वनोजा, ता. मंगरूळपीर जि. वाशिम.
ई-मेल: ghongategajananb@gmail.com मो.: 9822406115

**बीज शब्द:** शेती - कष्ट - कष्टकरी - माती - धन - निसर्ग - दारिद्रय - कौटुंबिक जीवन - ग्रामीण जीवनानुभव - अगतिकता - बोली - आविष्कार.

## गोषवारा:

आनंद यादवांची मराठी ग्रामीण कविता, ग्रामीण कवितेत महत्त्वाचा टप्पा मानले जाते. पूर्वसुरींच्या जानपद कवितेतील कल्पनाविलासाचा धागा अनुसरताना त्यांची कविता दिसत नाही. ग्रामीण परिसरातील कष्टकऱ्यांचे जीवन अधोरेखित करणे हे त्यांच्या काव्यनिर्मितीची प्रेरणा असल्याचे जाणवते. ग्रामीण बोली आणि निसर्ग प्रतिमांचा चपखल वापर यामुळे त्यांची कविता अकृत्रिम वाटते. शेतकरी, शेतमजुर यांनी शेतीत उपसलेले कष्ट, त्यांचे दारिद्र्य, कौटुंबिक जीवनातील परस्परांविषयी वाटणारा जिव्हाळा, त्यांच्या अवती - भोवतीचा निसर्ग, अवर्षण, अतिवृष्टी इत्यादी विषय त्यांच्या कवितेत प्राधान्याने आलेले दिसतात.

## प्रस्तावना:

आनंद यादव सर्जनशील कवी, कथाकार, कादंबरीकार, ललीत गद्यकार व समीक्षक म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांचा जन्म कोल्हापुर जिल्हयातील कागल या गावी शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या कुटुंबात दारिद्रय आणि अज्ञान पिढ्यानपिढ्या चालत आलेले होते. त्यांनी शेती कामात आपल्याला हातभार लावावा अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. त्यांना मात्र बालपणापासूनच शिक्षणाची आवड होती. दिवसभर शाळा व सकाळ संध्याकाळ ते मळ्यात राबू लागले. चौथ्या वर्गापासून ते कविता लिहू लागले, गाऊ लागले. स्वत:शीच गुणगुणण्यातून त्यांची कविता आकाराला आली. 'हिरवे जग', 'मळ्याची माती', 'मायलेकरं' अशा एकूण तीन काव्यसंग्रहाची निर्मिती त्यांनी केली.

## विषय विवेचन:

ग्रामीण कवितेच्या परंपरेत व प्रामुख्याने ग्रामीण कथा व कादंबरी वांङ्.मय या दोन्हीमध्ये आनंद यादवांचे योगदान मोठे आहे. प्रस्तुत शोधनिबंधाची दिशा लक्षात घेऊन त्यांनी लिहिलेल्या ग्रामीण कवितेचा प्रामुख्याने विचार करावयाचा आहे. बहिणाबाई नंतर ग्रामीण कवींच्या नामावलीत आनंद यादव यांचा उल्लेख करावा लागतो. आनंद यादवांनी ग्रामीण जीवन जे व्यापकतेने मांडायचे होते, विस्तृतपणे सांगायचे होते त्यासाठी कथालेखन व कादंबरी लेखन केले. जेव्हा आशय थोडक्यात पण वेगळ्या मुशीत

मांडायचं होता तेव्हा त्यांनी अल्पाक्षरी वांङ्.मय म्हणून कविता लेखनही केले आहे. "ग्रामीण कांदबरी कथा आणि समीक्षेच्या क्षेत्रात नावलौकिक संपादन केलेल्या आनंद यादवांनी ग्रामीण कवितेच्या प्रांतातही प्रवेश केलेला आहे. त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'हिरवे जग' 1960 साली प्रकाशित झाला. त्यानंतर 'मळ्याची माती' 1978 आणि 'मायलेकरं' हा दीर्घ कवितासंग्रह 1989 साली प्रकाशित झाला. आनंद यादव यांची कविता त्यांच्या कथा, कादंबऱ्यांच्या तुलनेत तेवढी सकस दर्जाची नाही मात्र त्यांनी जे कौटुंबिक जीवनातील नाट्य कवितेतून मांडले आहे, ते वेगळे जीवनानुभव सांगणारे आहे. दारिद्र्याने ग्रासलेल्या ग्रामीण व्यक्तींच्याही काही अपेक्षा असतात. आपल्या मुलाला शिक्षण देण्याची इच्छा असते. परंतु आर्थिक दुर्बलतेमुळे ती इच्छा पूर्ण करता येत नाही. हाच संघर्ष आनंद यादव यांनी कवितेतून मांडला आहे."(1) ग्रामीण जीवनातील हृदयस्पर्शी अनुभव नाट्यात्मक पद्धतीने आनंद यादव यांनी आपल्या कवितेतून मांडले आहेत.

आनंद यादव यांनी ग्रामीण जीवन कृषिजीवन, कौटुंबिक संघर्ष, निसर्गाचे लहरी वागणे इत्यादी आपल्या कवितेतून चित्रासम रेखाटले आहे. त्यांची कविता बेगडी न वाटता अस्सल ग्रामीण कविता वाटायला लागते. ते ग्रामीण कुटुंबात जन्माला आले व त्यांनी ग्रामीण जीवन जवळून पाहिले व अनुभवले. "आनंद यादव यांचे काव्य लेखन 1954 पासून सुरू झाले. ते स्वतः महाराष्ट्रातील एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले होते शिवाय लहानपणापासून शेतकरी जीवनाच्या अनुभवाबरोबरच शालेय जीवनातील क्रमिक पुस्तकांमधल्या कवितांनी त्यांची काव्यप्रतिभा अंकुरत राहिली. विशेषतः कविता गाऊन म्हणण्याच्या त्यांच्या बालमनाच्या आवडीतून त्यांच्या स्वतःच्या रचनांचा जन्म होत गेला या काळातील यशवंत गिरीशांची ग्रामीण कविता वाचून आविष्काराची ओढ त्यांच्यात निर्माण झाली. पुढे "सुगी" हा संग्रह त्यांच्या वाचनात येऊ लागला वय आणि समज वाढत गेली, तस तशी या कवितेतील व्याज, अनुभव, नाटकी, कृत्रिम आविष्कार शैली त्यांच्या लक्षात येऊ लागली. स्वतः एका कष्टकरी शेतकरी कुटुंबात जन्मलेले असल्याने यादवांनी ग्रामीण जीवनाचे अनुभव पुरेपूर घेतलेले होते आपण भोगलेले अनुभव आणि या कवितेतील ग्रामीण जीवनानुभव यांच्यात खूपच अंतर आहे किंबहुना या कवितेतील ग्रामीण जीवन कृतक खोटे आहे. या अनुभवांना साकार करणारी भाषाही खरी नाही, हे त्यांच्या लक्षात येऊ लागले."(2) त्यांचे संवेदनशील मन अस्वस्थ झाले त्यांना प्रचलित ग्रामीण म्हणवली जाणारी कविता बेगडी वाटू लागली.

आनंद यादव शेतकरी कुटुंबातील आणि ग्रामीण परिसरातील त्यामुळे त्यांनी ग्राम, शेती, शेतकरी व शेतमजूर यांना जवळून पाहिले, एवढेच नाही तर त्यांच्या जगण्यातील जीवनाशयाचे चटकेही आनंद यादवांनी सहन केले. त्यांनी ग्रामीण जीवनातील जे भोगलेपण पाहिले ते अतिशय संवेदनशील पणे परिणामकारकतेने त्यांना कवितेतून अभिव्यक्त करता आले. याची कारणमिमांसा करताना आनंद यादव म्हणतात. "काही काव्य नाही जाणवले, तसे निर्माण करावे असे वाटले ते साधारण दहावी मध्ये असताना वयाच्या अठरा-एकोणिसाव्या वर्षी. घरी परंपरागत पण खंडाची शेती. तिच्यावर अपार कष्ट केले. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण चालू होते. ससेहोलपट होत होती. अशा अवस्थेत असतानाच ठोकळ, यशवंत, गिरीश, चंद्रशेखर यांच्या ग्रामीण म्हटल्या जाणाऱ्या कविता क्रमिक पुस्तकांतून वाचत होतो त्यावरील शिक्षकांचे रम्य(!) भाष ऐकत होतो. आणि मनात चिडत होतो कारण सगळेच अज्ञान हे सगळे ग्रामीण जीवन खोटे आहे. विपर्यस्त आहे, अशा भावना कधी आपल्या जीवनात येतच नाहीत, अशी त्याचवेळी खात्री पटली आणि माझ्याकडून ग्रामीण कविता लिहिली गेली. म्हणजे या कवींच्या कवितांनी आकर्षून घेण्यापेक्षा

माझ्या मनात तीव्र प्रतिक्रिया निर्माण केली आणि मीही त्या काळात सरधोपटपणाने कविता लिहिली. पुढे लिहीतच राहिलो."(3) त्यांच्या या मनोगतातून त्यांच्या मनात असलेली जाणीव अत्यंत प्रामाणिक असल्याचे लक्षात येते.

ग्रामीण बोली लईत मांडली म्हणजे अस्सल ग्रामीण कविता निर्माण होते हा संभ्रम त्यांनी दूर केला व आपल्या कवितेतून अस्सल ग्रामीण जीवन रेखाटले. हे त्यांच्या पुढील विविध संदर्भीय कवितांवरून लक्षात येते.

तळची भाकर
'जाऊन शिस्तीन जेवायला तुम्ही
हळूच उचला तळची भाकर,
आणि तिच्या पापडाखालचं
लोणी सांडगं खावा आगुदर,
ठाव न्हाई कुणाला गुपीत
सासुबाईलाबी हे नका बोलू
त्यांनी घातल्यात दिरा नणंदास्नी
आणता नव्हं मला दिवाळीत शालू'

ग्रामीण जीवनामध्ये एकत्र कुटुंब पद्धतीत वैवाहिक प्रेम व्यक्त करण्याला मर्यादा येतात. वेगवेगळ्या निमित्ताने या प्रेमाला भरते येते व परस्परांच्या आर्त् भावनांचे आपसूक संदेशवाहन होते.

वैनी
'विड्याच्या पातळाच्या हिरव्या पदरानं
भराला आलेली शालूची रानं
शेंडा-बूड घुसळतं
जोडव्या मासूळ्यांतन
भिरंच्या भिरं पाखरांचं उडवत
आली वैनी
दादाच्या जिवाचं
बावच्याचं रानं
टचाटचा खुडत,
...नव्याभोर ढगात वादळ घुसवत'

वैनीच्या नात्याला निसर्गातील विविध प्रतिमांचे लेपन देऊन बावनकशी ग्रामीण सौंदर्याचा भावाविष्कार त्यांच्या कवितेतून जाणवतो. ग्रामीण जीवनात नात्यागोत्यांना फार महत्त्वाचे स्थान असते. पती-पत्नी, भाऊ-बहिणी, आई वडील, आजी-आजोबा असा गोतावळा सभोवताल असतो. या नात्यातून जिव्हाळा, आपुलकी, वात्सल्य, ममत्व ओसंडून वाहत असते.

'मेल्यावर जिती असती तर...
अंगाच कातडं मोट कराय इकलं असतं,
हाडांचा चुना बाजारात ठेवला असता
केसांच्या वारवाचं कंठ करून

गल्ली बोळात खपवलं असतं
आल्या पैशानं पोट भरून जेवली असती'

ग्रामस्थ तर या भूमातेला व मातेला पूजनीय मानतात. आयुष्यभर कष्ट करून राबणाऱ्या मातेच्या जीवाची केव्हा माती होते हे कळत नाही. इतरांसाठी राबणारी माय जिवंतपणी त्याग करतेच पण मृत्यूनंतर जर अस्तित्व भान राहिले असते तर तिने काय केले असते, हे आनंद यादवांनी समर्पक प्रतिमांनी अभिव्यक्त केले आहे. आनंद यादवांचा पिंडच ग्रामीण असल्यामुळे त्यांच्या ग्रामीण कविता अस्सल वाटतात.

## समारोप:

आनंद यादवांच्या कवितेतून अभिव्यक्त होणारा जीवनानुभव अस्सल वाटतो. कष्टकऱ्यांच्या जीवनाचे ते प्रत्ययकारी चित्रण करतात. त्यांच्या कवितेतून घडणारे निसर्गाचे दर्शन ग्रामजीवनाशी एकरूप झालेले दिसते. आनंद यादवांच्या प्रेमकवितेत विवाहोत्तर प्रेमाचे दर्शन घडते. ग्रामीण जीवनानुभव बोलीच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असल्याने अनुभव वास्तव आणि जिवंत वाटायला लागतात. ग्रामीण वास्तवाला केंद्रस्थानी ठेवणारी त्यांची कविता असल्याने त्यांच्या कवितेतून ग्रामजीवनाचे यथार्थ दर्शन घडते. आनंद यादव ग्रामीण माणसांच्या भाव-भावनांशी, तेथील वातावरणाशी समरस झालेले दिसतात.

## निष्कर्ष:

1) आनंद यादव यांची कविता ग्रामीण जीवनाशी एकरूप झालेली दिसते.
2) आनंद यादव यांची कविता ग्रामीण जीवनातील अस्सलपणा आविष्कृत करते.
3) आनंद यादव यांची कविता ग्रामवास्तवाला कवेत घेण्याचा प्रयत्न करताना दिसते.

## संदर्भ:

1) फडके, डॉ. भालचंद्र, किरवले, डॉ. कृष्णा: 'ग्रामीण साहित्य', य. च. म. मुक्त विद्‍यापीठ, नाशिक, एप्रिल 1996, पृ. ८२.
2) सार्वेकर, डॉ. कैलास: 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास'; मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे आवृत्ती पहिली, 1999, पृ. 111.
3) यादव, आनंद: 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, तृतीयावृत्ती जुलै, 1993, पृ. 156.

❖❖❖

# 'शबरी' कादंबरीतील विभावरी शिरूरकरांच्या लौकिक जीवनाच्या प्रतिबिंबाचा शोध

संशोधक विद्यार्थी
**उज्वला नामदेवराव जानवे**
मार्गदर्शक
**डॉ. परमानंद बावनकुळे**
चिंतामणी महाविद्यालय, पोंभूर्णा

## गोषवारा :-

'एक झाड आणि दोन पक्षी' या आत्मचरित्राचे नायक विश्राम बेडेकर असले तरी त्यांच्या जीवनाच्या अनुषंगाने त्यांची अर्धांगिनी असलेल्या बाळूताई खरे म्हणजेच विभावरी शिरूरकर यांचे जीवन व स्वाभावगुण चित्रित झाले आहे. जे विभावरी शिरूरकर लिखित 'शबरी' कादंबरीतील काही घटनांशी साधर्म्य सांगणारे आहे. शबरी आणि बाळूताई दोघीही शिक्षणाबरोबरच नोकरी, अर्थार्जन करीत आर्थिक स्वावलंबन उपभोगणाऱ्या आहेत. तत्कालीन रितीरिवाजांविरूध्दची त्यांची ही बंडखोरी आहे. दोघींचेही पती ध्येयवेडे असून; त्यांचा संसार दुसऱ्या स्त्रीच्या आगमनामुळे विस्कटलेला आहे. अशाच काही घटनांवरून 'शबरी' ही कादंबरी विभावरीबाईच्या लौकिक जीवनाचा वाङ्मयीन आविष्कार आहे हे सिध्द होते.

## बीजशब्द :-

लौकिक जीवन, साधर्म्य, स्वावलंबन, सुशिक्षितपणा, बंडखोरी.

## प्रस्तावना :-

मराठी कादंबरीविश्वात आपल्या बंडखोर विचार लेखनाने उठून दिसणाऱ्या लेखिका म्हणजे विभावरी शिरूरकर. वयाच्या २५ व्या वर्षी 'अलंकारमंजुषा' आणि 'हिंदूव्यवहार धर्मशास्त्र' यासारखे विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहून आपली बुध्दिविचक्षणा दाखविणाऱ्या पूर्वाश्रमीच्या बाळूताई म्हणजेच लग्नानंतरच्या सौ. मालतीबाई विश्राम बेडेकर. सभोवतीच्या समाजातील स्त्रीच्या दाहक अनुभवाभिव्यक्तीसाठी त्यांनी 'विभावरी शिरूरकर' हे टोपणनाव स्वीकारले. विभावरीच्या कथा - कादंबऱ्यांमधून हाताळले गेलेले विषय स्फोटक आहेत. स्त्रियांना शिक्षणाची संधी नसतांनाच्या काळामध्ये त्यांनी उच्चशिक्षण घेऊन, नोकरी करत आर्थिक स्वावलंबन अनुभवले. पुण्याच्या कन्याशाळेत, सोलापूरच्या गुन्हेगार वस्त्यात त्यांनी काम केले. अस्पृश्य वस्तीत जाऊन तेथील लोकांना स्वच्छतेचे धडे दिले. त्यांचे हे शैक्षणिक व सामाजिक कार्य तत्कालीन काळाची पार्श्वभूमी बघता अतुलनीय आहे. कदाचित विभावरीबाईने आत्मचरित्र लिहिले असते तर त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा अधिक उलगडा पडला असता. पण साहित्य हेही लेखकाचे अपत्य असते. त्यातून लेखक प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरित्या व्यक्त होत असतो. त्यांची 'शबरी' ही १९६२ साली प्रकाशित झालेली कादंबरी वाचतांना ती कुठेतरी बाळूताईच्या जीवनाशी समांतर जातेय असे वाटत राहते. या विचारांना पुष्टी मिळते ती १९८४ साली प्रकाशित झालेल्या बाळूताईच्या पतीच्या म्हणजेच विश्राम बेडेकर यांच्या 'एक झाड आणि दोन पक्षी' या आत्मचरित्रातील काही घटना प्रसंगांनी. त्यातून विभावरीच्या विवाहोत्तर लौकिक जीवनावर थोडा

प्रकाशझोत पडतो. 'शबरी' कादंबरीतील शबरी आणि अभिराम तसेच 'एक झाड आणि दोन पक्षी' मधील बाळूताई खरे आणि विश्राम बेडेकर यांच्या जीवनातील काही घटना प्रसंगाचे साधर्म्य बघता 'शबरी' ही कादंबरी विभावरी बाईचे 'शबरी' च्या रूपात लौकिक जीवन मांडते असे वाटते. अशाच काही निवडक घटनांचा अभ्यास या शोधनिंबधातून केलेला आहे.

## ➢ नायिकेचे व्यक्तिमत्त्व :-

'शबरी' कादंबरीतील शबरी ही धीट तरूणी आहे. बी. ए. पर्यंत शिक्षण घेतलेली शबरी देहू रोडवर नोकरी करीत स्वतंत्रपणे जगू बघते. ''शबरी, आज लवकरच घरी ये. प्रो. पारखी तुला बघायला येणार आहेत.'' (शबरी, पृ. २९) या वडिलांच्या बोलण्यावर मला येता येणार नाही असे शबरी त्यांना स्पष्ट सांगते. आपल्या विवाहाचा निर्णय ती स्वतः घेते. ''हो मी माझं लग्न ठरवलं आहे.'' (शबरी पृ. २९) हे ठामपणे पालकांना सांगते. अभिराम सोबतच्या भेटी दरम्यान त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करते. लहान वयात व वडिलांच्या संमतीने विवाह होण्याच्या काळात शबरी शिक्षित होत; नोकरी करत उशिरा लग्न करते. कुटुंबाला हातभार लावते. स्वतः च्या आयुष्याचा जोडीदार स्वतः निवडते; ही तिची बंडखोरीच ठरते.

बाळूताई खरे यांच्या वडिलांच्या सुधारक विचारांनी बाळूताईंना शिक्षणाची संधी उपलब्ध होते. या संधीचे सोने करीत त्या फार मोठा पल्ला गाठतात. एम. ए. च्या धर्तीची प्रदेयागमा व बी. टी. पदवी मिळवितात. पुण्याला शाळेत नोकरी करीत; आर्थिक स्वावलंबन अनुभवत आपल्या जीवनाला स्वतः आकार देतात. आईवडिलांनीच ठरविलेल्या वरालाच निवडण्याच्या तत्कालीन रितीरिवाजांना डावलत आपला जोडीदार त्या स्वतः निवडतात. लग्नाआधीच भेटून एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतात. स्वतः पुढाकार घेऊन लग्नाचा हेकाही धरतात. ''........ साध्या गोष्टीसाठी मोठे अवडंबर माजवण्याची याला फार हौस. विषय दोन माणसांचे साधे लग्न. पण याच्या दृष्टीने या लग्नात अडथळे आणणारे कोण ? तर हिटलर, मुसोलिनी, चेंबरलेन दलादिये ! हाइन लँड, आस्ट्रिया, हंगेरी हे देश गेले म्हणून यांच्या लग्नाचा मांडव घालायला याच्या दृष्टीने जागा नव्हती ! ''तरीही तू जर म्हणत असशील तर'' - बाळूताईंनी साफ सांगितले 'हे जायचं तर लग्न करून जा. मग पुढं हवं ते होऊ दे!'' (एक झाड आणि दोन पक्षी, पृ. १३९) असे बाळूताई शिष्यवृत्ती मिळवून अभ्यासार्थ इंग्लंडला जाणाऱ्या भावी नवऱ्याला बजावतात. विवाहाचा निर्णय घेतल्यानंतर तो स्पष्टपणे निर्भीडपणे आईवडिलांसमोर मांडतातही; ही बाळूताईची बंडखोरीच होय.

नायिकांप्रमाणेच नायकांच्या जीवनात ही थोडेफार साम्य दिसते. दोघेही ध्येयवेडे तरूण आहेत. अभिराम आपल्या व्यवसायात जम बसविण्यासाठी तर विश्राम बेडेकर सिनेमासृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडतांना दिसतात. त्यांचे जीवन, त्यांच्या सुशिक्षित व नोकरी करणाऱ्या पत्नी, त्यांच्या संसारी आयुष्यात आलेली परस्त्री आणि त्यामुळे त्यांच्या संसारात उठलेले वादळ यातही साम्य आहे.

## ➢ स्वयंपाकावरून केलेली हेटाळणी :-

घरच्या स्त्रीबद्दल, तिच्या कर्तृत्वाबद्दल एक प्रकारची न्यूनतेची भावना बऱ्याच पुरूषांच्या मनात असते. अभिराम आणि बेडेकर हे दोघेही सुशिक्षित, आधुनिक विचारांचे असले तरी सुशिक्षित स्वाभिमानी स्त्रीबद्दलची एक अढी त्यांच्याही मनात दिसते. 'शबरी' कादंबरीतील अभिराम ''आमची बायको सकाळी उठली की आधी ती वर्तमानपत्र वाचते. तिचं संपल्यावर मी.'' (शबरी, पृ. ६०) अशा मित्रांसमोरच्या हलक्या फुलक्या थट्टेतून शबरीचा अपमान करतो. अभिरामच्या मनात जे स्त्रीदाक्षिण्य आहे; तो दर्जा, तो सन्मान ते पत्नी शबरीला देतांना दिसत नाही. घरी मित्रांसमवेत अगदी रंगात आलेल्या पत्त्यांच्या खेळात खेळण्याची इच्छा शबरी अभिराम समोर प्रदर्शित करते. त्यावर ''छेःछेः, खेळायला कसली बसतेस. बायकांचं घर म्हणजे

स्वयंपाकघर'' (शबरी, पृ. ११४) असे म्हणत तिच्या इच्छेला डावलतो. नवऱ्याचा कृती उक्तीतला भेद शबरीला खटकतो. ''.... आपण उगीच म्हणालो. चुकलंच आपलं. पण सर्वांच्या देखत त्याने असं तोडायला नको होतं. तोच कितीदा म्हणतो, बायकापुरूष क्लबात खेळतात म्हणून हेही बायका जमून खेळत नसत असं नाही. मग मी खेळायला बसले तर काय हरकत आहे ?'' (शबरी पृ. ११५) अशी शबरी रास्त भूमिका घेते. आपल्या पत्नीच्या ठायी असलेल्या कलागुणांचा सन्मान तर सोडाच पण तिचे साधे शब्दातील कौतुकही तो करू इच्छित नाही. उलट प्रत्येक लहानसहान घटनेतून तिचे मानसिक खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करतो. अभिरामचे पाहुणे मेहरचंद, धीरूभाई, रतनदास हे शबरीकडे जेवायला येतात. काळजीपूर्वक खपून ती उत्कृष्ट स्वयंपाक बनवते. 'तिखट नाही ना लागत ?' असे धीरूभाईंना शबरी विचारताच सर्वजण उत्तम स्वयंपाकाचा निर्वाळा देतात पण अभिराम म्हणतो, ''उत्तम न म्हणून कसं चालेल ? सुशिक्षित बाईच्या हातून इतका स्वयंपाक होतो आहे हेच भाग्य.'' (शबरी, पृ. ११५) अशा कुत्सित वक्तव्यातून शबरी प्रतीची त्याची भावना अधोरेखित होते.

वरील प्रसंगाशी साधर्म्य दर्शविणारी घटना बेडेकरांच्या आत्मचरित्रातही येऊन जाते. बाळूताईची मोठी बहीण कृष्णाबाई या बेडेकरांचा मित्र हरिभाऊ मोटे यांच्या पत्नी. 'कसा झालाय स्वयंपाक ?' या कृष्णा बाईच्या प्रश्नावर ''सैपाक करणं ही काही सुशिक्षित बायकांच्या सरावाची गोष्ट नसते. जुन्या बायकांना जन्मभराचा अभ्यास असतो स्वयंपाकाचा. तेव्हा तुम्हाला 'ठीक आहे तसा' असं म्हणण्यात काय चुकलं ?'' (एक झाड आणि दोन पक्षी, पृ. १२१) असा चिमटा बेडेकर काढतात. बेडेकरांचा हा स्वयंपाक टोमणा विभावरीबाईंना चिरपरिचित असावा. त्यातूनच तो 'शबरी' कादंबरीतून उद्धृत झाला असावा असे दिसते.

## ➢ सुशिक्षितपणावरून ओढलेले ताशेरे :-

अभिराम हा उच्चशिक्षित असला तरी कुठेतरी स्त्रीचे वर्चस्व, तिचा शिक्षितपणा त्याला सलतो. त्यामुळे अभिराम सुशिक्षित बायकांवर सतत ताशेरे ओढतांना दिसतो. ''तुम्ही शिकलेल्या बायकांना स्वतः चा विसरच पडत नाही. प्रत्येक गोष्टीत तुमच्या स्वाभिमानाला धक्का लागल्यासारखं तुम्हाला वाटतं नि एकेरीवर येता तुम्ही.'' (शबरी, पृ. ९३) अशी त्याची तक्रार आहे. सुशिक्षित बायकांना घर सांभाळता येत नाही, त्यांचे घरात लक्ष नसते, तुम्ही फक्त स्वतः चा विचार करता, तुम्ही संसारासाठी नसतातच मुळी असे टोमणे तो मारतो. सदानकदा सुशिक्षित बाईबद्दलच्या त्याच्या अनुदार उद्गाराने शबरीचे मन विरल्यासारखे होते.

तर दुसरीकडे 'एक झाड आणि दोन पक्षी' या आत्मचरित्रातून साहित्यविश्वातील प्रथितयश लेखक असणारे बेडेकरही स्त्रीच्या सुशिक्षितपणावरून असेच ताशेरे ओढतांना दिसतात. ''स्त्रीशिक्षण हवं म्हणणाऱ्यांनी एक मोठी चूक केली. शिकलेल्या स्त्रियांशी कसं वागावं लागणार याचं पुरूषांना आधी शिक्षण द्यायला हवं होतं !'' (एक झाड आणि दोन पक्षी, पृ. १५९) बेडेकरांच्या मते, बायकांना मागच्या पिढ्यांनी फार वाईट वागवल्याची हाकाटी सुधारकांनी केली. सध्याचे सुशिक्षित त्यामुळेच बायकांशी उगीचच वरमून वागतात. म्हणून बायकां वरचढ झाल्या, त्यांच्या गमज्या चालतात असा तक्रारी सूर ते लावतांना दिसतात.

## ➢ सोबत जेवायला बसण्याचा प्रसंग :-

अभिरामची शबरी प्रतीची अनास्था अनेक लहानमोठ्या प्रसंगातून शबरीपुढे उघड झाल्याने तिचा स्वाभिमान डिवचल्यासारखा होतो. शबरी सोबत जेवायला बसलेलीही त्याला आवडत नाही. त्याचा वचपा म्हणून अभिरामने बाहेरून आणलेल्या खायच्या जिनसाची वाटणी होतांना शबरीला हेतुपुरस्सर विसरले जाते. ''आता तू घराची घरधनीण. तूच वाटे करून द्यायचे सगळ्यांना. तर तू अगदी नवऱ्याच्या मांडीला मांडी लावून

जेवायला बसल्यावर आमच्या नाही बुवा लक्षात राहत.'' (शबरी, पृ. १४७) असे आपल्या चुकीच्या वागण्याचे समर्थनही तो करतांना दिसतो.

सोबत जेवण्याच्या याच घटनेशी साधर्म्य दाखविणारी घटना बाळूताईच्या आयुष्यातही घडलेली दिसते. बाळूताई आणि बेडेकर गप्पा करीत, निरनिराळ्या विषयांवर बोलत एकत्र जेवायचे. जेवल्यानंतर हात धुवायला जातांना बोलत बोलत बाळूताई हात धुत आणि स्वतः चे हात धुणे झाले की पाण्याची तपेली खाली टाकून निघून जात. नवऱ्यासोबत जेवायला बसणे, बोलत जेवणे, हात धुवायला पाणी न देणे हे बाळूताईचे वागणे बेडेकरांना खटकायचे. ''काय बाई आहे ? पुढे येऊन हात धुते. पुन्हा तपेली भरून आपल्या हातात देण्याचे सुध्दा हिला वळण नाही !'' (एक झाड आणि दोन पक्षी, पृ. १५९) अशा शब्दांत ती सल व्यक्त होते. तात्पर्य, कुठेतरी दोघांच्याही मनात पत्नीचे स्वातंत्र्य, त्यांचे ठसठशीत व्यक्तिमत्त्व खटकते. वरवर स्त्रीसमानतेच्या गप्पा करणारे; पण पत्नीने सोबत जेवायला बसल्याने वा आपल्यापुढे जाऊन हात धुतल्याने त्यांचे पुरूषत्व दुखावतांना दिसते.

## ➢ पत्र प्रसंग :-

पतीला आलेले पत्र त्यांच्या पत्नीने फोडण्या व वाचण्याबद्दलचा नाराजीचा सूर व्यक्त करणारे घटनासाम्यही दोन्ही पुस्तकातून दिसते. अभिरामला आलेले पत्र त्याच्या पत्नीने, शबरीने फोडलेले त्याला आवडत नाही. त्यावर तो हरकत घेतो. ''हो माझी हरकत आहे. मला माझी पत्रं फोडलेली आवडत नाहीत.'' ''ही माझी पत्रं फोडायची नि वाचायची सवय तू सोडून दे.'' मी तुझी फोडणार नाही. तू माझी फोडत जाऊ नकोस.' ही आपल्यात पक्की समजूत असली पाहिजे.'' (शबरी, पृ. ७१) असा स्पष्ट खुलासा अभिराम करतो. नवऱ्याच्या या बोलण्याचा शबरीला धक्काच बसतो. घर म्हटले की सगळ्यांची सुखदु: ख एक असणार मग नवराबायकोत एकमेकांपासून लपवण्यासारखे काय असणार असा विचार शबरीच्या मनात येतो.

एकदा बेडेकरांसमोर पोस्टमनने दिलेले आणि हरिभाऊसाठी आलेले पत्र कृष्णाबाई फोडतात. हे दृश्य खटकून त्यावर बेडेकर उद्गारतात, ''तुम्ही हरीची पत्रे त्याला न विचारता फोडता ?'' (एक झाड आणि दोन पक्षी, पृ. १२०) कृष्णाबाईच्या होकारार्थी उत्तरावर ''नाही माझ्या मनात विचार आला, त्याच्या मित्रांना स्वतः च्या अगदी खाजगी गोष्टी हरीला लिहाव्याशा वाटल्या तर तुम्हालाही त्या कळाव्या, हे कदाचित त्यांना रूचणार नाही.'' (एक झाड दोन पक्षी, पृ. १२०) असा एकंदरीत बेडेकराचा नाराजीचा सूर दिसतो. म्हणजेच हे पत्रस्वातंत्र्य प्रकरण कुठेतरी बाळूताईच्याही आयुष्यात घडले असणार नि त्याचे पडसाद 'शबरी' कादंबरीतून उमटले असावे असे दिसते.

## ➢ परस्त्रीच्या आगमनामुळे विस्कटलेला संसार :-

शबरी व बाळूताई या दोघीच्याही नवऱ्यांच्या आयुष्यात आलेल्या दुसऱ्या स्त्रीच्या आगमनामुळे त्यांच्या भावविश्वात विलक्षण उलथापालथ झालेली दिसते. शिक्षित आणि स्वाभिमानी शबरीच्या व्यक्तित्वाने प्रभावित झालेल्या अभिराम नंतर एकदम बदलतो. दुसऱ्या स्त्रीला हृदयात स्थान दिल्यानंतर शबरीची कोणतीच गोष्ट त्याला चांगली दिसत नाही. तिने घर सोडून जावे म्हणून तो शबरीशी अंतर ठेवून तुटक वागतो. सुशिक्षितपणावरून तिला टोमणे मारतो, तिची फसवणूक करतो. महत्वाचे काम आहे सांगून शबरीच्या नकळत तिला अंधारात ठेवून प्रेयसीला गाडीमध्ये फिरवतो. जेव्हा अभिरामच्या खिशात सुरंगी फुलांचा गजरा, आकडे व हातरूमाल शबरीला सापडतो. तेव्हा त्याचा जाब द्यावा लागू नये म्हणून भरल्या घरात तो एकांत शोधतो. बायकोमुलांपासून अलिप्त होऊ बघतो. ''त्या दिवशी अभिराम आला. नेहमीप्रमाणेच तिच्या बाबतीत तो पुरा उदासीन होता. अलीकडे तो आला आणि मुले घरात असली तर तो

मुलांशी बोले, खेळे, नाहीतर दार लावून आपल्या खोलीत बसे. दार लावून बसण्याचा त्याचा हा परिपाठ तिला असहय झाला होता. आज त्याच्या खोलीचे दार उघडे होते. ती आत गेली. ''अभिराम, पॅन्टच्या खिशात ही नोट होती आणि हे आकडे.'' त्याने चटकन तिच्या हाताकडे पाहिले. औदासीन्याखेरीज त्या नजरेत काही नव्हते. (शबरी, पृ. १७२, १७३) पण शबरी मात्र हे आकडे, वेणी नि रूमाल आपल्या घरातले नाहीत म्हणत संतापाने पेटून उठते. तिला दुखावले म्हणजे ती आपल्या मार्गातून आपण होऊन निघून जाईल असे त्याला वाटून तो सतत तिच्यावर घाव घालतो. पावलोपावली तिचा अपमान करतो. पत्नी म्हणून हव्या असणाऱ्या सर्व सुखांना तिला पारखी करतो. अभिरामच्या अशा वागण्याने दिवसेंदिवस त्यांच्या संबंधात दरी वाढत जाऊन संसारात वितृष्ट येते.

बाळूताईलाही या सर्वाचा सामना करावा लागलेला दिसतो. खुद्द बेडेकरांच्याच शब्दांत, ''.... रूप, तारूण्य, पैसा, किर्ती सगळी एका स्त्रीच्या ठायी एकवटली होती. याच्यावर लुब्ध झाली होती. कनक आणि कामिनी. एकेकाचाही मोह भल्याभल्यांना होलपटतो. हा तर दोन्ही पात्यांच्या कात्रीत सापडलेला !'' (एक झाड आणि दोन पक्षी, पृ. २३३) या संबंधामुळे बेडेकरांची बुध्दी पार बावचळून गेली. त्यांना स्वतःशी, इतरांशी नीट वागणे सांधेना नि तो सर्व राग आणि चिडचिड मग बाळूताईवर निघतांना दिसते.

## ➢ माझ्या चांगुलपणावर विश्वास ठेवू नकोस :-

नवऱ्याच्या तुटक व चमत्कारिक वागण्याने शबरीचे मन शतश: विदीर्ण होते. आपला नवरा दुसऱ्या स्त्रीत वाहवत जातोय हे लक्षात येऊनही केवळ मुलांकडे बघून नवऱ्याची ही प्रताडना ती सहन करते. अभिरामच्या सहानुभूतीचे झरे आटण्याचा प्रत्यय वारंवार येऊनही तिच्या मनाच्या कोपऱ्यात अभिरामबद्दल प्रेम आहे. म्हणूनच त्याच्या मनातली खळबळ लक्षात घेऊन 'तू इतका चांगला आहेस.' या तिच्या बोलण्यावर अभिराम उद्गारतो, ''माझ्या चांगुलपणावर फार विश्वास ठेवू नकोस.'' (शबरी, पृ. १४४) असे म्हणत शबरीला दूर लोटतो. शबरीला आपल्या भावविश्वातून त्याने पूर्णतः बाद केल्याचा हा पुरावा आहे.

विश्राम बेडेकर यांनीही असेच वाक्य बाळूताईना ऐकवल्याची नोंद 'एक झाड आणि दोन पक्षी' त सापडते. सौंदर्य, पैसा आणि यश हे सर्वच ज्या स्त्रीच्या ठायी एकवटले होते अशा एका सिनेनटीच्या मोहात बेडकर अडकल्याने घरातील मोकळ्या वागण्यात फरक पडतो. तरीही बाळूताई दुरावा कमी करण्यासाठी त्यांच्याशी प्रेमाने बोलण्याचा प्रयत्न करतात. पण स्वतःच्याच विचारात गुरफटून मुकाट बसलेले बेडेकर तिच्यापासून दूर खिडकीजवळ जात अगतिकपणे म्हणतात, ''बाळूताई, तू समजतेस तितका मी चांगला माणूस नाही. माझ्यावर फार विश्वास ठेवू नको !'' (एक झाड आणि दोन पक्षी, पृ. २३३) असल्या काही वाक्यांवरून बाळूताईचे लौकिक जीवन व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व यांची सांधेजोड लक्षात येते.

## ➢ प्राणीघटनांचे साधर्म्य :-

प्राणीजगत हा मानवी भावविश्वाचा जवळचा कोपरा. 'शबरी' आणि 'एक झाड आणि दोन पक्षी' या दोन्ही ग्रंथातून कुत्र्याचे प्रेम आणि त्याच्या ईमानदारीचे चित्रण आले आहे. अभिराम शबरीच्या घरी असलेल्या कुत्र्याचे बाळूताई-विश्राम बेडेकर यांच्या घरच्या कुत्र्याच्या वर्णनाशी साधर्म्य आहे. ''एकदम हॉर्न वाजल्याबरोबर कुत्रा एकदम उभा राहिला आणि 'भोः' करून आपल्या धन्याचे स्वागत करायला धावला - सुध्दा किती नाचणे ते ! किती बागडणे ! किती निरक्षर आवाज तो ! अभिरामने दारात पाऊल ठेवताच आपले पुढचे पाय त्याच्या छातीवर ठेवून त्याने अक्षरशः अभिरामचा चेहरा चाटायला सुरूवात केली. .........'' (शबरी, पृ. १४५) अभिराम आल्याच्या आनंदात तो बेभान होतो. अभिरामने थोपटताच पाय पुन्हा जमिनीवर टेकून त्याच्या भोवती तो नाचत राहतो. आपले प्रेम व्यक्त करण्यासाठी त्याच्या पायाशी वेटोळे करून बसतो.

तर दुसरीकडे बेडेकर सोलापूरला जेव्हा बाळूताईच्या बंगल्यावर पोहचतात तेव्हा बेडेकरांचे स्वागतही असेच होते. ''टांगा बंगल्यासमोर उभा राहिला. याने खाली उडी टाकली. लगेच रेक्सने बंगल्याच्या व्हरांड्यातून थेट याच्यावर त्वेषाने झेप घेतली. हा कोसळायचाच ! उजेड फक्त टांग्याच्या टिमटिमत्या दिव्यांचा रेक्सने पुढचे पाय याच्या जवळजवळ खांद्याशी आले. त्याचा जबडा याच्या गळ्याशी !...'' (एक झाड आणि दोन पक्षी, पृ. १५७) हे सर्व वर्णन बघता विभावरी बाईने प्रत्यक्ष हा प्रसंग अनुभवल्याची प्रचिती येते.

एकंदरीतच, या सर्व घटना - प्रसंगातून विभावरी शिरूरकर यांच्या लौकिक वाङ्मयीन जीवनाचा परस्परसंबंध व्यक्त होतो. तसेच 'शबरी' च्या रूपातून विभावरीचा जीवनसंघर्ष व तिची बंडखोरीही अधोरेखित होते.

## निष्कर्ष :-

१) 'शबरी' ही कादंबरी विभावरी शिरूरकर यांच्या लौकिक जीवनाचा वाङ्मयीन आविष्कार होय.

२) विश्राम बेडेकर यांच्या 'एक झाड आणि दोन पक्षी' या आत्मचरित्रातून विभावरीसंबंधात आलेल्या काही घटनाचे साधर्म्य 'शबरी' कादंबरीतील काही घटना प्रसंगाशी आहे.

३) लेखकाच्या वास्तव जीवनाचे अंश त्याच्या साहित्य कृतीतील पात्रांतून बिंबित होत असते.

४) दोन्ही ग्रंथातून नायिकांचा जीवनसंघर्ष मांडलेला दिसतो. जो बाळूताईच्या लौकिक जीवनाशी समांतर जाणारा आहे.

## संदर्भ :-

१) शिरूरकर, वि. (२००९). शबरी. पुणेः देशमुख आणि कंपनी.

२) बेडेकर, वि. (१९८६). एक झाड आणि दोन पक्षी. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.

३) निमदेव, मा. (२००२). स्त्रीमुक्तीचा आद्य हुंकार : मालतीबाई बेडेकर. नागपूर : ज्ञानेश प्रकाशन.

४) शिंदे उषाताई रावसाहेब :- विभावरी शिरूरकर / मालतीबाई बेडेकर यांचे वाङ्मय : एक अभ्यास.

5) http://localhost8080/Xmlul/handle

❖❖❖

# रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यांमधील भटक्या समाजाच्या व्यथा-वेदना

**प्रा. डॉ. नवनाथ अंगद शिंदे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे,
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ
ता.राहुरी, जि. अहमदनगर -४१३७११
9890777639

## गोषवारा (Abstract):

भटक्या-विमुक्तांच्या साहित्य लेखांमध्ये अनेकांचे साहित्य महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यापैकी रामचंद्र नलावडे यांचे साहित्य देखील महत्त्वपूर्ण ठरले आहे. कथा,व्यक्तीचित्र, आत्मकथन, अनुभव कथन, संशोधनपर ग्रंथ, या साहित्य प्रकाराप्रमाणेच रामचंद्र नलावडे यांनी कादंबरी या साहित्य प्रकारात देखील लिखाण केले आहे.रामचंद्र नलावडे यांचा जन्म भटक्या विमुक्त समाजातील वडार समाजात झाल्यामुळे भटक्या समाजाच्या व्यथा-वेदना काय असतात याचा त्यांना अगदी जवळून अनुभव आला.याचे चित्रण त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून केले आहे. तसेच रामचंद्र नलावडे महसूल खात्यात काम करत असताना प्रस्थापित समाजातील असणाऱ्या विविध समस्या व प्रश्न, प्रस्थापित समाजातील जातीयता, अंधश्रद्धा रूढी-परंपरा, स्त्रियांच्या व्यथा-वेदना याचा त्यांना अगदी जवळून अनुभव आला. तसेच महसूल यंत्रणेतील भ्रष्टाचार,राजकारण,प्रामाणिक व निस्वार्थीपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची होणारी कुचंबणा याचा देखील त्यांना अगदी जवळून अनुभव आला. या सर्वांचे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांमधून स्पष्ट होते. रामचंद्र नलावडे यांच्या आजपर्यंत लाडी, पातेरा प्रहार, चंदनवाडी, थैमान, कुरण, खोत, खाण, पीकपाणी, झुंबड अशा एकूण दहा कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत.

## बीजशब्द (Keywords) :

वडार, आत्मकथन, लाडी, पातेरा, प्रहार, चंदनवाडी, थैमान कुरण, खोत, खाण, पिकपाणी, झुंबड, कातकरी.

## प्रस्तावना:

मराठीतील एक साहित्यप्रकार म्हणून कादंबरी या साहित्य प्रकाराकडे पाहिले जाते. मराठीत अनेक लेखकांनी कादंबरी या साहित्य प्रकारात आपले साहित्य लेखन प्रकाशित केले आहे. रामचंद्र नलावडे यांचे साहित्य देखील कादंबरी या साहित्य प्रकारात प्रकाशित झालेले आहे. कादंबरी या साहित्य प्रकाराचे स्वरूप स्पष्ट करताना मराठीमध्ये लेखकानी कादंबरी संदर्भात अनेक व्याख्या केलेल्या आहे. कादंबरी संदर्भात माधव काशिनाथ देशपांडे म्हणतात. "जीवनाचे कलात्मक व विस्तृत चित्रण म्हणजे कादंबरी होय."१ एकूणच कादंबरी मधून मानवी जीवनाचा दीर्घपट गद्य भाषेतून मांडला जातो. रामचंद्र नलावडे

यांच्या कादंबऱ्यांमधून देखील भटक्या समाजजीवनाचे व या समाजातील व्यथा-वेदनांचे प्रस्थापित समाजातील विविध,प्रश्न,अडचणी प्रस्थापित समाजातील जातीयता, स्रीजीवन,अंधश्रद्धा राजकारण,शैक्षणिक स्थिती व महसूल यंत्रणेतील भ्रष्टाचार, राजकारण,प्रामाणिक व निस्वार्थपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची होणारी कुचंबणा विस्तृत स्वरूपात स्पष्ट होते .रामचंद्र नलावडे यांच्या आजपर्यंत लाडी, पातेरा प्रहार,चंदनवाडी, थैमान, कुरण, खोत, खाण, पीकपाणी झुंबड अशा एकूण दहा कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांतील भटक्या समाजाच्या व्यथा - वेदना पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

## विषय विवेचन :

वडार समाजातील जातीयता, व्यसनाधीनता, वडार समाजातील जातपंचायत, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा राजकीय पुढाऱ्यांकडून वडार समाजाची होणारी फसवणूक, प्रस्थापित समाजाकडून वडार समाजाला मिळणारी कमीपणाची व अपमानाची वागणूक, कंत्राटदाराकडून वडार समाजाचे होणारे शोषण, काम करूनही कामाचा योग्य मोबदला न मिळाल्यामुळे वडार समाजाची होणारी उपासमार तसेच अलीकडील काळात वडार समाजात शिक्षणाचा होत असलेला प्रसार व त्यामुळे वडार समाजात होत असलेले परिवर्तन या सर्वांचे चित्रण रामचंद्र नलावडे यांच्या कादंबऱ्यांमधून घडते.

**१. लाडी-** कातकरी समाजातील स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचारचे चित्रण लाडी या कादंबरीत स्पष्ट होते. कातकरी समाजातील स्त्रियांचे गावातील सरपंच व फॉरेस्ट अधिकाऱ्याकडून शारीरिक शोषण होत असे. मात्र या समाजातील स्त्रियांना न्याय मिळत नसे. कातकरी समाजातील स्त्री जीवनाचे हे वास्तव चित्रण लाडी या कादंबरीत स्पष्ट होते. तसेच कातकरी समाजातील स्त्रीच्या ठिकाणी कष्ट करण्याची असलेली प्रवृत्ती लाडी या कादंबरीत व्यक्त होते. लाडी या कादंबरीतील कातकरी समाजातील लाडीच्या ठिकाणी असलेली कष्ट करण्याची प्रवृत्ती स्पष्ट होते. कातकरी समाजात असलेली माणुसकीचे चित्रण लाडी या कादंबरीत स्पष्ट होते. गावातील सरपंचाने कातकरी समाजावर वेळोवेळी अन्याय केलेला असतो त्यांचा अपमान देखील केलेला असतो. कातकरी समाजाला वेळोवेळी त्रास दिलेला असतो. त्यामुळे कातकरी समाज गावातील सरपंचावर नाराज असतो. मात्र गावच्या देवीच्या यात्रेच्या वेळी सरपंचाच्या शरीराचे धड डुकरांनी जंगलात नेलेले असते. त्याचा शोध घेण्यासाठी आलेल्या गावातील नाऱ्या सुताराला कातकरी समाज सरपंचावरील आपला राग विसरून सरपंचाचे डुकरांनी जंगलात नेलेले धड शोधण्यासाठी मदत करतात. तेव्हा कातकरी समाजातील झिल्या आपल्या कातकरी समाजाला म्हणतो. "गड्यांनो आपुन रानात आलाव पण गावावर देवीचा कोप झाला. आपल्या गावाच्या सरपंचाला देवानं दरबारात बलवून घेतलय. लई वंगाळ झालं. धड डुकरानं जंगलात आणून टाकलय. आपून ते हुडकून देऊ चला. झालं गेलं गेलो मागचं काय मनात ठेवायचं नाही आपण गावकऱ्यांना मदत करूया."२ यासारख्या अनेक प्रसंगांमधून कातकरी समाजाच्या ठिकाणी असलेली माणुसकी लाडी कादंबरी स्पष्ट होते. तसेच सरकारी सुविधांमुळे कातकरी समाजात होत असलेला बदल, कातकरी समाजाला शिक्षणाचे महत्त्व न समजल्यामुळे या समाजात येणाऱ्या अडचणी, कातकरी समाजातील व्यसनाधीनता, अंधश्रद्धा रीतीरिवाज, रूढी, परंपरा, कातकरी समाजातील व्यथा-वेदना, प्रस्थापित समाजाकडून कातकरी समाजावर होत असलेला अन्याय व अपमान, राजकीय पुढाऱ्यांकडून कातकरी समाजाचा स्वतःच्या स्वार्थासाठी होणारा वापर, सर्वांचे चित्रण या कादंबरीत स्पष्ट होते एकूणच लाडी या कादंबरीतून कातकरी समाज जीवनाचे, कातकरी समाजातील व्यथा-वेदना व कातकरी समाजातील स्त्री जीवनाचे चित्रण घडते.

**२. पातेरा-** कुटुंबासाठी दिवस-रात्र कष्ट करणाऱ्या स्त्रीचे चित्रण पातेरा कादंबरीत पार्वती, शकुंतला या सारख्या विविध स्त्री व्यक्तिरेखामधून स्पष्ट होते. प्रस्थापित समाजात स्त्रीला मिळणारी कमीपणाची वागणूक, समाजातील अंधश्रद्धेचा स्त्रियांना सहन करावा लागणारा परिणाम याचे चित्रण पातेरा कादंबरीत येते. प्रत्येक अडचणींना व समस्यांना मोठ्या धैर्याने सामोरे जाणाऱ्या स्त्रीचे चित्रण शकुंतला या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून पातेरा कादंबरीत घडते. प्रस्थापित समाजातील स्त्रीच्या व्यथा-वेदनांचे तिच्यावर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराचे चित्रण पातेरा कादंबरीत येते. मुलीचे लग्न जमवताना मुलीच्या मताचा विचार न घेणे. तिच्या नवऱ्याविषयी व घरच्या एकूण परिस्थिती विषयी तिला खरे सांगितले जाईलच याची शाश्वती नसते. लग्न झाल्यावर काही स्त्रियांना मोठ्या प्रमाणात अन्याय व अत्याचार सहन करावा लागतो. हे वास्तव चित्रण पातेरा या कादंबरीत घडते. शकुंतला प्रमाणेच तिच्या बहिणीला सासरी अत्याचार सहन करावा लागतो. तसेच गाव पातळीवर असणाऱ्या प्रथा, नियमांचे चित्रण पातेरा कादंबरीत स्पष्ट होते. शकुंतला गावात असलेल्या प्रथा व नियमाचे वर्णन करताना म्हणते," देवळात घटस्थापना झाल्यावर गावात कोणी मासमच्छी खात नसत. पुरुष दारू पीत नसत.जो कोणी हा नियम पुढील त्याला गावसईच्या फंडात रुपये दोनशे एकावन दंड भरावा लागे. दंड भरला नाही तर ते घर वाळीत टाकलं जाई."३प्रस्थापित समाजात स्त्रीची होणारी फसवणूक कुटुंबात तिला मिळणारी कमीपणाची वागणूक, मुलींना त्यांच्या मनाप्रमाणे शिक्षण घेता न येणे, प्रस्थापित समाजातील जातीयता व अंधश्रद्धा, व्यसनाधीनता व त्याचा समाजावर व कुटुंबावर होणारा परिणाम याचे चित्रण पातेरा कादंबरी स्पष्ट होते.

**३. प्रहार-** वडार समाजात असलेली अंधश्रद्धा प्रहार कादंबरीत पुढील आशयातून व्यक्त होते. भीमा वडाराची देव-देवतावर खूप श्रद्धा असते. देव-देवतावर विश्वास देखील असतो. कारण आपला मुलगा आजारी पडल्यानंतर तो आपल्या बायकोला म्हणतो. " आपल्या भावकीला गोळा करून देव-देव एकदाचं उरकून टाकू. घरात बरकत नाही. कामात बरकत नाही. चार रोजात खडा मारल्यागत पोरगा बरा होईल. म्हसोबाचं पानीचं लई कडक हाय बघ."४ यासारख्या अनेक प्रसंगातून वडार समाजात असलेली अंधश्रद्धा प्रहार कादंबरीत व्यक्त होते. वडार समाजातील स्त्रियांच्या व्यथा-वेदना, त्यांच्यावर होणारा अन्याय व अत्याचार, वडार समाजातील स्त्रियांची कष्ट करण्याची प्रवृती,त्यांच्या ठिकाणी असलेली व्यसनाधीनता याचे चित्रण प्रहार कादंबरीत घडते. पूर्वी वडार समाजाचा मुख्य व्यवसाय दगड फोडण्याचा होता मात्र अलीकडे वडार समाजातील काही लोक आपला परंपरागत व्यवसाय सोडून इतर व्यवसायाकडे वळाले आहेत. वडार समाजातील हे बदलते वास्तव चित्रण प्रहार कादंबरीत व्यक्त होते. वडार समाजातील व्यंकट आपल्या वडिलांप्रमाणे दगड फोडण्याचा परंपरागत व्यवसाय न करता सभापती बाळासाहेब जगताप यांच्या मदतीने ठेकेदारीचा व्यवसाय करून या व्यवसायातून मोठ्या प्रमाणात पैसा कमवतो व आपल्या राहणीमानात देखील बदल करतो. त्याच्या विचारात देखील बदल घडतो.

**४. चंदनवाडी–** कोकणातील ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या ठिकाणी एका विशिष्ट जमातीकडे एका विशिष्ट भूमिकेतून पाहण्याची असलेली प्रवृत्ती चंदनवाडी या कादंबरीत पुढील आशयातून व्यक्त होते. चंदननगर बस स्थानकात असलेला बोरसे हवालदार या बसस्थानकामध्ये आश्रयासाठी आलेल्या लमान जातीच्या लोकांकडे एक चोर जमात म्हणून पाहतो. जर चोरी केली तर पहा असे त्यांना म्हणतो. तेव्हा लमान जातीतील शंकर त्या बोरसे हवालदाराला म्हणतो., "आमी गांडिव कापड आल्यापासून राबवून खाताव.चोरी करून जगायचं असतं म्हणजे एवढ्या लांब परमुलखात आम्ही कशाला व आलू अस्तू."५

कोकणात राहणाऱ्या लोकांच्या स्वभाव प्रवृत्तींचे त्यांच्या ठिकाणी असलेल्या जातीयतेचे, अंधश्रद्धेचे, व्यसनाधीनतेचे या सर्वांचा त्यांच्या कुटुंबावर होत असलेल्या परिणामाचे  चित्रण चंदनवाडी या कादंबरीतून घडते. कोकणातील ग्रामीण भागातील अतिदुर्गम भागात असलेली शिक्षणाची बिकट परिस्थिती व त्याचा तेथील मुलांच्या शिक्षणावर होणारा वाईट परिणाम याचे वास्तव चित्रण चंदनवाडी या कादंबरीत व्यक्त होते. प्रामाणिकपणे व निस्वार्थीपणे काम करणाऱ्या व जनतेच्या हिताचा विचार करणारा शासकीय कर्मचारी गावाचा कशा पद्धतीने कायापालट करू शकतो याचे वास्तव चित्रण चंदनवाडी या कादंबरीत स्पष्ट होते. क्षीरसागर तलाठी प्रामाणिकपणे व निस्वार्थीपणे चंदनवाडी या गावात काम करून गावातील निरक्षर लोकांना गावातील माने गुरुजी यांच्या सहकार्याने साक्षरतेचे वर्ग सुरू करून येथील लोकांना साक्षर करतो. त्यामुळे येथील लोकांना लिहिता वाजता येऊ लागते. त्यामुळे इतर लोकांकडून त्यांची होणारी फसवणूक कमी होते त्यामुळे सर्वजण क्षीरसागर तलाठ्याचे मनापासून आभार मानतात. क्षीरसागर तलाठी प्रामाणिकपणे व कोणतेही पैसे न घेता लोकांची शासकीय नियमात बसणारी कामे करून देत असे त्यामुळे गावातील लोक शिरसागर तलाठ्याचा मोठ्या प्रमाणात आदर करत असे व त्याच्या शब्दाला मान देखील देत असे.

**५. थैमान**- महसूल खात्यामध्ये काम करणारे सर्वच अधिकारी भ्रष्ट प्रवृत्तीचे नसतात. काही जण आपल्या स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अति पर्जन्य वृष्टीच्या काळातही जनतेला मदत करण्यासाठी स्वतःचा जीव देखील धोक्यात घालून जनतेला मदत करत असतात. याचा प्रत्यय रामचंद्र नलावडे यांच्या थैमान या कादंबरीत येतो अति पर्जन्य वृष्टीमुळे मुंबई-गोवा महामार्गावर दरड कोसळलेली असते. त्यामुळे दोन्ही बाजूचा मार्ग बंद पडलेला असतो. हे जेव्हा प्रांत अधिकारी चव्हाण यांना समजते तेव्हा ते लवकर त्या घटनास्थळी जातात. त्या ठिकाणी त्यांना मुंबईला जाऊन इंजिनिअरिंगची प्रवेश परीक्षा देणारे विद्यार्थी येऊन भेटतात. त्यांना महामार्गावर कोसळलेल्या दरडींमुळे मुंबईला जाता येत नसते. तेव्हा विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन प्रांत अधिकारी मनोज चव्हाण स्वतः विद्यार्थ्यांबरोबर मातीचे ढिगारे पार करून पलीकडे जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना मुंबईला जाऊन इंजिनीअरिंगची परीक्षा देण्याचा मार्ग मोकळा होतो. त्यावेळी विद्यार्थ्यांना खूप आनंद होतो व प्रांत मनोज चव्हाण यांचा अभिमान देखील वाटतो तेव्हा मिलिंद हा विद्यार्थी प्रांत मनोज यांचे आभार व्यक्त करताना म्हणतो."साहेब हा तुमचा मोठेपणा आहे तुमच्या ठिकाणी आणखी एखादा असता तर त्यांनी आम्हाला एवढी मदत केली नसती आम्हाला त्यांनी प्रवेश परीक्षेपासून वंचित ठेवलं असतं. साहेब तुमचे आभार कसे मानावे हे कळत नाही तुम्ही आम्हाला आज जी मदत केली ती आम्ही आयुष्यभर विसरू शकणार नाही."६ कोकणातील माणसाच्या ठिकाणी असलेले माणुसकी, नैसर्गिक संकटाच्या काळातही काही लोकांच्या ठिकाणी असलेली स्वार्थी प्रवृत्ती, अतिवृष्टीच्या वेळी जनतेला मदत करताना महसूल यंत्रणेतील कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामध्ये होणारा संघर्ष व महसूल यंत्रणेतील कर्मचारी व अधिकारी आणि समाजातील लोक यांमध्ये निर्माण होणारा संघर्ष, राजकीय पुढारी व महसूल यंत्रणेतील कर्मचारी व अधिकारी यांच्यामध्ये निर्माण होणारा संघर्ष याचे चित्रण थैमान कादंबरीत घडते. तसेच निसर्गाच्या रौद्र रूपाचे व त्यामुळे होणाऱ्या नुकसानीचे चित्रण थैमान कादंबरी स्पष्ट होते.

**६. कुरण**- महसूल खात्यात काम करणाऱ्या भ्रष्ट तहसीलदाराचे चित्रण कुरण या कादंबरीत घडते. तहसीलदार बाजीराव डोईफोडे भ्रष्टाचाराच्या विरोधात बोलत असतो. मात्र स्वतः मोठ्या प्रमाणात

भ्रष्टाचार करत असतो. या वेळी तो भ्रष्ट कर्मचाऱ्यांना हाताशी धरून मोठ्या प्रमाणात पैसे कमावत असतो. प्रामाणिकपणे आणि निस्वार्थी पणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तो नेहमी त्रास देत असे. त्यांच्याशी व्यवस्थित बोलत देखील नसे. त्याचा वेळोवेळी अपमान देखील करत असे. भ्रष्ट कर्मचाऱ्याला मात्र स्वतःच्या जवळ करत असे व त्याच्या मदतीने मोठ्या प्रमाणात पैसे कमवत असे. ज्या लोकांकडून त्यांचे काम करण्यासाठी पैसे मिळत असे त्या लोकांची तो ते काम शासकीय नियमात नसले तरी लवकर मंजूर करून देत असे. लोकांकडून त्यांच्या कामाचे पैसे घेतल्याशिवाय त्यांचे काम तो लवकर मंजूर करून देत नसे. एकूणच बाजीराव डोईफोडे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून पैसा कमावून गर्भश्रीमंत होतो. महसूल खात्यात चांगल्या ठिकाणी बदली घडून आणण्यासाठी, पगार वाढवण्यासाठी रजा मिळवण्यासाठी वरिष्ठांना पैशाची पाकिटे द्यावी लागतात याचे चित्रण या कादंबरीत पुढील असे यातून स्पष्ट होते. तहसीलदार बाजीराव डोईफोडे नायब तहसीलदार अनुजा देशमुख मॅडमला म्हणतात. "तुमचा येथील प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर चांगलं पोस्टिंग मिळवण्यासाठी तुम्हाला आयुक्तांना पैसे द्यावे लागतील त्याशिवाय तुम्हाला चांगली पोस्टिंग मिळणार नाही".७ तसेच महसूल यंत्रणेतील काही कर्मचाऱ्यांच्या ठिकाणी असलेली स्रीलंपट प्रवृतीचे व त्याचे महिला कर्मचाऱ्यांना होणाऱ्या त्रासाचे चित्रण कुरण कादंबरी घडते. प्रामाणिक व निस्वार्थीपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला महसूल यंत्रणेत होणारा त्रास त्यांना वेळोवेळी राजकीय पुढाऱ्यांकडून व महसूल यंत्रणेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून होणारा त्रास याचे चित्रण कूरण कादंबरीत घडते. तसेच भ्रष्ट अधिकाऱ्याला त्यांनी केलेल्या कृत्याची कधी ना कधी तरी परत फेड करावीच लागते हा आशय कुरण कादंबरीतून स्पष्ट होतो.

**७. खोत-** समाजात खोत पद्धत अस्तित्वात असताना खोतांच्या जीवन पद्धतींचे व खोतांच्या हाताखाली काम करणाऱ्या कुळांच्या जीवन पद्धतीचे चित्रण खोत या कादंबरीत स्पष्ट होते. खोत पद्धत अस्तित्वात असताना खोत आपल्या शेतात कधी काम करत नसत. तर खोतांच्या शेतात कुळ काम करत असे. खोताच्या नियमाप्रमाणे गावातील लोक वागत असे. खोताने दिलेला निर्णय सर्व कुळांना मान्य असे. खोत सरकारी कामासाठी आपल्याकडे एखादी व्यक्ती लिखाण करण्यासाठी ठेवत असे. काही खोत कुळांना अडचणीच्या वेळी त्यांना मदत देखील करत असे. तर काही खोत कुळांना त्रास देखील देत असे.तसेच गावातील न्याय-निवाडा सोडविण्याचे काम देखील खोत करत असत. धार्मिक कार्याच्या ठिकाणी देखील खोतांना मान होता. एकूणच गावातील लोक खोतांच्या नियमाप्रमाणे वागत असे. गावात सरकारी अधिकारी येणार म्हणून गावातील प्रत्येक व्यक्ती गंगाधर खोताने आपल्यावर टाकलेली जबाबदारी अतिशय प्रामाणिकपणे पार पाडत असतो. गावातील सुडक्या महार हातात डफ आणि घुंगराची काठी घेऊन गावात मामलेदार येणार म्हणून संपूर्ण गावाला सांगतो. तसेच गावातील सर्व महार गावची साफसफाई करण्यासाठी लागतात. हे पुढील आशयातून व्यक्त होते. "सुडक्या महार गावात दवंडी देऊन थकून भागून त्याच्या घरी गेला. तेव्हा सूर्य क्षितिजावर टेकला होता. गाव झाडून स्वच्छ करण्यासाठी संपूर्ण महारवाडा कामाला लागला होता. गावात एखादा अमलदार यायचा असेल तर तो यायच्या आधी संपूर्ण गाव स्वच्छ करण्याची त्यांची जबाबदारी होती."७ तसेच सरकारने कुळ कायदा लागू केल्यानंतर खोतांच्या बदलत्या जीवन पद्धतीचे चित्रण खोत कादंबरीत स्पष्ट होते. कुळ कायदा लागू झाल्यानंतर खोतांच्या अनेक जमिनी कुळांच्या नावे झाल्या. खोतांना आपल्या जमिनी वाचवण्यासाठी सरकारी कार्यालयात जावे लागले. वकिलांच्या माध्यमातून आपल्या जमिनी वाचवण्यासाठी प्रयत्न करावे लागले. गावातील लोक खोतांच्या शब्दाला मान देखील देत नसत. खोत पद्धत अस्तित्वात असताना खोत

आपल्या शेतात काम करत नसे. कुळ कायदा लागू झाल्यानंतर मात्र त्यांना आपल्या शेतात काम करण्याची वेळ आली. भ्रष्ट कर्मचारी व अधिकारी खोतांच्या जमिनी कुळांच्या नावे करण्यासाठी कुळांच्याकडून मोठ्या प्रमाणात पैशाची मागणी करू व कुळ देखील खोतांच्या जमीन आपल्या नावे करून घेण्यासाठी भ्रष्ट अधिकाऱ्यांना पैसे देऊ लागले हे वास्तव चित्रण खोत कादंबरीत स्पष्ट होते.

**८. खाण-** अलीकडील काळात वडार समाजातील तरुण वडार समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी व वडार समाजाला संघटित करण्यासाठी वेगवेगळे मेळावे आयोजित करत आहे. याचे वास्तव चित्रण खाण या कादंबरीतून घडते. वडार समाजाचा मेळावा भरल्यानंतर वडार समाजाला जागृत करताना वडार समाजातील संभाजी विटकर वडार समाजाला मेळाव्या म्हणतो. "आपल्या समाजातील मुलांना शिक्षणापासून वंचित राहावं लागतं आहे. सरकारने मोठा गाजावाजा करून वसतीशाळा, आश्रमशाळा काढल्या आहेत. तर त्याचा फायदा आपल्या समाजातील मुलांच्याच्या परास त्या आश्रमशाळा चालविणाऱ्या संस्था चालकांना अधिक झालाय. सोयी-सवलतीमुळे आपल्या समाजातील फकस्त मूठभर लोकांचं तेवढं भलं झालं हाय. हे आपल्याला नाकबूल करता येनार न्हाय अजून आपला नव्वद टक्के आपला वडार समाज अंधारात चाचपडत हाय."९ वडार समाजात असलेली व्यसनाधीनता व या व्यसनाधीनतेचा वडार समाजावर होणारा परिणाम याचे चित्रण खाण कादंबरीत स्पष्ट होते. तसेच वडार समाजाला प्रामाणिकपणे काम करूनही कंत्राटदाराकडून कामाचा योग्य तो मोबदला न मिळाल्यामुळे वडार समाजाला उपाशीपोटी काम करावे लागते. याचे चित्रण खाण कादंबरीत स्पष्ट होते. तसेच वडार समाजातील अंधश्रद्धा, रितीरिवाज, जात-पंचायत वडार समाजाला प्रस्थापित समाजाकडून मिळणारी अपमानाची वागणूक, प्रस्थापित समाजाकडून वडार समाजावर होणारा अन्याय याचे वास्तव चित्रण खाण कादंबरीत स्पष्ट होते. वडार समाजातील स्त्रियांच्या ठिकाणी असलेला अंधश्रद्धेचा प्रभाव त्यांच्या ठिकाणी कष्ट करण्याची असलेली प्रवृत्ती याचे चित्रण खाण कादंबरी स्पष्ट होते. राजकीय पुढाऱ्यांनी वडार समाजाच्या पारंपरिक व्यवसायात शिरकाव केल्यामुळे वडार समाजाचा पारंपरिक व्यवसाय मोडकळीस आला आहे. अलीकडील काळात वडार समाजाला शिक्षणाचे महत्व समजल्यामुळे या समाजातील मुलं परिस्थितीशी संघर्ष करून अनेक अडचणींना सामोरे जाऊन शिक्षण घेत आहे. याचे वास्तव चित्रण या कादंबरीत स्पष्ट होते.

**९. पीकपाणी-** महसूल खात्यात प्रामाणिकपणे व जनतेकडून त्यांच्या कामाचे पैसे न घेता त्यांचे काम करून देणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना समाजातून प्रेम आदर व जिव्हाळा मिळत असतो. याचे वास्तव चित्रण पीकपाणी या कादंबरीत स्पष्ट होते. विजय पवार तलाठी हा सुरुवातीला दहागाव या ठिकाणी तलाठी म्हणून काम करत असतो. त्या ठिकाणी तो प्रामाणिकपणे व जनतेकडून कोणत्याही प्रकारे पैसे न घेता शासकीय नियमात बसणारी त्यांची कामे करून देत असे. त्यामुळे तेथील लोक विजय पवार तलाठ्याचा खूप आदर करत असत. जेव्हा विजय पवार या तलाठ्याची बदली भातगाव या ठिकाणी होते. तेव्हा भातगाव येथील लोक विजय पवार तलाठ्याचा सत्कार जाहीर करतात. जेव्हा विजय पवार तलाठ्याची भातगाव या ठिकाणी बदली झाल्यानंतर तो मोटघर या आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या गावी वार्षिक दस्त जमा करण्यास सगुणाच्या घरी जातो. मात्र सगुणा दस्त न देता आपला नवरा तुकारामाला तलाठ्याबद्दल भडकून देते. त्यावेळी तुकाराम विजय तलाठ्याची पोलीस स्टेशनमध्ये कंप्लेंट करायला जातो. मात्र त्या ठिकाणी गेल्यावर त्याला आपल्या बायकोच्या भावाकडून विजय पवार तलाठी किती

चांगला आहे हे समजते. त्यावेळी तो विजय पवार तलाठ्यावर करणारी पोलीस केस न करता विजय पवार तलाठ्याला भेट घेऊन त्याला म्हणतो." माझी सासरवाडी दहागाव हाय तिथं त्याच्या आधी तुम्ही तलाठी म्हणून काम करीत होता. मी त्याला तुमचं नाव सांगितल्यावर तुमची लई कौतुक करू लागला. त्याच्या जमिनीची खाते फोड करायची होती तेव्हा तुम्ही त्याच्याकडून एक नवा पैसा दिकून न घेता त्याचं काम करून दिलाव. गोरगरिबांची तुम्ही तिथं काम केलीत. असं मला त्याच्याकडून कळलं तुमची बदली झाली तेव्हा सोळा गावाने एकत्र जमून शंकराच्या देवळात तुमचा जाहीर सत्कार करण्यात आला."१० महसूल खात्यात भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट प्रवृत्तीचे चित्रण पिकपाणी कादंबरीत स्पष्ट होते. महसूल खात्यात प्रामाणिकपणे व निस्वार्थपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला भ्रष्ट वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून व राजकीय पुढाऱ्यांकडून वेळोवेळी अन्याय अपमान सहन करावा लागतो. वेळप्रसंगी अनेक वाईट अनुभव व प्रसंग यांना देखील सामोरे जावे लागते. याचे वास्तव चित्रण पिक पाहणे कादंबरीत स्पष्ट होते.

**१०. झुंबड-** ग्रामपंचायतीमध्ये होत असलेला भ्रष्टाचार व राजकारण यामध्ये प्रामाणिकपणे व निस्वार्थीपणे काम करणाऱ्या ग्रामसेविकेची होणारी कुचंबणा झुंबड या कादंबरीत व्यक्त होते. कल्पना साळवी कोकणातील जांभुळगाव या ठिकाणी ग्रामसेविका म्हणून काम करत असते. ग्रामपंचायतीमध्ये चांगल्या प्रकारे काम करून गावाचा विकास करण्याचे ध्येय कल्पना साळवी ठरवते. मात्र गावातील सरपंच ग्रामपंचायतीमधील सदस्य हे ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व राजकारण करत असतात. त्यांना गावच्या विकासापेक्षा स्वतःचा फायदा कसा होईल याचा ते अधिक विचार करत असत. गावचे सरपंच ग्रामपंचायतीमधील कामाच्या खोट्या पावत्या तयार करून शासनाकडून पैसे घेत असत. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कल्पना साळवीला मात्र हे आवडत नसे. तेव्हा गावचे सरपंच बापू तिला म्हणतात मी असताना तुला कोणीही काहीही करू शकत नाही. ग्रामपंचायतीमधील शिपाई बाळू देखील काही वेळेस लोकांनी दिलेले घरपट्टीचे व पाणीपट्टीचे पैसे ग्रामपंचायतींमध्ये जमा न करता स्वतः साठी वापरत असे. कल्पना साळवी प्रामाणिकपणे व निस्वार्थीपणे काम करत असल्यामुळे तिला तिच्या कामात कोणी सहसा मदत करत नसे. तेव्हा आपल्या मनातील व्यथा व्यक्त करताना कल्पना साळवी म्हणते. " ही माणसं अशी का बरं वागतात मी एवढं सरळ वागत असताना ती मला सहकार्य का बर करत नाहीत. जनसेवा करायची म्हणून किती मी या गावी उत्साहाने आले होते. माझ्या उत्साहाला या ठिकाणी सुरु तर लागणार नाही ना."११ महसूल यंत्रणेतील काही कर्मचारी व अधिकारी यांच्या ठिकाणी असलेली भ्रष्ट प्रवृत्ती व स्त्रीलंपट प्रवृत्तीचे चित्रण झुंबड या कादंबरीतून घडते. गावातील काही स्रीलंपट प्रवृत्तीच्या लोकांमुळे स्री कर्मचाऱ्याला काम करत असताना सहन करावा लागणारा त्रास याचे वास्तव चित्रण झुंबड कादंबरी स्पष्ट होते. तसेच लोकांची घरपट्टी व पाणीपट्टी वेळेवर न भरण्याची प्रवृत्ती, ग्रामपंचायतीमधील विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी सतत प्रयत्नशील असण्याची प्रवृत्ती, शासकीय योजनेतून मिळणाऱ्या पैशाचा शासकीय कामासाठी वापर न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापर करणे, अडचणीच्या वेळी एखाद्याला मदत व सहकार्य करणे यासारख्या प्रवृत्तीचे चित्रण झुंबड या कादंबरी स्पष्ट होते.

## निष्कर्ष (Conclusions) -

१. भटक्या समाजाला प्रस्थापित समाजव्यवस्थेत माणूस म्हणून जगता येणे.
२. भटक्या समाजाला स्वतःच्या हक्काची जमीन व घर मिळणे.

**३.** प्रस्थापित समाजातील जातीयता अंधश्रद्धा भ्रष्टाचार कमी होणे.

**४.** भटक्या समाजातील व प्रस्थापित समाजातील स्त्री जीवन चित्रित करणे.

**५.** महसूल खात्यात प्रामाणिक व निस्वार्थपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला सहन कराव्या लागणाऱ्या अन्याय व अपमानाचे चित्रण करणे.

**६.** महसूल यंत्रणेतील राजकारण व भ्रष्टाचार याचे चित्रण करणे.

## संदर्भ (References) :

१. देशपांडे काशिनाथ, 'साहित्य-साधना', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च १९६१, पृ. क्र. १५३
२. नलावडे रामचंद्र, 'लाडी', सुविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी २००७, पृ. क्र. ६४
३. नलावडे रामचंद्र, 'पातेरा', योगिता प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर२००७, पृ. क्र.५२
४. नलावडे रामचंद्र, 'प्रहार', पायल पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००९, , पृ. क्र.७
५. नलावडे रामचंद्र, 'चंदनवाडी', अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, मार्च २०१०, पृ. क्र.११
६. नलावडे रामचंद्र, 'थैमान', राजेंद्र प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती, मार्च २०१२, पृ. क्र.७८
७. नलावडे रामचंद्र, 'कुरण', लोकवांग्मयगृह मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर २०१३, पृ. क्र.१११
८. नलावडे रामचंद्र, 'खोत' दिलीपराज प्रकाशन प्रा.लि, पुणे, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २०१४, पृ. क्र.२६
९. नलावडे रामचंद्र' 'खाण', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०१७, पृ. क्र.२७१
१०. नलावडे रामचंद्र, 'पीकपाणी', दिलीपराज प्रकाशन प्रा. लि, पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर २०१७, पृ. क्र.८३
११. नलावडे रामचंद्र, 'झुंबड', दिलीपराज प्रकाशन प्रा. लि, पुणे, प्रथमावृत्ती जून २०१७, पृ. क्र.५३

❖❖❖

# महाराष्ट्र धर्माचे उद्गाते संत शिरोमणी नामदेव ॥

**डॉ राजेश मिरगे**
(मराठी विभाग)
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती
9404710558

महाराष्ट्राच्या इतिहासात संतांची परंपरा आणि त्यांचा भागवत संप्रदाय यांना महत्त्वाचे स्थान आहे. ज्ञानेश्वरापासून तुकारामा पर्यंत म्हणजे 13 ते 17 व्या शतकापर्यंत ही परंपरा विशेष उज्वलतेने झळकते. महाराष्ट्राच्या इतिहासाला वळण लावण्याचे कार्य संत मंडळींनी केले हा सिद्धांत प्रथम न्यायमूर्ती रानडे यांनी मांडला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्य स्थापनेची पार्श्वभूमी मराठी संतांनी उभारली हे त्यांचे प्रतिपादन महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रीयन संतांच्या कार्याचा विचार करताना ऐतिहासिक कार्यकारण परंपरेची दृष्टी आपण ठेवली पाहिजे. संतांच्या भागवत संप्रदायाचा प्रसार महाराष्ट्रातून चोहीकडे झालेला आहे .महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आणि झोपड्या झोपड्या मधून संतांची कवने आजही दुमदुमत आहे .जेथे जेथे म्हणून मराठी भाषा बोलली जाते तेथे तेथे संतांचे अभंग अद्यापही ऐकू येतात. दूर दूरच्या प्रदेशातून पंढरपूरला दिंड्यांची आणि वारकऱ्यांची गर्दी हल्लीही लोटत असते. सहा -सात शतके लोटली तरी संतांच्या संप्रदायाची बहुजन समाजावरील पकड कमी झालेली नाही. समाजाच्या सर्व थरात माळकरी आढळून येतात. शतकानूशतके टिकणारा हा वारकरी संप्रदायाचा ओघ पाहिला म्हणजे या संप्रदायाच्या स्थापनेच्या पाठीमागे जबरदस्त प्रेरणास्त्रोत आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. संतांच्या भागवत धर्मातील अद्वैत आणि एकेश्वर वाद यातही संतकालीन सामाजिक जगण्याचे प्रतिबिंब उमटलेआहे. विस्कळीत आणि पांगलेल्या समाजात ऐक्य आणि एकसंघ समाज रचनेची गरज निर्माण यातून होते .ही गरज एकेश्वर वादातून व्यक्त होत असते. रानटी आचार ,विचार आणि उपासनेचे मार्ग जाऊन त्या ऐवजी एकच देवता, सोपा धर्म मोक्ष साधनाची साधे तत्वज्ञान आणि कडवी निष्ठा आहे. संतांच्या एकेश्वर भक्तीचे अधिष्ठान पंढरीचा विठ्ठल होते. या विठ्ठलाची उपासना करताना तो आपला जिवलग सखा आहे, हीच भावना संतांनी ठेवली आहे. ईश्वरा हा सर्व भूतमात्रांच्या ठाई आहे हे तत्त्व संताने स्वीकारल्यामुळे त्यांनी भक्तिमध्ये ईश्वराच्या बरोबरीचे पदच गाठले आहे. या सर्व संतांमध्ये अग्रगण्य भक्त शिरोमणी संत नामदेव आहेत. नामदेवांच्या कार्यावरून ते संतांमध्ये केंद्रस्थानी आहे. सर्व संतात त्यांचे कर्तृत्व फार मोठे आहे. अटकेपार भगवा झेंडा फडकवणारे संत नामदेव हे अद्वितीय आहेत.

संत नामदेवांचा जन्म २६ ऑक्टो. १२७०चा म्हणजे ते शिवाजी महाराजांच्या जवळपास 400 वर्ष आधीचे, तेव्हा उत्तरेत मुस्लिम सत्ता स्थिर झाली होती. धर्माच्या नावाने हिंदू आणि मुस्लिम दोन्ही धर्मातील सनातनी बहुसंख्य भारतीयांना दुय्यम दर्जाचे जगणे भाग पडत होते. त्याविरुद्ध संत परंपरेने मोठी क्रांती घडवली. फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरातल्या या क्रांतीचे नेतृत्व नामदेवांनी केले. संत नामदेव जगणं सोपं करणारा महामानव, महाद्दष्टा, महानामा जगाला प्रकाश देणारी आपली सविस्तर परंपरा नामदेवांनी उजळली.

नामदेव यांनी महाराष्ट्रात सर्व जातीच्या संतांचे मंडळ उभं केलं होतं. संत चोखामेळा, जनाबाई या शुद्रातील शूद्र समाजातल्या संतांना मोठं केलं होतं, त्यांना अभंग लिहायला प्रवृत्त केलं होतं, तेच कार्य त्यांनी पंजाबात केलं. आधार नसलेल्या एका विधवा स्त्रीचा मुलगा बोहरादास त्यांचा पहिला पट्ट शिष्य झाला. सुतार काम करणारा जल्लो ,महारोग झालेला खत्री समाजाचा केशो ज्याची त्यांनी सेवा करून बरा केला. रामानंद, कबीर, सैन, विलोचन, जयदेव, सधना, परमानंद, सूरदास, मीराबाई, नरसी मेहता या समाज घडवणाऱ्या उत्तर भारतातल्या संतांना नामदेवापासूनच प्रेरणा मिळाली. महत्त्वाचं म्हणजे या संतांना येणाऱ्या स्थानिक भाषेतूनच बिंनदिकतपणे लिहिण्याची प्रेरणा ही नामदेवांनी दिली, शिवाय स्वतः हिंदीतून रचना लिहून तिथल्या भाषेशी नाळ जोडली. कृष्ण आणि त्यांच्या संगड्यांच्या रूपाने नामदेवांनी मराठीत पहिल्यांदाच सुंदर बालसाहित्याची निर्मिती केली. महाराष्ट्र धर्म समर्थ रामदासांनी सांगितला असं मांडल्या जातं .भालचंद्र नेमाडे आणि कॉम्रेड शरद पाटील हे ज्येष्ठ विचारवंत महाराष्ट्र धर्माचा पाया परदेशातून आलेल्या मलिकांबर या निजामी सरदारांना घातला असं सांगतात पण समतेचा, ऐक्याचा पाया महाराष्ट्रात भक्कम करून उत्तर भारतातही अस्मितेचा, बंधुभावाचा झेंडा नेणारे नामदेवच महाराष्ट्र धर्माचे खरे उद्गगाते आहेत. संत नामदेव केवळ महाराष्ट्र पुरुष नव्हे तर "राष्ट्रपुरुष" आहेत. परकीय आक्रमण थोपवण्यासाठी उत्तर भारतात जाऊन हिंदू-मुस्लिम ऐक्य घडवून आणणारे ऐतिहासिक पुरुष आहेत. लढवय्या शीख धर्माचा पाया घालणारे प्रेरणा स्त्रोत आहेत.संत नामदेव पंजाबात एकंदर अठरा वर्षे राहिले व तेथे त्यांचा शिष्य परिवार पसरला होता अशी माहिती संत साहित्याचे अभ्यासक ल .रा .पांगारकर यांनी उजेडात आणली आहे. पंजाबात गुरुदासपूर जिल्ह्यात घुमान येथे नामदेवांची समाधी आहे इतर प्रांतात जे भक्ती भावाने उठाव झाले त्याला प्रेरणा देण्याचं कार्य नामदेव आणि संतयात्रा यांनी केले. मराठी संत मंडळाचे तत्व व्यक्ती संत ज्ञानदेव होते तरी खरे प्रणेते संत नामदेवच आहेत. नामदेव आणि मराठी संत मंडळीचा मुकुटमणी तसेच महाराष्ट्रातील आद्यकीर्तनकार आणि आद्य अभंगकार अशी मान्यता सिद्ध पावली आहे.

संत नामदेव हे सर्वमान्य सर्वांचे नेते म्हणून तत्कालीन काळात आदराचे स्थान मिळू शकले याचे कारण त्यांनी निरनिराळ्या जाती-जमातीमधील कृतिशील माणसांचा मोठा जथा वारकरी चळवळीच्या झेंड्याखाली एकत्र आणला. नामदेवाने विशद केलेल्या भक्ती पंथाची संरचना व्यापक असल्याने चौदाव्या शतकाच्या अखेरीस उत्तरेत त्याचा झपाट्याने प्रसार झाला आणि कोणताही प्रखर संघर्ष येऊ न देता निरनिराळे प्रादेशिक पंचभेद सहजपणे एका विशाल भक्तीच्या प्रवाहात मिसळून उत्तरेत अभू तपूर्व सर्जनशील भक्ती चळवळ पसरत गेली. उत्तरेत भक्तिमार्गाचे प्रसार कार्य करणाऱ्यांचा नामदेवांचा जवळचा संबंध आला होता. हिंदू आणि मुस्लिम या दोहातील इतिहास प्रसिद्ध धर्मांना दाखवून देऊन त्यांनी दोन्ही धर्मातील सीमारेषा मिटवून टाकल्या, यातूनच त्यांनी मुसलमान आणि ब्राह्मण ह्या आपल्या दोन मोठ्या शत्रू वर उघड उघड टीका करण्याचे खास तंत्र ही विकसित केले यामुळेच नामदेव आपल्या काळातील पद दलितांचे सर्वात लोकप्रिय असे धार्मिक -वांग्मयीन नेते बनले .हिंदू आणि इस्लाम या दोन्ही मधील कट्टर धर्मश्रद्धेला छेदून जाणारे हे नेतृत्व होते .आपल्या एका हिंदी पदात नामदेव म्हणतात,-

हिंदू अंधा तुरक काना!दो हाते ज्ञानी शाना
हिंदू पूजे देहुरा ।मुसलमान मस्जिद
नामे सोई सेना। जह देहुरां
मसीती ना।

त्यांनी केलेली मुसलमानी अत्याचाराची मीमांसाही एकदम वेगळ्या प्रकारची आहे.

देव दगडाचा भक्त हा मायेचा ।संदेह दोघांचा फिरे कैसा ।

ऐसे देव तेही फोडीले तुरकी ।घातले उदकी बोभातील ।

एवढा हिंदू मुसलमान धर्माच्या सरहद्दीचा व्यापक आधार घेऊन नामदेवांनी आपल्या पंथाचा प्रसार केला. शीख धर्मगुरूंनी आपल्या पवित्र ग्रंथसाहेबात नामदेवांच्या अभंगाचा समावेश केला. ब्राह्मणी अरेरावीपणा आणि मुसलमानी धर्म वेडेपणा या दोघांनाही आव्हान देण्याची नामदेवांची पद्धत अतिशय सूक्ष्म आणि नम्र क्षमायाचक पण प्रतिस्पर्धीला जिंकून घेणारी अशी होती. आपल्या चळवळीत प्रत्येक प्रसंगी साध्य कोणते आणि साधन कोणते यासंबंधी नामदेवांचे भान नेहमीच जागृत असे. त्यांनी बंड केले ते गाजावाजा न करता शांतपणे पण ते अतिशय परिणामकारक ठरले .अस्पृश्यांना आपल्या पंथात आश्रय देणारे संत नामदेव हे पहिले संत होते. विविध जातीमध्ये सुमारे 24 कवी त्यांच्या बैठकीतील ज्ञात आहेत. सोयराबाई यांची बहीण निर्मलाबाई, सोयराबाईचा भाऊ बंका आणि मुलगा कर्ममेळा या चोखामेळाच्या कुटुंबाला साक्षर करण्याची श्रेय नामदेवांचेच आहे. या सर्व कुटुंबाने आपल्यावर लादण्यात आलेल्या अमानवी परिस्थितीचे वर्णन आपल्या अभंगातून केले आहे .उपासमार, अवहेलना असहायता या सर्व गोष्टी सहन करीत सामाजिक समानतेचा मोकळा श्वास घेण्यासाठी हा संघर्ष चालला होता .बहिष्कृत अस्पृश्यावर भक्तीपंथाचा उदारमतवादी प्रभाव किती पडला होता हे प्रस्तुत संघर्षावरून दिसते .सामाजिक समतेचा पुरस्काराची प्रेरणा घेऊनच सुमारे तीन दशकानंतर संत तुकारामांनी सनातनी व्यवस्थेच्या विरोधात बंड केले म्हणून ते निर्भयपणे म्हणतात

महारासी शिवे ।कोणे ब्राह्मण तो नव्हे ।

तया प्रायचित्त काही ।देहत्याग करिता नाही ॥

नामदेवांनी प्रथमतः वापरलेल्या लोकशिक्षण आणि आत्मविष्कार या प्रभावी साधनांचा विकास वारकरी चळवळीच्या इतिहासात अशा रीतीने घडून आला. कोणताही दृष्टिकोनातून पाहिले तरी नामदेवांनी केलेले हे बंड अपरिमित महत्वाचे ठरते .प्रभावी ठरतील अशा अविष्कार तंत्राचा वापर करून त्यांनी हिंदीत जाती-जातींचे नरकप्राय भेदभाव पुसून टाकले आणि अखंड मानवतेचा आदर्श वारकऱ्यांसमोर ठेवले

हातात वीणा आणि चिपळ्या घेऊन फिरतानाचे नामदेवांचे चित्र आपण पाहतो पण या शांत दिसणाऱ्या चेहऱ्यावर एक बंडखोर दडला आहे .नामदेवांच्या साक्षात भगवंतविरुद्धच्या सततच्या बंडाचं कारण तरी काय असावे ?ईश्वरावर अंधश्रद्धा असणाऱ्यांची लुबाडनुक आणि फसवणूक पंढरपुरातलेच बडवे करत असल्याचे त्यांनी पाहिले होते अशा अंधश्रद्धेतून जनतेला दूर करून त्यांना कर्मयोगाच्या मार्गाला लावण्याचा अंतस्थ हेतू नामदेवांच्या रचनांमधील बंडखोरीत असावा. त्यांनी तर साक्षात केशवालाच लबाड म्हटले आहे

साचपण ब्रीद सोडवीन तुझ्या। आता केशीराजा पण हाची॥

लबाड तू देवा लबाड तू देवा। लबाड तू देवा दावा आम्हा॥

काय मूर्खपणे सांगशील गोष्टी। थोरपणे ओठी पुरे आता।

नामा म्हणे काय खवडीसीआम्हा। लाज नाही तुम्हा कवणे वीसी ॥

अशा बंडखोरीच्या रचना करताना नामदेव भक्तांना एक महत्त्वाची शिकवण देतात, ती कर्मयोगाची. भगवान श्रीकृष्णाने गीतेत वीर अर्जुनाला कर्मयोगाची शिकवण दिली तीच पुढे लोकमान्य टिळकांना

भावली आणि त्यांनी गीता रहस्य म्हणजेच कर्मयोग शास्त्र विशद केले. नामदेव ज्ञानेश्वरांच्या संगतीत राहिले त्यांनी नेमके हेच सांगितले

मीच माझा देव मीच माझा भक्त। मी माझा कृतर्थ सहज असे॥
बंध आणि मोक्ष मायेची कल्पना। पडली होती मना भ्रांती कैसी॥

हे मंथन करीत नामदेव बंडखोर शस्त्र खाली टाकतो आणि तो विठ्ठलाच्या चरणी लीन होतो नामदेवांच्या अपूर्व अशा भक्तीची ही माहिती आहे.

नामदेवांचे हिंदी काव्य फार महत्त्वाचे आहे.त्यातूनच उत्तरेत निर्गुण संतां परंपरा निर्माण झाली. या संतांच्या मांदियाळीने विशुद्ध चैतन्यतत्वाचे चिंतन बाह्यचाराचा निषेध, गुरुभक्ती सहसाधना संतसंग ,जातीपातीचे विचार न करता माणूसधर्माचा उद्घोष असे अतिशय मुलगामी स्वरूपाचे चिंतन मांडले. नामदेवांचा खरा चमत्कार त्यांची देशयात्रा आहे .त्यांनी महाराष्ट्राच्या आणि देशाच्याही लोकभाषेतून जनजागरण केले, उदात्त विचारांची मांदियाळीच देशात तयार व्हावी म्हणून आंतरभारतीचे कार्य सर्वप्रथम केले हा खरा नामदेवांचा चमत्कार आहे. आज महाराष्ट्रभर त्यांनाच अधिक मान्यता आहे हे विसरून चालणार नाही .नामदेव हिंदी वाङ्मयाच्या इतिहासात अमर झाले, उत्तरेला ज्ञान असलेले पहिले तत्वचिंतक जनकवी नामदेव हेच होते त्यांच्या हिंदीत आजच्या खडीबोली राष्ट्रभाषेचे पूर्व रूप आपल्याला पाहता येते. भारतात गावोगावी पदयात्रा करीत नामदेवांनी ही संत परंपरा सशक्त केली, बलवान केली. सर्वसामान्य माणसात आत्मविश्वास निर्माण केला. भक्तीच्या नावाखाली दुराचार केला जात होता त्याला शह दिला." नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी|| असे म्हणत भारतभर संचार करणारे नामदेव उदात्त, मंगल प्रगट करणारे वैष्णवांचे कुळ पुरुष ठरतात.

संत नामदेव हे भावकवी होते, धर्म सुधारक होते, पुरोगामी विचारवंत उदार ,धर्मनेता, वारकरी संप्रदायाची ध्वजा घेतलेले प्रचारक होतेच पण ते डोळस कृतिशील पर्यटकही होते. त्यांनी तहानलेल्यांसाठी तळी बांधली . वनराया तयार केल्या, व्याधीग्रस्तांसाठी आरोग्यधाम उभी केली. 700 वर्षांपूर्वी विशाल दूरदृष्टी असलेले एक बहुआयामी पुरुष या माती जन्माला आला हेच आम्हा मराठी माणसांचे अहोभाग्य होय असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## संदर्भ ग्रंथ

१) महाराष्ट्रीय संत मंडळांचे ऐतिहासिक कार्य - बा. र. सुंठणकर, लोक वाड्.मय गृह आवृत्ती तिसरी डिसेंबर 2008

२) महानामा - संपादक- सचिन परब, श्रीरंग गायकवाड, मनोविकास प्रकाशन प्रथम आवृत्ती एक जानेवारी 2023

3) संत नामदेवांचा भक्तीयोग - डॉ. शंकर अभ्यंकर, आदित्य प्रतिष्ठान, आवृत्ती पाचवी 2001

४) प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप - ह. श्री. शेनोलीकर

५) आद्य मराठी चरित्रकार संत नामदेव - डॉ. सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे 2012

❖❖❖

# कोंडी : राजकारणात गुरफटलेल्या ग्रामवासीयांचे चित्रण

**डॉ. सुभाष ज्ञानबा गव्हाणे**

शिप्रमं तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली, जि. बुलढाणा

Email - gawhanesubhash121@gmail.com मो.नं. ९८५०३१४८८५

## प्रास्ताविक

जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाची ज्या काळात चाहूल लागली त्या काळात म्हणजेच १९९० च्या दशकामध्ये श्री रवींद्र शोभणे यांचे लेखन बहराला येत होते. कादंबरी, कथासंग्रह,समीक्षा, ललित लेख संग्रह, संपादने इत्यादी प्रकारचे लेखन करणाऱ्या रवींद्र शोभणे यांची पहिली कादंबरी 'प्रवाह' १९८३ मध्ये प्रकाशित झाली. त्यानंतर 'रक्तधुव', 'कोंडी', 'चिरेबंद', 'सव्वीस दिवस', 'उत्तरायण', 'पडघम', 'पांढर' इत्यादी कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या.याच काळात त्यांचे पाच कथासंग्रह व काही समीक्षा ग्रंथही प्रकाशित झालेत. मात्र 'कोंडी' या ग्रामीण कादंबरीने रवींद्र शोभणे यांची साहित्य जगतामध्ये विशेष ओळख निर्माण केली. खरसोली,नरखेड परिसरात लेखकाचे बालपण गेले व शिक्षणही त्याच भागात झाले. त्यामुळे या भागातील बदलत्या काळानुसार झालेल्या बदलांचे,लोकांच्या बदलत चाललेल्या वृत्ती-प्रवृत्तींचे अत्यंत सूक्ष्म निरीक्षण अगदी बालपणापासूनच झालेले होते. त्याची 'कोंडी' ही कादंबरी १९९२ मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीमध्ये खरसोली, नरखेड हा संपूर्ण प्रदेश तेथील तत्कालीन बदलत्या वर्तमानासह प्रतिबिंबित झाला आहे. जागतिकीकरणाचे वारे ग्रामीण भागापर्यंत वाहू लागले व त्याचा परिणाम म्हणजे गावागावांमध्ये आधुनिक बदल दिसू लागलेत. गावातील राजकारण,गावातील लोक इत्यादींमध्ये प्रचंड परिवर्तन बघायला मिळत होते. यामध्ये सामान्य माणूस मात्र भरडल्या जाऊ लागला होता. श्रीमंत अधिकाधिक बलवान होऊ लागलेत. गावा- गावातले हे वर्तमान वास्तव 'कोंडी'मध्ये दिसून येते. 'कोंडी'तील अनेक घटना, पात्र लेखकांनी प्रत्यक्षानुभूतीतून उभे केले आहेत. खरसोली गावात चोऱ्या करणाऱ्या अत्यंत चपळ आणि रेड्यासारखी शक्ती असलेल्या विश्वनाथ या व्यक्तीचा खून होतो. या प्रत्यक्ष घडलेल्या घटनेतून त्यांना प्रस्तुत कादंबरीचे बीज सापडले. 'माझ्या गावात ही अशी घटना घडली होती. असा भीषण खून मी पहिल्यांदाच गावात झाल्याचं ऐकत होतो क्षणभर वाटलं गाव असं वेगळ्या अर्थाने वाईट वळणानं बदलत आहे... आणि हा क्षणच 'कोंडी'साठी निमित्त मात्र ठरला.[1] अशाप्रकारे प्रत्यक्ष वर्तमान या कादंबरीत चित्रित झाले आहे.

## कोंडी कादंबरीतील विषय:-

'कोंडी' कादंबरीमध्ये मुख्यतः जे विषय चर्चिले गेलेले आहेत ते म्हणजे प्रास्ताविकामध्ये नमूद केल्यानुसार तत्कालीन वर्तमान बदल त्यामध्ये गावागावांमध्ये बदललेले राजकारण, राजकारणामध्ये शिरलेले गलिच्छपण तसेच बदलत्या काळामध्ये शेतमजुरांची होणारी कुचंबना, कृषी व्यवस्थेतील इतर बदल इत्यादी विषय आलेले आहेत.'कोंडी' कादंबरी म्हणजे मोलमजुरी करणाऱ्या गणपत आणि कौशीची कथा आहे.

पिढ्यान पिढ्या कष्ट उपसूनही मजुराचा मुलगा मजूरच होतो हे वास्तव 'कोंडी'तून पुढे येते. तसेच मजुराच्या जीवनात एखादी दुर्घटना घडल्यास त्याचा कुणी वाली राहत नाही.त्याच्या संसाराची आबाळ होते. ज्यांच्याकडे आयुष्यभर कष्ट उपसले ते सुद्धा मदतीसाठी तयार होत नाहीत आणि त्यामुळे मजुरांचे दुःख अधिक गडद होत जाते. या प्रचंड आर्थिक अडचणींचे परिणाम मजुरांच्या पुढच्या पिढ्यांनाही भोगावे लागतात त्यांचे योग्य शिक्षण होत नाही त्यामुळे ते वाममार्गाला लागतात व त्यांच्याही जीवनाची शोकांतिका होते. 'कोंडी' मध्ये दुसरा आणि अत्यंत महत्त्वपूर्ण विषय येतो तो म्हणजे गावातील राजकारणाचा. गावातील ग्रामपंचायतच्या निवडणुकीचा. गावच्या गटातटाच्या राजकारणात सर्वसामान्य गोरगरिबांची कशी कोंडी होते, तसेच कामधंदे सोडून अख्ख गाव कसे राजकारणात रंगून जाते त्याचेही वास्तव चित्र प्रस्तुत कादंबरीतून उभे राहिले आहे. यासोबतच पेहरावतील, लोकांच्या वृत्ती प्रवृत्तीतील झालेले बदल, गावात चालणाऱ्या हातभट्ट्या, बलुतेदारीचा ऱ्हास, आधुनिक शेतीचे प्रयोग इत्यादी विषय मुख्य विषयासोबत लेखकांनी प्रस्तुत कादंबरीतून उभे केले आहेत.

## गलिच्छ राजकारणात गुरफटलेल्या ग्रामवासियांचे चित्रण

स्वातंत्र्योत्तर काळात देशात लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आली. त्यामुळे सत्तेची सूत्रे सर्वसामान्यांच्या हातात येतील, सर्व पातळ्यांवर सर्वसामान्यांची सत्ता असेल असे स्वप्नवत बदल अनेकांनी बघितले. पंचायत राज अस्तित्वात आले. जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, तालुका पातळीवर पंचायत समिती, तर गाव पातळीवर ग्रामपंचायत अस्तित्वात आल्या. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर एका विशिष्ट गटाचे वर्चस्व निर्माण झालेले बघायला मिळू लागले. या संस्थांच्या निवडणुका दिवसेंदिवस अत्यंत चुरशीच्या व्हायला लागल्या. निवडणुकांमध्ये प्रचंड पैशांचा वापर होऊ लागला. त्यामुळे समाजातील श्रीमंतांचे अशा निवडणुकांमध्ये वर्चस्व बघायला मिळाले. गावातल्या ग्रामपंचायत च्या निवडणुका तर प्रचंड चुरशीच्या आणि गावागावांमध्ये कलह निर्माण करणाऱ्या ठरू लागल्या. जस जसा काळ पुढे जात होता ही चुरस अधिकाधिक वाढत गेली. गावांमध्ये जे प्रस्थापित होते त्यांच्याच हातात गावच्या सत्तेच्या चाव्या होत्या. निवडणुकांच्या काळामध्ये त्यामुळे प्रत्येक गावात दोन-दोन, तीन-तीन गट पडलेले दिसू लागले. त्यातून हेवे-दावे निर्माण झाले. दिवसेंदिवस राजकारणात रस घेणाऱ्यांची संख्या ही वाढतच गेलेली आहे. गावागावातील प्रस्थापित राजकारण्यांनी गावातील सामान्यांचा, तरुणांचा स्वतःच्या स्वार्थासाठी वापर केलेला दिसतो. हे सर्व करीत असताना अर्थातच सत्ता आपल्या हातात राहावी यासाठी निवडणूक काळात पैसा, दारू, गुंडगिरी इत्यादींचा वापर करून काही प्रलोभनणे या मंडळींनी ग्रामवासियांना दाखविलेली दिसतात. त्यामुळे निवडणुका ह्या अतिखर्चिक झाल्यामुळे राजकारणात श्रीमंतांचाच पगडा बघायला मिळू लागला. सामान्य माणूस फक्त मतदाता राहिला.

रवींद्र शोभणे यांच्या 'कोंडी'मध्ये या अशा राजकारणाचे चित्रण त्यांनी केले आहे. खरसोली या गावात शामराव पाटील आणि रामदास पाटील हे प्रत्येक निवडणुकीत सरपंच पदाचे उमेदवार असतात. अख्या खरसोली गावाची या दोन गटात विभागणी झालेली आहे. प्रत्येक निवडणुकीत गावात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण होते. हेवेदावे उभे राहतात. गावाचे विद्यमान सरपंच रामदास पाटील आहेत. कादंबरीमध्ये एका दशकाचा कालखंड असल्यामुळे पुढेही ग्रामपंचायतच्या दोन निवडणुका होतात. प्रत्येक निवडणुकीत हा असाच सामना बघायला मिळतो. दोघेही पाटील एकाच समाजाचे असले तरी राजकारणात ते एकमेकांचे शत्रू आहेत. प्रस्थापित व्यवस्थेचे प्रतिनिधित्व ते करतात.'शामराव पाटील आणि रामदास पाटील हे परस्परांचे

शत्रू असले तरी एकाच वर्गाचे प्रतिनिधी आहेत. ही प्रस्थापित व्यवस्था ज्याला आपण गावगाड्यांची व्यवस्था म्हणू ती आहे. म्हणून शामराव पाटील गणपतशी बोलताना गावगाड्याचा उल्लेख करतो तर वसंतांशी बोलताना रामदास पाटीलही तेच सांगतो. गावगाड्याला सांभाळून घ्यावे लागते असे सांगतो. म्हणजे सत्तेसाठी परस्पर विरोधी राजकारण करणारे असले तरी शेवटी ते हितसंबंधांच्या पातळीवर, गावगाड्याच्या पातळीवर एकच आहेत.[2]

अशाप्रकारे सत्ता कोणाचीही असली तरी गाव गाड्यावर प्रभुत्व या वर्गाचेच असायचे. शामराव पाटील आणि रामदास पाटील हे दोघेही गावातील श्रीमंत जमीनदार आहेत. त्याचप्रमाणे मध्ययुगीन सरंजामी मूल्य अंगी बाळगून ते गावगाड्यावर वर्चस्व ठेवू इच्छितात. त्यामुळे लोकशाही प्रस्थापित होऊनही त्यांची मग्रुरी जात नाही. लोकशाही व्यवस्था ते सरंजामी मनोवृत्तीतून स्वतःसाठी राबवू पाहतात. मग त्यासाठी निवडणूक काळात गुंडांची मदत घेतली जाते. गणपतचा मुलगा वसंता व्यायाम करून पहिलवान म्हणून गावात प्रसिद्ध होतो. गावातील मारवाड्याला चाकूने जखमी केल्यापासून गावात त्याची पैलवान, गुंड म्हणून दहशत बसते. वसंताच्या या दहशतीचा फायदा ग्रामपंचायतच्या निवडणुकीमध्ये घेता येईल म्हणून रामदास पाटील त्याला जवळ करतो. कारण वसंताचा गावामध्ये चांगलाच दरारा निर्माण झालेला असतो. त्याला शह देण्यासाठी शामराव पाटील नागपूरहून बादशहा नावाचा गुंड बोलावतो. पण वसंता त्याच्यावर भारी पडतो. मुळात वसंता तसा संवेदनशील आहे. अन्यायाविरुद्ध लढणारा नव्या युगातला तरुण आहे. पण त्याला योग्य दिशा सापडत नाही. रामदास पाटलाने त्याचा उपयोग राजकारणासाठी करून घेतला आणि वसंतानेही नाईलाजाने म्हणून तो करू दिला. पण त्यामुळे वसंताचे आयुष्य उध्वस्त झाले. त्याचा परिणाम त्याच्या बहिणीला निर्मलाला सुद्धा भोगावा लागला. तिचा भाऊ गुंड आहे म्हणून अनेकदा तिचे लग्न मोडले. महाराष्ट्रातील राजकारणामध्ये राजकीय मंडळींनी वसंता सारख्या हजारो ग्रामीण तरुणांचा आपल्या स्वार्थासाठी असाच वापर केलेला आहे आणि तो आजही होत आहे. वसंताचे आयुष्य जसे उध्वस्त झाले तसेच अनेक तरुण या राजकारणा पायी वापरल्या गेल्याचे नव्वदीच्या काळातले व जे आजचे ही वास्तव आहे ते रवींद्र शोभणे यांनी 'कोंडी' मधून मांडले आहे. 'कोंडी' मधीलअशा राजकारणाबद्दलचा नागनाथ कोत्तापल्ले यांचा अभिप्राय सार्थ वाटतो.ते म्हणतात 'या लोकशाहीच्या निमित्ताने येणाऱ्या निवडणुका, दारू आणि पैशांचा वापर, गुंडांचा वापर, बसचे गावात येणे, हातभट्ट्यांचा उदय यासारखे घटकही येतात. एकंदरीत सरंजामदारांच्या मुठीत गुदमरणारी लोकशाही लेखक ध्वनीत करीत जातो.[3]

ग्रामपंचायत च्या निवडणूक काळात लोक आपले शेतीवाडीचे कामधंदे सोडून राजकारणात, त्यातील हेव्यादाव्यात रंगून जातात. फोडाफोडीचे राजकारण गावात चालते. वसंता हा रामदास पाटलाचा माणूस म्हणून वावरतो. पण श्याम पाटील त्याला आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न करतात. 'तुला पाहिजे ते मिळेल फक्त तू माझ्या बाजूने ये'असा निरोप त्याला पाठविले जातो. मात्र ते शक्य होत नाही. असे फोडाफोडींचे प्रयोग इतरांवरही निवडणूक काळात होतात. त्यामुळे संपूर्ण गाव ढवळून निघतो. एका पार्टीने फुकट सिनेमा आणला म्हणून दुसरी पार्टी सुद्धा लोकांसाठी फुकट सिनेमा आणते. सिनेमा सुरू झाला व गाणे लागले की नाचणे, शिट्या मारणे इत्यादी गोंधळ चालतो. लाऊडस्पीकर वरून अर्ध्या रात्रीपर्यंत उमेदवारांचा प्रचार चालतो. घराघरांच्या भिंती प्रचाराने रंगवल्या जातात. मुक्याचे ठिकाणी मोठमोठे बोर्ड लावले जातात. त्या बोर्डवर कोणी शेंगोळे फेकून मारल्यास उगीचच वाद निर्माण होतात. हॉटेलमध्ये मतदारांना खुश करण्यासाठी प्रचंड गर्दी असते. अशाप्रकारे खरसोली गावातली माणसं आपले नित्याचे कामधंदे सोडून सिनेमा, हॉटेल, चर्चा, भांडणं, प्रचार यामध्ये वेळ खर्ची घालत होती. यामुळे अगोदरच आर्थिक

बेताची परिस्थिती असलेल्या कुटुंबांवर, मजुरांवर याचा विपरीत परिणाम होत होता. निवडणूक काळात गावातील अशा वातावरणामुळे नित्यकर्माकडे म्हणजे कृषी व्यवस्थेकडे दुर्लक्ष झालेले बघायला मिळते. यथा राजा तथा प्रजा या न्यायाने गावातील पुढाऱ्यांमधील स्वार्थी वृत्ती संपूर्ण समाजामध्येच पसरत गेलेली दिसते. जेवतो राजकारण्यांप्रमाणे पैशाच्या मागे लागलेला बघायला मिळतो. आदमी मजूरही कमी श्रमात जास्त मोबदला मागायला लागलेले दिसतात.

## निष्कर्ष

'कोंडी' कादंबरी मध्ये अशाप्रकारे गावागावांमध्ये सर्वत्र राजकारण आणि त्यातले हेवेदावे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचलेले दिसतात.आज नवनवीन पक्ष स्थापन होत आहेत व गावागावात पक्ष शाखा सुरू केल्या जात आहेत. गावातील नवतरुण यांच्याकडे काही पदे देऊन त्यांना पक्षाशी जोडल्या जात आहे. प्रत्येक नेता आपली ताकद अशा पद्धतीने गावागावातील तरुणांना आपल्याकडे वळवून घेऊन वाढवत आहे. राजकारणा पाई गावागावात गटातटाचे राजकारण सर्वत्र पसरलेले आहे. गुन्यागोविंदाने नांदणारे गावातील लोक राजकारणापायी एकमेकांचे शत्रू होऊन बसले आहेत. गावातील राजकारणात प्रसंगी धाकदपटशा,पैसा इत्यादींचा वापर होत आहे. त्यामुळे गावातील वातावरण या अशा राजकारणामुळे प्रचंड ढवळून निघालेले आहे पूर्वीसारखी आपुलकी गावातील लोकांमध्ये राहिलेली नाही.लोक आपले नित्याचे काम धंदे सोडून राजकारणात दिवसेंदिवस अधिकाधिक रस घेत आहेत. सर्व सामान्यांचे यामुळे मनोरंजन जरी होत असले मात्र त्यांचे नुकसान अपरिमित होत आहे. राजकारणी मात्र स्वतःचा स्वार्थ साधत आहेत. राजकारणामध्ये पैशांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागल्यामुळे सर्वसामान्य माणूस निवडणुकांमध्ये उभाही राहू शकत नाही. त्याला प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळू शकत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील वास्तव राजकारणाचे वास्तव चित्रण कोंडी कादंबरी मधून रवींद्र शोभणे यांनी केले आहे.

## संदर्भ ग्रंथ

१) शोभणे रवींद्र, 'कोंडी', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक २७९, पृष्ठ १२६.

२) कोत्तापल्ले नागनाथ, 'कोंडी'-प्रस्तावना, देशमुख आणि कंपनी, प्रा.लि. पुणे, पृष्ठ ११

३) तत्रैव, पृष्ठ १५.

❖❖❖

# संत जनाबाईंच्या अभंगांतून व्यक्त होणारे स्त्रीमन

**प्रा.डॉ. सविता माधवराव पवार**
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर
9011579077

**प्रस्तावना :**

तेराव्या शतकामध्ये वारकरी संप्रदायातील संत कवींनी रचलेल्या अभंगांच्या माध्यमातून विठ्ठल भक्तीला बहर आला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेवांपासून संत तुकारामांपर्यंत अनेक संत कवींनी आपल्या अभंगाद्वारे आत्माविष्कार घडविला. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या अभंगाच्या रूपाने इवलेसे रोप लावले आणि पुढे संत तुकारामांनी अभंग निर्मितीत कळस गाठला. संत कवींच्या अभंगातून विठ्ठल भक्तीचे जसे दर्शन घडते, त्याचबरोबर तत्कालीन समाजव्यवस्था, सामाजिक विषमता, व्यक्तीची अगतिकता, परंपरागत व्यवसाय याचेही दर्शन घडते. संत चोखोबा, सोयराबाई, संत कान्होपात्रा संत जनाबाई यांच्या अभंगांद्वारे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील श्रेष्ठ कनिष्ठता लक्षात येते. स्त्री जाणिवांचा आविष्कार आपल्याला संत जनाबाई, संत कान्होपात्रा यांच्या अभंगातून घडताना दिसतो. लौकिक जीवनात निराधार असलेल्या जनाबाईला संत नामदेवांच्या घरी आसरा मिळाला. पुढे संत नामदेवांच्या प्रभावातून अभंग निर्मितीकडे आणि अध्यात्माकडे वळलेल्या संत जनाबाईंचा अध्यात्मप्रवास आणि विठ्ठलभक्तीचा प्रत्यय त्यांच्या अभंगाद्वारे येतो. स्वतःला 'नामयाची दासी' म्हणून धन्यता मानणाऱ्या जनाबाईंच्या मनाचा प्रवास, एक स्त्री म्हणून त्यांचा मनोधर्म याचे प्रकटन त्यांच्या अभंगाद्वारा होते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संत जनाबाईंच्या अभंगांमधून व्यक्त होणाऱ्या स्त्रीमनाचा अभ्यास मांडला आहे.

**स्त्रीजन्म म्हणवूनी न व्हावे उदास :**

संत जनाबाईंचे अभंग त्यांच्या स्त्रीमनाची जाणीव आपल्याला सतत करून देतात. संत जनाबाई यांच्या समकालीन संत मुक्ताबाई यांनी ऐहिक जीवनच नाकारले. त्यामुळे त्या अनुषंगाने येणारे अनुभवविश्व त्यांच्या अभंगात पाहायला मिळत नाही. अर्थातच त्यामुळे एका स्त्रीमनाचे दर्शन त्यांच्या अभंगांमधून घडत नाही. परंतु जनाबाईंचे अभंग अनुभवताना मात्र त्यांच्या स्त्रीमनाची सतत साक्ष पटत राहते. एका स्त्रीने रचलेल्या अभंगातून तिचे स्त्रीमन अधोरेखित तर होणारच आहे परंतु त्या अनुभवांशी असलेली प्रामाणिकता, एकनिष्ठता याचा स्पर्श संत जनाबाईंच्या अभंगाद्वारे आपल्या मनाला होत राहतो. जनाबाईंच्या अभंगांचा अभ्यास करताना जाणवणारी महत्त्वाची गोष्ट अशी की, त्यांना आपल्या स्त्रीत्वाचा अजिबात विसर पडत नाही. संत जनाबाईंना एक दासी म्हणून जगणे वाट्याला आले. एक स्त्री म्हणून जगताना आणि त्यातही एक दासी म्हणून जगताना जनाबाई दुःखी कष्टी होताना दिसत नाहीत.

"स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास| साधुसंता ऐसे केले जनी
संतांचे घरची दासी मी अंकिली| विठोबाने दिली प्रेमकळा
विदुर सात्विक माझिये कुळीचा | अंगीकार त्याचा केला देवे
न विचारिता कुळ गणिका उद्धरिली | नामे सरती केली तिही लोकी
ऋषींची कुळे उद्धारिली जेणे| स्वर्गावरी तेने वस्ती केली

नामयाची जनी भक्तीते सादर| माझे ते साचार विटेवरी"

या अभंगाद्वारे त्याचा प्रत्यय आपल्याला येतो. संतजनांच्या सहवासामुळे दुःखावर, प्राप्त परिस्थितीवर मात करण्याचे सामर्थ्य जनाबाईकडे आहे. त्यामुळे स्त्री जन्म मिळाला म्हणून उदास होऊ नये असा उपदेश जनाबाई करतात. दासी म्हणून जगावे लागत असले तरी विठ्ठलाची आपल्यावर कृपा आहे याचे समाधान त्यांना आहे. आपल्या वाट्याला आलेल्या उपेक्षित जीवनावर संत सहवास आणि विठ्ठलभक्तीतून त्या मात करतात असे त्यांच्या या अभंगाद्वारे सूचित होते. आपले स्त्रीपण आणि दासीपण त्यांनी नीट समजून घेतले आहे. समाजातील आपल्या स्थानाविषयी त्यांना जाणीव असल्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक अनुभूतींना वास्तवाचा स्पर्श झालेला आहे. त्यांच्या अभंगातून व्यक्त होणाऱ्या अनुभूती या डोळस वाटतात. त्यामुळे त्यांच्या अभंगांचा वेगळेपणा जसा जाणवतो त्याचबरोबर प्रौढ व स्वच्छ दृष्टी सुद्धा जाणवते.

## कौटुंबिक अनुभूती घेणारे स्त्रीमन:

जनाबाई आणि त्यांच्या समकालीन संत मुक्ताबाई यांचा विचार करता त्या दोघींची जडणघडण ही मूलतः वेगळी आहे. प्रथमदर्शनी जनाबाई ज्ञानदृष्ट्या मुक्ताबाईच्या तुलनेने काहीशा खुजा वाटत असल्या तरी प्रत्यक्षात जनाबाईंच्या अभंगाच्या अभ्यासकाला त्यासंबंधी वेगळाच अनुभव येतो आणि ज्ञानी असणे व ज्ञानाचा अनुभव घेणे यात जेवढे अंतर असणे शक्य तेवढे ते कमी अधिक प्रमाणात मुक्ताबाई आणि जनाबाई यांच्या अभंगवाणीत आढळते. मुक्ताबाईला लाभलेले अध्यात्मज्ञान हे काहीसे कुंतीला अकालीच झालेल्या पुत्रलाभाप्रमाणे आहे. मुक्ताबाईंच्या प्रपंचासंबंधीच्या भूमिकेत व वृत्तीत तटस्थपणा कोरडेपणा आढळतो तो त्यामुळेच होय'१ जनाबाईंच्या वाट्याला कमी वयातच अनाथपण आले. संत नामदेवांच्या परिवारात त्यांनी आपले जीवन घालवले. या परिवारात वावरताना त्यांचे स्थान हे दासीचेच राहिले आहे. त्यांना स्वतःचा प्रपंच नव्हता पण संत नामदेवांच्या प्रपंचालाच त्यांनी आपला प्रपंच मानला. या परिवाराची सुखदुःखे स्वतःची मानली. एवढेच नाही तर ही सुखदुःखे त्यांनी समरसून उपभोगली, त्यामुळे जनाबाईंचे अनुभव विश्व हे समृद्ध बनले आहे. त्यांच्या अनुभूती ह्या खास त्यांच्या आहेत. त्यांचा स्वतःचा प्रपंच नसला तरी त्यांच्या प्रापंचिक अनुभूती आणि त्यांचे कष्टमय जीवन वाचकाला अंतर्मुख करते. मुक्ताबाईंच्या अभंगातून त्यांचे अध्यात्मज्ञान प्रगटत राहते. जनाबाईसारख्या कौटुंबिक जाणीवा आणि प्रपंचाविषयी ओढ त्यांच्या अभंगांमध्ये दिसत नाही. त्यांचे व्यक्त होणे हे एका ज्ञानवतीसारखे आहे; तर जनाबाईंच्या काव्यातून एक नाजूक, हळवे, प्रेमळ आणि त्याचबरोबर प्रौढ स्त्रीमन व्यक्त होत राहते.

## नामयाची दासी जनी :

जनाबाई स्वतःचा नामोल्लेख नामयाची दासी जनी असा करताना दिसतात. नामदेवाची दासी म्हणताना त्यात त्यांना कमीपणा वाटत नाही. परिस्थितीतून आलेले हे दासीपण त्यांनी स्वीकारले आहे. विठ्ठलाविषयी, नामदेवाविषयी आणि संतजनां विषयी नितांत श्रद्धा त्यांच्या मनात आहे. जनाबाईला नामदेवांसारखा गुरु लाभला आहे .ही त्यांच्या अध्यात्मिक जीवनाच्या दृष्टीने जशी अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे, त्याचबरोबर त्यांच्या काव्यजीवनाच्या दृष्टीने सुद्धा अतिशय पोषक अशी बाब आहे. नामदेवाच्या परिवाराचे दास्यत्व स्वीकारून त्यांच्या घरची धुणीभांडी करताना त्या कुटुंबाचा त्या एक भाग होतात. नामदेवाची विठ्ठलभक्ती पाहून जनाबाईंनाही विठ्ठलभक्तीचे वेड लागते. सुरुवातीला नामदेवांचे बोट पकडून त्यांचा हा प्रवास सुरू होतो. नामदेवाच्या आश्रयाने विठ्ठलाचा परिचय होतो. नंतर मात्र जनाबाई स्वतंत्रपणे विठ्ठलभक्तीची अनुभूती घेताना दिसतात. या दृष्टीने पाहता जनाबाई नामदेवांच्या शिष्या आहेत आणि अशा शिष्या ज्या पुढे अध्यात्मजीवनात

स्वतःचे अनुभव घेताना दिसतात. तसेच त्यांचे काव्यही स्वयं अनुभवाने फुललेले दिसते. संत ज्ञानेश्वरांचा ज्ञानानुभवही त्यांनी स्वीकारलेला दिसतो. त्यांच्यावर झालेल्या ज्ञानानुभूतींच्या संस्कारामुळे जनाबाईंचे मन अधिक अंतर्मुख झालेले दिसते. त्यांचा आत्मविश्वास जसा वाढत जातो तसे नामदेवांचे दास्य स्वीकारणे म्हणजे त्यांच्या काव्याचेही दास्य स्वीकारणे नव्हे याची जाणीव त्यांना होत गेलेली आहे. यापुढेही 'दळीता कांडीता..' अभंग रचना करताना त्यांच्या काव्याचा विषय हा विठ्ठलभक्तीच राहिलेला दिसतो. हळूहळू नामदेवाच्या काव्यविषयक प्रभावातून त्या बाहेर आल्या असल्या तरी नामदेवाचे दास्यत्व मात्र त्या विसरत नाहीत. विठ्ठलाशी, त्याच्या भक्तीशी आणि काव्याशी जे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले ते नामदेवांमुळेच होय याची जाणीव असल्यामुळे जनाबाईंच्या मनात नामदेवांविषयी कृतज्ञ भाव दिसतो.

## स्वतःच्या अपेक्षित जीवनाची जाणीव :

संत नामदेवांचा मोठा परिवार आणि या परिवारामध्ये आश्रित म्हणून जनाबाईंना जगावे लागले आहे. नामदेवाच्या या मोठ्या परिवारामध्ये वावरून सुद्धा जनाबाई या अखेरपर्यंत एकाकीच राहिलेल्या दिसतात. आपल्या उपेक्षित जीवनाची त्यांना सतत बोचणी लागलेली आहे असे जाणवते.

"राजाई गोणाई| अखंडित तुझे पायी
मज ठेवियले द्वारी | नीच म्हणोनि बाहेरी
काय करू पंढरीनाथा | काळ साह्य नाही अता
मज टाकिले परदेशी | नारा विठा तुजपाशी
श्रम बहु झाला जीवा | आता सांभाळी केशवा
कोण सखा तुजविण |माझे करी समाधान
हीन दीन तुझे पोटी |जनी म्हणे द्यावी भेटी||"२

आपल्याला नीच म्हणून वागणूक मिळते आहे याची बोच जनाबाईंना आहे. त्यामुळे या भावनेने त्या व्यथित दिसतात.आपल्याला जीवाभावाचे कोणी नाही या भावनेने त्यांचे मन दु:खी होताना दिसते पण त्याचबरोबर ते पांडुरंगाला शरण जाते. जनाबाईंची अभंगवाणी वारकऱ्यांच्या विठ्ठल गजरात वावरत असूनही आपल्या एकाकीपणाने उठून पडते आणि त्यातच जनाबाईच्या मनाचे व त्या मनाने निर्मिलेल्या अभंगांचे वेगळेपण आहे असे म्हणता येईल.

जनाबाईंचे जीवन विलक्षण कष्टमय होते. सतत कष्ट करीत असताना, त्या कष्टाला त्या विठ्ठलभक्तीची जोडतात. दळण-कांडन करणे, झाडलोट, सडासारवण करणे, धुणीभांडी करणे आणि घागर घेऊन पानवट्यावर जाणे यासारख्या या ना त्या कामात त्या सदैव गुंतलेल्या दिसतात. संत चोखोबा, संत गोरा कुंभार आदी संतमंडळी कष्ट करीत विठ्ठलभक्तीत रममान झालेले दिसतात. संत जनाबाई सुद्धा घरकामे करताना विठ्ठलाला आळवतात. विठ्ठल त्यांच्या कामात त्यांना सहाय्य करताना सुद्धा दिसतो.

"जनी जाय पाणीयासी| मागे धावे हृषिकेशी
पाय भिजो नेदी हात| माथा घागरी वहात
पाणी रांजणांत भरी| सडा सारवण करी"

जनाबाईंचा विठ्ठल हा अलौकिक, अप्राप्य न राहता तो मनुष्य रूप धारण करून जनाबाई सोबत कष्टाची कामे करताना दिसतो. जनाबाई घरकाम करता करता अध्यात्मानुभवात तल्लीन होऊन जातात. 'देहभाव प्राण जाय| तेव्हा हे धैर्य सुख होय,' 'जोड झाली रे शिवासी| भ्रांत फिटली जीवाची,' 'मी तो समर्थाची दासी| मिठी घालीन पायासी'

यांसारख्या अनेक अभंगांमधून जनाबाईंच्या विलोभनीय स्त्रीमनाचे दर्शन घडते. 'माय मेली बाप मेला, आता सांभाळी विठ्ठला,' 'मज ठेवियले द्वारी | नीच म्हणोनि बाहेरी,'
' मज टाकिले परदेशी | नारा विठा तुजपाशी' यांसारख्या अभंगांतून उपेक्षित जीवनाची त्यांच्या मनाला जी बोचणी लागून राहिली आहे, त्याची जाणीव होते. जनाबाईंच्या करुणापर अभंगांचा विचार करता जाणवते की ह्या अभंगरचना त्यांच्या विठ्ठलवियोगातून निर्माण झाल्या असल्या तरी त्यांचे मूळ मात्र त्यांच्या एकाकीपणाच्या जाणिवेमध्ये आहे.

## निष्कर्ष:

विठ्ठलभक्तीत रमणारे जनाबाईंचे मन विलक्षण आत्मविश्वासपूर्ण वाटते. 'दळिता कांडिता तुज गाईन अनंता' असे म्हणणाऱ्या जनाबाई विठ्ठलभक्तीमध्ये रममान होत आपल्या कष्टमय जीवनावर मात करताना दिसतात. जनाबाईंचे मन सश्रद्ध आणि सुजाण आहे आणि त्याचबरोबर प्रौढ आचारविचार दर्शविणारे आहे. त्यांचे मन जसे विचारी, सश्रद्ध, संवेदनक्षम आहे, त्याचबरोबर ते आपल्या स्वतःच्या परिस्थितीविषयी, स्थानाविषयी व्याकुळ होऊन समाजजीवनाकडे पाठ फिरवणारे नाही. लौकिक जीवनात घट्ट पाय रोवून जनाबाई सश्रद्ध मनाने अध्यात्मानुभूती घेताना दिसतात. आपल्या अध्यात्मजानामुळे आपली परिस्थिती व स्त्रीमन नाकारण्याचा प्रयत्न जनाबाईंकडून होत नाही. जी परिस्थिती आहे ती स्वीकारून, कोणताही अहंभाव न बाळगता वा अवाजवी भावविवश न होता जीवनाला सामोरे जाणारे जिवंत, सुदृढ व अकृत्रिम असे विलोभनीय स्त्रीमन संत जनाबाईंच्या अभंगातून आपल्याला अनुभवता येते.

## संदर्भ-टिपा :

१) संत कवी आणि कवयित्री: एक अनुबंध, डॉ. सुहासिनी इर्लेकर, पुणे, आवृत्ती २००६, पृ.क्र.२१४
२ ) तत्रैव, पृ.क्र.२३४

❖❖❖

# मराठी काव्यातील ग्रामीण संस्कृती

डॉ. शरद वाघोळे
मराठी विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हान कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर
९४२१७४५३३५

उत्तम शेती – मध्यम व्यापार– कनिष्ठ नोकरी ही मानसिकता जाऊन उत्तम नोकरी – मध्यम व्यापार – कनिष्ठ शेती या मानसिकतेपर्यंत ग्रामीण समाज मन आले. शेतीतील नापिकी, व्यापारी लोकांची लुबाडणूक, सरकारची उदासिनता, निसर्गाचा लहरीपणा, दारिद्र्य अशा विविध कारणांमुळे शेतकरी शेतीपासून दुरावत आहे. त्यातून चांगल्या जीवनाच्या शोधार्थ तो शहराकडे वळलेला दिसतो. शहरात ग्रामीण भागाच्या तुलनेत पोटाचा प्रश्न लवकर सुटतो. खेड्यापेक्षा चांगले जीवन शहरात त्याला दिसते. त्यातून तो शहराकडे आकर्षित झालेला दिसतो. शरीकरणाने ग्रामीण भागात प्रवेश केला, जागतिकीकरण, आधुनिकीकरणाने ग्रामीण भागाचे स्वरूप बदलविले. ग्रामीण भागात गरिबी, दारिद्र्य असेल परंतु त्यांनी आपली संस्कृती जतन केलेली दिसते. काळाच्या ओघात या संस्कृतीतील अनेक बाबी लुप्त होत आहे. परंतु मराठी ग्रामीण कवितेने या संस्कृतीला शब्दबद्धकरून ठेवले आहे. जित्राब काव्यसंग्रह म्हणजे याचे सुंदर उदा. होय.'अतिथी देवो भव:' अशी विचारसरणी आपल्याकडे आहे. आज बदलत्या युगात मात्र या म्हणीचे पालन होत नसले तरी खेडे भागात मात्र आजही आपल्या या भारतीय संस्कृतीचा आदर केला जातो. 'संस्कृतीमध्ये सामुहिक सह – कृती असते. या सह – कृतीमध्ये धर्माधिष्ठित तत्वे, आचार, आहार, पोशाख, प्रथा, परंपरा, समजुती आणि रोटीबेटी व्यवहाराचे कायदेकानून सर्व समूह संगतमताने परंपरेने पाळत असतो म्हणून संस्कृती म्हणजे मानवी समूहाची वैशिष्ट्यानिशी जगण्याची एक जीवनशैली असते.'[१] या संस्कृतीत अतिथीचे स्वागत–सत्कार केले जाते. त्याला देवाप्रमाणे मानून त्याचे आतिथ्य केले जाते. अतिथीबद्दल असणारा जिव्हाळा, प्रेम, आदर ग्रामीण भागात दिसून येतो. ग्रामीण लोकांचे व्यक्तिमत्वच काहिसे वेगळे असते. स्वत: कितीही कष्ट सहन करतील पण आलेल्या अतिथीच्या आतिथ्यात कोणत्याही गोष्टीची कमी पडू देणार नाही. काळानुरूप या संस्कृतीचा,परंपरेचा लोप होत आहे, परंतु अशी विचारसरणी टिकली पाहिजे, टिकवल्या गेली पाहिजे. गावातील अशा वागणुकीचे चित्रण 'गरिबीचा पाहुणचार' या काव्यातून आहे,

'या बसा पाव्हनं असं, राम राम घ्या
कोनच्या तुम्ही गावाचं? गाबुडं तिथं राहु दया!
मीठ भाकरी गरिबाची घ्या गोड करोनी तुम्ही
इतक्यात कसं उरकलं , हे नव्हं खरं
आणखी एक चतकोरा घ्यायला पायजे बरं!'

वरील ओळींमधून स्वत:ची परिस्थिती कितीही गरिबीची असली तरी आलेल्या अतिथीचे मन तृप्त करण्यासाठी गरिब पती–पत्नीची चाललेली धडपड दिसून येत. ग्रामीण भागात आजही अशी परंपरा दिसून येते.'शेती, पशुपालन, स्थापत्य, धातुकाम, यंत्रनिर्मिती, वस्त्रोत्पादन, अर्थोत्पादन या गोष्टींची संपन्नता भौतिक संस्कृतीत अभिप्रत असते. धर्म, नीती, कायदा,विद्या, ललित कला, वाङ्‌मय, सभ्यता, शिष्टाचार इत्यादी गोष्टींचा समावेश आध्यात्मिक संस्कृतीत होतो. या दोन्ही प्रकारच्या संस्कृतीचे अन्योन्यसंबंध आहेत. मनुष्यांच्या मानसिक आशा – आकांक्षांना भौतिक सुधारणेमुळे मूर्त रूप येते, आणि भौतिक सुधारणांची इमारत आध्यात्म्याच्या पायाव उभी केली तर तिला संस्कृतीचा दर्जा प्राप्त होतो. बाह्य समृद्धीबरोबरच मन, बुद्धी, पंचद्रिये यांवर नियंत्रण असावे लागते. आणि हे सर्व साध्य करण्याची जी प्रक्रिया तिला सामान्यता संस्कृती असे म्हणतात.'[२]अशा प्रकारची संस्कृती असलेला माणूस जित्राब काव्यसंग्रहाचा केंद्रबींदू आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. आजच्या मॉल संस्कृतीच्या काळातही खेड्यामध्ये आठवडी बाजाराची परंपरा जपत असल्याचे दिसते. बाजाराचा दिवस काही वैशिष्ट्य मिरवणारा असतो. त्या दिवसाची खेड्यातील लहान–मोठी मंडळी अगदी आतुरतेने वाट पहात असतात. खेड्यातील लोकांना आठवडी बाजाराच्याच दिवशी मीठ–मिरची, कांदा अशा दैनंदिन जीवनासाठी उपयुक्त वस्तू तसेच लहान मुलांची खेळणी, कपडे, बांगड्या, फळे मिळतात. व्यवसायिकांनाही आपल्या वस्तू विकण्यासाठी

आठवडी बाजाराची संधी मिळते.ग्रामीण पुरूष—स्त्रिया आपल्या शेतातील माल बाजारात विकण्यासाठी घेऊन जातात. बाजारासाठी ग्रामीण स्त्रिया एकमेकींच्या संगतीने, सोबतीने बाजारात जातात. लहान मुले बाजाराची शोभा पाहण्यासाठी बाजारात जाण्याचा हट्ट करतात. आठवडी बाजाराची आतुरता लहान—मोठ्यांना लागलेली असते. असं हे ग्रामीण भागातील अस्सल मराठमोळं दृष्य जित्राबमधील 'बाजार' या काव्यातून साकार केलेले आहे.

'हा गाड्यांनी गजबजला गाडीतळ
किती गडबड, गर्दी, गोंगाट नि गोंधळ!
बाजारकऱ्यांची रहदारी ही सुरू———
जाहली, चालली पहा कसे तुरूतुरू'

एखादा सण असेल तर बाजाराची मजा न्यारीच असते. सणासाठी लागणारे साहित्य, नवनवीन कपडे खरेदी करण्याची उत्सुकता सर्वांना असते. सण्ससची सर्व खरेदी बाजारातून मोठ्या हौसेने केली जाते.

गावातील हा आनंद काळानुरूप बदलत आहे. शहराच्या प्रभावामुळे बाजाराचे, सण — उत्सवाचे, कलांचे स्वरूप बदलत आहे, भूतकाळात प्रभावी असणाऱ्या या सर्व परंपरा काव्यरूपाने जित्राबमधून जतन करण्यात आल्या आहेत. पूर्वी खेड्यातील बाया तालुक्याच्या ठिकाणी जात असे. भाजीपाला, धान्य, मिरची, कपडे इत्यादी अनेक साहित्य विकायला न्यायच्या. तेव्हा त्यांची लहान मुले आपली आई—बाप आपल्यासाठी बाजारातून परतताना खाऊ आणतील या अपेक्षेने टक लावून त्यांची वाट पाहत असत. या सर्व बाबींतील नवलाई या संग्रहातील काव्यातून जाणवते. आपल्या ग्रामीण परंपरेतील लोकमानसाचा परामर्श कवींनी घेतला आहे. बाजारातील लगबगीचा, त्यातील आनंदाच्या सूक्ष्मातिसूक्ष्म छटा आनंद यादव यांच्या 'हुलगला बाजार' या काव्यातून दिसून येतात,

'परतल्या बायका
खेडच्या पाडच्या
ओट्या खोप्यात
घेऊन चिरमुरं,
पेरू, रताळं;
भरत बकाणं
करत घास'

असे जिवंत आणि यथातथ्य चित्र हे बाजाराला जाणाऱ्या बायकांचे आनंद यादवांच्या काव्यातून दिसून येते.

लोककला टिकवून ठेवली ती ग्रामीण भागाने, परंपरेने चालत आलेली विचार सरणी असो किंवा धार्मिक विधी परंपरा असो ग्राममानसाने या सर्वांना आपल्या मनात जतन केले आहे. मराठी ग्रामीण समाजाचे नाते संतपरंपरेशी जुळलेले असते. अशा परंपरलेला दैनंदिन जीवनात जतन केले जाते. स्त्रिया पहाटेच उठून सडासारवण करतात. रांगोळ्या घालतात. खेड्यामध्ये पहाटेच दारी रायरंग येतो. तो लोकांचे रंजन करतो, लोकांना हसवितो. ग्रामीण लोक त्याला कृष्णाचेच रूप मानतात. त्याची पूजा करून त्याला धान्य देतात. तो रायरंग हा एक श्रेष्ठ कलावंत असतो. आपल्या कलेच्या माध्यमातून लोकांना उपदेश करतो, पुराण कथा सांगतो. तो देवाचे दर्शन घडवितो. त्यामुळे खेड्यातील लोक त्याचे कृतज्ञ असतात. अशा या लोककलावंताचे तसेच या कलावंताचा आदरसत्कार करणाऱ्या लोकमानसाचे चित्रण पुढील ओळीतून दिसते,

'आला आला रायरंग
करे लोकांचे रंजन
हासवता हासवता
घाले डोयात अंजन
आला रायरंग दारी
याचं फेडा तरी रीन
आरे थकले भागले
त्याचा घालवतो शीन'

रायरंगाचे ग्रामीण जीवनात मोठे योगदान असते. तो आपल्या कलेने लोकांचे मनोरंजन करतो, दु:ख दूर करण्याचा प्रयत्न करतो. परंतु मनोरंजन एवढाच हेतू त्याच्या कलेचा नाही तर मनोरंजन करता —करता तो प्रबोधनाचे कार्य

सुद्धा करतो. हे प्रबोधन कधी धार्मिक बाबतीत असते तर कधी सामाजिक प्रश्नावर आधारित असते. तो आपल्या कलेने सर्वांना खुश करीत असतो. असा या रायरंगाकडे बघण्याची ग्रामीण लोकांची भूमिका श्रद्धेची असते, एक कलावंत म्हणून त्याचा ग्रामीण परंपरेत सन्मानच केला जातो, म्हणून बहिणाबाई चौधरी म्हणतात,

'नका म्हणू रे भिकारी
जरी तुम्ही नानावटी
करा गुनाची कदर
हात घाला कनवटी'

ग्रामीण विभागात लोक एकमेंकांशी अगदी आपुलकीच्या भावनेने वागत असतात. एकमेकांना सुख—दुःखात साथदेत असतात. कुणी दुःखात असेल तर पटकन त्याच्या मदतीला धावून जातात. परस्परांना मदत करणे हे जणू त्यांच्या रक्तातच भिनलेले असते. त्यांचे दैनंदिन जीवन कष्टाचे असते. सूर्याच्या पहिल्या किरणापासूनच त्यांना जणू कष्ट करावे लागते. परंतु ते कष्ट करताना त्यात आनंद शोधतात. स्वतः बरोबरच इतरांनाही आनंदी ठेवण्याचा ते सतत प्रयत्न करीत असतात आणि आनंदाने आपले जीवन कंठीत असतात. अशा सामाजिक एकोप्याचे दर्शन खेड्यात नेहमीच घडत असते.

सामुहिक कार्य हे ग्रामीण जीवनाचे वैशिष्ट्यच! एखादा मंगल प्रसंग असो किंवा एखाद्याच्या घरी काही वाईट घडले असेल तर सगळं गाव त्याठिकाणी येणारच, आपला यासोबत काही संबंध नाही ही शहरी मानसिकता तेथे आढळणार नाही. एकीचे बळ ग्रामीण माणसाला चांगले माहित असते तसेच एकमेकांना मउतीचा हात देण्यास तत्पर असणारी त्यांची वृत्तीच असते, अशा या ग्रामीण भागातील माणसाच्या सहकार्य भावनेला साकारणारी कविता कवी गिरीश यांनी लिहिली आहे,

'न्हिरीचा खाऊन चल भाकर कांदा
भलरि दादा ! भल गडी दादा !
बाच्या किरतीची समरून आन्
लुटायला जाऊ मोत्याची खान्
उपटून काढू कणसाळलं रान्
चला राव भिडवून खांद्यास खांदा
भलरी दादा! भल गडी दादा!'

या भलरी गीतात कवी गिरीशांनी सामुदायिक जीवनाच्या उच्च संस्कृतीचे, जीवनमूल्याचे व सामुदायिक सहकार्याचे रूप साकार केलेले आहे. ग्रामीण जीवनात सुगीच्या हंगामाच्या वेळी एक आनंदाची लहरच जणू सगळीकडे पसरलेली दिसते. या सुगीच्या हंगामात शेतकरी वर्ग खूप खुश असतो. कारण वर्षभराची त्याची मेहनत फळाला आलेली असते. त्याचे मेहनतीचे फळ शेतात उभ्या असलेल्या पिकाच्या रूपाने त्याला दिसत असते. शेतातील धनधान्य याच हंगामात घरी आणले जाते. त्यामुळे शेतकरी वर्ग आनंदी असतो. त्याचे मन जीवनाची अनेकविध स्वप्ने पाहण्यात मग्न होते. अशाप्रसंगी लोककला,लोकगीते,लोकनृत्यातून ते आपल्या भावना व्यक्त करतात, लोकसंस्कृतीत परंपरेने चालत आलेल्या लोककलांना ग्रामीण लोकांनी जतन केले आहे. अशा या लोककला ग्रामीण संस्कृतीचा एक भागच आहे, आपल्या भावभावना लोकमाध्यमातून ते व्यक्त करतात. सुगीच्या दिवसातील आनंदउत्स साजरा करणाऱ्या लोकांचे चित्रण श्री. बा. रानडे यांच्या 'लेझिम' मधून दिसते.

'दिवस सुगीचे सुरू जाहले
ओला चारा, बैल माजले
शेतकरी— मन प्रफुल्ल झाले
घन झन खळ झण् खळ् झुन् छिन्
लेझीम चाले जोरात!'

या सुगीच्या हंगामात खूप कष्टही करावे लागतात. म्हणून हे ग्रामीण लोक लेझीम खेळतात. त्या लेझीमच्या नादामध्ये हे लोक आपले सर्व कष्ट विसरून उत्साहित होऊन लेझिमच्या तालावर नाचू लागतात. अशा विविध कवितेतून ग्रामीण जीवनशैलीचे चित्रण यातून आलेले दिसते

## निष्कर्ष

१. ग्रामीण जीवनशैलीचे संग्रहण अशा कवितांनी केले असून ग्रामीण जीवनाच्या अभ्यासाकरिता उपयुक्त अशा या कविता आहेत

२. ग्रामीण बोलीतील लुप्त होत असलेल्या शब्दांचे संकलन अशा कवितेतून दिसते. भाषिक अभ्यासासाठी या कविता उत्तम संदर्भ आहेत.

३. समाजशास्त्रीय दृष्टीने ग्रामीण जीवनाचा अभ्यास करण्यासाठी या कविता उपयुक्त आहेत.

## संदर्भ

१. ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, लेखक – मोहन पाटील, स्वरूप प्रकाशन, आवृत्ती दुसरी २००८, पान ०३.

२. मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी, डॉ. सदा कऱ्हाडे, प्रकाशक –लोकवाङ्.मय गृह, आवृत्ती दुसरी १९९०, पान ०३.

❖❖❖

# खानदेशातील अस्सल लोककलेचे संचित : वही गायन

**प्रा. दीपक संतोष पवार**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव
८७९३६४२८३८

## प्रस्तावना :-

आज खान्देशाच्या दृष्टीने वहीगायन हे मनोरंजनाचे व त्याद्वारे प्रबोधनाचे एक महत्वपूर्ण माध्यम आहे. वहीवाङ्गमय हाही लोकसाहित्यातील एक लोकवाङ्गमय प्रकार आहे. महाराष्ट्र हा एक लोककलेने समृद्ध असा राज्य आहे. त्यात विविध प्रांताचे ठळकपणे वैशिष्ट्ये सांगणाऱ्या लोककथा आहेत जसे की पूर्व विदर्भाची दंडार, पश्चिम महाराष्ट्राची तमाशा त्याचप्रमाणे वहीगायन हा प्रकार फक्त खान्देशातच बघायला मिळतो वहीगायनात पूर्व खान्देश व पश्चिम खान्देशातील वेगवेगळ्या बोलीचा उपयोग होतो. सोशल मिडीयाच्या उदयामुळे वहीगायनाचे स्थान आता बरंच बदललेले आहे. वहीगायनाच्या माध्यमातून धार्मिक, नैतिक, सामाजिक व अध्यात्मीक प्रबोधनाचे कार्य घडते. प्रस्तुत संशोधन प्रकल्पात संशोधकांनी वहीगायनाचा विविध अंगांनी आढावा घेतलेला आहे.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१) वहीगायन म्हणजे काय ? हे समजुन घेणे.
२) सामाजिक प्रबोधनामध्ये वहीगायनाची भूमिका अभ्यासणे.
३) वहीगायनाचे महत्त्व पटवुन देणे.
४) वहीगायनाची बदलती भूमिका अभ्यासणे.

## संशोधनाची गृहितके :-

१) वहीगायनाच्या माध्यमातून सामाजिक, धार्मिक अध्यात्मीक परिवर्तन घडून येत आहे.
२) वहीगायन हा लोककला प्रकार कुठेतरी लुप्त होतांना दिसत आहे.
३) वहीगायकांची समाजाकडुन अपेक्षा उंचावत आहे.

## वही वाङ्मय :

## १) वहीगायन :-

खान्देशातील प्रामुख्याने जळगाव जिल्ह्यात आढळून येणारी लोककला वहीगायन ओवी या शब्दाचा अपभ्रंश होवून वही हा शब्द या लोककला प्रकारात रुढ झाला. पौराणिक काळातील कथा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुरुवातीच्या काळात मौखिक आणि नंतर लिखित स्वरुपात वर्ग झाल्या. यामधील कथा याच स्वरुपात, त्यांना पात्र वादयाची जोड देत, प्रसंगी लोकांच्या मनोरंजनासाठी अभिनय करत सादर केल्या

जातात. वही म्हणणाच्या वह्या तोंडपाठ असतात वही गायनातून गण म्हणजे गणपती व कठहेर काजोळ म्हणजे ग्रामदेवता व निसर्गदेवतांना वंदन आणि कथात्मक स्वरुपात रामायण, महाभारतापासून ते वास्तव काळातील विविध विषयांपर्यंत वह्यात अंतर्भाव दिसून येतो. तास व ठेक्यात, डफ, ढोलकी, झांज, बासरी यांच्या साथीवर वही गायली जाते. वहीगायनाची एक विशिष्ट चाल असते. वहीगायनातील उत्स्फुर्तता, सहजता आणि रांगडा आवाज यामुळे तिचे वेगळेपण दिसून येते. लावणी, पोवाडा इ. गीतप्रकारांपेक्षा वेगळे वहीचे गायक बऱ्याचदा स्वतः रचनाकार असतात, त्यामुळे वहीच्या रचनेत साहित्यिक सुपांचा फारसा आविष्कार आजमावत नसला, तरी त्यातील वैचारिकता, आशयघनता आणि श्रध्दाशीलता महत्त्वाची असते. नव्या पिढीत वहीविषयी फारसे आकर्षण नसले, तरी बरेच तरुण वहीगायनात आढळून येतात. वहितील गायकाला शाहिर म्हणून सुद्धा ओळखले जाते.

" 'लंकेवर कोसळली वीज' या वहीत सज्जन-दुर्जन, सत-असत प्रवृत्तींचा संघर्ष वर्णन केलेला आहे. कथा कादंबऱ्यातून जसा संघर्ष चित्रित केलेला दिसतो त्याप्रमाणे या वहीत संघर्ष चित्रित केलेला आहे. हा संघर्ष रावणाच्या म्हणजेच एकाच व्यक्तीच्या मानसिक पातळीवर आहे. रावणाच्या मन:प्रवृत्तीला सुष्टदुष्टता पुढीलप्रमाणे दिसून येते.

"राम जन्मले अयोध्या नगराला।
वीज पडली लंका शहराला।
लंकेत फिरला रावण राजारे।
लोक मेलेल्यासारखे दिसले त्यात।

'कौरव पांडवांचे वर्तमान' या वहीत वहीकाराने कुरुवंशाची वंशावळीच गुंफलेली आहे. शंतनुराजाची मत्स्यगंधा राणी होती. तिला चित्रांगद व विचित्रवीर्य असे दोन पुत्र होते. काशीराजाला तीन मुली (अंबा, अंबिका व अंबालिका) होत्या. अंबिकेपासून जन्मांध धृतराष्ट्र जन्माला येतो. अंबालिकापासून पंडूराजा. गांधारीचे शंभर पुत्र (कौरव) होय. कुंतीचे तीन पुत्र, धर्म, भीम व अर्जुन होय. एवढी लांबलचक वंशावळी वहीकाराने मोठ्या कौशल्याने कथन केली आहे.

'भीमाची वही' यात सत-असत प्रवृत्तींचा संघर्ष दाखविला आहे. कौरवांनी भीमाला कपटाने मारायचे ठरविले आहे. भीमसुध्दा कपटी मनाने हनुमानाला अलिंगन देतो. कौरवांनी अन्नात विष टाकून भीमाला मारले. सत-असत प्रवृत्ती याठिकाणी दिसून येते.[१]

'शक्तीचा अवतार' या वहीमध्ये कानोळ ही शक्तीचा अवतार आहे असे वहीकार सांगतात या वहीत ते म्हणतात –

" कानोळ आहे रे शक्तीचा अवतार।
आदिशक्ती रे मूळ सुंदर।
मृत्यू लोकांनी नाव ठेवलं कान्होळ।

कान्होळ ही आदिशक्ती असून मृत्यूलोकांनी तिचं नाव कानोळ ठेवलं. तसेच कानोळ कन्हेराचा जोडा हे शिवपार्वतीचे स्वरूप आहे. कन्हेर म्हणजे शिव. कानोळ म्हणजे पार्वती केवडा हे गणपतीचे प्रतीक आहे. जाई हे देखील प्रतीक आहे. पार्वतीच्या त्या कन्या आहेत. कन्हेर, केवडा, जाई-जुई यांचे नातेसंबंध दाखविलेले आहेत. म्हणजे आदिशक्तीची विविध रूपे आहेत."[२]

## २) वहीची रचना :-

रचनेच्या दृष्टीने या वह्या वाचताना गद्य वाटतात पण, तालासुरावर ऐकतांना ते पद्य आहे असे वाटते. काही वह्यामधील धृवपद चरणांचे आहे तर काहींमध्ये ५ चरणांचे आहे. वहीच्या प्रत्येक चरणाच्या शेवटी

यमक साधलेला असतो. वहीगायक आपल्या सर्व वाद्यासह तयार झाले की सुरुवातीला गण म्हणतात व गणाच्या प्रत्येक कडव्याला कळी म्हणतात. कळीमध्ये जो कथाभाग असतो तो पद्यात गायला जातो. त्यालाच निरुपण म्हणतात. सखी म्हणजे देवाला नमन करणे होय. वहीवाङ्मयात काजोळ हे एक दैवत मानले गेलेले आहे. पार्वती या मुळ आदिशक्ती देवीला कल्पून कान्होळ (कानूबाई) म्हणण्याची परंपरा आहे. कन्हेर म्हणजेच शिवाचे रूप होय. वहीचे गायक बऱ्याचदा कळी संपल्यानंतर एखाद्या मुद्दयावर विशेष जोर देवून त्याची पुनरावृत्ती करतात त्यालाच तिपड म्हणतात.

## • वहीगायनाचा समाजावर होणारा परिणाम :-

वहीगायन ही खान्देशातील लौकीक वाङ्मयाची गायन परंपरा आहे. खान्देशात ही परंपरा पिढ्यानपिढ्या जतन झालेली दिसून येते. वहीची परंपरा मौखिक स्वरुपाची असून ती कथात्मक गीतांची पौराणिक परंपरा म्हणून रूढ झालेली आहे. वहीगायनाच्या माध्यामातून समाजात अध्यात्मीक, नैतिक, सामाजिक प्रबोधन घडून येते. वही हे लौकिक गीत वाचनापेक्षा गायन व प्रवण यासाठी उपयुक्त ठरते. वहीगायन करतांना या लोकवाङ्मयाचा प्रभाव समुदयावर पडतो हे तिचे सामर्थ्य आहे. डफ, सांज, ढोलकी व घुंगराच्या तालावर उत्स्फूर्तपणे सादर केलेले हे लौकीक गीत सहज काव्याचा आविष्कार म्हणता येईल. वहीगायक बऱ्याचदा रामायण, महाभारत, पांडवप्रताप यांच्या वह्या सादर करतात पण अलीकडे वहीगायनाच्या माध्यमातुन व्यसनमुक्ती, स्त्री-पुरुष समानता, स्त्रीभ्रूण हत्या यांसंदर्भात प्रबोधन केले जाते.

## वहीतील विशिष्ट संकेत :-

वहीगायक आपल्या सर्व वाद्यांसह तयार झाले की, सुरुवातीला गण म्हणतात व गणाच्या प्रत्येक कडव्याला कळी म्हणतात. कळीमध्ये जो कथाभाग असतो तो पद्यात गायला जातो. त्यालाच निरुपण म्हणतात. सखी म्हणजे देवाला नमन करणे होय. वहीवाङ्मयात काजोळ हे एक दैवत मानले गेले आहे. पार्वती या मुळ आदिशक्ती देवीला कल्पून कान्होळ (कानूबाई) म्हणण्याची परंपरा आहे. कन्हेर म्हणजेच शिवाचे रूप होय. वहीचे गायक बऱ्याचदा कळी संपल्यानंतर एखाद्या मुद्द्यावर विशेष जोर देवून त्याची पुनरावृत्ती करतात त्यालाच तिपड म्हणतात.

## वहीगायनची वैशिष्ट्ये :-

१. वहीची रचना गद्यात्मक, सादरीकरण पद्यात्मक असतो.
२. वहीगायन लोकसंस्कृतीच्या आधारे धार्मिक, सामाजिक व अध्यात्मिक प्रबोधनाचे कार्य करते.
३. वहीची रचना यमकबध्द, बोलीचा सुश्राव्य वापर म्हणुन परिणामकारकता येते.
४. ताल, लय, आशय, प्रतीकात्मकता, संवेदनशीलता, भावपूर्णता यांच्या अपूर्व संगमाने गायन व निरूपण होते.
५. आधुनिक काळात मनोरंजन व प्रबोधनाचे एक वैशिष्ट्यपूर्ण हत्यार म्हणजे वहीगायन होय.

## वहीगायनाचे वेगळेपण :-

खान्देशाच्या व्यतिरिक्त महाराष्ट्राच्या कोणत्याही प्रादेशिक भागात ही कला आढळत नाही. प्राचीन काळापासून वहीगायनाची प्रथा खान्देशात अस्तित्वात आहे.

## निष्कर्ष :-

कथात्मक वह्यांमध्ये परिचित अशी कथानके असून क्वचित तयात उपकथानकातील एखादाच अंश वर्णन केलेला दिसून आला. कथात्मकता हे या वह्यांचे वैशिष्ट्य असले तरी त्यातील ताल, ठेका आणि ढंग यांना अधिक महत्व दिलेले दिसून येते. विविध लोककलांना राज्यात त्या-त्या क्षेत्रात राजमान्यता मिळाली. वहीगायन हा लोककला प्रकार तर अस्सल खान्देशी मातीतला आणि राज्यात इतरत्र कुठेही न दिसणारा लोककला प्रकार आहे. तरीही या कलाप्रकाराला ना प्रतिष्ठा मिळाली ना राजमान्यता. खान्देशात जवळपास तीन-चारशे वर्षापासून या कला प्रकाराचे अस्तित्व आढळून येते. या लोककला प्रकाराच्या माध्यमातून समाजात वेगवेगळ्या प्रकारचे प्रबोधन केले जाते. यात प्रामुख्याने स्थानिक बोलीभाषांचा वापर केल्याने समजायलाही अगदी सहज, सोपे वाटते. सुरुवातीच्या काळात वहीगायन करणाऱ्या मंडळाला रुमाल, टोपी, नारळ व वस्त्र देऊन गौरविण्यात यायचे परंतु या लोककलेला प्रतिष्ठा ना मिळाल्याने कलावंतांच्या अर्थार्जनाचा प्रश्न मंडळासमोर कायम राहिला. काही ठिकाणी सध्या कोरोनाचा विषय घेवून जनजागृती होत असल्याचे आढळून आले. कलेचे जतन करणारी कुटुंब महाराष्ट्रात तमाशा, लावणी, शाहिरीसारख्या लोककला प्रकारांना त्या-त्या भागात लोकमान्यता मिळाली. दुर्दैवाने वहीगायनाला लोकमान्यता मिळालेली नाही. कुटुंबाचा वारसा म्हणून काही लोक या कलेचे जतन करत आहेत. जळगाव जिल्ह्यावर जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात जवळपास ४-५ हजार वहीगायन करणारे कलावंत आहेत. दुर्दैवाने अर्थार्जनाच्या अभावी वहीगायन हा अस्सल खान्देशी मातीतला लोककला प्रकार आता दुर्मिळ होत चालला आहे. एकंदरीत वहीवाङ्मयाचे कथात्मकता हे खास असे वैशिष्ट्य म्हणता येईल.

## संदर्भ ग्रंथ -

१) प्रा. सौ. शालिनी नारखेडे - खानदेशातील वही वाङ्मय, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद
२) तत्रैव
३) व्यवहारे शरद — लोकसाहित्य उद्गम आगि विकास, विश्वभारती प्रकाशन, नागपू
४) नारखेडे शालिनी - खानदेशातील वहीवाङ्मय, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद
५) पाटील किसन - मराठी लोकरंगभूमी, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव

❖❖❖

# भारतीय ज्ञान परंपरा आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

## Indian Knowledge System and National Education Policy

डॉ. पवन मांडवकर

प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद

E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## गोषवारा

'भारतीय ज्ञान परंपरा' ही अत्यंत समृद्ध अशी आहे. ज्ञान आणि विज्ञान, लौकिक आणि पारलौकिक, कर्म आणि धर्म तसेच भोग आणि त्याग यांचा अद्भुत समन्वय भारतीय ज्ञान परंपरेत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये भारतीय ज्ञान परंपरेवर भर देण्यात आलेला आहे. सुसंस्कारासोबतच मातृभाषा आणि शारीरिक शिक्षणाचाही सांगोपांग विचार या नव्या शैक्षणिक धोरणात करण्यात आलेला आहे. प्राचीन काळी गुरूंना सर्वश्रेष्ठ समजले जात असे. नव्या धोरणातही केंद्रस्थानी शिक्षक आहेत. सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविताना शिक्षकांकडूनही निस्वार्थी, त्यागी आणि सर्वज्ञानी असण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेचे जगभरात जे स्थान प्राचीन काळी होते, तेच परत मिळविण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण प्रयत्नशील आहे.

## Abstract

The 'Indian knowledge System' is very rich. It has a wonderful harmony of knowledge and science, karma and dharma as well as bhoga and sacrifice. The National Education Policy 2020 emphasizes on the Indian knowledge tradition. Along with good culture, mother tongue and physical education have also been considered in this new education policy. In ancient times Guru means teacher was considered the best. Teachers are also at the center of the new policy. Teachers are also expected to be selfless and omniscient while making all-round students. The new education policy strives to regain the position of the Indian education system in the world that it once enjoyed.

**बीजशब्द** : भारतीय ज्ञान परंपरा, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, Indian Knowledge System, National Education Policy, कर्म, धर्म, भोग, त्याग, मातृभाषा, शारीरिक शिक्षण

## प्रस्तावना

'भारतीय ज्ञान परंपरा' ही अत्यंत समृद्ध आणि अद्वितीय अशी आहे. भारतीय ज्ञान परंपरेत ज्ञान आणि विज्ञान, लौकिक आणि पारलौकिक, कर्म आणि धर्म तसेच भोग आणि त्याग यांचा अद्भुत

समन्वय आहे. प्राचीन अशा ऋग्वेद काळापासूनच भारतीय शिक्षणपद्धतीने जीवनातील नैतिक, भौतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. ग्रंथज्ञानासोबतच शारीरिक श्रमांचे महत्त्व भारतीय ज्ञानपरंपरेतून अधोरेखित होते.

भारतात जगप्रसिद्ध अशी ज्ञानकेंद्रे अर्थात विद्यापीठे होती. तक्षशिलेची स्थापना श्रीरामाचा भाऊ भरत याने केली आणि आपला मुलगा तक्षला तिथे वसवले. पुढे आक्रमकांनी तक्षशिला नष्ट केली आणि ग्रंथालये जाळली, ज्यात असंख्य संस्कृत ग्रंथ जळाले. यानंतर शिक्षाविद आचार्यांनी नालंदा विद्यापीठाची स्थापना केली. पुढे नालंदाही परकीयांनी उद्ध्वस्त केली. या विद्यापीठांमध्ये भारतीय ज्ञान परंपरा, वेद, संस्कृत साहित्य आणि वैज्ञानिक पद्धतीनुसार अभ्यासले गेले आणि ही विद्यापीठे योग आणि आयुर्वेद विज्ञानाची प्रयोगशाळा आणि केंद्रे म्हणून प्रसिद्धीस आली. भारताने नेहमीच जगाला आध्यात्मिक बंधुता, योग आणि आयुर्वेदाचे ज्ञान दिले आहे, ज्याचे अनुकरण आजही जागतिक समुदाय करत आहे.

नुकत्याच लागू करण्यात आलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये भारतीय ज्ञान परंपरेवर भर देण्यात आलेला आहे. सुसंस्कारासोबतच मातृभाषा आणि शारीरिक शिक्षण याचाही सांगोपांग विचार या नव्या शैक्षणिक धोरणात करण्यात आलेला आहे.

## विषय विवेचन

प्राचीन काळी गुरुकुल शिक्षणप्रणाली होती. ब्रह्मचर्याचे पालन करीत शिष्य अठरा विद्या - सहा वेदांग, चार वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद), चार उपवेद (आयुर्वेद, धनुर्वेद, गंधर्ववेद, शिल्पवेद), मीमांसा, न्याय, पुराण आणि धर्मशास्त्र असे सर्वप्रकारचे ज्ञान प्राप्त करीत. उदरनिर्वाहासाठी कोणतीही अडचण येत नसे आणि प्रौढावस्थेत पोचेपर्यंत ते आपल्या विषयात पारंगत झालेले असत. अशा भारतीय शिक्षण व्यवस्थेत अध्यापन करणारे आचार्य हे त्यागी, संपूर्ण कुशल आणि आर्थिक मोहापासून दूर असणारे असत. तेव्हा शिक्षण हे व्यवसायाचे आणि कमाईचे साधन मानले जात नव्हते.

वायुपुराणात असा उल्लेख आहे की गुरुरूपी तीर्थाचे दर्शन घेतल्याने यश मिळते आणि ते सर्व तीर्थक्षेत्रांत श्रेष्ठ आहे. प्राचीन भारतीय सनातन ज्ञान परंपरा खूप समृद्ध होती आणि धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांचा समावेश असलेल्या व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकसित करणे हा तिचा उद्देश होता. जेव्हा संपूर्ण जग अज्ञानाच्या अंधारात भरकटत होते, तेव्हा संपूर्ण भारतातील ऋषीमुनी सर्वोच्च ज्ञानाचा प्रसार करीत, मानवाला पशुत्वापासून मुक्त करून त्याला उत्तम संस्कारांनी सुसज्ज करून पूर्ण संस्कारी मानव बनवीत होते.

प्राचीन शिक्षण प्रणालीत ज्ञान, परंपरा आणि प्रथा या मानवतेला पोषक होत्या. भारतातील तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, बल्लभी, उज्जयनी, काशी आदी ठिकाणे शिक्षण आणि संशोधनाची जगप्रसिद्ध केंद्रे होती आणि अनेक देशांतून विद्यार्थी ज्ञान संपादन करण्यासाठी येथे येत असत.

वैदिक कालखंडात स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात भारताची कामगिरी उल्लेखनीय अशी होती. मैत्रेयी, ऋतंभरा, अपाला, गार्गी आणि लोपामुद्रा इत्यादी स्त्रियांची नावे त्यांच्या बुद्धिमत्तेमुळे जगप्रसिद्ध झाली होती. बोधायन, कात्यायन, आर्यभट्ट, चरक, कणाद, वराहमिहिर, नागार्जुन, अगस्त्य, भर्त्रीहरी,

शंकराचार्य, स्वामी विवेकानंद इत्यादी अनेक महापुरुषांनी भारतभूमीवर जन्म घेऊन भारतीय ज्ञान परंपरा समृद्ध करण्यात अतुलनीय योगदान दिले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 संपूर्ण देशभरात नुकतेच लागू झालेले आहे. त्यानुसार, 2040 पर्यंत भारताची शिक्षण प्रणाली कोणत्याही सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देईल. 21 व्या शतकातील हे पहिले शैक्षणिक धोरण आहे ज्याचे उद्दिष्ट आपल्या देशाच्या विकासासाठी आवश्यक गरजा पूर्ण करणे आणि 21 व्या शतकातील शिक्षणाची महत्वाकांक्षी उद्दिष्टे साध्य करणे, तसेच भारताच्या परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांचा पाया राखणे आहे.

प्राचीन काळी अध्यापन मुख्यतः तोंडी असायचे. विद्यार्थी वर्गात शिकवले जाणारे विषय लक्षात ठेवायचे आणि मनन करायचे. नम्रता, सत्यता, शिस्त, स्वावलंबन आणि सर्वांसाठी आदर या मूल्यांचे अधिष्ठान भारतीय ज्ञान परंपरेला आहे. त्याच पायावर आधारित ही नवी शिक्षण प्रणाली आहे. मानव, प्राणी आणि निसर्ग यांच्यातील समतोल राखण्याचा प्रयत्न करणारी भारतीय परंपरा विद्यार्थ्यांना शिकविली जाणे आवश्यक आहे. वेद आणि उपनिषदांमध्ये मांडण्यात आलेल्या तत्वांचे अध्यापन केल्यास व्यक्ती स्वत:सोबतच स्वत:चे कुटुंब आणि समाजाप्रती कर्तव्ये पार पाडू शकेल, अशी योजना आखण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये शिक्षणासोबतच शारीरिक विकासावरही भर दिला गेला आहे. विष्णुपुराणानुसार कर्म तेच आहे, जे बंधनातून मुक्त करते आणि विद्या ती आहे जी मुक्तीचा मार्ग दाखवते. हे तत्व स्वीकारून भारतीय परंपरेत विद्यापीठे आणि गुरुकुलांमध्ये शिक्षण दिले जायचे. घरोघरी, मंदिरे, शाळा, गुरुकुलांमध्ये मूल्यांसह स्वदेशी शिक्षण दिले जात होते. यासर्वांचा विचार नव्या शैक्षणिक धोरणात केलेला आहे.

प्राचीन काळी गुरूंना सर्वश्रेष्ठ समजले जात असे. सध्या शिक्षण व्यवस्थेत होत असलेल्या मूलभूत बदलांच्या केंद्रस्थानी शिक्षक नक्कीच असले पाहिजेत. या धोरणामुळे प्रत्येक स्तरावरील शिक्षकांना समाजातील सर्वात आदरणीय आणि उदात्त सदस्य म्हणून सन्मान मिळेल. आपल्या पुढच्या पिढीला खऱ्या अर्थाने आकार देणारे हे शिक्षण आहे. या धोरणाच्या माध्यमातून शिक्षकांना त्यांचे काम प्रभावीपणे करता यावे यासाठी त्यांना सक्षम करण्यासाठी शक्य ती सर्व पावले उचलली जात आहेत. प्रत्येक स्तरावर शिक्षकी पेशातील उत्तमोत्तम व्यक्तींची निवड करण्याची योजना आहे. त्यासाठी त्यांचे जीवनमान, सन्मान, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता सुनिश्चित केली जाईल. या धोरणाचा उद्देश दया, सहानुभूती, लवचिकता, धैर्य, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि नैतिक मूल्ये असणारे आणि सर्वसमावेशक समाजाच्या निर्मितीसाठी अधिक चांगले योगदान देऊ शकतील असे चांगले मनुष्य विकसित करणे हा आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये भारतीय भाषांना महत्त्व देत अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसह जवळपास सर्वच अभ्यासक्रमांमध्ये भारतीय भाषेचा पर्याय ठेवण्यात आला आहे. या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून प्रत्येक मुलाच्या विशिष्ट क्षमतांचा स्वीकार, ओळख आणि विकास यासाठी शिक्षक आणि पालकांना संवेदनशील करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शैक्षणिक आणि इतर क्षमतांच्या सर्वांगीण विकासावर पूर्ण भर दिला जातो. मूलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र

यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे, ज्यामुळे नवनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी सर्जनशील आणि तार्किक विचारांना चालना दिली जाऊ शकेल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बहुविद्याशाखीय विद्यापीठांची स्थापना आणि आंतरविद्याशाखीय संशोधनाला प्राधान्य राहील. उच्च शिक्षणात तीन प्रकारच्या संस्था असतील - संशोधन करणारी विद्यापीठे, अध्यापन करणारी विद्यापीठे आणि स्वायत्त पदवी देणारी महाविद्यालये. पदवीप्राप्त करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे बदल करण्यात येणार असून त्यात एक वर्ष पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र, दोन वर्षांनी पदविका आणि तीन वर्षांनी पदवी दिली जाणार आहे. चार वर्षांचा पदवीपूर्व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एक वर्षानंतर पदव्युत्तर पदवी दिली जाईल. 2040 पर्यंत, सर्व विद्यमान उच्च शिक्षण संस्था स्वतःला बहु-विषय संस्था म्हणून स्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवतील.

प्रत्येक विद्यार्थ्याला ज्ञानकेंद्रित भारतीय मूल्यांमधून विकसित दर्जेदार उच्च शिक्षण देणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. हे भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवू शकेल. आमचा अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या मूलभूत जबाबदाऱ्या आणि घटनात्मक मूल्ये रुजवतानाच बदलत्या जगात नागरिकांची भूमिका आणि जबाबदाऱ्यांविषयी जागरूकता निर्माण करेल, अशी या धोरणाची कल्पना आहे. भारतीय ज्ञान परंपरांच्या माध्यमातून भारत देश अधिक समाजाभिमुख होऊन सर्वोच्च गौरवशाली राष्ट्र होईल.

## समारोपीय निष्कर्ष

भारतीय ज्ञान परंपरा अनेक वर्षांपासून चालत आलेली आहे, किंवा विश्वाच्या आरंभापासून चालत आली आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. प्राचीन ऋषीमुनी कोणतेही काम विचारपूर्वक करीत असत. त्यांचे संशोधन कार्य आजच्या तुलनेत अनेक पटींनी चांगले होते. मग ते आयुर्वेद क्षेत्र असो वा विज्ञान. या बदलत्या जगात प्रत्येकजण बदलतो आणि आपणही त्याचे बळी ठरलो आहोत. हळूहळू जीवनपद्धती बदलत गेल्या आणि आमची अधोगती होत गेली. इंग्रज भारतात आल्यानंतर शिक्षण क्षेत्रात अनेक बदल झाले, त्यात संशोधनाचाही समावेश होता. ऋषी-मुनींच्या संशोधन पद्धती जरी पूर्वीपासून असल्या तरी आजच्या काळात त्या क्वचितच पाहायला मिळतात. संशोधन हा भारतीय ज्ञान परंपरेतील एक अंगभूत घटक आहे. अनेक तथ्ये प्राचीन साहित्यात आढळतात, जी तत्कालीन संशोधनाला पुष्टी देतात.

प्राचीन काळी नालंदा, तक्षशिला अशी जागतिक स्तरावर वाखाणल्या गेलेली विद्यापीठे भारतात होती. बख्तियार खिलजीने नालंदा विद्यापीठात शिकणारे हजारो विद्यार्थी, संस्कृत विद्वान आणि गुरुकुल नष्ट केले. आक्रमकांनी तक्षशिला नष्ट केली आणि ग्रंथालये जाळली. असंख्य संस्कृत ग्रंथ नष्ट केले. या विद्यापीठांमध्ये भारतीय ज्ञान परंपरा वैज्ञानिक पद्धतीनुसार अभ्यासल्या जायच्या. ही विद्यापीठे योग आणि आयुर्वेद विज्ञानाची केंद्रे होती. या परंपरेतून भारताने नेहमीच जगाला आध्यात्मिक बंधुता, योग आणि आयुर्वेदाचे ज्ञान दिले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे प्राचीन आणि शाश्वत भारतीय ज्ञान आणि विचारांच्या समृद्ध परंपरेच्या आधारावर तयार करण्यात आले आहे. भारतीय विचार परंपरा आणि तत्वज्ञानात ज्ञान,

शहाणपण आणि सत्याचा शोध हे नेहमीच सर्वोच्च ध्येय मानले गेले आहे. प्राचीन भारतातील शिक्षणाचे उद्दिष्ट हे सांसारिक जीवनाची तयारी म्हणून ज्ञान संपादन करणे असे नाही तर संपूर्ण आत्मज्ञान आणि मुक्ती असे मानले जात असे. त्याचा या धोरणात विचार करण्यात आला आहे.

सहानुभूती, इतरांबद्दल आदर, सौजन्य, लोकशाही भावना, सेवेची भावना, सार्वजनिक मालमत्तेचा आदर, वैज्ञानिक विचार, स्वातंत्र्य, जबाबदारी, समानता आणि न्याय या नैतिक, मानवी आणि संवैधानिक मूल्यांवर आधारित गुण विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांचे सतत मूल्यमापन करण्यावर तसेच शक्य असेल तेथे तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जाईल.

एकंदरीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीतून भारतीय ज्ञान परंपरांच्या समृद्ध मार्गावर चालत नवी पिढी सर्वगुणसंपन्न आणि स्वत:च्या पायावर उभे ठाकण्यासाठी तयार होईल, यात शंका नाही.

## संदर्भ

1. Mandavkar Pavan, Indian Knowledge System (IKS), SSRN electronic journal,
URL: https://papers.ssrn.com/sol3/papers.cfm?abstract_id=4589986
2. Mandavkar Pavan, Indian Knowledge System (IKS), Research Gate
URL: https://www.researchgate.net/publication/374373778_Indian_Knowledge_System_IKS
3. https://iksindia.org/
4. https://en.wikipedia.org/wiki/Indian_Knowledge_Systems

**Available at SSRN:** https://ssrn.com/abstract=4662206

❖❖❖

# मराठीची जडणघडण आणि मराठी लेखनाचे आधुनिक तंत्रज्ञान

# Structure of Marathi and Modern Technology of Marathi Writing

डॉ. सौ. वीरा मांडवकर **(Dr. Veera Mandavkar)**

सहायक प्राध्यापक, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

संचालक, डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर

इ मेल : veeramandavkar18@gmail.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## गोषवारा

मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील असून भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. मराठी भाषेचा उदय प्राकृत भाषेच्या महाराष्ट्री या बोलीभाषेपासून झाला, असे मानले जाते. मराठी देवनागरी लिपीमध्ये लिहिली जाते. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भाषाशुद्धी चळवळ राबवली. मराठी छपाई क्षेत्रात सुरुवातीला अडचणी होत्या. सध्या युनिकोडमुळे मराठी ही संगणकावर बरीच स्थिरस्थावर झालेली आहे आणि मराठी टंकलेखनाचे अनेक पर्याय उपलब्ध झालेले आहेत.

## Abstract

Marathi language belongs to the Indo-European language family and is one of the 22 official languages of India. It is believed that the Marathi language originated from the Maharashtrian dialect of the Prakrit language. Marathi is written in Devanagari script. Marathi language and culture flourished during the Yadavas of Devagiri. Savarkar, the freedom fighter, carried out the language purification movement. Initially there were difficulties in Marathi printing sector. Currently, Marathi is very stable on computers due to Unicode and many Marathi typing options are available.

**बीजशब्द** - भाषा, इतिहास, ग्रंथ, शीलालेख, बीजे, कोश, प्रमाण, समृद्ध

## प्रस्तावना

मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. मराठी ही भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. मराठी महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे १४ कोटी आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. मराठी भाषा भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे आधुनिक रूप आहे. मराठीचे वय सुमारे २४०० वर्ष आहे. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून मराठी भाषेला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. आजतागायत मराठी भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत आणि त्यात सातत्यपूर्ण रीतीने भर पडत आहे. गोवा, गुजरात सारख्या राज्यातही मराठी भाषा काही प्रमाणात बोलली जाते. गोव्यात मराठीला समृद्ध असा इतिहास आहे.

# विषय विवेचन

## 1 मराठी भाषेचा उदय

मराठी भाषेचा उदय प्राकृत भाषेच्या महाराष्ट्री या बोलीभाषेपासून झाला, असे बहुतांशी मानले जाते. नव्या संशोधनानुसार मराठी अन् प्राकृत ह्या एकच भाषा असल्याचे सप्रमाण सिद्ध केले आहे. सदर महाराष्ट्र शासनाच्या संशोधन अभिजात मराठी प्रतिवृत्ताने केले आहे. ज्ञात इतिहासावर पैठण (प्रतिष्ठान) येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली. मराठी ही भाषा देवनागरी लिपी वापरून लिहिली जाते.

मराठीतील आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ गाथा सप्तशती हा सुमारे २००० वर्षांपूर्वीचा आहे. मुकुंदराजांनी विवेकसिंधु या ग्रंथाद्वारे शंकराचार्यांच्या वेदांतावर निरूपणात्मक विवेचन केले आहे. शा.श. १११० सालच्या सुमारास लिहिला गेलेला मराठीतील हा आद्यग्रंथ त्यांनी बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई या आपल्या जन्मगावी लिहिला. इ.स. १२७८ मध्ये म्हाइंभट यांनी लीळाचरित्र लिहिले. त्यानंतर इ.स. १२९० मध्ये ज्ञानेश्वरी या ग्रंथाची रचना ज्ञानेश्वरांनी केली. महानुभाव संप्रदायाने मराठी साहित्यात मौलिक भर घातली. संत एकनाथ यांनी या भाषेत भारुडे लिहिली आणि एकनाथी भागवत, भावार्थ रामायण आदि ग्रंथांची भर घातली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. स्वराज्याची राजभाषा म्हणून मराठीची निवड केली. अमराठी शब्दांचा वापर टाळण्यासाठी शिवरायांनी मराठीचा १४०० शब्दांचा राजव्यवहारकोश तयार करून घेतला. आणि पेशव्यांनी या साम्राज्याचा विस्तार केला. तत्कालीन भारतावर (आताचा पाकिस्तान, इंडिया आणि बांग्लादेश) राज्य करतांना देखील मराठीचा अधिकृत भाषा म्हणून वापर होत असे. इ.स. १९४७ नंतर स्वतंत्र भारत/ इंडिया देशाने मराठीला अधिकृत भाषेचं पद दिलं. इ.स. १९६० मध्ये मराठी भाषिकांच्या एकसंध महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि मराठीस राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला.

राजा केसिदेवरायच्या कारकिर्दीत कोरलेला अक्षी शिलालेख हा आजवर सापडलेला मराठी भाषेतील पुराणतम शिलालेख आहे. अक्षी शिलालेखाच्या शोधापूर्वी कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या उंच मूर्तीच्या पायाशी मराठीत कोरलेला लेख - "चामुण्डराजे करवियले" हा आद्य मराठी लेख समजला जात असे. अक्षी हे गाव महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील अलिबागपासून दक्षिण दिशेस ५ कि.मी. अंतरावर अलिबाग- मुरुड जंजिरा रस्त्यावर आहे. या शिलालेखाचा उल्लेख इ.स. १८८३च्या कुलाबा गॅझेटियरमध्ये आहे. त्या शिलालेखावरील वरील मजकूर खालीलप्रमाणे -

गी सुष संतु । स्वस्ति ओं । पसीमसमुद्रधीपती ।
श्री कोंकणा चक्रीवर्ती । स्री केसीदेवराय ।
महाप्रधान भइर्जु सेणुई तसीमीनी काले प्रव्रतमने ।
सकु संवतु : ९३४ प्रधावी संवसरे: अधिकु दिवे सुक्रे बौलु ।
भइर्जुवे तथा बोडणा तथा नौकुंवली अधोर्यु प्रधानु ।
महलषुमीची वआण । लुनया कचली ज ।
(राजा केसिदेवरायाचा अक्षी शिलालेख इ.स. १०१२)

हा लेख एका ओबडधोबड शिळेवर कोरला असून त्या शिळेचा माथ्यावर चंद्रसूर्य आणि पुन्हा चंद्रसूर्य असे कोरीवकामाचे स्वरूप आहे. लेख देवनागरी लिपीत असून भाषा संस्कृत व मराठी मिश्र आहे. इंग्रजी काल गणनेनुसार या लेखाची तारीख १६ मे सन १०१२ अशी आहे.

अर्थ : "जगी सुख नांदो. ओम पश्चिम समुद्राधीपती श्री कोकण चक्रीवर्ती श्री केसिदेवराय यांचा महाप्रधान भइर्जु सेणुई याने शक संवत ९३४ परिधावी संवत्सर अधिक मासात शुक्रवारी वद्यपक्षात देवीचा बोढणासाठी नऊ कुंवली धान्य दान केले." लुनया हे लेख कोरणाऱ्याचे नाव आहे.

कुडल संगम, ता. दक्षिण सोलापूर येथील मराठी शिलालेख - "वाछि तो विजेया होईवा ।।' कुडल शब्द कन्नड असून त्याचा अर्थ संगम आहे. भीमा व सीना या दोन नद्यांचा संगमावर वसलेल्या या गावात चालुक्यकालीन संगमेश्वर मंदिर आहे. त्याची स्थिती बऱ्यापैकी असून तेथील सभामंडपातील तुळईवर अडीच् ओळींचा लेख कोरलेला आहे. त्याचा काही भाग संस्कृत काही भाग मराठी आहे. शेवटचे वाक्य "वाछि तो विजेया होईवा ।।' असे मराठीत आहे. त्यात काळाचा स्पष्ट उल्लेख आहे. तेथे शके ९४० असे कोरले आहे. साधारणतः इ.स. १०१८ या काळात तो कोरला गेला असावा. श्रवणबेळगोळच्यानंतर दिवे आगार ताम्रपटाचा शोध लागला. त्याचा काळ शके ९८२(इ.स. १०६०) होता. त्यानंतर कुडलचा शिलालेखाचा शोध लागला.

## 2 मराठी भाषेत कालानुक्रमे झालेले बदल

मराठी भाषेचे वय हे साधारणपणे २५०० वर्ष मानले जाते. या काळात समाज जीवनातल्या बदलानुसार ही भाषा सतत बदलत राहिली. तरीही सर्वसाधारणपणे ठळक फरक खालील प्रमाणे करता येतात.

### 2.1 आद्यकाळ

हा काळ इ.स. १२०० पूर्व, म्हणजे लीळाचरित्र आणि ज्ञानेश्वरी या ग्रंथाचा लिखाणाचाही पूर्वीचा काल होय. काळातील मराठी शब्दांचे तसेच काही वाक्यांचे उल्लेख ताम्रपटात तसेच शिलालेखात आढळतात. परळ, मुंबई येथे आढळलेला शिलालेख इ.स ११०९ मध्ये कोरला गेला.

### 2.2 यादवकाळ

हा काळ इ.स. १२५० ते इ.स. १३५० असा आहे. देवगिरीचा यादवांचे महाराष्ट्रावर राज्य असल्याने मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा होता. अनेक लेखक व कवी यांना राजाश्रय होता. याच काळात महानुभाव या पंथाची सुरुवात झाली. चक्रधर स्वामी, भावे व्यास, महिंद्र व्यास, नागदेव आणि महदंबा यांनीही मराठी वाङ्मयात महत्त्वाची भर घातली. वारकरी संप्रदायास सुरुवात झाली. महाराष्ट्राचा बहुतेक सर्व जातीत यामुळे संतांची परंपरा जन्मास आली व त्यांनी वेगवेगळ्या प्रकारे काव्यरचनेस सुरुवात केली. नामदेवशिंपी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सावता माळी, चोखा मेळा, बंका महार, सेना न्हावी, कान्होपात्रा यांनी भक्तिपर काव्यरचना केल्या व मराठी साहित्याचे दालन वैविध्यानी समृद्ध केले.

### 2.3 बहामनी आणि सल्तनत काळ

हा काल इ.स. १३५० ते इ.स. १६०० असा आहे. यादवांचे स्वराज्य संपून मुसलमानी काळ सुरू झाला. सल्तनत काळात मराठीचा वापर मोठ्या प्रमाणात होत असे. राज्यकर्ते मुस्लिम असले तरी स्थानिक सरंजामदार, जमीनदार, महसूल गोळा करणारे अधिकारी आणि बहुसंख्य लोकसंख्या हिंदू होती. प्रशासन आणि महसूल संकलन सुलभ करण्यासाठी, सुलतानांनी अधिकृत कागदपत्रांमध्ये मराठीच्या वापरास प्रोत्साहन दिले. तथापि, त्या काळातील मराठी भाषेत बरेच फारसी प्रचलित झाले. उदाहरणार्थ, दररोजच्या भाषणात वापरलेले शब्द जसे की बाग, कारखाना, शहर, बाजार, दुकान, हुशार, कागद, खुर्ची, जमीन, जाहिरात इत्यादी. अहमदनगर सल्तनत काळात मराठी ही प्रशासनाची भाषा बनली. विजापूरच्या आदिलशाहीनेही प्रशासन आणि रेकॉर्ड ठेवण्यासाठी मराठीचा वापर केला. अशा धकाधकीचा काळातही मराठी भाषेत साहित्याची भर पडली. नृसिंह सरस्वती, भानुदास, जनार्दन स्वामी, एकनाथ, दासोपंत, रंगनाथ, विष्णूदास नामा, चोंभा यांनीही मराठी वाङ्मयात भक्तिपर काव्याची भर घातली.

### 2.4 मराठा साम्राज्याचा काळ

हा काळ अंदाजे इ.स. १६५० ते इ.स. १८१८ असा आहे. या काळात मराठी स्वराज्याची स्थापना झाल्याने मराठी भाषेवरील फारसी शब्दांचे आक्रमण थंडावले. असे मानले ज़ाते की शिवाजी महाराजांनी रघुनाथ पंडित यांस राज्यव्यवहार कोश बनवतांना फारसी ऐवजी संस्कृत शब्द योजना करण्यास सांगितले. याच़ काळात मराठी भाषेला राजमान्यतेसोबत संत तुकाराम, समर्थ रामदास स्वामी यांचामुळे लोकमान्यताही मिळू लागली. मुक्तेश्वर, वामन पंडित यांनीही मराठी काव्य विकसित केले. या शिवाय शिवकल्याण, रमावल्लभदास, मोरया गोसावी, संत महिपती यांनी संत चरित्रे लिहुन संतविजय, भक्तिविजय आदि ग्रंथांद्वारे मराठी भाषेत मोलाची भर घातली.

याकाळात मोरोपंतांनी मराठी भाषेत ग्रंथरचना केलया. तसेच श्रीधर या कवीने आपले हरिविजय व पांडव प्रताप या काव्यांद्वारे खेड्यापाड्यात आपल्या मराठी कविता पोहोचवल्या. याच काळात शृंगार व वीर रसांना स्वतंत्र स्थान मिळाले. यासाठी लावणी व पोवाडा हे हे नवीन वाङ्मय प्रकार मराठीत निर्माण झाले. याच़ काळात वाङ्मय हा रंजनाच़ा प्रकार आहे हे समाजाने मान्य करण्यास सुरुवात केली. याच़ काळात बखर लेखनाची सुरुवात झाली. निरंजन माधव, कृष्ण दयार्णव, रामजोशी, प्रभाकर, होनाजी बाळा, सगन भाऊ हे या काळातील महत्त्वाचे कवी आहेत.

### 2.5 इंग्रजी कालखंड

हा काळ इ.स. १८१८ ते आज़तागायत असा आहे. याकाळात गद्य लेखनाची सुरुवात झाली. कथा लेखनाची बीजे याच़ काळात रोवली गेली. नियतकालिके व गद्यसाहित्य छापण्याची सुरुवात होण्याच़ा हा काल होता. मराठी भाषेत अनेक नियतकालिके या काळात कथा छापू लागली. छपाईची सुरुवात झाल्यानंतर मराठी भाषेचा प्रसार उत्कर्ष वेगाने होत गेला. मराठी पंडित व मराठी भाषेचे अभ्यासक मेजर कँडी या आंग्ल अधिकाऱ्याने मराठी भाषेला विराम, अर्धविराम, प्रश्न आदी विरामचिन्हांनी बांधले. यामुळे मराठी लिखाण सुकर झाले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 1926 पासून राबवली त्यातूनच अनेक मराठी शब्द निर्माण झाले आणि ते आज प्रचलित आहेत. ते वापरण्यात येऊ लागले

### 2.6 स्वातंत्र्योत्तर कालखंड

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भाषाशुद्धी चळवळ राबवली त्यातूनच महानगरपालिका क्रीडांगण सारखे महत्त्वाचे मराठी शब्द निर्माण झाले. साठीच्या दशकाच्या उत्तरार्धात आणि सत्तरीच्या पूर्वार्धात महाराष्ट्रातील सांस्कृतिक-सामाजिक वातावरण बहरून आलेले होते. छबिलदास चळवळ जोमात होती. शेकडो उत्साही, नवर्जनशील तरुण आपापले मित्र घेऊन आणि खांद्याला झोळ्या अडकवून छबिलदासवर थडकत असत. 'युक्रांद' च्या तालमीत तयार झालेले तरुण, दलित पँथर्सचा साहित्यप्रक्षोभ, नक्षलवादाने प्रेरित झालेले नव-कम्युनिस्ट असे एक वातावरण तर दुसऱ्या बाजूला 'अॅकॅडेमिक' साहित्याचा व समीक्षेचा सरोजिनी वैद्य, विजया राजाध्यक्ष आदींचा वाङ्मयीन दबदबा. 'सत्यकथा' नावाचे साहित्यिक केंद्र होते. श्री. पु. भागवत त्यात प्रभावशील होते. मध्यवर्गीयांना रिझविण्याची संपूर्ण जबाबदारी पु.ल. देशपांड्यांवर पडली. 'सत्यकथा' नावाच्या प्रस्थापिताला समांतर असा लघुनियतकालिकांचा प्रवाह आणि वाङ्मयक्षेत्रातील माहिती व गॉसिपचे व्यासपीठ (आणि चव्हाटा) 'ललित' च्या उदयाने सुरू झाला. 'घाशीराम कोतवाल, 'सखाराम बाईंडर' , 'गिधाडे' सत्तरीच्या पूर्वार्धातले. चिं. त्र्यं. खानोलकरांची 'मिस्टरी' आणि 'कोकणी गूढ' त्याचप्रमाणे दिलीप चित्रेंची, विलास सारंगांची बंडाळी याच काळातली. 'नेमाडी' पंथातील नवविद्वान आणि भाऊ पाध्येंची 'वासुनाका' हीसुद्धा साठीच्या दशकातलीच. 'दलित पँथर्सनी साठीच्या अखेरीस आणि सत्तरीच्या सुरुवातीस दिलेले आव्हान जितके उग्र तितकेच आश्वासकही होते.

म्हणजेच यादवकाळात संतसाहित्याने मराठी भाषा तळागाळापर्यंत पोचविली. बहामनी काळात प्रशासनिक व्यवहार मराठीत होऊ लागल्यामुळे तिचा अधिक उत्कर्ष झाला. मराठा साम्राज्याच्या काळात राजव्यवहारकोश अस्तित्वात आला. त्याच काळात लावणी, तमाशाने श्रृंगाराच्या अंगाने आणि पोवाडा संस्कुतीतुन वीररसाच्या माध्यमाने मराठीला रंजनपर स्वरूप आणले. इंग्रजी राजवटीत छपाईचा शोध लागल्यामुळे लेखन आणि त्याचे वितरण सोपे झाले. स्वातंत्र्योत्तर काळात विविध चळवळींनी मराठी भाषेला नवचैतन्य प्राप्त करून दिले.

# 3. आधुनिक तंत्रज्ञान आणि मराठी लेखन

संगणकीकरणाच्या सुरुवातीच्या काळात मराठी लेखनासाठी विविध अडचणी होत्या .

**1.** प्रथमत: मराठी छपाई क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या विविध मराठी मुद्रांमध्ये एकमानकता (स्टँडर्डायझेशन) नसल्यामुळे सुसंगती (कंपॅटिबिलिटीही) नसते. टंकणयंत्रावरील मराठी लिपीसाठीचा कळफलक अजून प्रमणित होऊ शकलेला नाही. त्यामुळे एक माणूस अनेक टंक वापरू शकत नाही. यासाठी राज्य मराठी विकास संस्था प्रयत्नशील आहे.

**2.** मराठीचे टंक (फॉन्ट) हे व्यापारी तत्त्वावर निर्माण केले असल्याने ते महाग किंमतीला विकत घ्यावे लागतात. त्यामुळे त्यांचा वापर मर्यादित होतो व सर्वसामान्य जनतेला ते सहजासहजी मिळत नाहीत. सी डॅक या संस्थेने निर्माण केलेले टंक मोफत उपलब्ध आहेत. मात्र असे टंक मर्यादित संख्येत आहेत.

**3.** हे व्यापारी मराठी फॉन्ट विकताना ग्राहकाच्या गरजेनुसार त्याला टंकांमध्ये ANSI ते UNICODE (युनिकोड)असा पर्याय पुरवत नाहीत.

**4.** आंतरजालावर शोध घेण्यासाठी युनिकोडचा (इंग्रजी :UNICODE) वापर गुगलसारख्या शोध यंत्रामध्ये करता येतो. आपोआप डाउनलोड होणारे डायनामिक टंक युनिकोड कंपॅटिबल नसल्यामुळे शोध यंत्रात चालत नाहीत.

**5.** युनिकोड धर्तीचे टंक विंडोज २००० व त्या पुढील प्रणालींबरोबर मुळातच असतात. जुन्या विंडोज प्रणाली वापरणाऱ्यांना युनिकोड वापरणे जड जाते. परंतु लिनक्सवर आधारित संचालन प्रणालींत युनिकोडचा मूळ म्हणून वापर केल्यामुळे अशा संगणकांवर मराठी वापरताना कमी समस्या येतात.

**6.** हे टंक देवनागरी लिपीसाठी तयार केलेले असल्यामुळे ते हिंदी छपाईसाठी उत्तम चालतात. परंतु काही अक्षरे मराठीसाठी विशेष आहेत, ती सगळी टाईप करता येतील असे टंक कमी आहेत.

सध्या युनिकोडमुळे मराठी ही संगणकावर बरीच स्थिरस्थावर झालेली आहे आणि मराठी टंकलेखनाचे अनेक पर्याय उपलब्ध झालेले आहेत. काळानुसार आणि वापरलेल्या तंत्रज्ञानानुसार संगणकावरील टंकलेखनपद्धतीचे पूर्व-टंकनपद्धती आणि आधुनिक टंकनपद्धती असे दोन प्रकार करता येतील

## 3.1. पूर्व टंकनपद्धती

युनिकोडच्या आधी ही टंकन पद्धती अस्तित्वात होती. यात इंग्रजी फॉन्टच्या ज़ागेवर मराठी फॉन्ट टाईप करता येत असत. (उदा. शिवाजी, कृतिदेव, किरण इत्यादी non-Unicode फॉन्ट आहेत.) तसेच पूर्वप्राथमिक अवस्थेत मराठी भाषेत टंकलेखनासाठी अनेक softwares बनविण्यात आली होती. (उदा. मराठी सोबत इतर भारतीय भाषांमध्ये टंकलेखनासाठी C-DACचे ISM-OFFICE, श्री-लिपी, इत्यादी)

## 3.2. आधुनिक टंकनपद्धती-

आधुनिक टंकन पद्धतीत युनिकोड टंक व विविध keyboard layout यांचा समावेश होतो. यामध्ये लिप्यंतर तंत्रज्ञानाचा वापर करून softwareच्या माध्यमातून मराठी टंकन करतात. ही पद्धती खासकरून कुठलेही प्रशिक्षण न घेता टंकन करणाऱ्या लोकांमध्ये प्रसिद्ध व लोकप्रिय आहे. लिप्यंतरसाठी पुढील software लोकप्रिय आहेत.

**3.2.1**. Microsoft Indic Tool / मायक्रोसॉफ्ट इंडिक टूल : इंडिक टूल हे microsoft या कंपनीने विकसित केले आहे. हे Windows XP, Vista, Windows 7,8,8.1,10 आदी प्रणाल्यांवर चालते.

**3.2.2**. Google Input Tool / गूगल इनपुट टूल : गूगल इनपुट टूल हे गूगल या कंपनीने विकसित केलेले लिप्यंतर software आहे. हे Windows XP, Vista, Windows 7,8,8.1,10 बरोबरच गूगल क्रोम ब्राउजरच्या साहाय्याने कुठल्याही प्रणालींवर चालू शकते.

**3.2.3**. युनिकोड टंकनपद्धती व software.

**3.2.4**. देवनागरी इनस्क्रिप्ट - ज्यांना पारंपरिक टंकन यंत्रावर टंकलेखनाचा सराव आहे, अशांसाठी देवनागरी इनस्क्रिप्ट हा पर्याय विंडोज़ आणि लिनक्स या परिचालन प्रणालींवर मिळतो.

अशाप्रकारे आधुनिक तंत्रज्ञानामुळे मराठी भाषेचे लेखन सुलभ झालेले आहे. त्यामुळे प्रसारमाध्यामांतुन मराठी लेखनाला चालना मिळते आहे. त्याचे स्वरूप परंपरागत लेखनापेक्षा वेगळे असले तरीही मोजक्या प्रमाणात का होइना, दर्जेदार साहित्यनिर्मिती होताना दिसते आहे. 'मराठी लोप पावते की काय' अशा पार्श्वभूमीवर आधुनिक तंत्रज्ञानामुळे मराठीला नवसंजिवनी मिळाली.

## निष्कर्ष -

1. मराठी भाषा भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे आधुनिक रूप आहे.
2. पैठण (प्रतिष्ठान) येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला.
3. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली.
4. अमराठी शब्दांचा वापर टाळण्यासाठी शिवरायांनी मराठीचा १४०० शब्दांचा राजव्यवहारकोश तयार करून घेतला.
5. प्रशासन आणि महसूल संकलन सुलभ करण्यासाठी, सुलतानांनी अधिकृत कागदपत्रांमध्ये मराठीच्या वापरास प्रोत्साहन दिले.
6. मराठी भाषेला राजमान्यतेसोबत संत तुकाराम, समर्थ रामदास स्वामी यांचामुळे लोकमान्यताही मिळाली.
7. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भाषाशुद्धी चळवळ राबवली.
8. साठीच्या दशकाच्या उत्तरार्धात आणि सत्तरीच्या पूर्वार्धात महाराष्ट्रातील सांस्कृतिक-सामाजिक वातावरण बहरून आले.
9. मराठी छपाई क्षेत्रात सुरुवातीला अडचणी होत्या. आधुनिक तंत्रज्ञानामुळे मराठी भाषेचे लेखन सुलभ झालेले आहे.
10. युनिकोडमुळे मराठी ही संगणकावर बरीच स्थिरस्थावर झालेली आहे आणि मराठी टंकलेखनाचे अनेक पर्याय उपलब्ध झालेले आहेत.

## संदर्भग्रंथ व साहित्य

१. कुळकर्णी, अ.अं., प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९६८

३. देशपांडे, कुसुमावती, पासंग, मौज प्रकाशन गृह, मुंबई, तृतीयावृत्ती, १९७१, पृ. ६५–६६.

3. कुरुंदकर, नरहर, धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, १९७१, पृ. ३९.

4. Mandavkar, Pavan, मराठी कादंबरीचा उदयकाल (The Emergence of a Marathi Novel), November 12, 2019,
URL: https://ssrn.com/abstract=3485562 or http://dx.doi.org/10.2139/ssrn.3485562

**Available at SSRN:** https://ssrn.com/abstract=4666934

❖❖❖

## Form IV

(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

**मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका (MPSP)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre**, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | **Annual (January)** |
| 3. Printer's Name | - | **Seva Prakashan**, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

**We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.**





Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

e mail: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For RJI: researchjournalofindia@gmail.com

For MPSP: marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983





| | | | |
|---|---|---|---|
| **Annual Subscription** | - | **Individual / Institutional** | **₹ 500/-** |
| **Account Details : Bank** | - | **Bank of Maharashtra** | |
| **Branch** | - | **Azad Maidan Road, Yavatmal** | |
| **IFSC code** | - | **MAHB0000047** | |
| **MICR coe** | - | **445014001** | |
| **A/c No.** | - | **60175373000** | |
| **A/C Name** | - | **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre** | |



**(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)**



p-ISSN 2454-7409

9 772454 740009

e-ISSN 2582-5305

9 772582 530008